

# एकटे जीव

अरुण कुलकर्णी

# एकटे जीव

कोंकणातून शालेय शिक्षण पुरे करून कोल्हापूर, सांगली, मुंबईला ऊच्च शिक्षणा साठी वणवण करताना कित्येक मनस्वी लोक भेटत गेले. त्यांनी मनावर फार ठसे ऊमटवून टाकले. त्यांना जगासमोर आणायचा हा प्रयत्न आहे.

कोंकणांतल्या गोष्टी सांगताना मालवणी बोली, मुंबईतील मालवण्यांची सुद मराठी, सांगलीची घाटी, कुणबाऊ बोली, मिरजेत वाद्य बाजारांत ऐकलेली हैदराबादी हिंदी व लखनवी हिंदीची जुगलबंदी. अशा कितीतरी वेगवेगळ्या बोलीतून ह्या व्यक्ती आपल्या समोर येतात.

आयुष्यांत एकटेपणाने पण मनस्वी पणाने जगणाऱ्या या लोकांच्या जगावेगळ्या कथा तुमच्या समोर आणताना आम्हाला आनंद होत आहे.

श्री. अरुण कुळकर्णी हे पेशाने ईंजीनियर. स्वतःचा कारखाना चालवणारे कारखानदार. त्यांच्या आयुष्याच्या वाटचालीत त्यानी  अनुभवलेले हे लोक फार सुंदर तऱ्हेने ते वर्णन करीत. त्यांची शैली पाहूनच वाटे कीं यांच्यात एक लेखक दडला असावा. मित्रांच्या व आप्तांच्या आग्रहातून त्यानी लिहीण्याचे मान्य केले. मान्यवर शिरीष पै यांची प्रस्तावना फार बोलकी आहे. त्यांनी केलेले प्रत्येक गोष्टीचे अवलोकन तर एक प्रशस्तीपत्रच आहे.

आज हे दहा गोष्टिंचे पुस्तक प्रकाशीत करताना आम्हाला फार आनंद होत आहे. मराठी बोली भाषांचे हळुवार पापुद्रे आपल्या समोर ऊलगडत जातात व आपण प्रत्येक गोष्टीत गुंगून, हरवून जातो.

सुहास खोपकर

ई-साहित्य प्रतिष्ठान
प्रकाशन

# एकटे जीव

(कथासंग्रह)

लेखक : अरुण कुळकर्णी

kulkarni@technique-baroda.com

07359212211

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

ई प्रकाशक :

ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

ई प्रकाशन : २५ एप्रिल २०१६

©esahity Pratishthan®2016

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# एकटे जीव

लेखक
अरुण गणेश कुळकर्णी.

या कथांचे सर्व अधिकार ©

श्री. अरुण गणेश कुळकर्णी किंवा त्यांचे वारस श्री रविंद्र अरुण कुळकर्णी
८, ग्रीनपार्क सोसायटी,
मकरपुरा रोड बडोदा ३९० ०१० यांच्या कडे आहेत.
मो. ०७३५९२१२२११, ०९४२६५१०७६१ किंवा ०९८२४०१५२६२
Email- kulkarni@technique-baroda.com
Arungk1943@gmail.com

प्रकाशक- सुहास खोपकर
सुहास्यरेखा प्रकाशन,
नंदीधाम
व्रजधाम मंदीर शेजारी,
मांजलपूर, बडोदा.३९० ०११
मो. ०९०९९९२५९६८
Email- suhasyarekhaprakashan@gmail.com

मुखपृष्ठ – केतकी देवळालीकर

पहिली आवृत्ती- डिसेंबर२०१३ -१०००

किंमत- ₹ १९०/-

ISBN-978-81-928195-0-1

कै. मालती ल. पंडीत व श्री. सुरखा सु. घोलकर या माझ्या मोठ्या बहिणींनी वाचायची आवड लावली तर सौ. मंगल सबनीसने गोष्टी लिहीण्यास उद्युक्त केले व प्रत्येक गोष्ट वांचून त्यावर प्रांजळ मत सांगत माझ्या लिखाणाला हुरुप देत गेली. त्या तिघीनाही हा संग्रह समर्पित.

**अरुण गणेश कुळकर्णी**.

## एकटे जीव साठी मान्यवर शिरीष पै यांची प्रस्तावना व अवलोकन



### अरुण कुळकर्णींचे लक्षणीय एकटे जीव

श्री. अरुण कुळकर्णी यांच्या दहा कथांचा संग्रह ''एकटे जीव'' वाचताना मी एका आगळ्यावेगळ्या अपरिचित पण मनाला लुब्ध करणाऱ्या विश्वात प्रवेश केला. ह्या कथा म्हटले तर कथा आहेत म्हटले तर व्यक्तीचित्रे आहेत, तर कधी एखादी कथा लघु कादंबरीचे रूपही धारण करते उ. 'विठाबाई' ही दीर्घ कथा.

श्री. अरुण कुळकर्णी हे जमीनदारांच्या घरातले. पण स्वातंत्र्यानंतर जमीनदारीचे दिवस संपले होते. शिक्षणासाठी त्यांनी कोंकण सोडले आणि इंजीनिअर होण्यासाठी त्यांनी कोल्हापूर, सांगली, मुंबई अशी भटकंती केली. शेवटी बडोद्याला स्थायिक होऊन त्यांनी स्वतःचा व्यवसाय सुरू केला. कोकण ते बडोदा ह्या प्रवासात त्यांनी वेगवेगळ्या प्रदेशातली वेगवेगळी भाषा बोलणारी, भिन्न भिन्न व्यवसाय करणारी, कधी अडाणी तर कधी संन्यास धर्मात पोचलेली विद्वान माणसेही पाहिली. त्यांचे अपूर्व चित्रीकरण त्यांनी आपल्या कथातून केले आहे. त्यांची कथा मनावर इतका विलक्षण प्रभाव टाकते की मनातून हलूच शकत नाही. त्याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांची अर्थपूर्ण, नाट्यमय, ओघवती भाषाशैली. त्यांचे मार्मिक अवलोकन. त्यांचे जीवनाचे खोलवर चिंतन. त्यांनी केलेली माणसांची पारख आणि त्यांनी मानवी जीवनाबद्दल काढलेले निष्कर्ष. एकही एकही कथा त्यानी अशी लिहिलेली नाही की जी वाङ्गमयाच्या उच्च पातळीवर गेली नाही. एक लेखक या नात्याने त्यांना फार वरचे स्थान द्यावे लागेल. आणि प्रामुख्याने त्यांनी ज्या कथाविश्वात आपल्याला फिरवले आहे ते मराठी कथासंग्रहाला अगदी नवे आणि अगदी अपरिचित आहे ह्याबद्दल त्यांचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करावेसे वाटते.

त्यांची प्रत्येकच कथा हृदयाला भिडणारी आहे. ''तिज्या'' ह्या पहिल्याच कथेत ''तिज्या'' ही एक आगळी वेगळी व्यक्ती लेखकाने अगदी जीवंत उभी केली आहे. कुणालाही ''ईठ्ठला'' अशी हांक मारणारी ही व्यक्ती तिज्या लेखकाला आपण असे का करतो ते सांगतो,

**''भज ईठ्ठल, बोल ईठ्ठल, ईठ्ठल ऱ्हाईला सर्वीकडे।**
**तुज्यांत ईठ्ठल, माज्यांत ईठ्ठल, म्हणून कोणा दुखवू नाई.।।**

**परतेकात ईठ्ठल बगायची संवय पाडली की आपल्या हातून कोणाला दुखीवलं जात न्हाई. म्हणून पाप होत न्हाई.''**

तिज्या हा एक अशिक्षित माणूस पण त्याच्या विचारांची परिपूर्णता आणि ज्ञान हे थक्क करून सोडणारे आहे. त्याच्या तोंडचे अभंग मनात घोळत राहातात. लेखकाने हे सर्व तपशील कथेत संपूर्णतया गोळा केले आहेत.

तशीच लेखकाच्या मावशीकडे राहाणारी बाया- हिचे मराठी म्हणींवर प्रभुत्व होते. तिच्या मालवणी म्हणी साध्या, उद्-बोधक आणि मनोरंजक आहेत. हाताने कष्ट करायचे आणि तोंडाने मार्मिक बोलायचे हे तिचे व्यक्तिमत्व मनोरंजक आहे. तिच्या मालवणी म्हणी वाचताना लेखकाचेही भाषाप्रभुत्व व तल्लख स्मरणशक्ती ह्यांचे दर्शन घडते.

"वेडा की ज्ञानी-ज्ञानेश्वर" हे लेखकाने चित्रित केलेले, वरकरणी साध्याभोळ्या, खेडवळ पण आतून पूर्ण ज्ञानी असलेल्या व्यक्तीचे व्यक्तिमत्वही आपल्याला आश्चर्याने गुंग व्हायला लावते. आयुष्याच्या शेवटी पिंपळाखाली विरक्त होऊन बसलेला, देवामागे आंधळे होऊन फिरणाऱ्या माणसाना आत्मज्ञानाकडे वळविणारा हा निःसंग झालेला दरिद्री माणूस, पण शेवटी लोक त्याची समाधी बांधतात. लेखकाच्या हातून उतरलेले हे एक जगावेगळेच व्यक्तिमत्व मनात घर करून रहाते. लेखकाने ज्ञाना जे ज्ञान सांगे ते इतक्या सुंदर भाषेत सांगितले आहे की वाचकाला ते बरेच शिकवून जाते.

"लाडोबा धनगर व कमळा" ही लेखकाने धनगर समाजातून निवडलेली प्रेमळ जोडी डोळ्यापुढे मूर्तिमंत उभी रहाते. त्यांच्या तोंडची भाषा लेखकाने अगदी शब्दशः लेखनातून उभी केली आहे. हे लेखकाचे वैशिष्ट्य आहे. भाषा, मग ती भारदस्त असो, मालवणी असो की कुणबाऊ असो ती फार समर्थपणे लेखक आपल्या लेखनातून वापरत जातो. लेखकाचे हे भाषेचे ज्ञान खरोखर कौतुकास्पद आहे.

"विठाबाई" ही दीर्घकथा तर अपूर्वच आहे. विठाबाईची आयुष्यभराची भटकंती इतकी करूण आणि काळजाची इतकी कालवाकालव करणारी आहे. माहेरी, सासरी, भावाकडे सर्वत्र तिने भोगलेल्या यातना आणि त्रास आणि त्यातूनही मान वर काढून ताठ्याने उभे केलेले आपले जीवन खरोखर वाचकांच्या डोळ्यांत अश्रु उभे करते. ह्या कथेतली ग्रामीण बोली तर लेखकाने इतकी परिपूर्ण वापरली आहे की लेखकाच्या भाषा ज्ञानाचे कितीही कौतुक केले तरी ते कमीच पडेल. या कथेतले विठाबाईचे जीवन हे भारतीय स्त्रीचे जीवन परस्वाधीन, परतंत्र असहाय्य असले तरी त्यातूनच भारतीय स्त्री जीवनातून मार्ग काढीत स्वतःला कशी सांवरत राहाते याची उत्तम जाणीव देते.


"संन्यासी मी" ही कथा एका अत्यंत उच्च आध्यात्मिक शिखर गाठलेल्या, दीर्घ तपःश्चर्या करून साधनेत पूर्ण यश मिळवलेल्या संन्याशाची आहे. त्याच्या साधनेच्या शिष्यत्वापासून तो समाजाचा गुरू होण्यापर्यंतचा प्रवास लेखकाने क्रमाक्रमाने अभूतपूर्व रंगवला आहेच. पण शेवटी गुन्हा केला नसतानाही तुरुंगवास भोगावा लागला तरी तिथेही

त्याची आध्यात्मिक उंची कायम राहाते हे अतिशय प्रभावीपणे दर्शविले आहे. या कथेतून लेखकाचा आध्यात्माविषयीचा गाढा अभ्यास आणि व्यासंग जाणवतो.

शेवटची "उस्तादांची सितार मी" ही कथा लेखकाने काव्याच्या मोठ्या रोमँटिक पातळीवर नेली आहे. ही कथा लेखकाच्या लेखनशैलीचा एक आगळावेगळा गोडवा, माधुर्य आणि कल्पनाशक्तीचा उच्चांक सिद्ध करते. उस्तादजी एक थोर कलावंत तर त्यांची सितार ही तशी निर्जीवच. फक्त एक लाकडी वाद्य पण त्या दोघांत एक आत्मिक ऐक्य निर्माण होतं. ती सितार त्यांच्यावर कशी प्राणपणाने "मोहब्बत" करते ह्याची ही कथा. अन्य कुणा कथाकाराला सुचेलसे वाटत नाही. ही एकच कथा जरी लेखकाने लिहिली असती तरी तो एक महान कथाकार झाला असता. कथेचा शेवट म्हणजे सितारजीचा मृत्यु. हा तर इतका हृदयद्रावक आहे की एका निर्जीव सितारीलाही मानवी दुःख व्हावे ह्याचे नवल वाटते.

"एकटे जीव" हे कथा संग्रहाचे नांवही लेखकाने योग्य असेच दिले आहे. हा समग्र कथासंग्रह म्हणजे अनेक एकट्या जीवांचाच मेळावा आहे. जो एकाकीपणही किती समृद्ध असू शकते हे सिद्ध करतो. मराठी कथाविश्वाला "एकटे जीव" सारखी अभूतपूर्व देणगी देऊन लेखक श्री. अरुण कुळकर्णी धन्य झाले आहेत.

त्यांच्या लेखनिक उंचीचे आणि दर्जाचे योग्य ते कौतुक वाचकांकडून आणि समीक्षकांकडून व्हावे आणि मराठी कथासाहित्यात त्यांना उच्च स्थान प्राप्त व्हावे असा माझा त्यांना मनःपूर्वक आशीर्वाद.



## सदिच्छा

मधु मंगेश कर्णिक दिनांक १ जुलै २०१३

श्री. अरुण कुळकर्णी यांचा **"एकटे जीव"** हा कथा संग्रह वाचला आणि त्या कथांनी मला एका आगळ्या वेगळ्या दुनियेची भ्रमंती करवून आणली. आगळ्या वेगळ्या अशासाठी की ज्या कोकण प्रदेशावर मी गेली अनेक वर्षे लिहीत आहे, त्याच प्रदेशातील मला अनोळखी असलेले अनेक पैलू श्री. अरुण कुळकर्णी यांच्या या कथांतून मला आढळले व मला ते वेगळे वाटले. त्याचप्रमाणे कोकणा बाहेरील ज्या प्रदेशातील लोकजीवनाचे त्यांनी आपल्या कथांमधे वर्णन केले आहे ते लोकजीवनही मला आगळे वाटले. त्या अर्थाने श्री कुळकर्णी यांचे लेखन खरोखरच आगळे वेगळे आहे.

श्री कुळकर्णी यांच्या कथा मी वाचायला घेतल्या आणि त्यामधे हाहा म्हणता रंगून गेलो. त्यातल्या कोकणच्या पार्श्वभूमीवरील कथांनी मला खूपच आनंद दिला. श्री कुलकर्णी हे माझ्या करूळ गावापासून जवळच सह्याद्रीच्या पायथ्याशी असलेल्या एका लहानशा खेड्यातून आलेले. त्यांच्या गांवाला मी लहानपणी भेट दिलेली आहे. त्यामुळे तेथील सह्याद्रीचे कडे, रानोमाळ, तेथील पार्श्वभूमीवरील कथा वाचताना पुनः प्रत्ययाचा आनंद मिळालाच, परंतु खूप दिवसांनी सह्याद्रीच्या पायथ्याशी पुन्हा एकदा मोकळेपणाने फिरून आल्यासारखे वाटले. श्री कुलकर्णी हे कोकण सोडून अनेक ठिकाणी शिक्षणासाठी, नोकरीसाठी हिंडत गुजरातमधे स्थायिक झाले आहेत. प्रत्येक कोकणी माणसाला भासते तशी नशीब काढण्यासाठी परमुलुखात जाण्याची गरज त्यांना लहानपणीच भासू लागली. ते कोकणात रहाते तर कदाचित खोत, जमीनदार, तलाठी, ग्रामसेवक अशा हुद्यांवर काम करीत राहिले असते. परंतु त्यांनी कोकण सोडलं आणि जन्मजात कर्तबगारीने इंजिनिअर होऊन बडोद्यासारख्या दूरच्या भागात व्यवसाय स्थापन करून त्यामधे स्थिर झाले. कोकणच्या लाल मातीचे हेच वैशिष्ट्य आहे. तेथील कर्तबगार माणसे बाहेर जातात तेव्हाच त्यांची प्रतिभा बहरलेली दिसून येते. श्री कुलकर्णी हे व्यवसायाने इंजिनिअर परंतु मनाने कलावंत-लेखक त्यामुळे आयुष्याच्या उत्तरकाळामधे त्यांनी लेखनाचा ध्यास घेतला आणि या **'एकटया जीवांची'** कहाणी वाचकांसमोर सादर केली. श्री कुलकर्णी यांनी शब्दबद्ध केलेला **एकटा जीव** खरे पाहिले तर एकटा नसून तो अनेकांचा सोयरा होईल अशा पात्रतेचा आहे. जो दुसऱ्यावर प्रेम करतो तो कधीच एकटा राहू शकत नाही. श्री अरुण कुलकर्णी

यांच्या कथेतील तीज्या, बाया, लाडोबा धनगर व कमळा, विठाबाई या व्यक्ती कधीच एकट्या नव्हत्या. त्यांनी अनेकांशी आपले नाते जोडलेले होते. तरीही माणूस हा अनेकदा गर्दीत राहूनही एकाकी असतो. तेही त्याचे भागधेय असते. लेखक श्री कुलकर्णी यांनी हा अटळ एकटेपणा जाणून त्याचे चित्रण कथेच्या माध्यमातून केले. त्यांत ते यशस्वी झाले आहेत.

या कथांचे किंवा व्यक्तिचित्रांचे मार्मिक समीक्षण, ज्येष्ठ लेखिका शिरीष पै यांनी केलेले आहे. मी त्यांच्याशी पूर्णपणे सहमत आहे. श्री कुलकर्णी यांचे अवलोकन, निरीक्षण आणि लेखन अतिशय प्रत्ययकारी आहे. त्यामुळे त्यांनी यापुढे या एकट्या जीवांना याच पुस्तकात राहू द्यावे आणि त्यांना भेटलेली असंख्य एकटी नसलेली व्यक्तिचित्रे कथारूपातून वाचकांसमोर आपल्या समर्थ लेखणीने सादर करावी, अशी या निमित्ताने सदिच्छा देतो.

(मधु मंगेश कर्णिक)

## कथा अनुक्रम


तिज्या..........................................................................

बाया............................................................................

वेडा की ज्ञानी- ज्ञानेश्वर...................................................

लाडोबा धनगर व कमळा.................................................

विठाबाई......................................................................

संन्यासी मी...................................................................

जानवली ते मुंबई...........................................................

विचारवंत.....................................................................

उस्तादांची सितार मी.......................................................

सिद्धू............................................................................

# तिज्या

देव दर्शन खरोखर कुणाला झालंय का? फार मोठा प्रश्न विचारल्या सारखे वाटते ना? खरंच काही लोक म्हणतील देव अंतराळात असतो. काही म्हणतील देव्हाऱ्यात असतो. काही देवळात आहे असं मानतात. काही म्हणतात तो कामातच दिसतो. काही वेदाभ्यासात शोधतात तर काही म्हणतात सब झूठ, देव बीव काही नाही.

पण मला देव दिसलाय असं म्हटलं तर तुम्ही पटकन म्हणाल "काय तरी फेकू नका. दिसलाय देव? दाखवा आम्हाला."

मी आता तेच करायचा प्रयत्न करणार आहे. एक अनुभव नाही अनुभूती जी मी जवळून पाहिली, उपभोगली आणि तृप्त झालो. आयुष्याचा अर्थ समजावणाऱ्या, एक प्रचिती देणाऱ्या, दोन वर्षांच्या सहवासात खूप काही शिकवणाऱ्या, एका अशिक्षीत पण निर्मळ मनाच्या जोडप्याची कहाणी. जीचा नायक आहे तिज्या व नायिका आहे वैनी.

तुम्ही ऐकायचं, विचार करायचा, स्वतःची बुद्धी पणाला लावायची व मगच ठरवायचं देव आहे की नाही. आणि असेल तर तो कसा दिसला तुम्हाला या गोष्टी मुळे.

१९६३ चे वर्ष मी शिकायसाठी सांगलीला गेलो. रहायची व्यवस्था करायची होती. आणि शामराव पाटीलनी ती लगेच केली. सांगली त्यावेळी एक लहानसं शहर होतं. माधवबाग, विश्रामबाग वगैरे जवळपासची छोटी उपनगरं. आजूबाजूला शेती करणारे बरेच पाटील. शामराव त्यांतलाच एक.

शामरावने मला त्याच्या घरी पहिल्यांदा नेले तेव्हा नेहमीचा कुणालाही येणारा बुजरेपणा माझ्यातही आला. हंबीरराव पाटील, शामरावचे वडील घराच्या दर्शनी ओसरीवर एका भल्यामोठ्या आराम खुर्चीत बसले होते. जबरदस्त व्यक्तित्व, भल्या मोठ्या आकडेबाज मिशा, सफेद धोतर, सफेद बंडी नी हातात पानाचा उघडा डबा घेऊन ते सुपारी

कातरीत होते. शामराव अदबीने समोर उभे राहून बोलते झाले “बाबा हा माजा दोस्त हाय कालेजचा. हितं माज्या बरोबर ऱ्हाईल म्हणतोय मी. मग दोगांचा बी अभ्यास बरोबरीनं चांगला होईल. कसं?” सगळं बोलणं खास घाटी बोलीत बोलत होता शामराव.

“ऱ्हावा की, आमी का नाय म्हणणार काय राव? अब्यास बेस होणार तर ऱ्हाणार की ते हिथंच.” हंबीररावांचा आवाज त्यांना शोभणाराच होता. एवढ्यात आतून एक उंचापुरा हंबीररावांसारख्याच मिशा ठेवलेला चाळीशीच्या आजूबाजूचा माणूस बाहेर आला. शामराव कडे बघून बोलला “काय शामराव! पावणं घेवन आलासा वाटतं? कोण नवा दोस्त का?” एवढं विचारून शामराव काही बोलायच्या अगोदर ते अंगणात उतरले. बाजूलाच असलेल्या एका तबेल्यातून घोडा बाहेर घेवून आले. व त्यावर स्वार होवून दुडकत निघून पण गेले. कुणाला येतो पण म्हणाले नाहीत. माझे लक्ष हंबीररावांकडे गेले. ते कौतुकाने त्या माणसाच्या पाठमोऱ्या छबी कडे पहात होते.

शामराव म्हणाला “चला राव. आपण आपल्या रूम मदे जाऊ.”

मी सामान उचलून त्याच्या मागे जात होतो. जाताना वाटेत हंबीररावां समोरूनच जायचे होते. त्यांच्या पुढ्यात पोचलो. सामान खाली ठेवून त्यांच्या पाया पडलो तर गडगडाट हसायला लागले. मी गडबडल्या सारखा झालो. हंबीरराव जोरात हसत म्हणाले “शामराव बगा हे तुमचे दोस्त. पाया पडले आमच्या. ईठ्ठल वाटलो आमी. बगा तुमी न्हाई कदी पडत. हे पडले. तिज्याच्या पंक्तीत बसतील हे.” तिज्या म्हणजे? तिज्या हे नांव मला नवीनच ऐकू आले.

सामान उचलून खोलीत गेलो व पहिला प्रश्न शामरावला केला. “हे तिज्या कोण?”

“भाऊ हायेत आमचे. आसं बगा मगाशी घोड्यावरनं गेले ते मोठे दादा, नांव सुभानराव, मगचे तुमी नाय बगीतलेत ते मल्हारराव. मगचे ते तिज्या तिसऱ्या नंबरचे म्हणून तिज्या खरे नांव किसनराव व नंतर आम्ही शामराव” शामरावने सगळी कुळावळ स्पष्ट केली. चार भाऊ होते तर. मी मनात खूणगांठ मारली.

मग दिवस सगळे समजण्यात गेला. माझी चांगलीच व्यवस्था झाली होती. मला व शामरावला दोन लाकडी बेड होते. दोन कपाटे होती. पण अभ्यासाचे टेबल मात्र एकच होते. मी सामान कपाटात लावले. मग शामरावला म्हटले “शामराव, आंघोळ कुठे करायची? बाथरूम कुठे?”

“जाऊ की नदीवर, कृष्णामाईच्या पाण्यात न्हाऊन तर बगा. मस्त वाटंल. थंड पाणी चालतं न्हवं?” शामरावने विचारले नी मी आनंदलो. पोहणे परमप्रिय मग काय चांगले तासभर नदीत डुंबून घरी पोचलो तर कडाक्याची भूक लागलेली.

दुपारचा एक दीड वाजला असेल. ओटीवर चढलो तर खरपूस भाजल्या जाणाऱ्या भाकऱ्यांचा वास दरवळला होता. भूक अजून बळावली. दहा मिनीटांत जेवायला बोलावले.

हंबीरराव बाहेरच्या खुर्चीत बसून जेवत होते. आम्ही आंतल्या माजघरांत गेलो तर दोनच पाने वाढलेली. मनांत आले बाकीचे कुठे गेले?

पानांत ज्वारीच्या गरम खरपूस भाकऱ्या, लसणीची चटणी, लाल चटक डाळीची आमटी व दोन भाज्या, एक वांग्याची व दुसरी पालेभाजी. जेवण जबरदस्त चवदार पण तोंड तिखटाने पोळून निघेल असे. जेवून मस्त झोंप काढली. मग शामरावने फिरायला जायचे काढले. हंबीररावांचे घर, घर कसले वाडाच होता तो, गांवा पासून जरा दूर होते गांवा पर्यंत जायला दहा मिनीटे चालायला लागायचे. फेरफटका मारताना मी शामरावला म्हणालो "शामराव इथे ऱ्हायचं तर सगळ्यांची ओळख व्हायला पायजे. कोण कोण आहेत घरांत ते माहीत पाहिजे."

"बघा राव सकाळी चार भाऊ सांगीतले तुम्हाला. जेवताना वाडत हुत्या त्यां लाल साडी नेसलेल्या मोट्या वैनी व तपकीरी साडीवाली दोन नंबरची. तिज्या नी ती वैनी पहाटेहूनच शेतांत असतात. ते आता रातीलाच येणार बघा. तवाच दिसतील. आमची आई न्हाई. दोन वर्सापूर्वीच गेली. बाबानां पाहलेच तुम्ही. बाकीचे दिसतात ते नोकर चाकर. हळू हळू हुईल सगळ्यांची ओळख. चिंता नको राव. परवापासून कॉलेज सुरू मग काय आपण भायेरच."

फेरफटका करून घरी आलो. मग मी पुस्तक वाचत पडलो. शामराव बाहेर काहीतरी करत बसला होता. रात्रीची जेवणं बसली तर पंक्तीला सगळे होते.

पहिले सुभानराव मग मल्हारराव नंतर अगदीच काटकुळा, राकट, मळकट शेतकऱ्या सारखा वाटणारा, नंतर शामराव व मग मी अशी पंगत. हंबीरराव बाहेरच जेवून झाल्यावर सुपारी खात बसले होते. मी ताडले तिसरी व्यक्ति म्हणजे शामरावचा भाऊ तिज्या असणार.

सर्वांना वाढले गेले. जेवायला सुरवात केली. तिज्यानी मात्र डोळे मिटून पुटपुटायला सुरवात केली. हात जोडलेले होते. मग तोंडून आवाज आला "विठ्ठल विठ्ठल" मग जेवायला सुरवात केली. मी तिज्याना न्याहाळत होतो. कपाळावर गंध, कानाच्या पाळयाना गंध, गळयांत एक माळ बहुदा तुळशीच्या खोडाची. चेहेऱ्यावर एक शांत भाव. खाणे देखील भक्तिने करीत होता. त्याच्या भाकरीचा तुकडा मोडण्यांत, त्या बरोबर भाजी घेण्यांत, प्रत्येक घांस कपाळापर्यंत वर नेवून मग खाली आणून तोंडात घालण्यांत एक लय होती. तो जेवणाला महाप्रसाद समजून जेवतोय असे वाटत होते. नाहीतर आम्ही. बुभुक्षिता सारखे जेवणावर तुटून पडलो होतो. मला ओशाळे वाटले.

सकाळच्याच दोन्ही वहिनी वाढत होत्या. जेवण संपायच्या अगोदर एक बाई पाण्याने भरलेले दोन दोन गढू आणून प्रत्येकासमोर ठेवू लागली. माझे लक्ष तिच्यावर गेले. ऊन्हांत रापलेली, शेतांत काम करणारी वाटली. तिच्या गळयांत बारीक पोताचे मंगळसूत्र व बरोबर तशीच तुळशीची माळ दिसली. पटकन समजलो ही तिसरी वहिनी. तिज्याची बायको. बाकी

दोन्ही अलंकारानी नटलेल्या. ही लंकेची पार्वती. पण कपडे, केस व जामानीमा एकदम सुटसुटीत. चेहेरा पाणीदार व समाधानाने भरलेला. मनांत आले ही विसंगती कशी?

पोहलो, चाललो, भरपेट जेवलो मग रात्री वाचता वाचता डुलकी येवून गाढ झोपून गेलो. शामरावने तर माझ्या अगोदरच खर्ज लावायला सुरूवात केली होती.

पहाटे जात्याची घरघर व बरोबर सुंदर मंजूळ आवाजांत म्हटलेल्या ओव्या ऐकू येवू लागल्या.

रकमा माझी आई, रकमा माझी बहीण।
जात्या वरी आटवे, दळतां ज्वारीचं ग दाणं।।
रकमा माझी आई, रकमा माझी बहीण।
विसावली मी तिच्या कुशी, करतां दळण कांडण।।
रकमा माझी आई, रकमा माझी बहीण।
ईठ्ठलाची ग राणी, माझ्या मायेचं कोंदण।।
रकमा माझी आई, रकमा माझी बहीण।
मनांत माझ्या ऱ्हाते, जनु माझी मैतरीण।।

रखुमाईला आई, बहिण व मैत्रीण करून ही बाई अशी काही गात होती की त्यांतून प्रेम जिव्हाळा ऊतू जात होता. पहाट सोनेरी वाटू लागाली. भान हरपून मी ओव्या ऐकत बसलो.

तासाभरांत ओव्या थांबल्या. मी उठून बाहेर आलो. तोंड धुवून येतो तर समोर तिज्यावहिनी दिसल्या. मला बघून हंसल्या व म्हणाल्या "भौजी लवकर उटलासा? झोप लागली नव्हं?" मी पटकन बोललो "झोप तर छानच झाली, पण पहाट केवढी सुंदर वाटली! वैनी तुम्ही किती छान ओव्या म्हणता हो!" "माज्या ओव्यानी जागलात होय? उद्या पून हळू म्हणीन हो." वैनी.

"मुळीच नको. उलट मला आवडतील ओव्या ऐकायला. काय छान वाटलं तुमच्या ओव्या ऐकून." मी म्हणालो नी खोली कडे निघालो.

"चा घ्यायला या हो. करते मी. बाकी कोणी उठत नाय सक्काळच्या पारी" वैनी बोलली

खोलीत टॉवेल ठेवून मी चहा प्यायला गेलो तर कोणीच नाही. आंतल्या खोलीत चुलीकडे कोणीतरी होते. दुसराच दिवस, चुलीच्या खोलीत कसे जाणार? मग मी जरासा खांकरलो. आंतून आवाज आला "या ईठ्ठला, या. चा तयार हाय." पुरषी आवाज स्वयंपाक घरांतून आला व मी आंत गेलो. वैनी चुलीवर भाकरी भाजीत होती. दुसरीकडे चहा ठेवला होता. दूध गरम करून, चुली पुढे निखाऱ्यावर ठेवले होते. बाजूला पाटावर तिज्याभाऊ बसले होते. त्यानी मलाही पाट मांडला. घरांत आम्ही तिघेच उठलेले होतो. अजून तांबडेपण फुटले नव्हते. उजेड पण पडला नव्हता. "ईठ्ठला! कोण गांवचं हो आपण? शामरावांबरोबर हात कां साळेत?"

"मी कोंकणातला, कणकवलीचा. इथे आलोय कॉलेजला. शामराव माझ्याच बरोबर आहे. एकत्र अभ्याला बरे म्हणून घेवून आलाय तो इथेच." मी भडाभडा सगळे बोलून गेलो. मी शाळेत नाही, कॉलेजांत आहे, सांगून माझा मान परत मिळवण्याचा प्रयत्न करीत होतो.

दोन दिवसांत तिज्याची व माझी गट्टी व्हायला लागली. गट्टी कसली, माझ्या मनांतली कोडी सोडवायसाठी मीच जवळ जात असे. एक मात्र दिसले. तिज्या कोणालाही हांक मारताना ईठ्ठला म्हणूनच म्हणायचा मग त्याचे नांव घ्यायचा. नोकरांना सुद्धा तो तसेच बोलवायचा. मी विचारले "भाऊ तुम्ही सर्वांना विठ्ठल म्हणूनच हांक मारतां, मग नांव घेता. असे कां हो? समजायचे कसे दुसऱ्याने?"

बगा अभंग सांगतो "भज ईठ्ठल, बोल ईठ्ठल, ईठ्ठल ऱ्हाईला सर्वीकडे।

तुज्यांत ईठ्ठल, माज्यांत ईठ्ठल, म्हणून कोणा दुखवू नाई.।।

परतेकांत ईठ्ठल बगायची सवय पाडली की आपल्या हातून कोणाला दुखीवलं जात न्हाई. म्हणून पाप होत न्हाई."

माझे तोंड कितीतरी वेळ आ वासून बसले होते. केवढे मोठे तत्वज्ञान सांगत होता हा माणूस. हा अशिक्षीत आहे? कॉलेजांत गेलो तरी हे असे ज्ञान आमच्याकडे नाही व येणारही नाही. तिथे विचारांची दिशाच पूर्ण उलटी. एकमेकांचे पाय खेचणारी. चढाओढीची. तिथे हे विचार कसे रूजणार?

सगळ्यांची नांवे भारदस्त "राव"नी संपणारी फक्त तिज्याभाऊंचे नांव असे कां? सगळे तिज्या कां म्हणतात? हा विचार सारखा येई. मग हळू हळू सगळा पाटील घराण्याचा इतिहास हाती लागला.

हंबीरराव पाटलाना चार अपत्ये. चारी मुलगे. सुभान सर्वांत मोठा म्हणून लाडका. घराण्याची प्रतिष्ठा त्यानेच जपायची. म्हणून लहानपणा पासून सगळे लाड पुरवले जायचे. त्यांनी पाटीलकीचा मान आपलाच समजून तशीच वागणूक आचारली. शिकार, घोडेस्वारी. फेटा बांधून गांवभर भटकणे. मोठेपणा स्वतःकडे घेऊन लोकांची भांडणे सोडवणे. हे सगळे करताना त्यांना वेळच मिळत नसे. त्यांची चाल टेंचात असे. डोळयांत मग्रुरी, व बोलण्यांला एक अधिकाराची झालर. हंबीरराव देखील त्याला खतपाणी घालत. धिप्पाड, रगेल, रंगेल व्यक्तिमत्व म्हणजे सुभानराव.

गांवांत तमाशा कोणता आणायचा तिथपासून ते गांवच्या रस्त्याची आंखणी कशी करायची हे सरकारला सांगण्या पर्यंतचा अधिकार सुभानरावाना सगळया गांवाने बहाल केला होता. सुभानराव सकाळी एकदा बाहेर पडले की रात्री आठ वाजायच्या आजूबाजूला घरी येत. ते आले की मोठ्या वहिनी लगबगीने पाण्याचा लोटा व कळशी घेऊन बाहेर येत. अंगणाच्या पाळीवरच हात पाय चेहरा धुवून सुभानराव घरच्या पायऱ्या चढू लागत. हा सगळा सोहळा हंबीरराव मोठ्या कौतुकाने डोळे भरून पहात असत. ओसरीवर ते आले की

हंबीरराव विचारीत "काय राव! आज कामं मनासारखी झाली न्हवं? चेऱ्या वरनं दिसतेय खुषी. म्हणून म्हटलं."

"व्हंय" एवढेच बोलून सुभानराव आपल्या खोलीकडे निघून जात.

मी आश्चर्यांत पडे. मिशानी व्यापलेल्या व करारीपणाचा एकच भाव सतत असलेल्या चेहेऱ्यावर हंबीररावाना खुषी कुठून दिसली? मला वाटायचे हंबीररावाना पुत्र प्रेमाचा विकार झाला असावा. ही वागणूक फक्त सुभानरावानांच मिळायची.

दोन नंबरचे मल्हारराव यांनी आपल्या धोरणी स्वभावाने केंव्हाच जाणले होते. आपण कोणताही अधिकार मिळवू शकणार नाही. मग आपला अधिकार, आपले विश्व कुठेतरी तयार केलेच पाहीजे. मग उनाड गपिष्ट मित्रांची संगत करतां करतां एक टोळी तयार झाली. द्वितीय कां असेनांत पण पाटील पुत्र म्हटल्यावर त्यांना म्होरकेपण सहज मिळाले. मग कोणत्या तरी निवडणुका आल्या व ते राजकारणी झाले. त्यांचे स्वतःचे विश्व तयार झाले. त्या चारपांच गांवच्या आमदाराचे ते उजवे हात म्हणून ओळखले जाऊ लागले.

मग काय खूपच काम, घरी लक्ष देण्यास वेळ नाही. केंव्हा यायचे केंव्हा जायचे ते कोणालाही माहीत नसे. तालुक्याला पार्टीच्या ऑफिसवर भेटतात असे ऐकले होते.

कोणती जमीन कुणाला विकायची इथपासून ते कोणाच्या भावाला की भाच्याला रिक्षा द्यायची इथ पर्यंत सगळी कामे हेच पहात.

मात्र कटाक्षाने एक नियम ते पाळीत. कोणत्याही प्रकारे सुभानरावांना खटकेल असे काम ते करीत नसत, की राजकीय लोकांना करू देत नसत. वडील भावाचा मान राखीत.

जर कधी घरी लवकर आले तर हंबीररावांबरोबर गप्पा मारीत. अर्थात मल्हारराव बोलत व हंबीरराव अलीप्तपणें ऐकत. सर्व राजकारणावर असे. हंबीररावांच्या चेहेऱ्यावरचा कौतुकाचा भाव केंव्हाच गायब झालेला असे.

मला वाटे मल्हारराव आपल्या राजकारणी कामाचा आढावा देऊन त्यांच्या मनांत आपले स्थान तयार करू पहात असावेत. पण हुंकारा खेरीज कोणतीच प्रतिक्रिया न मिळाल्यामुळे थोड्यांच वेळांत मल्हारराव उठून निघून जात.

आता शामराव चौथ्या नंबरचे. आमचे सहअभ्यासू. पाटीलकीचा व पैशाचा भरपूर उपयोग करणारे. हंबीररावांचे शेवटचे लाडके अपत्य. "कॉलेजमधे जातो ते मजा करायला" ही वृत्ती. सिनेमे पहाणे, मित्रांबरोबर सहली काढणे, उगीचच भटकणे, हॉटेलांत मिसळ, भज्यांवर ताव मारणे हे सदोदीत चालू असे. पहिले एकदोन वेळेस मी सहलीत गेलो. पण मग सोडून दिले. कॉलेज बंक करणे मला परवडणारे नव्हते. शामरावला ही समज होती, की मी अभ्यास केला तर परीक्षेत त्याचा फायदा होणार होता. पण प्रत्येक परीक्षे अगोदर चार दिवस हे गृहस्थ महत्वाचे तेवढे विचारून घेत. त्याची उत्तरे काय हे पण मला विचारीत, लिहीत व मग परीक्षा देत. पास मात्र होत.

हंबीररावांकडे एकच प्रश्न विचारला जाई "परीक्षा पास केलीत न्हवं शामराव?" शामराव कडून होकार गेला की लगेच "म्हायतच हाय आमाला! तुमी होणारच! देवान लय हुशारी दिलीय तुमाला." असे म्हणत ते शंभर रुपयाची नोट काढायचे व शामरावला द्यायचे. मला खरोखर तर कीव यायची. शामराव हुशार होता. अभ्यास केला असतां तर चांगल्या मार्कांनी पास झाला असता. पण तो वडीलांच्या लाडाने बिघडला होता. वडील अभ्यासाच्या बाबतीत अज्ञानी. पास व नापास या पलीकडे त्यांना काही माहीत नसे. आणि याचाच फायदा घेवून शामराव चक्क वडिलाना फसवीत होता.

केंव्हाही मागीतले की त्याला पैसे मिळत. सिनेमाचे तिकीट १रूपया २रुपये असायचे असे ते दिवस. शंभर रुपये भरपूर होत. पण तरीही शामराव चार आठ दिवसानी हंबीररावांकडून पैसे उकळे. मजा मारी. मात्र एक गोष्ट तो नियमाने पाळे. मला कॉलेजांत वेळेवर पोचवणे व कॉलेज सुटले की घरी आणणे. माझी कधीच गैरसोय त्याने केली नाही.

मी रात्री अभ्यास करीत असे तर हे मस्त खर्ज लावून झोप काढत. परीक्षेच्या वेळी फक्त जागे होत व मला विचारून काहीतरी लिहीत. किंवा माझ्या नोटस् वाचत.

पण एक जबरदस्त विसंगती म्हणजे तिज्या व त्याची बायको. हंबीररावांचा तिसरा मुलगा. शामराव पेक्षां चार पांच वर्षांनी मोठा.

ते शेतीचा कारभार पहात. कारभार कसला. शेती करून पीक घरांत आणीत मग मात्र त्यावर हक्क सर्वांचा. ते दोघेही सक्काळी उठून आपल्या भाकऱ्या घेवून शेतांत जात ते संध्याकाळी सात वाजतां नाहीतर आठ वाजतां घरी येत.

हंबीररावांच्या या मुलाने बहुदा वडिलांकडून कोणतेही महत्व न मिळाल्याने किंवा पहिल्या पासूनच त्या नावडत्यावर सगळीच कामे टाकल्यामुळे हा मार्ग पत्करला असावा. त्याला कुटुंबात काहीच महत्व नव्हते. तो देखील ते मिळवण्याचा प्रयत्न करीत नसे. मला याचे नवल वाटे.

एकाच बापाची चार मुले पण प्रत्येकाचे स्थान ठरवण्यांत हंबीररावानी पूर्ण पक्षपात केलेला. हंगामात गूळ तयार झाला की सुभानरावाना ते सांगत "सुबानराव गुळ तयार की हो, बगा की मार्केट यार्डांत काय चांगला भाव येतोय कां. येत आसंल तर इकून टाका."

सुभानराव मग बहुतेक मार्केट यार्डाची फेरी करत व गूळाचा सौदा करून टाकत. मग दोन दिवस ट्रॅक्टर-ट्रॉली मधे गूळ भरण्याचे काम चाले. चिकार फेऱ्या होत व तिज्याची आणि वहिनीची दमछाक झालेली असे. पण ते जराही नापसंती दाखवीत नसत. मला एक राहून राहून वाटे. हे लोक अशा कामाच्या वेळी सुद्धा का हातभार लावत नाहीत. का त्या दोघांनीच करायचे?

माझ्या मनांत हळू हळू कुतूहल जागू लागले. असे कां? हे भक्तित डुंबलेले जोडपे एवढे निःस्वार्थी, निःस्पृह कसे? मग ठरवले सुटीच्या दिवसांत शेतावर जायचे, भाजीच्या शिवारांत जायचे. तिज्या व वहिनी काय करतात ते पहायचे.

मग दर सुटीत जायचे ठरवले. शेत घरापासून एक दीड किलोमिटरवर कृष्णेच्या अगदी कांठावर होते. किती एकर होते देव जाणे पण नजरेच्या पलीकडे जात होते. एका दिवसांत सगळे शेत फिरणे अशक्य होते. शेताच्या सुरवातीलाच भाजीचे शिवार होते. बाजूला ज्वारी व मक्याचे शेत पसरले होते. मग उजव्या बाजूला ऊस दिसत होता. लांब पर्यंत ऊसच ऊस. ऊसाच्या व ज्वारी मक्याच्या शेताच्या मधेच मातीच्या लांब लचक मेरा बनवून त्यावर कसली तरी झुडपे दिसत होती. हे सगळं मी भाजीच्या शीवाराच्या मागील बाजूला उभा राहून न्याहाळत होतो. शेतांत लांब एक दोन मजूर काम करताना दिसत होते. तिज्याचा की वहिनीचा कुठेच मागमूस नव्हता. मी असाच उभा असताना मागून आवाज ऐकू येवू लागला. मंजूळ आवाजांत कोणीतरी गात होतं. मी पटकन समजलो वहिनी शिवारांतच आहेत. शिवारांत कित्येक भाज्यांबरोबर काही छोटे छोटे मांडव घालून त्यावर वेली चढवलेल्या दिसल्या. त्या मांडवांच्या मागून तो आवाज येत होता. मी आवाजाच्या दिशेने चालत निघालो.

मांडवा मागे शिवारांत खूप मोठी जागा लहान लहान झाडानी व्यापली होती. व त्यांना हिरवे, लाल टोमॅटो लटकत होते. मांडवांकडे पाहिले तर कित्येकांवर लांब लचक काकड्या म्हणजे वाळके लटकत होती. दहा बारा मांडवांनंतर दुसऱ्या मांडवाना दोडकी, नंतरच्याना दुधी, पापडी सगळयाच भाज्या दिसत होत्या. मांडवांखाली वांगी तरारून उगवलेल्या झाडावर लटकत होती.

हे शिवार अतिशय नेटके होते. कुठेच कचरा, पाला पाचोळा दिसत नव्हता. फक्त शेणाचा एक मंद वास सुटला होता. तोडलेली भाजी गोणत्यात भरून नेटके पणाने एका ओळीत ठेवली होती. थोड्या पुढच्या मांडवां खाली दोन तीन बाया दिसल्या. मी त्या दिशेने जाऊ लागलो. हळू हळू गाणे स्पष्ट ऐकू येवू लागले. तिज्या वहिनी गात होती. मंजूळ आवाजाची पखरण शिवारांत होत होती. आता मला स्पष्ट ऐकू येत होते.

दिसली दिसली पघा मला रकमाई दिसली
हिरव्या हिरव्या येलीतून पघा कशी नटली।।
दिसली दिसली पघा मला रकमाई दिसली
जांभळी साडी घालून वांग्यांवर बसली ।।
दिसली दिसली पघा मला रकमाई दिसली
बोटं भेडीची दावत मला बोलवू लागली।।
दिसली दिसली पघा मला रकमाई दिसली
वेली वरी चौळी होवून कशी खूणवू लागली।।
दिसली दिसली पघा मला रकमाई दिसली
लाल लाल साडी लेवून मिर्ची की हो जहाली।।
दिसली दिसली पघा मला रकमाई दिसली

माझ्या साठी तिनं पघा रूपे कशी घेतली॥

मी गुंगून ऐकत होतो. जवळ पोहोंचलो तर वहिनी पाठमोऱ्या आपल्याच विश्वांत असल्या सारख्या गात होत्या. एका बाईची नजर माझ्यावर गेली व तिने वहिनीला खुणावीत सांगीतले. मागे वळून वहिनी मला बघून म्हणाल्या "भाऊभौजी तुमी आलासा व्हंय? शीवार बगाया आलासा?"

"वैनी, इतके दिवस झाले तुमच्याकडे येवून. शेत बघीतले नव्हते म्हणून आलो. तिज्याभाऊ कुठे आहेत?" मी बोललो.

वहिनी म्हणाल्या "ते तिकडं ऊसांत गेलतां नजर कराया. पाणी खत बगाया गेलं आसतील. येतील जेवणाच्या पारी. काय बगायचय तुमास्नी? मी दावते नां."

मग मला सगळं शीवार त्यानी फिरवलं. एक एका झाडाची माहिती दिली. सगळ्या भाज्या, वेली बघतां बघतां आम्ही शीवाराच्या टोकाला आलो तर ऊसा अगोदरचे ते छोट्या झुडपांचे शेत आले. मी विचारले "ही कसली शेती?"

"भूयमूग हाय तो. खानार? तयारच व्हतोय पघा. कवळं दाणं लय गोड. ईठ्ठल रकमाईच्या परसादावाणी." म्हणत माझ्या हो, नाही ची वाट न बघतां त्यानी दोन झुडपं ऊपटली. भुसभुशीत जमीनीतून मुळासकट ती वर आली. मुळाना कितीतरी शेंगा लटकल्या होत्या. मला देत बोलल्या "ताज्या हाईत. खाऊन पघा, गोड हाईत." लटकलेल्या सगळ्या शेंगा मस्त टपोऱ्या होत्या. प्रत्येक शेंग तीन चार दाण्यांची. एक दोन दाण्यावाली शेंग विरळाच. मनांत आले, काय छान पीक आलेय भुईमूगाचे. नाहीतर बाजारांत शेंगा घेतो तेव्हा एक दोन दाणेवाल्याच जास्त निघतात. चारवाल्या तर भाग्येच निघतात. गोडी तर फारच सुंदर. कोवळ्या, लुसलुशीत, नुकत्याच काढलेल्या शेंगा मी आयुष्यांत पहिल्यांदा खाल्ल्या.

मग टोमॅटो, वाळकं सगळंच एक एक करून वहिनीनी खाऊ घातलं. सगळंच अप्रतीम गोड. ताज्याच्या चवी पेक्षा तिज्याभाऊंच्या व वहिनींच्या प्रेमळपणाची गोडी त्यांत उतरलीय असा विचारही आला.

एवढ्यात तिज्याभाऊ ट्रॅक्टरमधून आले. लगबगीने वहिनी निघाल्या. मला म्हणाल्या चला. मी मागून निघालो. एक छान घर दिसले. जवळ गेलो तर समजले ते गुऱ्हाळ होते. गुळाची मोठी कढई, त्या पुढे एक चौकोनी जागा ज्यांत गरम गूळ ओतून थंड करायचा व मग बादलीत भरून ढेपी बनवायच्या. मी सगळे बघत होतो. मागच्या बाजूला सुंदर पडवी काढलेली होती. त्यांत आम्ही सर्वजण बसलो. वहिनीनी भाकरी काढली व म्हणाल्या "भाऊभौजी या, भाकर खावून घ्या थोडी."

माझे पोट काकडी, टोमॅटो, शेंगा खाऊन भरले होते. काय खाणार भाकरी? मी नको म्हटले तर तिज्याभाऊ बोलले "ईठ्ठला! भाऊ नाराजी करू नाई जेवनावर. ईठ्ठलाचा प्रसाद त्यो. दोनपारी थोडं खा की."

"तिज्याभाऊ! मी काकडी टोमॅटो व शेंगा खाल्ल्यात भरपूर. पोट भरलेय माझे. तुम्ही घ्या जेवून." मी.

"या! ईठ्ठला या! एकच तुकडा भाकरी खा आमच्या संग. पंगती भेद केला म्हणून पाप लागंल की वो आमास्नी." असं बोलता बोलता त्याने अर्धी भाकरी, वर झुणका व चटणी एका पानावर मला दिली. आम्ही तिघं मग खात होतो. तिज्या नी वहिनीचे पान एकच होते. केळीच्या एकच पानावर त्यांनी भाकरी, झुणका, चटणी घेतली होती व ते जेवत होते. शांतपणे जेवण झाले कोणी काहीच बोलले नाही. मग माठांतल्या पाण्यांतून तीन ग्लास भरून वहिनीने आम्हाला दिले. मी तिज्याभाऊ काय करतात ते पहात होतो. त्यानी ग्लासातले पाणी हात धुवायला वापरले. मग परत येवून पाणी प्याले. मी तेच केले. वहिनीनी पण आटपले. तिज्याभाऊ आडवे होवून विश्रांती घेवू लागले.

मग मी बोललो "गप कां सगळे? मला शेत खूप आवडले. तिज्या भाऊ मला सांगाल कां तुमच्या शेतीतलं. खतं केंव्हा घालता, पाणी किती देता, मला आवडेल शिकायला."

"आसं होय, या की मग येळ मिळेल तसं. ईठ्ठला! तुमी तर बगून बगून शिकाल. नी भाजीचं शिकवणरी तुमची वैनी. त्यांत आमी नाय ध्यान देत. या या ईठ्ठला केवाई या." तिज्याभाऊ.

मग डोळे मिटून पडले. वहिनीही बाजूलाच पहुडली. सारवलेल्या फक्त जमिनीवर ते आराम करीत होते. चेहेरे समाधानी दिसत होते. कामाचा थकवा, ताण काही नाही. मी त्यांना कौतुकाने बघत बसलो होतो.

त्यानंतर मी जवळ जवळ प्रत्येक सुट्टीच्या दिवशी त्यांच्या बरोबरच शेतांत जाऊ लागलो. मका, ज्वारी या पिकांची जमीन कशी करायची, पेरणी कशी करतात, पाणी किती लावतात, आंत उगवलेले रान कसे काढावे लागते. सगळे तिज्या काम करतां करता मला सांगत असे. प्रत्येक वेळी ईठ्ठला असायचेच. भुईमूगाची जमीन गादी वाफ्याची तर ऊसाची जमीनही तशीच बनवायची. ऊस एकदा लावला की तीन वर्ष लावणी नाही. दर दहा महिन्यानी पीक तयार होई. सगळ्याना फक्त शेण हेच खत. ते लोक बाजारू खते आणीतच नसत. पण सगळी पिके कशी जोमदार आलेली असत.

तिज्या काम करताना अभंग म्हणे. सगळे विठ्ठला वरचे. असा काही म्हणे की मनाला फार शांत वाटे. एके दिवशी ऊस तोडणी सुरू झाली. ऊस तोडता तोडता तिज्याच्या तोंडून भजन सुरू झाले.

ईठ्ठल माजा सखा, ऊभा चंद्रभागेच्या तीरी।
मला माया त्याची, भरली पघा माज्या ऊरी॥.... ईठ्ठल... ईठ्ठल.... ईठ्ठल.... ईठ्ठल

ईठ्ठल नाम ओठी, ईठ्ठल नाम मनी।
ईठ्ठल नाम घेतो, काम करतां रानी॥.... ईठ्ठल... ईठ्ठल.... ईठ्ठल.... ईठ्ठल

ईठ्ठलाचे नांम घेता, शेतालं मिळते पाणी।
ईठ्ठल माजा मायबाप, देतो भाकरी चटनी॥... ईठ्ठल.... ईठ्ठल.... ईठ्ठल....
ईठ्ठलाचे मन, ईठ्ठलाचे ग्यान, चालईते संसार।
तुज बगुनी मी चालतो, तुज बगुनी हांसतो,
माया तुजी माज्यावर, झाली अपरंपार॥
ईठ्ठला रे! ईठ्ठला रे! माया तुजी माज्यावर, झाली अपरंपार॥
... ईठ्ठल.... ईठ्ठल.... ईठ्ठल.... ईठ्ठल

खूप मजूर तोडणी साठी आले होते. तेही भजनात गुंगून त्याच्याच तालावर सपासप ऊस तोडत चालले होते. बघता बघता ऊसाचा ढीग होत होता. काही जण त्याच तालांत ऊस ऊचलून ट्रॅक्टर मधे भरत होते. मी अवाक होऊन हा सोहळा पहात होतो.

तिज्याने मंजूळ भजनाच्या तालावर सगळ्यांना कामाला लावले होते. कुठे कुणावर ओरडणे नाही. हे कर ते कर अशा सूचना पण नाहीत. फक्त एक ताल, एक लय भजनांत तयार झाली होती. त्याबरोबर सर्वांचेच हात चालत होते. विठ्ठलाचेच काम सगळे करीत होते. एवढी जबरदस्त ताकद एकाद्या भजनांत, ठेक्यांत लयीत असू शकते कां? मला उदाहरण समोर दिसत होते. एवढेच काय मी देखील त्या तालावर मुग्ध होऊन डोलता डोलता केंव्हा कोयता घेवून ऊस तोडायला लागलो समजलेच नाही. संध्याकाळ होत आली काम थांबले. तोडलेला ऊस रांगेत एका शिस्तीत होता. तो भरभरून गुऱ्हाळावर जात होता.

जाडजूड जांभळा, हिरवा ऊस बघून मी अचंब्यात होतो. किती सुंदर आहे ऊस. आजूबाजूच्या इतरांच्या शेतांत का नाही असा? एवढ्यांत तिज्याभाऊ चारफूट लांब ऊसाचे दोन दांडे घेवून आला. मला म्हणाला “ईठ्ठला! भाऊ, ऊस पघा खावून.” एक मला देवून दुसरा त्याने दाताने सोलायला सुरवात केली. मी देखील खाऊ लागलो. काय गोड होता! पुरी साखर भरली होती. पण माझा खाण्याचा वेग तिज्या पेक्षा अर्धा देखील नव्हता. आता घरी निघालो होतो. तिज्या, त्याच्या मागे वहिनी नंतर मी असे चाललो होतो. मी आजूबाजूच्या शेतांवर, शिवारांवर नजर फिरवीत होतो. कितीतरी फरक दिसत होता. तिज्या व वहिनी शेती जीव ओतून करीत म्हणूनच त्यांची शेती, शिवारं डंवरेली दिसायची. मला अजूनही एक शंका आली. तिज्या भाऊचे भजन व वहिनीच्या ओव्या ऐकून तर पिकानां जोम चढत नसेल नां? नाहीतर जवळ जवळच्या जमिनीतील पिकांत एवढा फरक कसा?

घर आले विचार थांबले. पाण्याने हातपाय धुतले. समोर हंबीरराव बसले होते. आमच्याकडे बघून त्यांच्या चेहेऱ्यावरची एकही रेषा हलली नाही. मला एकदम राग आला. कसा आहे हा माणूस? इतके गुणी, देवभोळे, कष्टाळू मुलगा व सून घरी आले तर जराही काही नाही? साधी विचारपूस देखील नाही? शेती बद्दलही काही विचारपूस नाही? मी गप्प आपल्या खोलीत जावून विचार करू लागलो.

रात्रीच्या जेवणाचे वगैरे आटोपले व खोलीत आलो तर झोप आली. पुस्तकाला हात देखील न लावता झोपलो. शामरावला आश्चर्य व काळजी वाटून विचारू लागला "भाऊ तबियत बरी हाय न्हवं? आंग गरम न्हाई नां? गोळी बिळी लागल का?"

"काही नाही रे, ऊस तोडून पाहिला. थकलो थोडा म्हणून झोंप आली." मी

"काय राव तुमचं हे! नोकर होतेच की तोडायला नी तिज्या बी होताच की. तुमी कशाला तोडायला बसला?" शामराव.    मी काही न बोलता झोपून गेलो.

पहाटे जाग आली ती ओव्यानी. वहिनी गात होती. रकमाईची भक्ती आवाजांतून सगळी पहाट भरत, सुंदर करीत चालली होती.

सय आली माहेराची, रकमाईच्या पंढरीची।
मन ईसावलं आठवांत, उचकी आली भकतीची।।
कां ग मला याद केलं, पंढरीच्या माऊलीनं।
सय माजी तिला आली, येळ बग परसादाची ।।
रोकू कशी ग ऊचकी, परसाद घेवयाचा।
लगबग चल बाई, येळ कशी चुकवायाची।।
किती देते रकमाई, माज्या हिरव्या शीवारांत।
गोड गोड फळे शेंगा, म्हणते परसाद मनांत।।
माऊलीच्या किरपेने, शेते उदंड पिकलेली।
दाण्यां दाण्यांत पिकांतल्या, तिची माया झिरपली।।
परसाद नाही थोडा, कोटारं ग भरलेली।
जशी रकमाईची कोठी, माज्या पुढ्यांत ऊसवली।।
कीड मुंगी पक्षी सारे, खावून तुरूप्त झाले।
तिच्या मायेचे तरी , मला बग किती दिले।।
माया तिची आभाळाची, सरवांच्या शिरी।
भक्ती करते रकमाईची, कीरपा राख माज्यावरी।।

ही बाई केवढी तल्लीन होवून गात होती. माझं मन पहाटेच्या विश्वात गार वाऱ्याबरोबर व ओव्यांच्या तालावर हेलकावे घेत होतं. किडे, मुंग्या व पक्ष्यांना पुरे पडून देखील रखुमाईने तिला केवढे दिले त्याचे ऋण आळवतेय. केवढी भक्तिमय झालीय ही बाई? शिवारांत काम करणं, तिथलं पीक हा रखुमाइचा प्रसाद समजणारी बाई. आपल्या श्रमांचा जराही अभिमान नाही. लिहिता वाचता न येणारी बाई एवढ्या ओव्या कशा करते. सगळेच मला अजब वाटत होते. एक खरे, दिवस सुंदर वाटायला लागायचा. मन शांत प्रसन्न व्हायचे.

दिवस जात होते कॉलेज चाललेच होते, पण बरोबर शेती व भक्ती दोघांचाही अनुभव घेणं चाललं होतं. खरं सांगू? त्या सुंदर शेतांत तिज्या बरोबर काम करताना मला फार समाधान वाटे. कां, कसे, काहीच मी सांगू शकणार नाही. पण त्या कर्मयोग्यांचा माझ्यावर

जबरा परिणाम व्हायला सुरूवात झाली होती. रजा पडली की मी खूष. शेतावर जायला मिळणार म्हणून खूष.

आता मी व तिज्या शेती शास्त्रांवर खूप बोलू. तिज्या माझा गुरू झाला होता.

इतर शेतांत बुजगांवणी बांधलेली असत. छोटे मांडव बांधून लोक मांडवावरून गोफणगुंड्याने पक्षी ऊडवत असत. तिज्याच्या शेतांत असले काहीच नव्हते. चिक्कार पक्षी येत. पोटभर दाणे टिपत. पण कोणीही त्यांना उडवीत नसत. मी न राहावून विचारले, "तिज्या भाऊ, तुम्ही कधी पक्ष्यांना उडवीत नाही. किती खावून जातात ते. बाकीचे गोफण गुंडा करतात. आपल्या शेतात नाही करत."

"ईठ्ठला.... ईठ्ठला, भाऊ तुमी असा इचार नका करू वो. माणसाला खायला लागतं तसंच कीड, मुंगी, पक्षानां बी लागतंच न्हवं? ईठ्ठलाचीच परजा ती त्यांना नको खायला? आपण आपली जमीन म्हंतो, कसतो पण जमीन दिली कोनी? ईठ्ठलानंच की. त्याची जमीन मग आसं कसायचं की त्याच्या सगळ्या परजेला मिळालं पायजेल आन् आपल्याला बी. अवो पोटं केवडी वो त्यांची? खाईनांत की पोटभर. आपल्याला कमी पडायचं न्हाई कदीबी. ईठ्ठल सर्वास्नी देणार आपण कोन न्हाई म्हननार? आनी त्यांना दुकीवलं तर ते दुक ईठ्ठलाला नाय का पोचणार? मग त्याची किरपा ऱ्हाईल कां आपल्यावर?"

तिज्या बोलत होता व मी आ वासून हे विश्व प्रेम पीत होतो. एक नवी अनुभूती मनांत तयार होत होती. खरंच हे विश्वच त्याने बनवलंय. माणसाने बळकावलंय. स्वतःच संग्रह करतोय स्वार्थाने. आणि इतर प्राण्याना लागतेय त्याच्या स्वार्थाची झळ. सर्वाना घेवून जगण्याचा हा तिज्याचा मार्ग किती सुंदर, प्रेमळच नव्हे तर पूर्ण श्रद्धेने भरलेला होता. तिज्याही शिकलेला नव्हता. मी शिकत होतो. मला अशिक्षित तिजा सर्वांपेक्षा मोठा, सर्वां पेक्षा ज्ञानी वाटू लागला. त्याला नवीन शोधांची, नवीन सुखसोयींची ओळख देखील नव्हती. तो फक्त भक्ति करायचा विठ्ठलाची व कामही करायचा विठ्ठलाचेच. कर्मयोग व भक्तियोग अजाणतेपणी आचरणारे एक जोडपे माझ्या समोर मूर्तीमंत ऊभे होते. कसे बनलेत हे दोघे? किती अप्रतीम संस्कारी आहेत हे. पण घरी यांना जरा देखील महत्व नाही. हे त्याचे भुकेलेही नाहीत. अव्यवहारी आहेत की संत?

शेतांत त्याने कधी कीड मुंग्याना मारायचे औषध मारले नाही. कुठलेही बाजारी खत वापरले नाही. गोठ्यांतील शेण, कृष्णामाईचे उदंड पाणी व तिज्या आणि वहिनीची मेहेनत ते शेत फुलवीत होती. एक विचार आला. विठ्ठलाचे काम हा स्वतःच विठ्ठल बनून करतोय कां? त्याचे भजन ऐकताना उलगडा झाला. तिज्या गात होता

पंढरपुरी ऊबे, ईठ्ठल रकमाबाई
किरपा त्यांची पोचे, चारी दिशांसई।
पक्षी येती शेतां, खाती पोटभर।
बगूनी तुजी सुरष्टी, मन येते तुज्यावर।। .. ईठ्ठल.. ईठ्ठल.. ईठ्ठल.. ईठ्ठल

माझ्या शेतांत मिळतो, घांस सर्वांसई।

कीड मुंगी संतोषते, मग मनी येई पंढरी॥

तुज्या मायेचा हात, माज्या शीरावरी।

कोटारे भरतोस, आनंद करतोस, माज्या सर्वांवरी॥

ईठ्ठला तुझी माया, सुरष्टीतून दिसे।

मन भरून भरून, तुझी मुरती भासे॥... ईठ्ठल.... ईठ्ठल.... ईठ्ठल.... ईठ्ठल

याच्या मनांत सर्वच कुटुंबाचे प्रेम होते. त्या कुटुंबात घरचे तर होतेच पण किडे, मुंग्यापासून पक्षांपर्यंत सगळेच समावले होते. मनांत आले असे कुटुंब कोणाचे असू शकते? उत्तर मिळाले विठ्ठलाचेच हो.

पुढच्या वर्षी पाऊस खूपच कमी झाला. दुष्काळाची कळा सगळीकडे पसरली. मला पोटात भीती वाटू लागली तिज्या आणि वहिनींचे कसे होईल, काम किती वाढेल, काय करतील ते बिचारे. पण नंतर जे काही तिज्याने केले ते बघून मी थक्क झालो.

“तिज्या भाऊ, दुष्काळ पडलाय. पिकं कशी घेणार? पाणी पुरेल कृष्णामाईचे?” मी विचारले.

“ईठ्ठला! भाऊ, ईठ्ठलाच्या मनांत हाय तेच होईल. आपण म्हेनत करायची. ईठ्ठल म्हेनतीचा आन् भगतीचा परसाद द्यायला चुकंल होय?” तिज्या सगळं विठ्ठलावरच सोडी. या जगाच्या नियमांची तो दखल घेत नसे, की इतरां सारखी चिंताही करीत नसे. या सगळ्या चिंता आपल्याला पटकन जाणवतात, मनांत येतात. याच्या जवळ देखील फिरकत नाहीत. काय म्हणायचे याला? कित्येक कोडी मलाच पडत चालली होती.

दुष्काळ म्हणजे पाण्याची टंचाई. तिज्याने कृष्णामाईच्या पात्रांत बसवलेले पंप आठ ते दहा फूट खाली उतरवले. नदीचे पाणी कमी झाले तरी शेताला ते मिळत रहावे हा विचार. वरच्या पाईपना जोड लावून लांब केले. शेतांत पाणी किती द्यायचे यावर स्वतः नियंत्रण ठेवले. कुठेही पाणी वाया जाणार नाही याची काळजी घेतली. तोंडाने विठ्ठलाचे अभंग आळवणे वाढले. तिज्याची तिनही पिके नेहमी सारखी भरघोस आली. मी थक्क होवून ती पाहिली.

कुणी म्हणतील मेहेनतीमुळे, कुणी म्हणतील वेळीच नियोजन केल्यामुळे, कुणी म्हणतील कृष्णामाईच्या पाण्यामुळे हे अपूप घडले. पण तिज्या म्हणाला “ईठ्ठलाची किरपा” वहिनी म्हणाली “रकमाईची किरपा” पण मी मनांत म्हणालो “ही विठ्ठल रखुमाईच्या मेहेनतीची कृपा” मला तिज्या आणि वहिनी व विठ्ठल रखुमाईत द्वैत दिसेना. ते एकच वाटू लागले. मी कृतकृत्य होत होतो.

मगचे दिवस आनंदाचे होते. शेतावर वहिनींची फुला फळाला आलेली भाजी पहाताना आनंद मिळे. ऊसाची गोडी पूर्वीपेक्षाही गोड वाटे. कोवळ्या भरलेल्या ज्वारीच्या व मक्याच्या कणसांचा हुरडा दाण्यां दाण्यांतून गोडी देत सांगत होता “मेहेनतीत मी आहे रे”

माझे नांव "विठ्ठल रखमाई" व माझी नजर सहजपणे तिज्याकडे व वहिनी कडे जात होती. ते विठ्ठल रखमाईच्या प्रसादाचा आनंदाने आस्वाद घेण्यांत तल्लीन झालेले दिसत होते.

तिज्याचा आनंद मग भजनांतून बाहेर येवू लागायचा.

पंढरीचा ईठ्ठल उबा झाला ऊसातून, जवारीच्या शीवारांत
मकईच्या कणसांतून, भाजीच्या रे वाफ्यातून।
मनीचा ईठ्ठल, रूप दाकवी पिकांतून॥... ईठ्ठल.... ईठ्ठल.... ईठ्ठल.... ईठ्ठल
घांस भरवी सरवां लागी, मनी राखे माया
माया त्याची बगताना, थरथरे काया।
रकमाईची किरपा, तुजा शीरावरी हात
बापा ईठ्ठला तुजे, रोज गातो गीत ॥... ईठ्ठल.... ईठ्ठल.... ईठ्ठल.... ईठ्ठल
पूजा बांदली शेतांत, परसाद आला पीकांत।
मुखी लाव सर्वांच्याही, सुखी कर सर्वांसई,
ईठ्ठला तू ऱ्हातो रे मनांत, माज्या मनांत देवा, माज्या रे मनांत
ईठ्ठल.... ईठ्ठल.... ईठ्ठल.... ईठ्ठल

घरी आलो तरी या आनंदात पुढचे दिवस फिरत होतो. कॉलेज चालू, अभ्यास सुरू. पण रिकाम्या वेळांत हेच विचार शेतावरचे, तिज्या व वहिनीनी केलेल्या किमयेचे. एका साक्षात्काराचे.

मग तिज्याचे सगळे घर डोळ्या समोर आले. तिज्याला न मानणारे हंबीरराव, स्वतःच्या खोट्या मोठेपणांत गर्क असलेला सुभानराव, राजकारणाच्या पडद्याआड उडाणटप्पू झालेला मल्हारराव, खोटे बोलून चैनी करणारा शामराव सगळेच मजा मारण्यांत दंग होते. सगळे घर फक्त तिज्या भाऊच्या मेहेनतीवर चालत होते.

धान्याने कोठारे भरत होती, भाजी घेऊन सांगलीला गाड्या जात होत्या, गुऱ्हाळे संपली की गूळ मार्केटयार्डांत विकला जात होता, जोंधळा, मका सगळी धान्य कोठारांतून व्यापारी येऊन सौदा करून नेत होते. सर्वांचे पैसे बहुदा घरांत हंबीरराव व सुभानरावांकडेच पोहोंचत असावेत. त्यांतून सर्वांचीच मौज मजा चालली होती. मोठ्या दोन्ही सुना दागीन्यानी, साड्यानी नटत होत्या.

असेल एकत्र कुटुंबाचा कदाचित हा नियम. पण कर्त्यांने सर्वांना सारखेच नको का ठेवायला? मुलां मुलां मधे एवढा भेदभाव करायला एका बापाला जमतोच कसा? असे कित्येक व्यावहारिक, कौटुंबिक प्रश्न माझ्या मनांत येत होते. गरीब बिचाऱ्या तिज्या आणि वहिनीं बद्दल मनांत सहानभूती तयार होत होती.

पण मग लक्षात आले. ते दोघेही या विश्वातले नव्हते. किड्या, मुंग्यांचा, पक्ष्यांचा विचार करणारे ते जोडपे फक्त काम जाणत होते. त्यांतून मिळणाऱ्या भाकरीवरच ते खूष होते. शेती उपजावण्यांत व मनपूर्वक विठ्ठलाच्या भक्तित ते पूर्ण गढून गेले होते.

खऱ्या अर्थाने कर्मयोगी, भक्तियोगी, ज्ञानयोगी व म्हणूनच राजयोगांत न्हात होते. माझ्या मनात आलेले विचार त्यांना शिवणारही नव्हते. ते त्याच्या पलीकडे गेलेले होते. गीतोपदेश खूप ऐकला वाचला होता. पण न वाचताही आचरणारे समोर दिसत होते. हे खरे ज्ञानी, हे खरे योगी होते.

विचार करता करता डोळ्यासमोर तिज्याभाऊ आले. हळू हळू वाढू लागले. प्रचंड रूप घेऊ लागले. ते वडाच्या झाडासारखे दिसू लागले. वहिनी पण आल्या. पारंब्या बनून त्यांना बिलगत गेल्या. वरून खाली येताना चारी बाजूनी जमिनीत घुसल्या. आता चित्र स्पष्ट होते. तिज्या एक विशाल वटवृक्ष झाला होता. वहिनी चारी बाजूनी पारंब्या बनून जमिनीत शिरल्या होत्या व वडाला आधार देत आहेत असा भास होत होता.

आता वडाला खूप फळे लागली होती तांबडी गुलाबी. खूप सगळी वटवाघळे येवून वडाला लटकू लागली. संध्याकाळी त्यांचा कर्कश आवाज होवू लागला. वडाची फळे खावून ती राहू लागली. जवळून मी एक एक वाघळाला न्याहाळू लागलो. एक जाडा बोजड मग्रूर दिसला. हंबीरराव वाटला. एक नुसताच टर्रेबाज गिरक्या घेत होता, सुभानरावच होता. खूप वाघळाना घेवून कचकचाट करणारा, सगळीकडे घाण टाकत सुटलेला तो मल्हारराव पटकन ओळखता आला. उगीचच सगळीकडे फिरत बसलेला शामराव सहज ओळखता आला. सगळे वडावर मजा मारत होते. त्याची फळे ओरबाडून खात होते. त्याच्या फांद्यांत पंजांची नखे घुसवून स्वतःला संरक्षित करत होते. व तो वटवृक्ष आनंदाने सगळ्याना न्याहाळत होता, पारंब्या देखील. त्यांच्या मोठेपणाचे रहस्य या सहनशीलतेत, सदभावात होते.

पटकन माझे लक्ष माझ्या स्वतःवर गेले. मी ही एक वाघुळच होतो. शामरावच्या बरोबरीचा. तसाच तिज्याच्या मेहेनतीचे लुटणारा. चमकलो, थरथरलो. कल्पनेने भयंकर अस्वस्थ झालो. नाही, काही झाले तरी इथून निघालेच पाहिजे. आपल्या स्वार्था साठी तिज्यावर व वहिनींवर बोजा नाही टाकायचा. राहू एकाद्या मित्राच्या खोलीवर तात्पुरते. परीक्षा आटोपून जाऊ गांवी. पण इथून निघालेच पाहिजे. हे सहन नाही होणार. मी तर सर्वांत जास्त मिळवलेय तिज्याकडून. मी त्याला काहीच देऊ शकणार नाही. माझ्यांत ती शक्ति ते मोठेपणच नाही. इथून जायला पाहिजे.

संध्याकाळ होत आलेली. पिशवीत पुस्तके भरली, बॅगेत कपडे टाकले. शामरावला म्हटले “मी जातो शामराव. हॉस्टेल मधे आहे. तुला काय लागले तर तिथेच ये.” त्याच्या उत्तराची वाट न पहातां बॅग ऊचलून बाहेर पडलो. हंबीररावांचा हुंकार आता वाघळांचा कचकचाट वाटला. काही न बोलता रस्त्याला लागलो. एवढा त्रासलो होतो स्वतःवरच.

आठ दहा पावले गेलो नाही तर समोरून तिज्या व वहिनी येताना दिसले. जवळ आले दोघांच्याही तोंडून एकच प्रश्न आला “विठ्ठला! भाऊ! कुठं चाललंसा?”

“तिज्याभाऊ, वैनी विचारू नका. मी जातोय पण तुम्ही कायम लक्षात रहाल.” मी

“ईठ्ठला! भाऊ सुकी ऱ्हा. आमाला पण आठाव येईल तुमची.” तिज्या बोलला व वहिनीने हुंकार भरला. आशीर्वाद ऐकता ऐकता माझे डोळे पाण्याने भरत होते. समोर तिजाभाऊ व वहिनी ऊभे होते ते हळू हळू अंधुक होऊ लागले. आणि काय आश्चर्य भरलेल्या डोळयां समोर दोघेही स्पष्ट दिसू लागले पण त्यांचे रूप बदलले होते. माझ्यासमोर साक्षात विठ्ठल रखुमाई उभे होते. पंढरपूरला न जाता देखील ते समोर दिसत होते. खाली वांकून नमस्कार केला. वांकलो तर डोळयांतील पाणी जमीनीवर पडले. उभा झालो तर तिज्या व वहिनी हंसत होते दुसरा आशिर्वाद देत होते.

“ईठ्ठल भलं करो तुमचं”

“रकमाईची किरपा ऱ्हावो तुमच्यावर”

मी गांवचा रस्ता धरला. मागे न पहातां चालू लागलो. तिज्याचे एक भजन अंधुक होत जात होते.

“ईठ्ठला माया राख सर्वांवरी, माया राख सर्वांवरी...... ईठ्ठला...........……………..”

माझी गोष्ट संपलीय. मानाल कां आता मला देव दिसला ते?

******************

# बाया

आमच्या एका मावशीकडे नेहमी एक बाई रहायला यायची. तिचे मावशीच्या घराशी काय संबंध होते ते माहीत पडले नव्हते. पण ती आली की मावशीला फार हायसे वाटायचे. कामाचा  बोजा ती उचलायची म्हणून मावशी खूष. तसेही मावशीचा व्याप फार मोठा. इनामदारांचे घर. कामेच फार असायची. विहीरी वरून पाणी भरा, जेवणासाठी खोपीतून लांकडे आणा, घरात सारवण करा, म्हैशींचे दूध काढा, भाजीचे परडे पहा. सगळीच कामे सकाळपासून रांग लावून उभी असायची. अशावेळी माणुसबळ हवेच. मग बाया सारखी माणसे आली की मावशी खूष व्हायची.

त्यांतच तिच्याकडे फार लोकांची ये जा असे. त्यांचे सर्व करावे लागे. कोर्ट कचेरीची कामे पहाणारे, जमिनीत भागेलीने शेती करणारे, पैशाचे हिशोब ठेवणारे, शिवाय नात्यातले असे सगळेच येत. त्यांचे चहापाणी पहायचे काम मावशीलाच बघावे लागे. अशा वेळी बाया आली की मावशीचा जीव हायसा होई. बाया पोटार्थी बाई. दोन वेळचे जेवण व वर्षांत दोनदा साडी कपडा मिळाला की बाया खूष असा माझा समज होता. मावशी मग चूल बाया कडे सोपवी व आपण बाहेरकामांच्या देखरेखीवर जास्त लक्ष घाली.

बाया व मावशीचे काय नाते ते मला समजले नाही व मी कधी विचारण्याच्या फंदात पडलो नाही. लहानपणी असे प्रश्न मोठ्याना विचारायची प्रथा नव्हती. बाया आली की आम्ही खूष होऊ. तिची मालवणी बोली, त्यांतून येणाऱ्या मालवणी म्हणी पोटदुखेपर्यंत हंसवत. बायाचे पाऊल घरात पडले की मावशी पटकन बोलायची "बरं झालं ग बाय आलीस ते. जीव मेटाकुटीला आला होता माझा."

"इनामदारीण तू गे! जेच्च्या आंगी मोठेपन तेला यातना कठीन. (जया अंगी मोठेपण तया यातना कठीण) सांग काय करूचे ते. सगळे करून देयन बघ चुटकन." बाया मालवणी ऐवजी मराठीत बोलण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत होती, पण  पहिल्याच संभाषणात एक  म्हण तिने टाकलीच होती. आता बाया असेपर्यंत मला खूप मालवणी, तशाच नेहमीच्या म्हणी

ऐकायला मिळणार होत्या. प्रसंगाप्रमाणे ती चपखल म्हणी ऐकवायची. सगळ्या लहान मोठ्यांवर म्हणीतून ताशेरे ओढायची. तरी देखील सगळे हसायचे. तिची बोलायची तऱ्हा व नंतर डोळे मिचकवायची तऱ्हा अशी काही होती की आपल्यावर ओढलेला ताशेरा देखील लागट वाटत नसे.

इथे मला वाचकांची माफी मागावी लागेल कारण तिचे कित्येक म्हणी वजा ताशेरे हे साधनशुचिता पाळणाऱ्याना सभ्य वाटायचे नाहीत अशा खास कोंकणी भाषेत आहेत. त्यांना सभ्य बनवायचा मी अजिबात प्रयत्न करणार नाही. तसे केल्यास बायाला मी जिवंत सादर करूच शकणार नाही.

बाया आता आपली पिशवी मधल्या खोलीतल्या खुंटीवर टांगून हातपाय धुवायला जात असतानाच मावशेला ओरडून सांगते "आकाबाय येतय गे तुजे काय ते शुचीभूत होवन् (शुचीर्भूत होऊन)" हे ऐकून मला हंसू यायला लागते. ही कां म्हणून शुद्ध मराठी बोलायला जाते? तिची मालवणी बोली किती मजेशीर वाटते ऐकायला. पण मावशीशी बोलताना ती मराठीचाच वापर आवर्जून कां करते? आम्ही सगळेच मालवणीत बोलतो, तरी ही कां हेकटपणाने मराठी वापरते? या प्रश्नांची उत्तरे मला कालांतराने मिळणार होती.

आता चूल बायाने ताब्यात घेतली होती. मावशीने सांगीतलेल्या गोष्टी पटापट बनवायला सुरवात केली होती. मावशी आता तिच्याकडून सावर्ड्याची माहिती काढत होती. मावशीचे काही नातेवाईक सावर्ड्याला होते. बाया आली की तिच्या कडून मावशीला त्यांची खुशाली तसेच इतर घडामोडी समजत. मावशी पहिला अर्धा तास बायाशी गप्पा मारल्या शिवाय पुढे सरकत नसे.

"काय गो बाया सुशीलेन सून आणली ना, सा महिने झाले. कसं चाललंय?" रूढी प्रमाणे सासू सुनांचे संबंध कसे आहेत ही माहिती मावशी बाया कडून काढीत होती.

"कसलं काय! सुस्ली काय बोलणार आक्काबाय? रंग गोरोपान नी घर गू घाण असलां चाललांय. अजून तरी सुस्ल्याचं काम काय कमी नाय झालं." बाया आपल्या म्हणी वापरत होती.

मला एक नवी म्हण सांपडली. पण कसली घाणेरडी होती. कोकणी बायका एकाद्याला वरमावायचे ठरवतात तेव्हा त्यांची भाषा सुद्धा जालीम होते. त्या माणसाला अगदी खाली खेचून टाकणारी होते.

"म्हंजे गो? कामाला नाय गो बरी? सुशीलाच मरतेय अजून? नी तो पारसो काय बघत बसलाय? समज नाय देत बायलेला?" त्या सुशीलेच्या कळवळ्याने मावशीचे एकावर एक प्रश्न सुटत होते.

"तो जाणार दुकानावर, सकाळीच जातो. गोवा रस्त्यावर दुकान टाकलांय त्याने. रातच्यालाच येतो परत. सुस्ल्याचा घोव बागायतीत काडतो सबंध दिवस. घरांत सुस्ला नी सून. सून आळशी काय करशील गे मग? भांडून काय ऊपेग (ऊपयोग)? पदरी पडलां पवित्र

गे. दुसरा काय?" बायाने परिस्थिती डोळया समोर उभी करत असतानाच एक म्हण पेरून दिली होती.

"काय गे बाय एक एक ऐकतो. जगात कामसू पणा ऱ्हायलाच नाय गो. हल्ली सगळेच नाजूक होतायत. चला कामं पडलीत बाय." असं बडबडत मावशी उठली. बाया कामाला लागली. मावशी गेलेली बघून मी बायाकडे गेलो. म्हटले "बाया तू आल्यापासून तीन म्हणी फटाफट टाकल्यास. दोन ऐकलेल्या आहेत, पण एक नव्हती कधी ऐकली. तिचा अर्थ काय व केंव्हा वापरायची समजावशील?"

"कुठची रे? मी बापडी म्हणीतच बोलते, सगळे हंसतात. पण काय करू. XXXX संवयच पडली ना." बाया अस्सल कोंकणी शिवी देऊन बोलत होती.

"ती गे! रंग गोरापानवाली" मी

"नको रे बाबा ती म्हण. ती काय शाळेत सांगशील? मास्तर येयल मला मारूक. आमची गांवठी म्हण रे ती एका कानान ऐकूची नी दुसऱ्यान सोडून देवची. तुला काय करायची? आणि काय रे कितवीत तू? म्हणी सुरू झाल्यो तुला?" बायाने माझ्यावर म्हण टाकीतच प्रश्नांचा भडीमार केला.

"मी चौथीत गेलोय. म्हणी केव्हाच झाल्या. तुझ्याकडे भंडार असते म्हणींचे. आता स्कॉलरशीपला बसणार. तिथे उपयोग होतील अशा शिकायच्च्यात ग. सांग ना अर्थ." मी बायाला लकडा लावत होतो.

"काय रे सरळ अर्थ बघ. दिसायला सुंदर असून काय ऊपेग. कामाचाय उरक पायजे ना. मग कोण काम सोडून नट्टापट्टाच करीत बसले, घरच्या कामांत लक्ष नाय घातले तर? घर कसे साफ राहील? मग म्हणतो रे ती म्हण. शाळेत लिवू नुको हां. आणि लिवलीस तर माझे नांव सांगू नुको हां" बाया मला सांगत होती. बायाचा चेहरा किती शांत सरळ वाटत होता. खरंच बाया फार सरळ बाई होती. कामसू होती. तशीच प्रेमळ होती. मावशीवर तर फार माया. दोघी अगदी बहिणींसारख्या वागत.

मावशीचे सोवळे ओवळे फार. पण बाया तिला चालायची. आम्ही थोडे जरी बाहेर जाऊन आलो तरी आम्हाला स्वयंपाक घरांत कशालाच हात लावायला मज्जाव असे. बायाला सोवळे ओवळे पटत नसे. पण मावशीकडे आली की जेवण करताना कडक सोवळे पाळी. मावशीकडे बोलताना मात्र ताशेरे झोडी.

"कसले गे कर्माचे सोवळे. सगळे कधी ना कधी शिवतातच एकमेकाला. ते काय आंघोळ केलव की जाणार? आणि गूळ, साकर काय जातवाल्यानी बनवून पाठवली तुझ्या सोवळयासाठी? फुकट कायतरी ढोंग कशाला करायचं?"

मग मावशी सांगे "अगो हा घराचा नियम आहे. घरांत देव आहेत. सोवळे पाळायलाच लागते. आणि गुळ साखरेचे म्हणशील तर सोवळयाचे करताना ती मी धुवूनच वापरते."

"होय तर साकर नी गूळ धुवून घेतले की भटांसारखे पवित्र होतत नाय. मग काय कशारय पाणी टाकलंस काय पवित्रच होणार. गूळ नी साखर वरून धुवून काय आंतून पण पवित्र होणार? ढोंगा गे सगळी. मी आपली तुझ्यासाठी करतेय. हगुरडा मारलय ना काखेत?" बाया खास कोंकणी तिरकसपणांत मावशीला टोले हाणत होती. मला एक नवीन म्हण किंवा वाक्-प्रचार मिळाला "हगुरडा मारला कांखेत" विचार करून अर्थ लावत बसायचा मग मला छंदच लागला.

हगुरडं पोरगं कांखेत मारलं आणि ते हगलं तरची स्थिती डोळ्या समोर आली. बाई रंगून जाणार. पण ही म्हण इथे कशी लागू? हां! आले लक्षांत! ही सोवळे गळ्यांत घातलेय म्हणून नाइलाजाने करतेय. एकादे काम पटत नसताना निभवावे लागत असेल अशावेळी ही म्हण लागू पडेल. हगुरडं मारलंय ना कांखेत आता ते करेल ते सहन करायचे हा सरळ अर्थ.

खरोखर बाया आली की मजा यायची. तिचे तिरकस बोलणे, बोलताना चेहेऱ्यावरचे हांवभाव व तिच्या म्हणी व उखाणे. डोक्यातल्या मेंदूला खडबडवून जागे करायचे. मेंदूचा वापर बरोबर करायला लावायचे. हंसूही यायचे. मग बाया बद्दल अजून जवळीक वाटायची. बाया एक उत्तम शिक्षक आहे असे वाटायचे.

साखर व गूळ धुण्यावरून निरुत्तर झालेली मावशी कामाचे निमित्त करून बाहेर जायची व बाया सगळ्यांकडे बघत डोळे मिचकवायची. डोळ्यांत भाव असे "मावशीची कशी जीरवली."

माझ्याही मनांत मग नेहमीची म्हण यायची, तुझं नी माझं जमेना नी तुझ्या वाचून करमेना. खरंच मावशी आणि बायाचे असेच होते. पण हळू हळू एक प्रश्न मला सतवू लागला. बाया मावशीची कोण? ऊत्तर कुठून शोधू? मग डोळ्यासमोर आली ती बायाच. बायालाच विचारू. दुसऱ्या कोणाला कशाला विचारायचे.

दुपारी जेवणे झाली की सगळ्यांची वामकुक्षी चालायची. घटकाभर सगळे आडवे व्हायचे. बाया मधल्या खोलीत आराम करीत पडलेली असे. वर खुंटीला तिची पिशवी आणि खाली गोधडी आंथरून पहुडलेली बाया. ती झोपत नसे हे माहीत होते. मी एक दिवशी दुपारी तिच्याकडे जाऊन बसलो. एकदम विचारले "बाया! तू कुठल्या गांवाहून येतेस ग? तुझे कोण कोण आहेत तिकडे?"

"काय रे बाबा आज माझ्या चौकशीवर उतरलंस रे. बघ रे आमच्या सारक्याना कोण नसते. आणि नाय तेच बरे. आता माझीच परवड होते, कोण असते तर त्याचीय परवड झाली असती. नाय कोण तेच बरे." बाया उठली. खुंटीची पिशवी काढली. आंतून चंची काढून चुना तंबाखू मळून बार भरला. मी बघतच बसलो. बाया तंबाखू खाते? पहिल्यांदाच बघत होतो. पण माझ्या प्रश्नाचे उत्तर नव्हते मिळाले.

"बाया तू सांगीतलं नाहीस? बघ तू नाही सांगीतलंस तर मी सगळ्याना सांगेन तू तंबाखू खातेस." मी बालीश दम मारला.

"अरे मेल्या तूं कुठे रंवतस (रहातोस)? कोंकणांत ना? म्हाईत नाय तुला इथे सगळेच तंबाकूवर जगतात. कोणाला नांव सांगणार? तुज्या मावशेला? तिचा संपला तर ती माझा तंबाखू मागून खाते. मला धमकावतोस काय रे?" बाया डोळे मिचकावीत मला लटका दम मारीत होती. तरी पण मी घाबरलो. म्हणालो "तुला नाय सांगायचे ना, जातो मी."

"ये रे बाबा! सांगतय तुला माझी कर्मकाणी (कर्मकहाणी). तूंच पयला विचारणारा रे. मी आले सावर्ड्यासून. शंकरबाबाच्या देवळाकडे घर आहे माझा. तुज्या मावसोबाची भयीण रे मी. पण सरळ सख्खी नाय. ते नाय तुला समजणार. पण तुझ्या मावशेन समजल्यावर आधार दिलान रे. फार समजूतदार बाई. तुझा मावसोबा बोलतो कुठे? पोटा पाण्याला काय नाय झाले तेवा आली इथे. सांगीतली कर्मकाणी आकाबायला. ऐकल्यार तिला वाटले गोष्ट सावरावी नायतर हगत्यालाय लाज नी बगत्यालाय लाज. तिने सोय केली माझी इथे. शेतीचे चार कोपरे हायत् ते पिकले की दोनचार म्हयने काढते तिथेच. बाकी येते इथेच मावशेच्या अनछत्रांत (अन्नछत्रांत). पण मी पण इनामदारच आहे हां. याच घरांतली." बाया काय सांगत होती ते मला काहीच समजत नव्हते. ती मावसोबांची बहीण कशी? मावसोबा बोलत कां नाहीत? सख्खी बहीण नाही तर दुसरी बहीण कुठली? बायाच्या म्हणी प्रमाणेच प्रश्नही मला भेडसावू लागले. ती बोलली त्या म्हणीचा अर्थ इथे कसा लाववयायचा? मी तिच्याकडे टक लावून भोंदल्यासारखा बघत होतो.

"तोंड मीट! तोंडांत मासकी (माशी) जाईल. आणि बघ तू ल्हान रे. तुला नाय समजणार हे आत्तां. मोठा हो आपसूक समजेल. माणूस कसा जगतो, काय काय भोगतो समजेल तुला. एक मासो नी खंडीभर रस्सो म्हणतत ना तसंच रे आयुष्य माणसाचं. एकादा दिवस सुखाचा बाकी सगळे कामाचे नायतर दुःखाचे. आयुष्य मग काय झाला तरी हंसत खेळत घालवायला बघायचे" बायाची म्हण ऐकली नी उठलो.

या सबंध वेळांत मला दोनच गोष्टी सरळ समजल्या होत्या, एक म्हणजे बाया चंदूकाकांची म्हणजे माझ्या मावसोबांची बहीण होती. व तिची अपुरी शेती होती म्हणून ती मावशीकडे यायची. मावशी तशी व्यवहारी असली तरी कंजूस होती. तिने बायाला जवळ कां केले? हगत्यालाय लाज नी बगत्यालाय लाज ह्या परिस्थितीचा अर्थ काय? तिने जर बायाला जवळ केले नसते तर मावशीला कसे लाजीरवाणे झाले असते? काही तरी भारी गोष्ट आहे. बघू समजेल हळू हळू, असे मनात म्हणत मी खेळायला निघालो.

मावशीचे घर फार मोठे. स्वयंपाक घर, मग मधली खोली, बाजूला धान्याच्या साठवणीची खोली. त्या खोल्यांपुढे माजघर माजघराच्या दोन्ही बाजूला एक एक झोपायसाठी खोली. आणि या सर्व खोल्यां समोर एक लांब लचक रूंद पडवी. ज्याच्यावर बैठकी मांडलेल्या. चंदुकाकांचा बसायचा झोपाळा टांगलेला. पडवीतून उतरायसाठी तीन चार ठिकाणी पायऱ्या. पायऱ्या उतरले की मोठे परसू. परसांत सगळीच झाडे लावलेली. नारळ, पोफळी, आंबे, फणस, काजू, पळस, रतांबा, शेगूल अशी मोठी झाडे. तर बरोबरच

जास्वंद, गुलाब, आबोली, कोरांटी, सोनटक्का, कृष्णकमळ, कमळ अशी फुलझाडे भरली होती. कृष्णकमळ व कमळासाठी एक छोटे तळे होते. परसांत फिरण्यांतही मजा यायची.

मी बाहेर येऊन तिकडे चाललो होतो तर नजरेला पडले. मावशी व चंदूकाका बोलत होते."किती दिवस रहाणार ती? महागाई केवढी आहे. आणि तुम्ही ही खाटली गळ्यांत बांधून घेता. पाहिजे तर तिला महिन्याला दहा पंधरा रुपये पाठवा. ब्याद इथे नको." चंदूकाका वैतागून बोलत होते.

"हे बघा तुम्ही यात पडू नका. उगीच मी बसवलेली घडी विस्कटू नका. ती पंचायतीत गेली तर नक्कीच आपल्याला सर्व काही द्यावे लागेल. त्यापेक्षा हे बरे. काय जेवते खाते एवढेच ना? पण कामही केवढे करते. दोन साड्या व कपडा दिला की तिची काही मागणी नसते. तुमच्या वडिलांनी दिली असती बाग, जमीन तर काय झाले असते? असो! ती साधी सरळ आहे. काही जास्त मागत नाही तेच पहा आणि विषय वाढवू नका. उध्या एक साडी ब्लाउजचा कपडा आणा बाकी मी सांभाळते." मावशी चंदूकाकांना समजावत होती.

म्हणजे बायाला सांभाळणे ही यांची जबाबदारी होती तर. पण मावशी प्रेम दाखवून तिचा उपयोग करून घेत होती. मला बायाबद्दल कुतूहल वाढतच होते.

आता गणपती येणार. मग काय घरात कामांची गर्दी झाली. गणपती सात दिवस असणार. सात दिवसांचे प्रसाद ठराविक होते पण त्यांचे सामान पडताळून एकत्र करून ठेवावे लागे. बायाला सगळे तोंडपाठ असल्या सारखे. दोन दिवसांत तिने प्रसादाच्या सामानाचीच नव्हे तर गणपती, गौरीच्या स्थापनेसाठी लागणारे चौरंग, पाट, पूजेची भांडी सगळे साफसूफ करून जय्यत तयार केले. मावशीने बघीतले आणि एकदम बोलली "काय गो बाया एकट्यानेच केलेस?"

"मग काय! कोणाची वाट बघणार! ही कामा म्हणजे भागला पडला बावीत नी बांव झाली झळझळीत सारखी गे. वर्सातून गरज पडली की करायची. नाय तर दररोज कोण करता."

'भागला पडला बांवीत नी बांव झाली झळझळीत.' नवीन म्हण मी अर्थ लावायचा यत्न सुरू केला. भागला विहीरीत पडली, सगळे धावले, तिला काढताना विहीरही साफ करावी लागली. म्हणजे प्रसंगानुसार कधीतरीच करायचे काम केले की ही म्हण वापरायची.

आरत्या, फुगड्या यांतही ती हिरीरीने भाग घेई. भयंकर उत्सवप्रिय बाई. लहाना सारखे सगळ्या खेळांत, उत्सवांत भाग घेई. मावशी व ती दोघेहि पन्नाशी कडे झुकत होते पण फरक केवढा. मावशी इनामदारणीचा बाज राखून फुगडीत भाग घेत नसे. बाया वय विसरून अगदी लहान मुली सारखी दमछाक होईपर्यंत फुगड्या घाली. नुसत्या घालीतच नसे पण सगळ्या पोरीना खेचून खेचून खेळायला लावी. इनामदारांच्या गणपतीला खरं उत्सवरूप बायाच आणी.

गणपतीत मुंबईहून आलेल्या एका मुलीने मावशीला पण फुगड्यांत खेचले. मग मावशी फुगडी घालताना बघून बाया हंसत सुटली जोरांत बोलू लागली "गे बाय आच्चर्यच झाला, भावीण नाचता नी ईनामदारीणय नाचता. असं नाय बा झालां कदी." मावशी झटकन थांबली. मग बाया तिला खेचून फुगडी खेळायचा आग्रह करू लागली. पण मावशी जाम रागावली होती. मग बाया तिचा नाद सोडून मुलींत मिसळून गेली.

बायाने लहानपणाला निसटूच दिले नव्हते. कुठलाही सण ती बारा पंधरा वर्षांच्या मुलीच्या उत्साहाने साजरा करे. तिचा आवाज, हंसणे, नाचणे सगळेच दंग्याला रंग चढवे. ती मग मुलींची लाडकी होई.

या सगळ्या गदारोळांत एकाद्या लहानगीला कोणाचा तरी धक्का लागे. ती पडे. रडू लागे मग सगळे धावत काय झाले पहायला ही गर्दी उडे. बाया पुढे होई. पोरीला पाही. थोडेसे खरचटून रक्त येत असे. धावत जाऊन हळद आणी. तोपर्यंत सगळ्या पोरीनी भोवती गराडा घातलेला असे. बायाला तिच्या पर्यंत पोंचायला अवघड होई. मग बाया ओरडे "बाजूला होवा गो! शेंबूड ईलो एकाक नी सगळे धांवतहत पुसाक, (शेंबूड आला एकाला नी सगळे धांवतात पुसायला) बाजूक व्होवा." ही चपखल म्हण सगळ्याना एका झटक्यांत गारद करी. गपचूप सगळे बाजूला होत.

मावशीच्या आलेल्या नातेवाईक बायका जेवणांत मदत करायला गर्दी करीत. हे बायाची शांती घालवी. तो गोंधळ चाले तेव्हा बाया म्हणे "काय रे बाबा होणार जेवणाचे! आकाबाय सावर गे सगळं, नायतर सातपांच रंभा नी पाण्याचा नाय थेंबा असे होईल." अर्ध्या मुंबयकरांना ही काय बोलली ते कळायचे नाही. आणि गांवच्या बायका समजून हंसायला लागायच्या. बायाची उपस्थिती सणाला खरोखर उत्सवांत बदलून टाकी. इनामदारांच्या घरचे सण बाया शिवाय उजवणे म्हणजे अळणी जेवण्या सारखे झाले असते.

मी दोन वर्षांसाठी माझ्या आई बाबांबरोबर राहायला गेलो. त्यांची सारखी बदली होणारी नोकरी. शाळा बदलत. त्यामुळे अभ्यासांत अडचण येवू लागली. कंटाळलो व आईला म्हणालो "मावशी कडेच बरा अभ्यास होईल. तिकडेच जाऊ दे मला." सगळ्याना पटले. मी मावशी कडे आलो तर पहिले दर्शन बायाचेच झाले. बाया मला पहातांच ओरडली "आक्काबाय सोमगो गेलो नी परूळा पावन ईलो गे. बघ तुझा लाडका भाचा आला." घरांत शिरतांनाच म्हणीची आंघोळ बायाने मला घातली. माझी कळी एकदम खुलली. परत बाया नांवाच्या स्वच्छ, मनमोकळ्या हवेचा श्वास घेतोय असे वाटले. आता म्हणींचा खेळ भरपूर खेळायला मिळणार याचा आनंद झाला. तशी माझी आणि बायाची गट्टी होतीच. त्यामुळे न समजणाऱ्या म्हणींची फोड तिलाच करायला लावणार होतो. बाया आता पूर्णपणे मावशीकडेच रहात होती. सावर्ड्याला जाणे तिने बंद केले होते. ती म्हणायची "कोण हाय माझं तिकडे? माझे सगळे इकडेच नां? आणि हे घर माझ्या बापाशीचेच ना? मला कोण काढील घरातून?"

मी आता आठवीत गेलो होतो. दोन वर्षांत वाचन वाढले होते. माणसाच्या आयुष्याचे, स्वभावाचे पापुद्रे स्वच्छ दिसायला सुरवात झाली होती. म्हणूनच बाया कोण हे माहीत पडले होते. ती चंदूकाकांची सावत्र बहिण होती पण अनौरस. चंदूकाकांचे वडिल इनामदार. जमीन वेगवेगळया गांवात पसरलेली. सावर्ड्याला नारळी, पोफळीच्या बागा व भात शेती होती. बागांची नीगा ते नोकरां करवी करीत. भातशेती भागेलीने करीत. त्या साठी ते कायम सावर्ड्याला जात येत. त्यावेळी तिथे एका बाईशी त्यांचे संबंध जुळले. इनामदारांना त्या काळांत असे एकादे बांडगूळ चिकटलेले असे. कदाचित त्यांची पतही वाढे. त्या बाईला एक मुलगी झाली तीच बाया. चंदूकाकांच्या वडिलानी सावर्ड्याच्या पंचायतीत सांगीतले होते. नारळाची एक बाग व चार एकर भातशेती ते बायाच्या आईला बक्षीसपत्राने देणार होते. बक्षीसपत्र जिल्ह्याच्या गांवी जाऊन करावे लागे. वेळ मिळाला की करून आणीन असे त्यांनी पंचायतीत सांगीतले होते. पण नशिबाचे चक्र फिरले. बायाची आई वारली. तीन चार महिन्यांत चंदूकाकांचे वडिल वारले. बाया त्यावेळी वीशी ओलांडत होती. ती अगदी निराधार झाली. चंदूकाकानी व्यवहार हाती घेतला. त्यांचे नुकतेच माझ्या मावशीशी लग्न झाले होते.

बाया उठली व तडक मावशीकडे आली. म्हणाली "मी तुझी नणंद गे. पण सरळ नाय, सावत्रय नाय. अक्करमाशी ना गे मी. आई वारली, तुज्या सासऱ्यानी नारळाची बाग नी चार एकर भातशेती द्यायची कबुलली होती. पंचायतीत नोंद केलीय पण कागद करायचा रवला (राहिला). पंचायत कब्जा करायला सांगते. पण मी म्हणते घरचे भांडण चव्हाट्यावर कशाला. <u>हगण्यापेक्षा निपटणां बरा.</u> तुझ्या कडे आले, बाई माणूस समजेल या आशेवर. बघ मी एकटी. काय असा भार इनामदारणीवर पडणार गो? माझं काय लगीन होणार नाय, नी मी करणारय नाय. तू आधार दे भयणी सारखी ऱ्हाईन. बघ काय करतेस ते."

मावशी या वादळाने अवाक् झाली. पण बायाचा सरळपणा तिला भावला. मग तिला आधी दोन दिवस रहायचा आग्रह केला. चंदू काकांशी बोलली तर त्यांनी जमीन सोडण्यास नकार दिला. मावशी समोर आता एकच मार्ग दिसत होता. बायाच्या सांगण्या प्रमाणे केले तर भांडणे होणार नाहीत. आणि एका पोटार्थी बाईला आधार देऊन आपल्यालाही तिची मदतच होईल. नाहीतरी इनामदारांचे घर सांभाळताना जडच पडतेय. बाया मावशेच्या घरची झाली. चंदूकाकाना आवडले नाही पण मावशीने त्यांच्या गळी उतरवले.

बायाने म्हण खरी केली <u>हगण्यापेक्षा निपटणे बरे</u>. मला वाटते या म्हणीनेच मावशीला सरळ विचार करायला भाग पाडले.

बाया आपल्या वागण्याने, हंसत रहाण्याने, गोड चिमटे काढण्याने व म्हणी फेकण्याने सगळ्याना हवी हवीशी वाटत होती. माझी बहीण शांती, मावशीची मुलगी, तर सगळेच तिच्याकडून करवून घेई. वेणी फणी, कपडे, आंघोळ सगळे काय बायाकडेच. बायालाही तिचा लळा. केंव्हा तरी मावशी सांगे "जास्त लाड करू नये. डोक्यावर बसतात मुले."

बायाचे उत्तर जायचे म्हणीत "ढवळ्या जवळ बांधलो पवळो नी लागलो तेंका एकमेकाचो लळो. तसंच गे माझं. शांती म्हणजे फार लाडाची. आयस म्हणून रीत भात काय ती तू लाव. मी लाडच करणार." ती आपला अधिकार सोडत नसे.

मला नवल वाटे. बायाने घरावर केवढा अधिकार मिळवला होता. ती गेली असती तर मावशीचा संसार लंगडा झाला असता. इनामदारांचे सण गर्जले नसते. मुलांचे प्रेमळ लाड थांबले असते. स्वयंपाकातल्या लोणच्यांची, फणसाच्या भाजीची, गणपतीतल्या मोदकांची, नवरात्रांतल्या खानतोळयांची, होळीच्या पुरणपोळयांची, संक्रांतीच्या कांटेदार तिळगुळाची, आणि सर्वांत म्हणजे बायाने या सर्वांना दिलेल्या उत्सव रुपाची मजाच गेली असती. बाया आश्रित नव्हती, इनामदारांचा आधारस्तंभ झाली होती. सर्व काही तिने प्रेमाने, म्हणींचा पाऊस पाडत, कामसू सुगरण बनून मिळवले होते.

एक दिवशी बायाला मी म्हटलेच "बाया तुला इतके काय काय येते. फार प्रेमळही आहेस. मग लग्न करून स्वतःचा संसार का नाय केलास? कां आश्रिता सारखी राहिलीस?"

"कोणी सांगीतला बाबा मी इथे मी आश्रीत म्हणून? माझ्या बाबाचं घर आहे हे. आणि मी लगीन केले तर इनामदारीण ऱ्हायली असती कां? ठेवलेल्या बाईची पोरगी मी, रडत कुथत कोणा तरी पापी पितराचा संसार करत बसले असते. आणि ह्या घराचेय हाल झाले असते. माझ्या बाबाच्या वेळेसारखेच दणदणतात बघ सण अजून. तुझ्या चंदू काकाचं नी मावशेचं काम नाय ते. माझा बाबा गेला नी काप गेला नी भोका रवली रे इनामदारांची. ती जगाला दिसू नये, माझ्या बाबाची इनामदारी तशीच ऱ्हावी म्हणून हाय मी इथे. शांतीची आजी, तुज्या चंदुकाकाची आयस रे, ती होती तेवा मला नी आईला सगळ्या सणाला बोलवायची. बाबावर राग नाय धरलान तिने आमच्यावरून. इनामदारी होती तिच्याय रगतांत. नायतर तुझा चंदुकाका कावळ्यान कितीय आंग घासलान तरी बगळो होयत नाय. मला म्हाईत होतं बाबाच्या मागे यांची इनामदारी दरीद्र पकडेल म्हणून आले हिते. माझ्या बाबाला वर शांती वाटली पायजे रे." शेवटच्या वाक्याबरोबर बायाच्या डोळयांतून पाणी ओघळू लागले. केवढे प्रेम केवढा त्याग, केवढी झटापट ते मिळवण्याची, किती मेहनत त्या साठी. बाया फक्त इनामदारांची अनौरस मुलगी नव्हती तर खरीखुरी वारस होती. जया अंगी मोठेपण तया यातना कठीण माझ्याही मनांत म्हण येवून गेली.

शेवटी तिचा दणदणीत विजय बघितला तो शांतीच्या लग्नांत. आम्ही सगळेच लग्नाला गेलो होतो. मावशीला चंदूकाकानी सांगीतले "लग्नाचे दागीने, शांतीचा साडीसुडका सगळे त्या बायच्या ताब्यांत द्या. तिला म्हणावे शांती बरोबरच रहायचे. बाकी कामे इतर बघतील. तिला लागणाऱ्या सगळ्या वस्तु वेळच्या वेळी मिळतील हे बघा म्हणावे. फार जीव आहे शांतीवर करा म्हणावं हौस पुरी."

मी हा बदल आश्चर्याने बघत होतो. चंदूकाका एवढे उदार कसे झाले बायाच्या बाबतीत? खूप मोठी लढाई तिने जिंकली होती. अधिकार पण मिळवला होता. बाया हे प्रकरण आता मला दैवत होत चाललं होतं.

बायाला भेटायला गेलो. तिला हळूच सांगीतले. चंदूकाकानी लग्नांत तिलाच शांतीची राखणदार बनवलीय. ऐकून फाटकन म्हणाली "मलाच ठेवणार रे राखणदार. मीच सांभाळलं तिला. किती डावलणार तो मला? आता म्हायत पडलं त्याला, मुंगीच्या मुतण्यान होवूर येत नाय." वर माझ्याकडे बघत मजेशीर पणाने डोळे मिचकावलेन. एवढी म्हातारी झाली तरी अजून लकबी त्याच होत्या. ही मोठी व्हायला तयारच नव्हती.

मुंगीच्या मुतण्याने पूर येत नाही. काय म्हण पण शोधून काढली होतीन. चंदूकाकाच्या दुस्वासाचा पूर तिच्यासाठी नगण्य होता. त्यांना शेवटी तिचा अधिकार द्यावाच लागला होता. तोही तिला पाहिजे होता तसा. इनामदारांची एक कुटुंबीय म्हणून तिने अधिकार मिळवला होता. जो तिला चंदूकाका नाकारत होता. स्वभाव, वाक्प्रचार, म्हणी किती प्रभावी असतात याचे जीवंत उदाहरण बायाच्या रूपाने मी पहात होते व एकदम आवाज आला "तोंड मीट, मासकी जायल तोंडात. मोठा झालास तरी तोंडाचा आ गेला नाय काय रे? ढेंगान वाढलो पण कानान नाय." बायाने टोकले. पण मला कितीतरी बरे वाटले. सगळयांच्या लकबी, संवयी मनांत जपणाऱ्या बाइचा राग कसा येईल? अंगाने वाढला पण बुद्धीने नायचा शेरा मिळवून सुद्धा मला बायाची माया व आदर वाटत होता.

खऱ्या अर्थाने बाया माझी गुरु होती. काहीच स्वतःचे असे नसताना ती आनंदात होती. तिच्या सारख्या परिस्थितील लोक नशिबाला दूषणे देत रडत कढत जगतात. बाया सरळसोट जगायची. रडणे कढणे म्हाईतच नाही. तिने लहानपण सोडलेच नाही. सगळया सणांत, समारंभात अगदी लहानमुलीसारखी नाचे. सर्वांवर प्रेम करे पण ते करताना चुकाही दाखवे. त्या मात्र म्हणीतून. त्यामुळे लागतच नसत. तोंडात कोंकणातली उघडी नागडी भाषा, पण मन एकदम साफ. एकच धेय, "मी इनामदारांतली तुम्ही नाकारू शकत नाही." आणि जिद्दीने तिने सिद्ध करून दाखवलं. इनामदारांच्या घरांत आपले अस्तित्व, आपली जागा तयार केली. तिला कुणीही हालवू शकले नाही. हत्यार एकच माया करणे. भलभल्या शिकलेल्या लोकाना जमणार नाही अशी विचारसरणी. इतक्या प्रतिकूल परीस्थितीत पण पॉझिटीव विचार करणारी. संतोषी, स्वार्थ अजिबात न ठेवणारी. निरागस व्यक्तित्व म्हणजे बाया.

अशा या बायाचे कित्येक वाक्-प्रचार व म्हणी सांगीतलेले प्रसंग आजही डोळया समोर जीवंत होतात व मी हंसतो.

एकदा मावशी आणि बाया कायतरी निवड टिपण करीत बसल्या होत्या. एवढ्यांत चंदूकाका आले नी जोरांत मावशेला विचारू लागले "माझा चष्मा कुठे ठेवलांत? सगळं इकडचं तिकडे करतां." मावशी खाली मान घालूनच म्हणाली "मी नाय बा ठेवला." एवढे बोलतेय तोपर्यंत बाया तिला खुणवीत म्हणाली "वर बघ" मावशीन वर बघतलं तर चष्मा

चंदूकाकाच्या कपाळावरच होता. चंदूकाकाना सांगताच ते जायला निघाले. तर बाया बोललीच "आकाबाय हे कसं झालं म्हाईत. ढुंगणा खाली आरी नी चांभार पोराक मारी." मावशी डोळयानीच बायाला गप्प राहायच्या खुणा करीत होती तर ही बया डोळे मिचकावत म्हणते "तू बाईल गे तेची. तू भिण्याचं काम कर. मी कशाला भिवू? भईण आहे, मी भिते काय." हे ऐकायला जाऊन सुद्धा चंदूकाका गप्प बाहेर गेले होते. आपला बहिणीचा अधिकार तिने असा साध्य केला होता. हे डोळया समोर आले की हंसू यायचे व हिंमतीचा आदरही वाटायचा. तिच्या निरागस चेहऱ्यामुळे, हंसत्या खळखळत्या स्वभावामुळे तिला बोलण्याची कुणाची हिंमतच होत नसे. हे शस्त्र तिच्याकडून अनवधानाने बरोबर वापरले गेले.

एके दिवशी आईला मावशीचे पत्र आले. बाया गेली. रात्री झोपली ती उठलीच नाही. मावशी व चंदूकाकानाच पुढचे सगळे करावे लागले. मी विचारात गेलो. हाही अधिकार तिने मिळवला. कुटुंबातलीच एक म्हणून. जिला तुम्ही जमीन बागा दिल्या असत्यात तर इनामदारीचा शिक्का लागला नसता. ती इस्टेट न घेतांच तिने आपले एकटे जीवन होवू नये म्हणून इनामदारांच्या घरांत पाऊल ठेवले व आनंदात इनामदार कुटुंबातलीच एक म्हणून जगून घेतले. स्वार्थाने काय जाते आणि सन्मानाने काय मिळवता येते याचे सुंदर उदाहरण बाया देवून गेली.

अजूनही असाच बसलो की कित्येक प्रसंग आठवतात, बाया आठवते, तिच्या म्हणी व वाक्प्रचार आठवतात. घरांत कित्येक प्रसंगी म्हणी फेकायची मला देखील संवय पडलीय. नातवंडे ओरडतात "परत सांगा! परत सांगा!" मी हंसतो. आठवते ती बाया. तिला ती श्रद्धांजली असते.

********

# वेडा की ज्ञानी- ज्ञानेश्वर

शाळेत गेलो तर एक नवीनच मुलगा आलेला दिसला. लक्षांत आला तो त्याच्या एकंदर अवतारा वरून. गुडघ्या पर्यंत लांब पँट, चुरगळलेला सदरा, डोक्यावर टोपी. टोपी शाळेत घातलीच पाहीजे हा दंडक नव्हता. कोणीही घालत नसे. त्यामुळे तो पटकन नजरेत आला. गोरापान, ऊंच, मध्यम बांधा, धारदार नाक, गोबरे गाल, लाल चुटुक ओठ व सर्वांत मुख्य म्हणजे घारे डोळे ज्यांत नजर पडली तर अथांग असल्यासारखे वाटे.

त्यांने डोक्यावरची टोपी काढून सारखी केली तेव्हा त्या खाली दडवलेले डोके क्षणभर दिसले. केस तासलेले, डोक्यावर मागे एक वर्तुळाकार केसांचे बेट, त्यांतून बाहेर पडलेली लांब शेंडी, तिला मारलेली गाठ. मात्र टोपी मागून ती गांठ व शेंडीचे शेपूट टोपी बाहेर निघालेले. न सांगता ओळखता येत होते हा ब्राम्हण आहे.

आठवीचा वर्ग, पुढे दोन रांगा मुलींच्या नी मागे मुले. हा आला तो मधे तिसऱ्या रांगेत बसला. शाळा सुरू होऊन आठ दिवस झालेले. प्रत्येक मुलाने आपली जागा आधीच ठरवून टाकली होती. तो नको त्या मुलाच्या जागेवर बसला होता. सावंतची जागा. सावंत म्हणजे दादागिरी करणारा. त्यामुळे आता काय होणार यावर सगळयांचे लक्ष लागले. पहिलाच तास इंग्लीशचा. सर आले तसा सगळयांचा हिरमोड झाला. सावंत अजून आला नव्हता. पुढचे नाटक कसे होणार? एवढ्यात सावंत आला. आपल्या जागेवर दुसराच कोणी बसलेला बघून तो रागाने त्याच्या जवळ उभा राहिला. नव्या मुलाने त्याच्याकडे पाहले पण नाही. सर कविता वाचत होते त्यातच त्याचे लक्ष लागले होते.

सावंतने सरांचे लक्ष नाही पाहून त्याचे दफ्तर खसकन खेचले व त्याची कॉलर पकडून उठवले. "मागे जा ही जागा माझी." एवढेच बोलला व जागेवर बसणार एवढ्यात सरांचे लक्ष गेले.

“काय चाललेय रे सावंत?” सरांचा प्रश्न ऐकून सावंत जागा बळकावत म्हणाला “माझ्या जागेवर बसला होता हा सर.”

त्या मुलाने आपले दफ्तर उचलले व माझ्या मागच्याच बेंचवर बसला. मी त्याच्याकडे पहातच राहिलो. अशावेळी अपमान, त्याचा राग, आपल्या दुबळेपणाची खंत, यांतले काहीच त्याच्या चेहऱ्यावर दिसले नाही. दिसले ते एक मंद स्मित. जणू काही त्याच्या दादागिरीची उपेक्षा करणारे. तास पुढे चालू झाला व संपला देखिल. सावंत उठून त्याच्याकडे आला व म्हणाला “ए भटा! तिथे मी बसतो. तिथे बसायचं नाही समजलास? नाहीतर बखोट पकडून फेकून देईन.”

“मी नवीन आलों. मांहित नव्हतें मलां. पण आपण क्रोध आवरां. मनांचीं शांती ढळतें. त्यांनें तुम्हालांच त्रास होंईल” त्याचे सानुनासिक बोलणे सर्व वर्गाला ऐकायला गेले.

हे ऐकून सगळे हंसले. सावंत गप्प आपल्या जागेवर गेला. काही मुलीना सावंतची जिरल्याचा आनंद झाला. मी मात्र मनांत म्हणालो “हे रसायन वेगळेच आहे. समजून घ्यायला लागेल याला.”

तो जास्त कुणातही मिसळत नव्हता. आपल्याच विश्वांत असायचा. मी त्याला सावंतच्या प्रसंगानतर विचारले “तुला राग नाही आला? त्याने तुझी कॉलर पकडून उठवले. अपमान नाही वाटला?”

“सरस्वतीचें मंदीर हें. कोंठेहीं बसलें तरीं ज्ञानच मिळवांयचें नां? मग पुढें कांय नी मागें कांय. मला जागां मोकळीं दिसलीं म्हणून बसलों.” त्याचे सर्व बोलणे अनुस्वारानी भरलेले. विचार त्याच्या वयाला न शोभणारे, अतिशय पक्व. मला वाटले याच्या बरोबर राहिले तर बरे होईल. मी त्याचे नांव विचारले. “ज्ञांनेश्वर शेवडें, मीं रामगडचा इथून आंठ मैल आहें रामगड. सातवीं नंतर कणकवलींस शिक्षण चांगलें म्हणून आलों. वडील गांवी स्मशानांत भिक्षुकीं करतांत. त्यांना लोक कार्टे म्हणतांत. पण तें अभिमानानें सांगतात मीं लोकांनां सद्गतीं देतों. ब्राम्हण असूनहीं त्यांच्या कामांमुळें लोंक आमच्याशीं अस्पृश्य असल्या सारखां व्यवहार करतांत. आपण घरीं तपांसून मगच आमचीं मैत्रीं धरांवीं. मग प्रश्न नकोंत उदभवायलां, म्हणून बोंललों हों. रांग नसावां.”

बापरे! केवढा बोलतो हां. सानुनासिक असली तरी स्वच्छ भाषा. प्रत्येक शब्दांत एक तरी अनुस्वार. जगरहाटीची पूर्ण कल्पना व अगोदरच खबरदारी घेण्याची संवय. कसा काय बनलाय हां? डोळयांत केवढा गाढपणा आहे. एकादे शांत तळेच पसरलेय त्याच्या डोळयांत असे वाटे. मला कोडे पडल्या सारखे झाले व मी ठरवले याला पकडून राहायचे. समजून घ्यायचे काय कसा आहे ते.

मी व तो मागे एकाच बांकावर बसू लागलो. तास सुरू असला कीं हे फार गुंगलेलेले असत लक्षपूर्वक सर्व ऐकत. संस्कृतवर अतिशय प्रेम व घट्ट पकड. मनाला पटले नाही तर

सरळ उभे राहून शिक्षकांशी उत्तर प्रत्युतरे. त्याच्या या वागण्याने मुलांना मजा येई. तो शिक्षकां बरोबर वैचारिक देवाण घेवाण करायला बघायचा. त्याचा त्यांना ताप व्हायचा व मुलांना मजा यायची. त्याच्या मुळे आमचा वर्ग आठवी ब ऐवजी "ज्ञानाशेवडेचा " वर्ग म्हणून ओळखला जाऊ लागला.

मला केंव्हा केंव्हा वाटे ज्ञाना खरोखरच त्याच्या वयाच्या मानाने जास्त ज्ञानी होता. विचार सुपष्ट होते. मला ते पटत. बाकीच्याना मजा वाटे. शिक्षकांना ताप होई. तरी देखील परीक्षेत हा वरचा नंबर काढी. खरेतर हा पहिलाच यायला हवा. पण काही शिक्षक रागाने याला मागे ठेवीत असा मझा समज होता.

मराठी व संस्कृत ह्यांत तर त्याची कोणीच बरोबरी करू शकत नव्हते. पण मराठीत हा मागे असायचा. माझे ठाम मत होते. केतकर बाईंशी याचा झालेला संवाद त्यांनी मनांत वाद म्हणून जोपासला असावा. एक कविता शिकवताना त्या म्हणाल्या "काव्यातून मांडलेले विचार गद्यातून मांडलेल्या विचारांपेक्षा समजण्यास अवघड. म्हणून काव्यातल्या प्रत्येक शब्दाचा अर्थ बरोबर समजून घ्या. मगच कविता पाठ करा. गद्य जेवढे सोपे तेवढी कविता नाही. सोप्या तऱ्हेने विचार पोंचववायचे माध्यम म्हणजे गद्य."

माझ्या बाजूला ज्ञाना शेवडे हात वर करून उठला "काव्य एका छंदात असतें. स्मरणांत लवकर रहातें. म्हणूनच अनादीं कालां पांसून वेदोपनिषिदें श्लोकांत बांधलीं आहेंत. शब्दांना त्यांचा स्वतःचां असां अर्थ आहें. म्हणून काव्य गद्या पेक्षां जास्त चांगलें असें नाही कां? गद्य पाठ विचारांच्या प्रवाहासाठीं चांगलें, परंतु चांगलें काव्य हें निरंतर काहीतरी सत्य घेऊन वहात असतें बरोबर विचारहीं. म्हणूनच श्रेष्ठ असे नाही कां वांटत बाई? "

सगळा वर्ग शांत होता. बाईं निरुत्तर होत्या. खरेतर बाई काय म्हणाल्या व हा काय बोलला ते आमच्या सर्वांच्या डोक्यावरून गेले होते. एक मात्र वाटले याचा अभ्यास खोलवर असावा. मग मात्र मराठीत याला मार्क कमी येवू लागले होते. मी त्याला म्हणालो "तू बाईना भेटून कां विचारत नाहीस कां मार्क कापले ते?"

"गुरुजन देतींल तें प्रसाद म्हणून स्वीकारायचें हीं आपलीं संस्कृतीं आहें. विसरलांस कांय? माझें विचार मी लिहीलें त्यांना पटत नसतील. त्या गुरु आहेंत त्यांचा तो अधिकार आहें. मला माझें विचार प्रिय आहेंत. अंतर्मन सांगतें तें मी करतों. त्यांना पटवायचा प्रयत्न करतों. तसेच त्यांचे ठांम विचार असतील तर ते त्यांना प्रिय असणारच. व असावेत देखील. दोन अंतर्मने विरोधी विचार करू शकतांत. त्यांत वावगें काय?" ज्ञाना काय बोलत होता ते डोक्यावरून जात होते तरी कुठेतरी पटल्या सारखे वाटत होते.

"ज्ञानेश्वर काय रे हे? मार्क कमी मिळाले तरी चालेल तुला?" मी

"आपण ज्ञानार्जनां साठीं इथें येतों. मार्कांसाठी नाहीं. ज्ञानासाठी शीक व प्रगल्भ हों असेच माझें अंतर्मन मला सांगतें." ज्ञानेश्वर मला सांगत होता. मला जाम चीड आली.

शाळेत वरचा नंबर मिळवणं ही महत्वाकांक्षा चूक? त्याला याचे काहीच नाही? काय बडबडतोय हा?

मी जरा चिडूनच विचारले "काय अंतर्मन अंतर्मन लावलेस! शाळेत शिकायला येतो. चांगले मार्क मिळवून वाहवा तर होतेच, पण आपल्याला उत्साह चढून अभ्यासाची गोडी लागते. चांगले शिकून मोठे होता येते. महत्वाकांक्षा पूर्ण करायला येतात."

"हें बघ तूं चिडू नकों. माझा त्रास तुला होंत असेंल तर मीं दुसरीं कडे बसतों. पण कोणतीहीं चढाओढ लावणें बरोबर वाटत नाहीं. त्यांपासूनच मनं कलुषित होण्याचीं क्रिया सुरू होतें. ज्ञान मिळवताना चढाओढ कसलीं? आणि ज्ञानार्जनानें महत्वाकांक्षा कसल्या जोंपासायच्या? ज्ञान विचारवंत होण्यासाठीं व स्वतःसाठींच असतें. जेंव्हा त्याचां उपयोग काहीतरीं मिळवण्यां करतां तेव्हा ज्ञान व आत्मा दोन्हीं कलुशींत करतां."

बापरे! हे प्रकरण दिसते तेवढे सोपे नाही. बहुतेक हा ठार वेडा आहे, नाहीतर काहीतरी अगम्य अभ्यास केलेला आहे. हा काय बोलतो ते सगळे जगरहाटीच्या विरुद्धच असते. कसे होणार याचे? मी मनांत विचार करत होतो.

एवढ्यांत तो पुढे बोलला "एकलव्याचा अंगठा कां कापला गेलां? याच चढाओढीं मुळें नां? अशांच महत्वाकांक्षें मुळें नां? मी तर कृष्ण-उपदेशां शिवाय महाभारतांत वैफल्यच बघतों. महत्वाकांक्षांमुळे होणारा नाश. काम, क्रोध, मद, मत्सर, लोभ, वासनां, ममता सगळयांचींच चढाओढ आहे त्यांत. म्हणूनच विध्वंसही आहे. माझा आत्मा मला सांगतो. यां कशांतच अर्थ नाहीं. फक्त ज्ञान हींच माणसांची खरीं गरज आहें. हें एक जीवन देंखील तें मिळविण्यास पुरें पडणार नाही. मी ज्ञानार्जन करणार. त्यांचा व्यापार करून पोंट नाही भरणार. त्या साठी सरळ सोपा मार्ग आहे मजजवळ. पण तो अवलंबून, पडताळून मगच मी तो सांगेन. आत्ता नाही."

बापरे! मी देखील गीताई दररोज वांची. महाभारत तर वांचून, व गांवच्या दहिकाल्यातून पाठ झाले होते. श्रावणबाळ, एकलव्य वगैरेंच्या गोष्टी सर्वच घरांत उगाळल्या जात होत्या. पण आम्ही त्या गोष्टी म्हणूनच ऐकल्या. याने त्याचे संदर्भ आपल्या आयुष्याच्या पुढच्या प्रवासासाठी वापरायचे ठरवलेत? वय तरी आहे कां याचे? पण एक गोष्ट खरी. हा बोलते ते कुठेतरी पोंचते. मनांत खळबळ उडवते. कित्येक वेळी पटते. कां? ते मात्र समजत नव्हते. मी गाढ विचारांत होतो. तो केंव्हाच निघून गेला होता.

आमच्या परीक्षा संपल्या तो गांवी जाताना म्हणाला. "तुझ्यामुळें मलां एक मित्र मिळालां. मी हें कधीच विसरणार नाहीं. माझ्यामुळें इतर मुलांनीं तुला हिणवलें. चिडवलें तरीं तूं माझ्यापाशींच बसलांस. हें माझें भाग्य. रिझल्टला मीं येणार नाहीं. तूं घे. वडिल येंतील बाजारच्या दिवशीं त्यांना सांग. तूं माझ्या घरी आलांस तर बरें वाटेल."

मला नैसर्गीक भावनांनी माझाच अभिमान वाटला. पण दुसऱ्याक्षणी त्याचीच "अभिमान म्हणजे शत्रू" आठवले आणि मी परत भूतलावर आलों. हा मुलगा आता माझ्या विचारांवर नियंत्रण करू लागला होता की काय? मी दचकलो. आपण तर सर्व सामान्यांसारखेच राहिले पाहिजे. याचे विचार आपणांला समजणार नाहीत कीं झेपणार पण नाहीत. पुढच्या वर्षी जागा बदलायची.

नववीत गेलो. शाळेचा पहिलाच दिवस. वर्गांत शिरलो तर ज्ञाना माझी जागा पकडून वाट पहात होता. तशी जागा पकडायला त्याला त्रास पडला नसावा. तो आहे म्हणून शेजारी बसायला कोणी धजले नसेल. मी सरळ त्याच्या शेजारी बसलो. ज्ञानाने माझ्यासाठी जागा पकडली होती.

"तूं माझां रिझल्ट पाठवलांस धन्यवांद." ज्ञानाने आभाराचा सोपस्कार पुरा केला.

मी सहज विचारले "रजा मजेत घालवलीस नां? काय मजा केलीस रजेत?"

"रजां? आम्हांस रजां कसलीं? आता पर्यंत तीर्थरूपानां पाहिजें तीं सामुग्रीं गोळां करून देंत असें. या वेळी त्यांनी आम्हांस श्राद्धकार्य करण्याची दीक्षां दिलीं. पुढे कामांस येईल म्हणालें. पितृ देवो भव! मग कांय सर्व रजा लोकांना सद्गतीं देण्यांत गेलीं. निरर्थक कर्मकांड करत होतों आम्हीं. दशम पिंड काय, बारसीं, तेरावें काय. चालले होतें वडिलांच्या मर्जीनुसार. पण खरे सांगू सर्व निरर्थक वाटत होतें. पाप करणाऱ्यांनां अशानें सद्गतीं मिळणार कां! वाईट कर्में केलींत त्याचीं फळें भोगणारच तें. कुठून सद्गतीं मिळणार रें? पिंडाला कांवळा शिवला कांय नी नाही शिवलां कांय. अशानीं यांचीं पापें धुतलीं जाऊन हें मुक्त होंणार कां? मृत्यंजयाचा जप जिवंतपणीं केंला तर आरोग्य दायक असतों म्हणें. मेल्यांवर उच्चारून कांय मेलेल्याचीं तब्येंत सुधारणार कांय?" तेवढ्यांत तास घ्यासला शिक्षक आले व माझी सुटका झाली.

पण दोन गोष्टी मनांत घर करून ऱ्हायल्या. मेल्यावर स्मशानात नक्की काय करतांत? व मृत्युंजयाचा जप कुठला? मी कधी स्मशानांत गेलोच नव्हतो. मुलांना तिकडे पाठवीत नसत. व संध्याकाळच्या प्रार्थनांत असला कुठलाच मंत्र म्हटल्याचे आठवेना.

हा ज्ञाना मला विचारचक्रांत टाकत होता. एक एक नवीन काहीतरी सांगायचा. माझी उत्सुकता वाढवायचा. मग त्याला विचारल्याशिवाय राहावायचे नाही. विचारले की जुन्यांचे शंका निरसन व्हायचे पण नविन काहीतरी शंका तो मनांत तयार करायचा.

आता हेच बघा ना मी सहज या शंका त्याला मधल्या सुटीत विचारल्या. साध्या सरळ होत्या. स्मशानांत काय करतात? व मृत्युंजय जप कसा म्हणतात? त्या नंतर ज्ञानाने मला मधली सुटी संपे पर्यंत खूप काही सांगीतले. जाळण्याच्या दोन क्रिया, एक भडाग्नी, दुसरा मंत्राग्नी. मग मंत्राग्नीत तर्पण असते, भडाग्नीत नाही. उच्च वर्णीय मंत्राग्नीच देतात. दर्भ हा गवताचा एक प्रकार असतो. अश्माचे पूजन करून मग तर्पण करतात. महामृत्युंजय जप हा

महेश म्हणजे शंकराचा आहे. ब्रम्हा सृष्टी निर्माण करतो, विष्णू रक्षण करतो व महेश कालाप्रमाणे नाश करतो हे सृष्टी चक्र आहे. त्यांत आपण सर्व बांधले गेलोत हेच सत्य. बाकी स्मशानात चालते ते कर्मकांड, थोतांड. मग मृत्युंजयाचा जप सुंदर आवाजांत त्याने म्हटला.

पण माझ्या मनांतले वादळ वाढवून गेला. आता स्मशानभूमीत काय होते ते समजले होते. डोक्यांत अगोदर दोनच शंका होत्या. पण आता शंकांचे एक मोहोळच त्यांने उठवले होते. भडाग्नी म्हणजे? मंत्राग्नी म्हणजे? मग दोन वेगळ्या क्रिया कां? भडाग्नीवाल्याना सद्गती मिळते कां? की फक्त मंत्राग्नीवाल्यानां? तर्पण म्हणजे? दर्भाचे गवत कसे असते? अश्म म्हणजे? तो कां पुजायचा स्मशानांत? धर्म व कर्मकांड यांत फरक काय?

माझ्या डोक्यांत हे सगळे किडे वळवळू लागले. त्याला विचारायची हिंमत झाली नाही. त्यांची उत्तरे ऐकता ऐकता कदाचित नववीचे पूर्ण वर्ष गेले असते व माझ्या डोक्यांत प्रश्नांचे मोहोळ तयार झाले असते.

ज्ञाना हा मला सांसर्गिक रोग वाटला. याच्याकडे जी माहिती आहे ती काढू गेल्यास आणखी जाणण्याचे प्रश्न तयार व्हायचे व डोके त्यांतच गुंतायचे. याला आता काही विचारायचेच नाही. असे ठरवले. पण एकच दिवस गेला व मधल्या सुटीत माझ्या तोंडून नकळत प्रश्न गेला. "धर्म नी कर्मकांडात फरक काय? " मी जवळ जवळ आत्महत्या केली होती.

तो प्रश्न विचारत होता व प्रत्येकाला माझे उत्तर हो म्हणूनच जात होते.

"देवळांत जातोंस?" माझी मान हलतांच बोलला "कर्मकांड"

"देवळांत देवावर फुलें चढवतोंस? नमस्कार करतोंस? काहीतरी मागतोंस? पैसे टाकतोंस?"

माझी मान होकारार्थी हलली. "कर्मकांड "

"घरी सत्यनारायण, नवचंडी, ग्रहशांती, गृहशांती श्राद्ध असल्यां पूजा करतां? ब्राम्हणालां पोटभर जेवायलां घांलत असांलच?" " हो." " हें सगळें कर्मकांड "

अरे हे तर सगळेच करतात. त्यालाच ते धर्म म्हणतात. आणि तूं कर्मकांड म्हणतोस. मग धर्म म्हणजे काय?

"आत्तां मधली सुटी संपेल. एवढया अवधीत मी काय समजवणार. असे करू खेळाच्या तासाला जाऊ नकोस. मी तर जातच नाही. बसू शांत कुठे तरी. बघूं समजावतां आलेतर त्या वेळांत" ज्ञाना बोलता झाला.

मी हादरलो. हा जर एक तास काहीतरी मला सांगेल तर माझ्या डोक्याचे काय होईल. कोणी सांगीतला होता हा शहाणपणा करायला. स्वतः होवून मी माझी वाट लावून घेत होतो.

पण त्याच बरोबर मला वाटले, तो सांगतो त्यांत खूप नवीन काहीतरी असते जे मनाला भावते. म्हणूनच आपल्या तोंडून असले प्रश्न पटकरून सटकतात.

खेळाच्या तासांला शाळेच्या मागे मोठ्या झाडाखाली टेकून त्याचे बौधिक मी ऐकत बसलो होतो. मग माझा समज झाला "ज्ञाना खरोखरच ज्ञानी होता. ज्ञानेश्वर होता."

ते कर्मकांड व धर्मा वरचे बौधिक असे होते.

आपला धर्म म्हणजे वेदोपनिषिदांवर आधारीत. त्यांचा अभ्यास जरूरीचा. वेद चार आहेत जो मनुष्य ज्या वेदाचा अभ्यास करी व पारंगत होई त्याला त्या वेदाच्या नांवाचे ब्राह्मण्य मिळे. म्हणजे पहा मी जर ऋग्वेदाचा अभ्यास केला व त्यांवर धर्मसभेत इतरांबरोबर वाद केला आणि माझे विश्लेषण त्यांना पटले तर मी ऋग्वेदी ब्राह्मण होत असे. असेच यजुर्वेदी, सामवेदी व अथर्ववेदी ब्राम्हण व्हायचे. दुसरी उपनिषिदे होती. कठोपनिषद, ईषोपनिषद असे उपनिषिदांचे प्रकार. सर्वांचा अभ्यास एका मनुष्य आयुष्यांत शक्य नाही. म्हणून मी सर्वांबद्दल तुला ज्ञान देऊ शकणार नाही. पण एवढे खरे की तेव्हा ब्राह्मण्य अभ्यासाने मिळे, जन्माने नाही. प्रत्येकाचा वर्ण त्याच्या कामां वरून ठरे. जन्माने नाही.

पण मनुष्यस्वार्थ आपले शीर वर करतोच. तेच झाले. जन्माने ब्राह्मण्य हळूहळू समाजांत शिरले. ब्राह्मण्यच कां, सर्वच जाती जन्माने ठरू लागल्या. केंव्हा कशा विचारू नकोस. इतिहास माझ्या कडे नाही. मग मनुने त्यावर चार वर्णांचे शिक्कामोर्तब केले. मला वाटतं अपुऱ्या ज्ञानामुळे कर्मकांड जोर पकडूं लागले. ज्ञानाधिष्ठीत धर्म कर्मकांडाधिष्ठित होऊ लागला.

मंजुळ आवांजांतले त्याचे प्रवचन ऐकताना मी हरवून गेलों. किती समजत होते कुणास ठावूक. पण मनावर जबरी पकड घेत होते. ऐकत रहावे वाटत होते. तो पुढे सांगत होता.

देव कसे विचारले तर यांच्याकडे उत्तर नव्हते. विश्वामित्रांनी ओम दिला तो विश्व जनार्दनाचा आवाज म्हणून. जो त्यांनी ऐकला होता. पण यांनी देव बनवले दगडांचे. त्यांचे पूजा पाठ सुरू केले. ठीक आहे धार्मिकता मनांत वसवण्याचे प्रतिक म्हणून, भक्तीची पहिली पायरी म्हणून ते ठीक होते. पण मनुष्याला तिथून पुढे नेण्याचे काम करावयांस हवे होते. ते थांबले व त्याचा बाजार कर्मकांडाच्या रुपाने सुरू झाला.

अरे दगडाच्या देवाची पूजा करून काय पापे धुतली जाणार? त्याला खायला प्यायला मिळत नाही, तो तुमच्या प्रसादाने खूष होणार? तो तुमचं सर्वांगाने पालन करतो. तुम्ही स्नान करतां तसेच त्यालाहि घालतां? चरांचरांत भरलेला तो आंघोळीला बसला तर भूतलावावरचं पाणी तरी पुरेल कां. जे शक्य नाही ते आंधळेपणाने धर्माच्या नांवाखाली खपवणे सुरू झाले, पूजापाठ सुरू झाले. त्याला मंदिरांत कोंडला. आवर्तने, भजने, जत्रा काय काय चालू केले यांनी. सगळीच कडे माणसाच्या जन्मापासून तो स्मशाना पर्यंत कर्मकांडाशिवाय काहीही

होत नाही. तोच धर्म झाला आहे. मूळ ज्ञानाधिष्ठित धर्म जवळ जवळ नाहींसाच झालां आहें रें.

अरे सांगू लागलो तर खूपच आहे. वर सांगीतलेले तर काहीच नाही.

मग जवळचाच एक दगड त्यांने उचललां म्हणाला आपण याला दररोज पुजायला लागूं. लोक बघ हे पाहूनच पूजा करातात की नाही. दोन फुले ठेवूं, शेंदूर कुंकू लावूं आणि पायां पडत जाऊ नेमाने.

"मग काय होईल? " मी

"थोड्यांच दिवसांत काही लोक आपल्या कांहिही न विचारतां ती शेंदूर फुले बघूनच पाया पडू लागतील, मग फळे ठेवतील, पैसे टाकतील. पापे धुण्याचा सोपा मार्ग दुसरे काय?" ज्ञाना.

"मग करणार आहेस तसे? कोणाला समजले, हे आपण चालू केले म्हणून, तर?" मी

"तुला माझे म्हणणे पटले असेल तर नको. नाहीतर प्रात्यक्षिकाने अनुभव घे. पाहिजे तर विचार करून बघ. नंतर करूं." आत्मविश्वासाने तो बोलला.

माझे शाळकरी मन म्हणाले बघू तर खोडी करून. आमचे नशीब असे की झाड वडाचे होते. दुसऱ्या दिवशी मी कुंकू, थोडा शेंदूर व दोन उदबत्त्या घेवून लवकर शाळेंत आलो. वडाच्या झाडाकडे जाऊन सगळी सामुग्री दडवली व वर्गांत येवून बसलो. ज्ञाना आला तसं त्याला सांगीतले. शाळा सुटल्यावर खूप वेळ रेंगाळलो. जवळ जवळ सगळे गेल्यावर आम्ही शाळे मागे गेलो. एक चांगला मोठासा लांबट, गोल, गुळगुळीत दगड बघून दोघानी मिळून आणला व वडा खाली ठेवला. जागा चांगली साफसूफ केली. दगडाला शेंदूर लावला. कुंकू वर ओतले. शाळेच्या परसांतून तोडलेली फुले वर घातली. उदबत्त्या लावल्या व गपचूप निघालो. ज्ञाना शांत दिसत होता. मला मात्र पोटांत गलगलल्या सारखे होत होते.

ज्ञाना म्हणाला "फार रहदारी नाही. वेळ लागेल. पण नक्की सुरू होईल याची पूजा आठ एक दिवसांत. माझ्याकडे एक छोटा त्रिशूळ आहे घरी पडलेला. उद्या आणीन. मग काम लवकर होईल."

'आठ दिवस?' माझ्या पोटांत गडबडले.

दुसऱ्या दिवशी गपचुप त्रिशूळ लावून झाला. नव्या उदबत्या लावल्या नी परत आलो. मग मात्र ज्ञाना म्हणाला "आता तिकडे जायचे पण नाही. पकडले जाऊ."

दोन तीन दिवसच पुरे झाले व शाळेत साफसुफी करणारे काहीतरी कुजबूजू लागले. एकएक जण मागे जाऊन येवू लागला व एक दोन दिवसांत शाळेत वणव्या सारखी बातमी पसरली. शाळेच्या मागे, वडाखाली स्वयंभू प्रकट झालेत. मी ज्ञानाकडे पाहिले तो निर्विकार होता. त्याच्या जयाचा त्याच्यावर यत्किंचितही परिणाम नव्हता. मला म्हणाला "पुढे खूप

आहे, पहात रहा. पण चुकून देखिल कुणाला बोलू नकोस, याचे जन्मदाते आपण आहोंत म्हणून. तुला पुरी खात्री पटेल.”

मी गप्प. ज्ञानाच्या विजयाचा आनंद, कर्मकांड कसे असते या प्रात्यक्षिकाचा आनंद, काय मनांत चालले होते देव जाणे. त्यांनेच निर्माण केलेले डोक्यांतील किडे एका झटक्यांत वळवळायचे थांबले. मला सगळ्याचा अर्थ स्पष्ट झाला. ज्ञाना खरंच ज्ञानी वाटू लागला. आता मी आश्चर्यांत होतो. एवढे या छोट्या मुलाला कसे काय माहीत? पण मी प्रश्न विचारला नाही. शंका घेण्याचा प्रश्नच नव्हता. त्याचे बोलणे शंकातीत होते. त्याने सिद्ध केले होते.

शाळेत मग शिक्षकानी वर्गणी गोळा केली. स्वयंभू शंकराची विधीवत पूजा झाली. सत्यनारायण झाला. मग पौर्णिमेला भजने सुरू झाली. आमच्या खोडीला देवत्व प्राप्त झालं. कित्येक वेळी पोटांत कढ येई. मिरवावी शेखी या स्वयंभू चे जनक आम्ही. पण ज्ञाना डोळ्या समोर येई. शांत. कशाचीही अपेक्षा न ठेवणारा. कर्म करा. फलप्राप्तीचा आनंद विनयानेच भोगा सांगणारा. मी गप्प बसे.

नववीचे वर्ष संपायच्या अगोदर त्याने सांगीतलेल्या अजून एका गोष्टीची प्रचिती आली. मला मराठीत मार्क कमी मिळाले. पेपर तर सोपा गेला होता. कां मार्क कमी, कुठे चुकले, ते विचारायला गेलो. केतकर बाई म्हणाल्या “मिळणारच तुला कमी मार्क. संगत कसली तुझी. त्या कार्ट्याच्या मुलाबरोबर राहून तू वांया जातोयस.”

ज्ञानाने सांगीतलेली ब्राह्मणी अस्पृशता उघडी झाली होती. माझ्या पेपर लिहिण्यामधे व मार्कां मधे तिने फेर धरला होता. परत एकदा ज्ञाना अचूक ज्ञानी ठरला. मला राग नाही आला. शांत वाटले. मनांत आले माझे मार्क चांगलेच असणार. तुम्ही ते कमी दिलेत. दुःख कसले.

दहावीत गेलो. रजे नंतर शाळा सुरू झाली. ज्ञाना गायब. मनांत म्हटले येईल दोन चार दिवसांत. आजारी असेल. दहा दिवस झाले तरी आला नाही. मग समजले त्याने शाळा सोडली.

माझे दिवस पूर्वी सारखे जाऊ लागले. केतकर बाईंकडून मराठीत पूर्वी सारखेच चांगले मार्क मिळू लागले.

खूप दिवसानी मंदीरांत गेलो तर ज्ञाना नजरे समोर झळकला. बस हंसला आणि नाहीसा झाला. देवाला नमस्कार करताना फक्त आठवत होते ज्ञानाचे बोल “दगडाच्या देवाकडे मागून काय मिळणार?” मनाला पटत होते, पण कृतीत मात्र येत नव्हते. कां ते समजले नाही. हळू हळू ज्ञानाचा भास मंदिरात गेलो की होऊ लागला. कोणत्याही मंदिरांत जाणं मी टाळू लागलो. मला ज्ञाना अदृश्य पणे पूर्ण नास्तिक बनवत होता. संध्याकाळी गीताई म्हणताना मात्र त्याचा हंसरा चेहरा दिसायचा. जणू सांगायचा “यातला अर्थ पूर्णपणे जाण. हाच तुला खरा धर्मार्थ सांगेल”.

मी शिक्षण पूर्ण केले. नोकरी व्यवसायांत शिरलो, विवाहित झालो. मग बाप, आजोबा अशी स्थित्यंतरे होत गेली. पण आयुष्यभर ज्ञानाची संगत राहिली.

घरी सत्यनारायणाची पूजा न चुकता व्हायची. पत्नीची इच्छा. मग सगळे साग्रसंगीत जोडीने करायचो. पण ज्ञाना खिजवीत असायचा. मी मवाळ त्यामुळे कुणाची मते बदलण्याचा प्रयत्न करीत नसे. ज्ञाना सारखी अलिप्तता आणून बोलणे मला जमत नसे. कदाचित मी प्रवाहाच्या विरुद्ध जायला घाबरत होतों. पण त्या ज्ञानाने माझी पाठ कधीच सोडली नाही.

माझ्या डोक्यांत खुंटी मारल्या सारखा ज्ञाना रूतून बसला होता कायमचाच.

पण एक गोष्ट खरी मी स्वतः होऊन कोणतेच धार्मिक कार्याचे प्रयोजन केले नाही. मला तसा विचार कधी शिवला नाही.

माझे कित्येक मित्र कसले कसले यज्ञ त्याच्या कारखान्यांत करीत. प्रसादाचे आमंत्रण मला असायचे. समोर बसून फुले, अक्षता, पैसे टाकताना ज्ञाना प्रकटायचा. मला शांतपणे विचारायचा "काय मागीतलेस? अरे मागून देव देतों कां?" तो अंतर्धान पावायचा व मी खजील व्हायचो.

जगाच्या व नातेवाईकांच्या मते मी नास्तिक, अति नास्तिक आहे. एके दिवशी आम्ही असेच कुठल्या तरी देवीच्या देवळांत गेलो होतो, हिने ओटी, फुले, उदबत्त्या कापूर असे बरेच सामान घेतले. व पूजे साठी निघाली. पायरी वरच्या भिकाऱ्यानां दान धर्म करीत होती. देवळांत पोंचलो तर फार गर्दी. पुजाऱ्याने खसकन हिच्या हातून सामानाची थाळी घेतली. पूजेचे ५१ रुपये मागीतले. एका पानांत गुंडाळून प्रसाद दिला. भक्ती भावाने ही हात जोडणार तेवढ्यांत "पुढे चला पुढे चला" म्हणत एका गणवेशातल्या माणसांने आम्हाला पुढे ढकलले.

यावेळी ज्ञाना प्रकट होऊन माझ्या जीभेवर उतरला "काय हे! एवढे सगळे तूं केलेस पण दर्शनही घेवू दिले नाही त्यांनी. आता तरी बोध घे. देव आपल्याच अंतरांत आहे. अशा देवळांत तो कुठून मिळणार? जीवे भावे घरी जरी स्मरलेस तरी यापेक्षा चांगले होईल. बाजार मांडलाय यांनी सगळा." माझ्या तोंडून ज्ञाना बोलला.

"राहू दे तुमचे! तुम्ही एक नास्तिक. आम्हाला नको सांगू असले. आमचा विश्वास आहे देवावर." ही तडकून बोलली. मी गप्प झालो.

मग समजले ज्ञानाचा मी एकटाच शिष्य होतो. मीच त्याचे विचार ऐकायचो. शाळेत इतर एवढी मुले होती. पण एकानेही कधी त्याचे शिष्यत्व केले नव्हते. ते त्याला वेडाच समजत.

मी आता निवृत्तीच्या वयात पोचलो होतो. गावा पासून एक हजार मैल दूर आलो होतो. गांवी जायची ओढ लागायची. मग ठरवले गावी जायचे. नातवंडे बरोबर होती. कणकवलीत पोचलो तेव्हा त्यांना माझी शाळा दाखवायला नेले. फिरता फिरता शाळेच्या वरच्या मजल्यावर गेलो. हळूच डोकावून वडाच्या झाडाकडे पाहिले तर तिथे एक सुंदर पक्के मंदीर दिसले. फुलांनी सजलेले. सुंदर कळस, छान लाकडी दार. त्याला बसवलेल्या स्टीलच्या चकचकीत सळया. स्वयंभूचा एकंदर थाट बघून ज्ञानाची आठवण झाली. ज्ञानाच्या व माझ्या एका खोडीचे स्मारक मी थक्क होऊन पहात होतो.

मनांत आले रामगडला जाऊन भेटावे कां? पण बरोबर सगळे कुटुंब घेऊन जायला धजलो नाही. थोड्यांच दिवसांत परत गांवी गेलो. यावेळी निश्चय केला. काही झाले तरी ज्ञानाकडे जायचेच. तसेही कामासाठी मला आचऱ्याला जायचेच होते. थांबू वाटेत व भेटू ज्ञानाला.

मी गाडी आचऱ्याला घ्यायला सांगीतली. रामगड आले. रस्त्यावर एक दोन दुकानेच दिसली. एका दुकानावर विचारले "ज्ञानेश्वर शेवडेंचे घर कुठे हो?"

गाडीवाला बघून दोघे तिघे धांवत आले. कोण ज्ञानेश्वर शेवडे? विचारणा झाली. मग मी सविस्तर सांगीतले. त्यांचे वडील स्मशानांतील काम करायचे. बहुदा तोही करीत होता. ब्राह्मण आहे. माझ्या शाळेत होता कणकवलीला. एक म्हातारे गृहस्थ ओरडलेच. "त्या वेड्याला भेटायला गाडी घेवून आलांत? कुठून आलांत?" मी म्हणालो "फार लांबून आलोय. हजार मैलांवरून."

"त्या वेड्याला भेटायला हजार मैलांवरून आलांत? काय वेडे काय हो तुम्ही? तो भटवाडी जवळच्या पिंपळा खाली आहे बघा. अहो ठार वेडा आहे तो. भूतानी पकडलंय त्याला. स्मशानात कार्य करायचा. रात्री रात्री तिथेच झोपायचा." तो म्हातारा.

"तुम्ही त्याला वेडा ठरवला असेल. तो खरं तर फार अभ्यास केलेला आहे." मी.

"कसला अभ्यास? देवळांत जाऊ नका म्हणतो. देवळांत दगड आहे, देव नाही म्हणतो. पूजा वगैरे करू नका म्हणतो. भुते बोलतात त्याच्या तोंडून. पाप करायला सांगतात." म्हातारबुवा.

मी काय बोलणार! मी विचारले "गाडी नेता येईल का तिथ पर्यंत? कोणी दाखवेल का रस्ता?"

एक सतरा अठरा वर्षांचा मुलगा म्हणाला "चला मी दाखवतो. गांवच्या देवळा पर्यंत जाईल गाडी. मग फर्लांगभर चालायला लागेल."

त्याला गाडीत घेवून कच्च्या रस्त्याने आम्ही निघलो. गांवच्या देवळाकडे गाडी उभी केली. शेतातून पाऊल वाटेने जाताना मन काय काय विचार करत होते. कसा असेल? काय

बोलेल? खरंच वेडा झालाय की लोकांचा गैरसमज? दूर एक पिंपळाचे झाड दिसत होते. त्याच दिशेने चाललो होतो.

तिथे पोचतो तर तो मुलगा म्हणाला "तो बघा तो झोपलाय वेडा." असे बोलून तो लगबगीने मागे फिरून चालता झाला. बहुदा भूत पकडेल अशी भीती वाटली असावी त्याला.

एका भल्या मोठ्या पिंपळाच्या झाडाखाली फक्त पंचा नेसून एक म्हातारबुवा पहुडले होते. गाढ झोंप लागलीय कीं काय? उठवू कीं नको अश्या विचारां बरोबरच तोंडातून निघाले "ज्ञाना! ?"

"या बसां! मी पाहिलेंय तुम्हांला येतानां. दोनच मिनीटें द्या." मिटल्या डोळ्यांनीच त्यांनी म्हटले व परत शांत झाले.

मूळचा गोरा रंग तपकीरी झाला होता. केस सर्व शाबूत होते, पण करडे झाले होते. पांढरी लांबलचक दाढी  एका बाजूला वळून पेंगुळली होती. कमरेवर एक राजापूरी जुना पंचा कासटे मारून नेसलेला. पाय तुळतुळीत स्वच्छ. एकही भेग कुठे दिसत नव्हती. चेहरा शांत, समाधानाने भरलेला वाटत होता. हा असा झाडाखाली कां? घर नाही? लग्न? मुले बाळे? कित्येक प्रश्न मनांत फेर धरू लागले.

एवढ्यांत एक उसासा टाकून ज्ञाना उठून बसला. म्हणाला "आलांत? या, वाटलेंच होतें कधींतरीं आंपण भेंटायलां यांल. एक प्रश्न तुम्हालां सतवत रांहाणार आणि तुम्हीं येणांर."

"मला ओळखलेस तूं? आणि हे काय तुम्ही तुम्ही करतोयस? वर्ग मित्र ना आपण? पूर्वी सारखेच बोलू. काय रे कसला प्रश्न मला सतवणार? इथून जात होतों, रामगड आले म्हटले पाहू विचारून तुझ्या बद्दल. व आलो." तो शांतपणे ऐकत होता.

"तूं बरोबर बोलतोंस. पण तूं समजला नाहींस तुझ्यां आत्म्याचां आवांज. स्वेच्छेनेंच आपण कोठें जातो असे नाही. जुन्या गोष्टी मनांत फार खोल दडलेल्या असतात, ज्ञानाची आवड असलेली कोडी वजा प्रश्न असतात ते. हे असे प्रश्न जीवाभावाने केंव्हातरी कवटाळलेले असतात. स्मरणांत नसतात. पण खोलवर आंत आत्म्यापाशी बसलेले असतात. तेच ठरवतात मग कोठे जायचे ते, तुम्ही नाही. या खोल प्रदेशाला मी अंतर्मन म्हणालो असतो, पण तुला तो शब्द आवडत नाही, म्हणून वापरायचे टाळलें. विचार काय ते!" ज्ञाना.

त्याचे बोलणे तसेच होते, तोच छान आवाज, तीच गुंग करणारी भाषा. फरक होता तो डोळ्यांत. त्यांत आता एक अथांग सागर भरला होता. निळा, खूपच अथांग. त्यांत एकदा पोहून यावे असे वाटले. चेहरा शांत, प्रचंड समाधान पसरलेला. दाढी व लांब केसांमुळे त्याला साधुत्व किंवा संन्यस्तपणा आलेला दिसत होता.

"अरे इथे कां राहातोस? घर होते ना तुझे? मग इथे कां? ऊन, वारा, पाऊस पाण्याचा त्रास नाही होत? जेवतो खातोस काय? काम धाम काही नाही, लोक तुला भुतांनी पकडलंय समजून घाबरतात. जवळही येत नाहीत. कसा जगतोस?" मी

"एवढें सगळें प्रश्न कशालां? त्यांचा एकच प्रश्न तयार होतों. ज्याचे उत्तर मागायला तूं येशील असे मला वाटायचे. मनापासून वाटायचे. तुझी ज्ञानाची आवड, ज्ञान मिळवूनच काम करण्याचे तुझे मार्ग. कामाबद्दलची कळकळ मी पाहिली आहे. गाडी घेवून आलास आहेस नां. प्रतिष्ठित, यशस्वी माणूस झालांच असशील. खात्री होती मला. तूं कर्मयोगी, व्यावहारिकते सह, व मी भक्तीयोगी, अव्यावहारिके सह. म्हणूनच वांटत होते तूं येणार." ज्ञाना बोलत होता. मला त्याने कर्मयोगी म्हटले. कसे काय? मलाच समजले नाही.

"या सर्व प्रश्नां ऐवजी एकच प्रश्न तूं विचारला पाहिजे होतांस." ज्ञानाच पुढे बोलत होता "एवढ्या सगळया प्रश्नांतून एकच प्रश्न जो तुझ्या अंर्मनांत आहे. ज्याकरीतां तूं इथे आलास. तो आहे. मी जी जीवनशैली आचरणार होतो ती पडताळली कां? त्याची सांगता काय?"

मी हादरलोंच. शाळेंत त्यानी सांगीलेले आठवले. खरे होते. माझे आजचे सगळे प्रश्न मिळून हाच प्रश्न तयार होत होता. ज्ञानाच्या ज्ञानावर, स्मरणशक्तीवर, विचारशक्तीवर सगळयावर एकदम भक्ती बसली. मग ज्ञानाने त्याचा जीवनप्रवास सांगीतला. थक्क करणारा. जगाच्या दृष्टीने अव्यवहारीक, वेडेपणाचा, अतिशय दुष्कर, त्याच्या दृष्टीने अतीव समाधान देणारा.

शाळा सोडून तो वडिलांच्या कामांत लागला. नववी नंतरच्या रजेत वडील गेले होते. गावचे लोक मग यालाच बोलावू लागले. दुसऱ्या पावसांत घर पडले. याने पिंपळाखाली बस्तान घातले. कर्मकांडात न मानणारा स्मशानांत जायचा बंद झाला. लोकांना तो कधी देवळात जाताना, भजन, पूजा, जत्रेत भाग घेताना दिसेना. जे जाताना विचारीत त्यांना सांगे, दगडाच्या देवाची पूजा करून पापे धुतली जातांत कां? मग काय, त्याला भूताने पछाडल्याची आंवई कोणीतरी उठवली व त्याच्यावर सर्व गांवाने शिक्का मोर्तब केले. काहीनी वेडा ठरवले. पिंपळाखालचा वेडा.

पण हा कशाचेच मनावर घेत नव्हता. तो आपली जीवन शैली पडताळून पाहात होता.

"माणसाची गरज केवढी? दोन वेळचे अन्न शरीरांस केवढे लागते, काय खावे, केंव्हा खावे, हे सर्व ठरवले. मग हे पहा याच झाडा मागची जमीन उकरून काकडी लावली, मका टाकला, पडवळ, गाजर, मुळा, चवळी, फणशी टाकली. खूप काही रूजले. पोटाची सोय झाली. उन्हाळयांत तर बहार आला. भाज्या सुकल्या तर फळां नी रेलचेल केली. रानांत आंबे, करवंदे, अशी कित्येक फळे मिळू लागली.

पहिल्यांदा एक दोन बायांना वाटले मी साधू असेन. त्यांनी केळी, नारळ आणून ठेवले. मला सांगू लागल्या घरच्या कहाण्या. म्हणू लागल्या कृपा करा आमच्यावर. सरळ सांगीतले

हे मनुष्य जीवनांचे भोग आहेत. भोगावेच लागतात. देवळांत सांकडे घालूनही काही झाले नाही नां? मग माझ्या कडे आलांत नां? मी काही देव नाही. कोणताही मनुष्य देव होऊ शकत नाही. पापे करू नकांत. अपेक्षा, गरजा वाढवू नकांत. त्या निघून गेल्या. व मी भूताने पछाडलेला ठरलो. मला त्याचे काहीच वाटले नाही.

मी जे निसर्ग देई ते खाई. लागते किती, दोन गाजरे व एक काकडी वर मी दोन दिवस रहातो. मला चूल वगैरे काहीच लागत नाही. कच्चेच खायचे. अरे या गरजा माणसाने वाढवल्या व दुःखी झाला. मी ही कारणे जाणून त्यांना जीवनांतून व्यर्ज केले. आकाशाचे छत, या झाडाची छाया व धरतीचा पलंग माझी घराची गरज भागवतात. नदी मला स्नान घालते, वारा हळूवार मायेचा हात फिरवतो, धरती व रान पोटभर खायला देते. निसर्ग सगळी गरज पुरवतो. मला समजते या जगांत याला वेडेपणच म्हणणार. सर्वांनी देवाने निर्माण केलेली धरती आपली ठरवली. भांडणे वाढली, संग्रह वाढले, चिंता वाढल्या मी ही मूळ कारणेंच काढून टाकली आयुष्यातून. म्हणून चिंतारहीत जगतो. बघ हे प्रात्यक्षिक. तुझा प्रात्यक्षिकाशिवाय विश्वास नाही बसत कशावर.”

“अरे पण हे आदिमानवा सारखे झाले नाही कां? एवढे शोध लागलेत. माणसाचे आयुष्य सुखकर होण्याचे खूप मार्ग आहेत. ते सोडून हा प्रकार कोणी अवलंबेल कां? मग तुला वेडाच ठरवतील नां लोक!” मी

“माझे आयुष्य शांतपणे चिंता विरहीत, पाप विरहीत जगायचे होते. तुमचे शोध सुखसोई, त्या मिळवण्याची धडपड यांत पडून समाधान घालवायचे नव्हते. मला समाधानी जीवनाचा मार्ग शोधायचा होता. मला काहीच कमी नाही पडले. या निसर्गाने, ज्यांत देवांश ठांसून भरलाय, त्याने मला सर्व काही दिले. मी संतुष्ट समाधानी आहे.” ज्ञानाचा चेहरा आनंदाने समाधानाने फुलला होता. त्याचा आनंद बघून मी सुखावत होतो. एवढ्यांत ज्ञाना बोलला

“तूं येणार ही खात्रीं होतीं. माझां एकच मित्र. तों प्रात्यक्षिक पडताळायलां येणारंच. आज आलांस फार बरें वाटलें.” हा ज्ञाना जरा हळवा वाटला.

मी निघालो “ज्ञाना येतो, मी इकडे आलो की येत जाईन.”

“तू ये की नको येवूस, आता सर्व सांगता झाल्यांवर त्याला अर्थ नाहीं राहात. नाही भेटलास तरीं राग नाहीं.” ज्ञाना.

मी निघालो. गाडी कडे पोचलो तर आठ दहा जणांचा घोळका गाडी कडे उभा होता. गांवांत अशी गाडी आल्यामुळे कदाचित असेल असे मला वाटले. पण ते भूताने पछाडलेल्या बरोबर मी एवढा वेळ कसा बसलो. या कुतुहलाने जमले होते. ते म्हातारबुवा पण होते. म्हणाले,

“काय भेटलांत? आणि इतका वेळ बोलत बसलांत? भूतबाधा नाही ना झाली तुम्हाला? त्या वेड्याला भेटायला हजार मैलांवरून येतां? खरंच वाटत नाही.”

मी हंसत बोललो “अहो या भूताने मला शाळेतच पछाडलेय. सदा विचारांत येतो. खरं सांगू तो तुमच्या गांवचे भूषण व्हायला पाहिजे, त्याला तुम्ही वेडा ठरवलांयत. तो खरोखर एक संत आहे. आपण कोणीच त्याच्या सारखे नाही होऊ शकत.”

डोळे विस्फारून ते लोक मला ऐकत बसले. मी निघून आचऱ्याला पोचलो. एक दोन दिवसांत काम आटपून परत येताना ज्ञानासाठी एक धोतरजोडी घेतली. त्याच्याकडे पोंचलो तर तिथे एकदोन लोक दिसले. आश्चर्य वाटत असतानांच तिथे पोंचलो. लोकानी फळांचा प्रसाद ज्ञानासमोर ठेवला होता. उदबत्त्या लावल्या होत्या. व त्यांचे संभाषण चालू होते.

“स्वामी, प्रसाद माना आम्ही दिलेला. आम्हाला बरे वाटेल.” लोक सांगत होते.

दगडाचा देव बनवलेल्याची आठवण होऊन मी खजील झालो. माझ्यावर नजर जातांच ज्ञाना म्हणाला “अरें आता माझें देऊळ बांधतोंस कां रें? बघ सगळें माझ्या मागें कसें लागलेत तें? काय सांगितलेंस तूं यांनां?”

माझ्याकडून अजाणतेपणी म्हणा कीं ज्ञाना वरच्या प्रेमामुळे म्हणा चूक झाली होती. मी त्याला संत म्हटलेले लोकांनी जिवाभावाने मानले होते. मी त्याला देवत्व दिलं होतं. ओशाळत मी म्हटलं “मी काहीच नाही बोललो रे! फक्त म्हटलं तू वेडा नाहीस, संत आहेस. काय सांगू एवढा परिणाम एवढ्या लवकर होईल कल्पनाच नव्हती रे.”

“हजार मैलांवरून आलांस हे ही सांगीतलेंस, अर्धातास बसलास मजकडें. वर मला संत उपाधी दिलीस. पुरें असतें रें एवढें यांना. आता माझा संत, देव म्हणून गांजावांजा करतील व पिंपळा खाली तू आणखी एका मंदिराचा जनक होशील.” हंसऱ्या डोळ्यांनी ज्ञाना बोलत होता. माझ्या हाताकडे बघून म्हणाला “तूं देखील प्रसाद चढवणार काय मला?”

मी तिथेच थिजलो म्हणालो “प्रसाद नाही रे तुझ्या साठी दोन धोतरे घेतली, मायेने. म्हटले, निसर्ग सगळे देईल, कपड्यांचे काय?”

“बरोबर आहे तुझा विचार. पण माझ्यापाशी वडिलांची पुण्याई आहे नां. स्मशानांत हवें तेवढें पंचे येतात रें. लोक अंधश्रद्धेने तिथेच टाकून जातांत ते चालतांत मला. कसले सुतक नी कसले पाप, ते मेलेले येणार कां नेसायला?” ज्ञाना कसा राहीला असेल याची पूर्ण कल्पना मला आली. खरं सांगू, पहिल्यांदा शहाराही आला अंगावर. पण मग विचार आला. तो त्याच्या मतांशी अतिशय प्रामाणिक होता. हे फक्त तोच करू जाणे. साध्या लोकांचे कामच नव्हे हे.

मी धोतरजोडी काढली दोन धोतरांची फाडून चार बनवली व म्हणालो ज्ञाना ही प्रेमाने आणलेली भेट आहे. आता त्याचे चार पंचेच झालेत. नेसत जा.

मी लोकांनां म्हणालो “चला उठा, त्याला देव नका बनवूत. तो संत आहे. त्याचे आयुष्य तो एकटाच घालवणार आहे. पाहिजे तर वेडा म्हणा. पण देवपण देऊ नका. मी भेटायला हजार मैलांवरून आलो ते मित्र म्हणून. तो देव म्हणून नाही. चला घरी चला.”

सगळे उठले व माझ्या बरोबर निघाले खरे, पण मला धसका बसला होता. काय होईल ज्ञानाचे आता? लोक जगू देतील कां शांतपणे?

दोन वर्षानी परत गांवी गेलो. यावेळी मी दोन राजापुरी पंचे खरीदले. रामगडला पोंचलो. गाडी थांबतांच पिंपळाकडे लक्ष गेले. पोटांत धस्स झाले. तिथे एक छोटेसे मंदीर दिसत होते. तिथे पोंचलो तर ज्ञाना नव्हताच.

मठी खाली लिहीले होते “परमपूज्य स्वामी ज्ञानेश्वर शेवडे यांची समाधी.”

हातांतले पंचे पिंपळा खाली ठेवून निघणार तोंच विचार आला ज्ञानाला नाही आवडणार पंचे ठेवलेले. चटकन उचलले व परत फिरलो.

असंख्य विचारांचे ओझे मी आजही बाळगतोय. ज्ञानाचा अंत चांगला झाला असेल ना? लोकानी संत्रस्त केले नसेल ना?. माझ्यामुळे त्याला लोकांचा ताप झाला नसेल ना?

ज्ञाना एक माझ्या मनांतील प्रश्नचिन्ह होवून बसलाय.

***********

# लाडोबा धनगर व कमळा

लहानपणी लाडोबा धनगर डोंगर उतरून खाली यायचा. डोक्यावर कांबळयाची(घोंगडीची) खोळ, कमरेला कोयता ठेवायची आकडी बांधलेली. त्या कमरेवर गोफ बांधलेला. गोफाच्या दोऱ्यांत मागून पुढे जाणारी, फक्त लाज राखणारी लंगोटी कसून बांधलेली. त्याच गोफाच्या दोऱ्याला एका लाकडी आकड्याने तीन चार कांचेच्या बाटल्या लटकवलेल्या. दोन बाटल्यांत तपकीरी काहीतरी भरलेले, दुसरीत पांढरे पांढरे दूध किंवा ताक. व तिसऱ्यांत पिण्यासाठी पाणी. कांबळयाच्या खोळीवर कर्दळीच्या पानांचा भला मोठा पेंडा एका हाताने सांवरलेला. दुसऱ्या हातांत एक मोठा दांडा. शरीर यष्टी कोरीव काम करून काढल्या सारखी सुदृढ व शाळीग्रामा सारखी काळी कुळकुळीत, चमकणारी.

लाडोबा सह्याद्रीचा सुळका उतरून खाली यायचा तो आमच्या गांवात, आमच्या घरी. त्याची चाल लांबूनच सांगे लाडोबा येतोय. झपझप उचलले जाणारे पाय, डोक्यावरच्या कर्दळीनी घेतलेली वर खाली होण्याची लय व बाटल्यांच्या एकमेकांवर आपटण्याची किणकिण लाडोबाच्या चालीला एक संगीत जोडून जायची. पाय झपाझप उचलत लाडोबा दहा अकरा वाजता आमच्या कडे पोहोंचे. कर्दळीच्या पानांचा पेंडा खाली टाकत पडवीत बस्तान मांडे. कमरेच्या बाटल्या आकड्यातून सोडून जमिनीवर ठेवे. कांबळयाची खोळ डोक्यावरून बाजूला ठेवे. हे सर्व चालले असताना वडील शांतपणे पहात असत. त्यांच्या चेहेऱ्यावर एक मंद कौतुकाचे हंसू पसरे. मी जोरांत ओरडे "लाडोबा आला! लाडोबा आला!" आणि पळत जाऊन त्याच्या पाठीवर लटकून गळयाला मिठी मारे. लाडोबा मला मागे हात करून अलगद पकडे व म्हणे "धनी! धनी! पडशालासा सबूर करा." त्याचे घाटी हेल ऐकताना मजा येई.

वडील ओरडत "अरे सोड त्याला! दमून आलाय तो. सकाळीच निघाला असणार तो. श्वास तरी घेऊ दे त्याला."

"ऱ्हाव द्या मोठे धनी, लेकरू ते! माया करतंय. बरं हाय, काय पण तरास नाय मला" लाडोबा वडलाना गप्प करायचा.

एवढ्यांत घरातून कोणीतरी जुने धोतर किंवा राजापुरी पंचा आणून लाडोबा कडे फेके. मग वडिल सांगत “लाडोबा गुंडाळ रे बाबा कमरेला. तुझ्या लंगोटी-अवताराची लाज वाटते सगळयांना”

लाडोबा फक्त हंसे. मला पाठीवरून उतरे. खांद्यावर पंचा टाकी व विहीरीची वाट पकडे. मी त्याच्या मागोमाग चालू लागे. वडील हंसत म्हणत “बावीवर जाऊ नका रे कोणी, नायतर दोन दिगंबरांचे दर्शन होईल.” सगळयांच्या हंसण्याचा आवाज येई. मी मात्र खूष असे. लाडोबा विहिरीवर पाणी शेंदून भडाभडा डोक्यावर ओतणार होता. थंडपाण्याची शिरशिरी व दुपारच्या उन्हाचा उबदार शेक मजा देणार होता. दोन कळशा माझ्यावर, मग दोन कळशा स्वतःवर तो ओतत बसणार होता. अंग न पुसताच आम्ही उन्हांत कोरडे होणार होतो. मग लाडोबा पंचा गुंडाळून त्याची ओली लंगोट धुवून वाळवणार होता. मग ती नेसून त्यावर पंचा गुंडाळणार होता. मला तो पाठीवर लटकवून घरी आणणार होता. मजाच मजा.

लाडोबाचे येणे माझ्यासाठी पर्वणी असायची. जंगलात राहून तो खूप कला शिकला होता. बांबूतून बांसरी, धनुष्यबाण बनवून तो मला देई. त्याचे बाण फार सुंदर असत. सरळ रेषेत जात. पुढे बनवलेले टोक झाडाच्या पानांत मस्त घुसे. मग मी वेड्यासारखा तासनतास धनुष्यानेच खेळे. बांसरी देखील वाजवायची मजा येई. मी उगीचच पिपाणी वाजवल्यासारखे वाजवे. पण लाडोबा  वाजवू लागला की त्यांतून संगीत निघे. तालावर मान डोलू लागे. त्याच्या वाजवण्यांत एक लय एक सुंदर ठेका असे. मी गप पडून त्याचे वाजवणे ऐकी.

असा हा लाडोबा धनगर आज आला होता. दोन मधाच्या बाटल्या व रानकेळींच्या पानांचा भला मोठा पेंडा त्याने आमच्यासाठी आणला होता. मधाच्या बाटल्या वडिलांना देत म्हणाला “धनी! आग्या मध हाय. दोनचार पखवड्यांत मध साखर पकडंल. पाणी लागाया देवू नगा.”

आता मी मोठा झालो होतो. लाडोबाच्या पाठीवर बसण्याचे, त्याच्याबरोबर विहीरीवर आंघोळ करायचे दिवस संपले होते. मी शाळेत जात होतो, रीतभात शिकत होतो, दहा वर्षाच्या मुलाची शिंगे मला पण आली होती. म्हणून लहानपणीची ती मिठी माराविशी वाटली तरी मारत नव्हतो. खरोखर तर मनांत वाटे, लाडोबाच्या गळयाला मिठी मारावी, त्याच्या पाठीवर लटकावे, त्याच्या अंगाला येणारा तो आगळाच मेंढपाळी वास तृप्त होईपर्यंत घ्यावा. पण ते बरे दिसणार नाही असे मन बजावी.

लाडोबा एक मेंढपाळ होता. आमच्या गांवाच्या वर सह्याद्रीचा कडा चढला की दाजीपूर. त्या दाजीपूरच्या जंगलात आठ दहा मेंढपाळ रहात, त्यातलाच एक लाडोबा. आम्ही खोत. खालीपासून दाजीपूरच्या सरहद्दी पर्यंत आमची जमीन होती. सह्याद्रीचा कडा आमचा. त्या कडे कपारीत मधेच उंच सुळक्यांच्या बाजूने थोडी फार सपाटी मिळे. एकादा ओढा नाहीतर लहानशी नदी वाहे. बाकी सर्व जंगल. अशा जागी हे मेंढपाळ धनगर रहात. आमचे कूळ समजत व रानमेवा म्हणून चांगला मध, व रानकेळयांची पाने आणून देत. ही

पाने आली की पत्रावळी लावण्याचे काम वाचे. बाकी देण्यासारखे त्यांच्याकडे काही नसे. पूर्वापार पडलेली प्रथा होती ती. वडील जमिनीचा खंड मागत नसत. व धनगर रानांत सुखाने रहात.

मेंढ्या सह्याद्रीच्या कड्यांवर चरताना केंव्हा केंव्हा आमच्या बाजूला येत. ऊंच हिरव्या कड्यांवर मग हलणारे पांढरे तपकीरी ठिपके दिसत. मी मनांत म्हणे "लाडोबा मेंढ्या चारतोय उतरेल कां खाली?"

मग लाडोबा वडिलाना सांगत होता ते ऐकू लागलो. कारण त्याच्या आवाजांत काळजी होती.

"धनी, कोणतरी सरकारी बाप्पे आलंतं. जंगल, रान सरकारचे व्हणार म्हणालं. मग आमचं काय? हुस्कीवणार काय आमाला?" लाडोबा विचारीत होता.

"आपलं सरकार आलंय. गोरे सोजीर गेले. तुमाला नाय काढायचे. पण काय करणार ते अजून मला पण माहीत नाय. आमचे डोंगर जाणार. लाकडांचे उत्पन्न बुडणार वाटते." वडील.

"पण तुमी धनी, रान देताव काय म्हणून? न्हाई सांगा की त्यास्नी." लाडोबा

वडिल हसत  गप्प झाले. विडीचे झुरके मारत विचारांत गेले.

लाडोबा पुढे म्हणाला  "धनी, आमी तुमची रयत. काडलं रानातून कुठं जायचं? आदार तुमचाच की आमास्नी."

"होय रे बाबा! तुला काय वाऱ्यावर नाय सोडणार मी. काढलं तर ये इथे. काम करणाऱ्याला काय पोटभर मिळतं रे."  वडील त्याला आश्वासन देत होते. तो निःश्चिंत झालेला वाटला. धनी व कूळ यांतला तो एक विश्वासाचा दुवा मला दिसला .

लाडोबा मग उठला. कुऱ्हाड आणली व न सांगता परड्यांत पडलेले आंब्याचे खोड फोडून लांकडे काढू लागला. दोन दिवसानी जायला निघाला तर वडील म्हणाले "लाडोबा, या पावसांत शेती करायला ये. दुसरा गडी नाही बघत मी. तुला रानातून काढले तर शेती तरी करशील."

"येतो की धनी. बकऱ्या, मेंढ्या देतो पाव्हण्याना सांभाळायला नी बायलेला घेवूनच येतो बगा." लाडोबा एका पायावर तयार झाला. जायला निघाला.

"लाडोबा! लाडोबा! सगळ्या बकऱ्या नको देऊस. एक बकरी नी तिची पिल्लं घेवून ये मला खेळायचंय त्यांच्याशी." मी माझे घोडे दामटले.

"व्हय! व्हय! धाकले धनी, आणतु की." म्हणत निघून गेला.

रात्री झोपच येईना. सारखे वाटे, लाडोबाने उद्याच यावे बकऱ्या घेवून. रजेत खेळायला मिळेल. मग त्याच्या भाषेची मजा वाटत होती. कसा बोलतो लाडोबा. आमची मालवणी हेल काढून बोलयची तऱ्हा. तर ह्याची अगदीच तोडून बोललेल्या शब्दांची घाटी भाषा. सहा सात मैलांत केवढा भाषेचा फरक. राहाण्याची पद्धतही वेगळी. किर्र जंगलात रहायचे.

जंगलात तर वाघ, तरस, गवे असली भयंकर जनावरे भरलेली. त्यांत हे लोक रहायचे. साध्या तीरकामठ्यानी स्वतःचा बचाव करायचे. ससे, भेकर, साळुंद्र्यांची शिकार करून मेजवानी करायचे. बकरीचे दूध आणि आजूबाजूच्या जागेत बनवलेले वर्षाला पुरेल न पुरेल एवढे अन्नधान्य एवढ्यावर यांची गुजराण चाले. तेल, तूप वगैरे जेवणांत नसे. चवीला फक्त मीठ व मिरची. विकत घ्यायचे ते फक्त मीठ. जंगलात झाडाना आडवे उभे वासे ठोकून बनवलेले घर. छप्पर तर पानांचेच. पण ते घर देखील नीट नेटके सारवलेले, तांबड्या दगडांचा चुरा करून तांबडे रंगवलेले. समोरच झाडाना बकऱ्या बांधायच्या. जंगलातल्याच कांटेरी झुडपांचे कुंपण त्यांच्या भोवती करायचे. कांटेरी कुंपणामुळे बकऱ्यांचे जंगली जनावरां पासून संरक्षण व्हायचे.

अतिशय खडतर आयुष्य असे या धनगरांचे. पण निसर्गातच राहिल्यामुळे ते अतिशय काटक व सदृढ असत. शरीरयष्टी एकाद्या कोरीव शिल्पासारखी.

पावसाळ्याअगोदर लाडोबा लांबून येताना दिसला. बरोबर त्याची बायको सुद्धा होती. त्याच्या मागून तुरूतुरू चालत होती. डोक्यावर पदर घेतलेला, पुढच्या सोग्याने तोंड झांकलेले. पदराचे टोक दांतात घट्ट पकडलेले. उंची लाडोबाला शोभेल अशी. कांखेत एक मोठे बोचके पकडलेले. दोघे घरी पोंचले. लाडोबाने रानकेळींच्या पानांचा पेंडा पडवीत अलगद उतरला. कांबळे पडवीत टाकून त्यावर घाम पुसत बैठक मारली. त्याची बायको तुरूतुरू चालत पडवीत आली. लाडोबा पासून चार हात लांब असलेल्या एका खांबाकडे बोचके खाली ठेवून खांबाला टेकून उभी राहली.

"लाडोबा आलास ये. आणि ही तुझी बायको?  नांव काय ग पोरी तुझे?" वडील विचारत होते.

"कमळा म्हणत्यात" एकदम किनऱ्या आवाजांत कमळाने नांव सांगीतले. व खांबाला हाताचा विळखा घालून उभीच राहिली. मान खाली होती. आता तिची लाडोबा कडे पाठ होती. म्हणून तोंडावरचा पदर पूर्ण बाजूला झाला होता. तिचा चेहेरा मला दिसत होता. गोल गोरटेल्या चेहऱ्यावर लहान मुलीचे भाव पसरले होते. हनुवटीवर एक हिरवे गोल गोंदण व कुंकवाखाली तीन गोल हिरवी गोंदणे चेहेऱ्याला एक वेगळेच रूप देत होते. लाडोबा पेक्षा कमळा वयाने लहान वाटत होती.

एवढ्यांत एक कोंबडी तीन चार दिवसांच्या आठ दहा पिल्लाना घेवून पडवीत आली. पिल्ले कोंबडीच्या बरोबरीने एकमेकाना खेटत ढकलत चिक चिक करीत तिच्या अवती भवती फिरत होती. कमळा पटकन खाली बसली. जवळ आलेल्या एका पिल्लाला तिने उचलून घेतले मात्र, कोंबडीने कचकचाट करत तिच्यावर झडप मारली. कमळाने एका हाताने कोंबडीला दूर लोटले. कमळा निरागस पणे पिल्लाला गोंजारीत होती. कोंबडीने हल्ला केला की तिला हाताने दूर लोटी. मी पहात होतो. तिला जराही भीती वाटत नव्हती.

नाहीतर इतर लोक पिल्लाला हात लावताना कोंबडीने हल्ला केला की घाबरून पिल्लाला सोडीत व दूर होत. ही जरापण घाबरत नव्हती.

"अगो सोड पिल्लाला नायतर कोंबडी टोंचत बसेल तुला." वडील म्हणाले

"व्हय" म्हणत कमळाने पिल्लू सोडून दिले. आता ती उकीवडी बसली होती तशीच बसून राहिली . मला वाटते काय करावे तेच तिला समजत नव्हते.

"लाडोबा आलाय! त्याला न्याहारी द्या. आणि दोघानाही पडवीतल्या खोलीत रहायला सोय करा." वडील

कमळा पटकन उठली. बोचके उचलले व कोण येते का ते पाहू लागली. आम्हाला हंसू आले. केवढी घाई करत होती ती सगळ्याच गोष्टीत. मग तिला खोली दाखवली तशी लगबगीने कामाला लागली. झाडू घेवून खोली साफ केली. एक दोरी बांधून त्यावर आपल्या साड्या नेटक्या पसरून ठेवल्या. बोचक्यातून एक फणी व छोटासा आरसा काढून खिडकीच्या पाळीवर ठेवला. मग लगबगीने घागर ऊचलून विहिरीवर गेली ती आंघोळ करून आली. येताना घागर भरूनच घेवून आली. पडवीत येताच विचारू लागली "पाणी कशांत भरूसा? प्यायचं हाय न्हवं."

तिची लगबग बघून वडील हळूच म्हणाले "कामसू दिसतेय चटपटीतपणा आहे कामांत."

आणि खरेच येणाऱ्या दिवसांत तेच खरे ठरले. ही पहाटेच उठे. विहीरीवर आंघोळ करून येई. गाई म्हैशीना चारा घाले. न सांगताच दूध काढणे तिने स्वतःच्या ताब्यात घेतले. मग विहीरी वरून पाणी भरणे सुरू केले. एका मागोमाग एक एक काम करतच सुटली. मी एक बघितले. ती आम्हा सगळ्यांसमोर चेहेरा उघडा ठेवी पण लांबून जरी लाडोबा दिसला तरी पटकन चेहेरा साडीच्या पदराने झाके. आम्हाला हंसू येई.

माझी लाडोबाशी गट्टी होतीच आता कमळा बरोबर पण झाली. तिला विचारी "तू जंगलात कशी रहायचीस? भीती नाय वाटायची? वाघ बघितलायस?"

ती हंसत सांगे "भ्याचं कायहून? मान्साचं सगळयानाच भ्या. कोन जवळ पन येत नाय बघा. नी एक तेलाचं रिकामं बारदान (तेलाचा रिकामी मोठा कॅन) ठेवायचं. जवळ कोन वराडलं तर वाजवाचं. पळून जात्यात की मग. भ्या वाटायचं ते गव्याचं. शिंगं रोखून चौखूर आलं की धडकी भरायची. आपल्याला काय खात नाय ते, पन घर तोडून टाकतं नव्हं. वाटेत येईल ते चिरडतं, मोडतं. लई वांड जनावर."

मी आ वासून तिच्या बरोबर जंगलची सैर करायचो. तिच्या हिम्मती बद्दल तिचा अभिमान वाटायचा. मग विचारायचो "तुझ्या बकऱ्या किती आहेत? त्यांची पिल्लं केवढी आहेत?"

“मॉप हायेत. मला नाय मोजता येत. कमी झालं तर नजरेनेच ध्यानांत येतं. बगा चार घटका लागतात दूद काढाय. पांच शेर दूद काडते रोज. म्हणजे तुमी बगा किती होतील. तुमी शिकलेले न्हवं.” कमळा बोलत होती.

“पण एक बकरी किती दूध देते ते तर सांग. मग सांगता येतील किती बकऱ्या त्या.” मी.

“दीड नायतर दोन पेले देते की एक बकरी” कमळा.

चार घटका दूध काढायचा वेळ, पांच शेर दूध, एक बकरी दीड ते दोन पेले दूध देणार मग बकऱ्या किती? मीच काय , अंकगणितवाल्या आठवल्याना तरी येईल कां हे गणित सोडवायला? मी कमळाबरोबर हिशोब काढायचा नाद सोडून दिला. कमळा एकदम गप्प झाली, चेहेऱ्यावर पदर ओढला. मी समजलो लाडोबा आला. तेवढ्यांत लाडोबा माझ्या जवळच येवून बसला. “काय इचारतासा धाकलं धनी? ती येडी काय सांगणार! मला इचारा.” मी उलट त्याला रागावत बोललो. “तू बकरी आणि त्यांची पिल्लं कां नाय आणलीस?”

“पानं, सामान होतं न्हवं? आन बकरीच्या पिलास्नी उचलून कसा घेणार? ती एवढं चालत न्हाईत धाकलं धनी. आता जाणार न्हवं, तवा आणीन, दोन चार बकऱ्या आणीन. तुमाला खेळायला होतील आमाला दूद मिळल न्हवं” लाडोबाने माझी समजूत घतली.

आणि खरंच आठ दिवसानी लाडोबा त्याच्या घरी निघाला. तिसऱ्या दिवशी परत आला तो चार मोठ्या बकऱ्या नी दोन छोटी पिल्ले घेऊनच. त्या बघताच वडील ओरडतच म्हणाले “लाडोबा हे काय आणलंस? यांना राखणार कोण?”

“न्हाई धनी, आमची कारबारीण राखील की. तिला बकरीचं दूद प्याया लागतं. धाकलं धनी पण म्हणालं बकऱ्या पायजेत. तरास नाय देणार त्या.” लाडोबाने गरज सांगीतली अगदी सरळपणे. तोपर्यंत कमळाने बकऱ्यांचा ताबा घेतला. आंब्याच्या झाडाच्या सांवलीत बकऱ्याना घेऊन गेली. तिच्या मागे मी धांवलो. पिल्लांना हात लावायला गेलो तर ती इकडे तिकडे पळू लागली. मग बकऱ्याही पळू लागल्या. कमळा दोऱ्या आणायला गेली होती. आणि मी बकऱ्याना उधळवून लावले होते. त्या सैर भैर पळत होत्या, मी त्यांना पकडायला बघत होतो. एकपण हाती लागत नव्हती. एवढ्यांत कमळा आली. हंसत म्हणाली “ऱ्हाऊ द्या, मी करतेय बगा गोळा त्यांना” एवढे बोलून तिने तोंडाने हार्रर्र हुर्रर्र असले आवाज काढायला सुरवात केली मात्र. एक एक बकरी सरळ तिच्या दिशेने येवू लागली. तिला जरा देखील तोशीश पडली नाही. दावण बनवून तिने एक एकीला गळयांत अडकवली व दुसरे टोक आंब्याच्या झाडाला बांधले. परसांतलीच काही जंगली वेलींची पाने ओरबाडून तिने त्यांच्या पुढ्यांत टाकली. त्या निमूट पाने खावू लागल्या. पिल्ले तिने बांधलीच नव्हती. ती आता त्यांच्या आईला लुचत होती मी हे सगळे मजा घेऊन बघत होतो.

कमळाचे व बकऱ्यांचे सख्य बघून आश्चर्यांतही पडलो होतो. जंगलात रहाणाऱ्या त्यांनी एकमेकांशी किती सुंदर जुळते घेतले होते. सगळया बकऱ्या कमळाच्या आवाजावर वागत.

मग तिने पिल्लाना उचलून घेतले व आपल्या खोलीत घेवून गेली. मी पहातच बसलो तर म्हणाली “दूद सगळं लुचतील न्हवं. आता रातीलाच दूद काडल्यावर द्यायचं लुचायला.”

लाडोबा, कमळा, बकऱ्या या सर्वांनी  माझे खेळच बदलून गेले. लाडोबाचे बांसरी, धनुष्यबाण तर झालेच, पण बकरींच्या पिल्लांना आंजारणे गोंजारणे, कमळा बरोबर बकरीचे दूध काढायला बसणे, बकऱ्याना हाताने एक एक पान भरवणे असले उद्योग आणखी मजा देवू लागले.

कमळा दूध काढी ते तीन बकऱ्यांचे. एका बकरीचे काढत नसे. मग समजले ती थोड्याच दिवसांत विणार होती. मी आनंदलो. एकदम छोट्या बछड्यां बरोबर खेळायला मिळणार. आठ दहा दिवसांतच ती बकरी व्याली. सकाळी उठलो तर बकऱ्यांचा आवाज बदललेला. जाऊन बघतो तर नवीन तीन बछडी धडपडत उभे रहायचा प्रयत्न करीत होती. आपल्या आईला लुचायचा प्रयत्न करीत होती. कमळा जवळच बसून त्यांना मदत करीत होती. कमळाच्या चेहेऱ्यावर मायेचा पूर आलेला दिसत होता. स्वतःच्या बाळांना आई जपेल तशी ती पिल्लाना जपत होती. मी विचारले “केंव्हा झाली पिल्ले?”  कमळा म्हणाली “सक्काळच्या पारी झाली. बकरी बेंबट्या मारत हुती म्हणून बगाया आली तर वीत हुती. झुंजुमुंजु पण नवतं झालं. दोन घटकांनी उजवाडलं. तेवापून हितंच हाय मी. बरं केलं पगा. तीनी बकरीच हायत की हो, एकपण बकरा नाय.”

कमळाची सगळी बातमी ऐकता ऐकता मी चुकचुकत होतो. म्हणालो “मला का नाय उठवलंस? मला पण बघायचं होतं पिल्लं कशी होतात ती. ”

“नाय बगावं आपण. पाप हो वीत बगणं. देव राग करतात, नी आपल्याला पोरं देत न्हाई.” कमळा मला समजावत होती. आज विचार करतो तेव्हा समजतं देवाची भीती कशा कशाला घातली जायची. जे बघणे प्रशस्त नाही त्याला देवाची भिती घातली की झाले.

मग लाडोबा आला. बकऱ्यांवरून हात फिरवला. “तीन झाली न्हवं. बरं हाय की. गांवाला जावू तेवा कळप वाढंल तुजा.” कमळाला तो म्हणत होता. कमळाने केंव्हाच तोंड पुरे झांकून घेतले होते. ती आता मानेनेच बोलत होती त्याच्याशी.

मला कमळा व लाडोबाचे नवल वाटे. ते एकमेकांशी बोलताना कधीच दिसत नसत. कमळाचा बुरखा पुरा तोंडावर असे. आनंद, राग, हंसू, अश्रु हे सगळे लाडोबाला दिसणार कसे? हे सगळे भाव चेहेऱ्यावर दिसले नाहीत तर हे एकमेकाना ओळखणार कसे? पण आता वाटते त्या चालीरीतीत सुद्धा काहीतरी असावे ज्यामुळे ते एकमेकांना समजून घेत असावेत.

त्याच दिवशी रात्री सगळे झोपलो असताना आवाज आला. कोणीतरी कोणालातरी मारत होते. बाइचा दबकत रडण्याचा आवाज येत होता. जरा लक्ष दिल्यावर समजले, लाडोबा कमळाला मारीत होता व कमळा दबक्या आवाजांत रडत होती. मी कळवळलो. पटकन वडिलाना बोललो “कमळाला मारतोय लाडोबा, रडतेय ती. बघा ओरडा त्याला.”

वडील हंसत म्हणाले “झोप तू. नवरा बायकोच्या भांडणांत पडू नये. तू झोप बघू.”

झोप काय येणार. मी तसाच पडून होतो. आता  हळूहळू आवाज बंद झाला. दुसऱ्या दिवशी  सकाळी सर्व नेहमी प्रमाणे सुरू झाले. मला आता लाडोबाचा राग येत होता. कमळाला मारतो, वाईट आहे लाडोबा. मग मी बकऱ्यांकडे गेलो. तिथे कमळा होती. बकऱ्याना पाने घालत होती. आज तिने पदर डोक्यावरून पुढे घेतला होता. दातात पकडून डावा गाल झांकला होता. मी तिच्याकडे बघत म्हणालो "फार मारलं कां ग तुला? मी नाय बोलणार लाडोबाशी. मारकुटा कुठला."

"आब्बा! बोलू नये आसं. नी तुमी झोपला नवता? ऐकू नये नवरा बायकोचं." ती बोलताना पदर तोंडातून निसटला आणि डाव्या गालावर लाल लाल वळ दिसले. समजलो. पदराने ती वळ दडवीत होती. मी विचारले "केवढे वळ उठलेत तुझ्या गालावर? एवढं का मारलन तुला?"

"दाल्ला हाय तो माजा. मारणारच की. मारायलाच पायजे नायतर दाल्ला कसला!" मोठ्या अभिमानाने कमळा सांगत होती. सगळच अजब होतं. मार खाऊन सुद्धा कमळा खूष होती.

थोड्याच दिवसांत पाऊस सुरू झाला. पेरण्या आटपल्या. लावण्या देखील पार पडल्या. कमळा व लाडोबामुळे कामानी झडप पकडली होती. लाडोबा सगळे विचारून करी. शेती कधी केली नव्हती, पण बघून पटकन शिके. इतरांपेक्षा कामाची झडप खूप जोराची. वडील त्यामुळे खूष. कमळाही तशीच. पण तिच्यांत थोडा बालीशपणा होता. लावणी करताना मधेच काम टाकून शेतांत फिरू लागे. काहीतरी शोधत, गोळा करे. मग समजले. पावसाने शेतांत पाणी भरलेले असे. त्यांत खूप खुबे (कवचाच्या गोगलगाई) झालेले असत. ती ते साडीच्या ओटीत गोळा करी. लाडोबा मग केंव्हातरी ओरडे "बेस झालं खुबं, कामाला लागा."  कमळा खुब्यांची ओटी एका गोलीत(मातीच्या घागरीत) सोडे. खाडखाड आवाजांत खुबे गोलीत पडत. मग कामाला लागे.

असेच तिने त्या दिवशी खुबे गोळा केले. संध्याकाळी घरी येई पर्यंत तिची गोली पुरी भरून गेली होती. उचलायलाही जड झाली होती. मग लाडोबाने तिच्याकडून गोली घेतली व तरा तरा घरच्या दिशेने चालू लागला. घरी पोचल्या बरोबर कमळाने गोलीत थोडे पाणी व मीठ टाकून न्हाणीतल्या चुलीवर चढवले. व चुली पुढ्यांत स्वतःला शेकत बसली. लाडोबाला सगळे हंसत विचारू लागले. "लाडोबा आज काय खुब्यांची मेजवानी?"

"व्हय की. पावसांतच खायचे. ताकद देतात न्हवं." लाडोबा सांगायचा. हे असलं काही गांवचे लोक खात नसत. रानातले धनगर मात्र त्याची मेजवानी करीत.

तासाभराने खुबे शिजले व लाडोबा व कमळा पडवीतच खायला बसले. बसण्याची तऱ्हा देखील आगळी. लाडोबा एक मोठा चपटा दगड व फोडायला कोयता घेवून बसलेला तर त्याच्या बाजूला त्याच्याकडे पाठ करून काटकोनांत बसलेली कमळा. तिने दोन दगड घेतलेले. दोघांच्या मधे शिजवलेल्या खुब्यांची गोली. आज भात भाकरी काहीच नव्हते,

फक्त मीठांत शिजवलेले खुबे खायचा बेत होता. दोघेजण अर्धा पाऊण तास खुबे फोडून खात होते . त्यांच्या कवचांचा ढीग पुढ्यात वाढत होता. मधेच कमळा लाडोबाला पाठ टेकून बसत होती. हे जेवण मला एक वेगळंच दृष्य दाखवत होते. कमळा तोंड दाखवत नव्हती पण मधेच खेटून बसत होती.

त्याच रात्री परत मारण्याचा, रडण्याचा सोपस्कार ऐकू आला. मी बुचकळयांत पडलो. एवढे खुबे कमळाने गोळा केले, शिजवले, प्रेमाने लाडोबाला खायला घातले तरी लाडोबा कमळाला कां मारतो. मी परत वडीलाना बोललो तर ते म्हणाले "त्यांची रीतच रे ती. तुला नाही समजणार आता मोठा झालास की होईल फोड सगळयाची."

मला खरच हे लोक समजायला कठीण पडत होते. बायकोला मारणारा लाडोबा तिच्या मदतीला पटकन धांवायचा. बायको त्याच्यापासून तोंड दडवायची. मधेच पाठमोरी लगट करायची. मार खाल्ला की त्याचा अभिमान बाळगायची. कठीण होते सगळे समजणे. पण मोठा झालो आणि समजले. हे त्यांचे प्रियाराधन असायचे. एकादे चांगले जेवण, चांगला प्रसंग ते रात्री असा उजवीत. रानांत रहाणारे त्यांचे रानटी प्रकार. हे आपले मत, पण ते आपला उत्सव आपल्या तऱ्हेनेच अभिमानाने उजवायचे. तो तसा उजवला नाही तर पुरूष मर्द नाही, व बाईने माराची तक्रार केली तर ती बाई सखी नाही. सुधारलेले एकाद्या गोष्टीला रानटी म्हणून कां म्हणतात हे जिवंत उदाहरण पहायला मिळाले होते. पण तेही समजले जवळ जवळ चार पांच वर्षा नंतर.

पावसचा जोर उतरत चालला होता. श्रावण सरी सुरू होत्या. मधेच ढग, मधेच चादणं अशा रात्रींची मजा दिसत होती. एक दिवशी परसांत लाडोबाने लांकडे पेटवली. एक जुनी मोडकी कोयती तापवत ठेवली. हे काय नवीन म्हणून मी तिथेच ठाण मांडून बसलो. मग तो एक जुना पाटा घेवून आला. मोठा हातोडा पण आणला. मी फक्त बघत होतो. काहीतरी करण्याच्या मागे होता तो. जाळांत कोयती लाल लाल झाली तशी बाहेर पाट्यावर ठेवून त्याने हातोडीने धोपटायला सुरवात केली. थंड झाली की परत लाल लाल करे व धोपटी. आता माझी उत्कंठा शिगेला पोचली. मी विचारले "काय करतोयस तू हे?"

"धाकले धनी भल्ली बनवायची म्हंतो. जनावराच्या शिकारीला लई बेस." लाडोबा सांगत होता. भल्ली म्हणजे? माझ्या डोक्यावरून गेले. पण बोललो नाही. काय होईल ते दिसणार असा विचार करून गप्प राहिलो. आता भल्ली आकार घ्यायला लागली. हा भाला बनवत होता तर. पण तो जरा वेगळाच आकार घेवू लागला पुढून अगदी भाला पण मागून त्याला दोन आंत वळणारे आंकडे पण त्यानी काढले होते. मधे एक सळी सारखी टोकदार दांडी काढली होती बाहेरच्या धारा थापटून थापटून पातळ केल्या होत्या. पण त्यांना हवी तशी धार नव्हती. मनाजोगती भल्ली तयार झाली तसे त्याने काम थांबवले. तो भालाच होता पण छोटा म्हणून भल्ली म्हणत.

दुसऱ्या दिवशी पासून तो त्याला गुळगुळीत दगडावर घासून धार काढू लागला. चार पांच दिवसानी भल्ली चकचकीत दिसू लागली. त्याने भरीव बांबू घेवून त्याच्या निमुळत्या टोकावर ती मस्त घट्ट बसवली. मी त्याची ही कला टक लावून बघत होतो. त्याची भल्ली शिकारीसाठी तयार झाली होती.

मी त्याला विचारले "मी भाला बघितलाय. त्याला असे मागे आंकडे नसतात तू कशाला काढलेस हे आंकडे?"

"धाकलं धनी, आसं पघा भल्ली जनावरांत घुसवली की जरा फिरवायची. आंकडा फसतो. जनावर ईवळत पडतं. पळत न्हाई." लाडोबाकडे शास्त्र होतं. न शिकताही मिळवलेलं ज्ञान, कला. तिचा उपयोग फक्त गरजेसाठी, पोटापाण्यासाठी.

एक दिवशी संध्याकाळी जेवणे आटपल्यावर लाडोबा एक भरीव लाकडी सोटा व भल्ली घेवून निघाला. आता त्याने पंचा गुडाळला नव्हता. फक्त लंगोटीवर होता. त्याच्या मागे कमळा हळू हळू बडबडत चालली होती. मलाही वाटले लाडोबा बरोबर जावे. मी खळयांत उडी मारून त्यांच्या कडे धांवलो तर कमळा काळजीने बोलत होती "एकलंच जातासा. बरोबर नाई कुणी. सांभाळायास हवं."

"हूं" लाडोबा

"वाघटं हाय म्हणत्यात हितं पन." कमळा

"हूं" लाडोबा. हे ऐकताच "मी तुझ्या बरोबर येतो" म्हणायचे मी गिळून टाकले.

"बघा! घाई करू नका. शिकार नाय झाली तरी चालंल. पन सांबाळा सोतास्नी" कमळाचा स्वर आता कांपरा होत होता.

"हूं" लाडोबा

मी पहिल्यांदा कधीच कमळाला लाडोबा बरोबर पाहिली नव्हती. जेंव्हा पहिल्यांदा आली तेव्हा ती बरोबर होती. त्यानंतर आता चालली होती. परड्याचे झापे आले व कमळा थांबली. डोळयाला पदर लावून डोळे कोरडे करीत होती. मी मागेच होतो. कमळाच्या लाडोबावरच्या प्रेमाचा, त्याच्या काळजीचा एक साक्षात्कार मला होत होता. हे खरेच निर्मळ प्रेम. कोणताही भपका नाही, प्रदर्शन नाही. मनाच्या मखमली पेटीत जपलेले अमुल्य मोत्या सारखे प्रेम.

कमळा मागे वळली. मला बघून म्हणाली "तुमी? तुमी काय करतासा हितं?"

"मी जाणार होतो लाडोबा बरोबर. बघ मला नाय नेलं त्यानं." मी खरे दडवत काहीतरी ठोकून दिले.

"येडं की काय? रातच्याला पाया खाली दिसत बी नाय. हे एकलंच गेलंत ते येव दे धडधाकट" कमळा बडबडत होती.

घरी आलो झोपून गेलो पहाटे पहाटे इतर गडी, बाया, वडिल सगळयांचा एकच कालावाला ऐकून जाग आली. "एकट्याने बरीच शिकार केलीन" एवढे कानावर पडताच

झोप उडाली व मी बाहेर धांवलो. बाहेर एक भले मोठे भेकर, दोन ससे लाडोबाने शिकार करून आणले होते.

तो दिसतच नव्हता. थोड्या वेळाने पंचा गुंडाळलेला लाडोबा आला. वडील म्हणाले "अरे लाडोबा केंव्हा केलेस हे करतूत? आणि एकटाच गेलास? सांगूनपण नाय गेलास? आता एवढे सगळे कितीतरी दिवस चालेल तुला."

"धनी सर्वास्नी वांटा. मी काय एकला खाणार? बेसावध रान हाय. दोन जोडीला आसतील तर मॉप शिकार मिळंल." लाडोबा बोलता झाला.

मग शिकार साफ करून तिचे वांटे झाले. लाडोबाचा वाटा उजव्या हातानेच घातला गेला. तो म्हणत होता एवढं कशाला! एवढं कशाला! पण त्यालाच मानाचा मोठा वांटा दिला. पठ्ठ्याने मिरची मसाला काहीच न लावता निखाऱ्यावर सगळे भाजून काढले. कमळाने ते मातीच्या गोलीत भरले.

मी परसांत इकडे तिकडे फिरत होतो. लाडोबाने बनवलेल्या धनुष्य बाणाने तिरंदाजी करीत होतो. फिरता फिरता मी घराच्या मागील बाजूला आलो. समोरच लाडोबाच्या खोलीची खिडकी होती. जवळ गेलो तर आंतले दृष्य पाहून थक्क झालो. कमळाने एका पानावर पिठाचा दिवा बनवला होता. तो पानावर घेवून ती लाडोबाला ओवाळत होती. दिवा त्याच्या मस्तकी लावी परत ओवाळे परत मस्तकी लावी मग उलटा ओवाळे. मी धांवत घराला प्रदक्षिणा घालून घरांत शिरलो सरळ लाडोबाच्या खोलीकडे धांव घेतली. दार लोटलेलेच होते ते उघडून आंत शिरलो. मला बघताच कमळाने पटकन ओवाळणी आटोपती घेतली. दिवा तिने भिंतीवर काढलेल्या त्यांच्या देवाच्या चित्रा समोर ठेवला व लाजून तिने बनवलेल्या तीन दगडांच्या चुलीकडे बसली. तिची आमच्या कडे पुरी पाठ होती.

मी ओरडलो "कमळा ओवाळना लाडोबाला. मला बघायचीय तुमची ओवाळणी."

कमळाने मानेनेच नकार  दिला. मी तिच्याकडे गेलो म्हणालो "चल ना कमळा." पुढचे बोलणेच खुंटले. कमळा थरथरत होती. डोळ्यांतून पाणी येत होते. तेवढ्यांत लाडोबा बोलला "धाकलं धनी नाय येनार ती. आमच्यांत बाईल ओवाळते ते बगु नये आसं हाय. तुमी आलांत तर आता ती भुकी ऱ्हायल एक दिस. देवाला भजत बसंल. मगच पाणी पील. आणि धाकलं धनी ल्हान हायत त्यांचं देवाला वावगं नाय. देवाला पाया पडा. आमचं काय बी वायट नाय होनार." दुसरी वाक्ये कमळासाठी होती.

मला  अपराधी वाटायला लागलं. कमळा दिवसभर बाहेर नाय आली. सगळ्या घराला समजले माझे प्रताप. वडिलांनी तंबी भरली. लाडोबाच्या खोलीत पाय ठेवायचा नाही. मी भरकटत होतो. स्वतःचाच राग येत होता.

दुसऱ्या दिवशी कमळा काम करताना दिसली व हायसे वाटले. पण तिच्याकडे जाऊन बोलायची हिम्मत होईना. ती बकऱ्यांकडे गेली तसा मी पण गेलो. हिम्मत करून बोललो "कमळा राग आला माझा? माहित नव्हतं मला."

"तुमचं काय नाय चुकलं. मीच दाराचा आडणा लावला नाय. मीच चुकली." कमळा

"आणि बघितलं तर काय वाईट होतं? आम्ही तर सगळ्यांसमोर ओवाळतो" मी.

"तुमचा देव येगळा. आमची उजळाईदेवी लई कडक. कोप केलान तर धन्यालाच नेते. पुजा कराया लागते दीसभर. अन्नपाणी काय पण घ्यायाचं नाय. रातीला दिवा लावायचा कुंपणाकडं. वाऱ्यानं, पावसानं पण विझता नये. तरच देवी शांत झाली म्हणायचं" कमळा सांगत होती.

"मग?" मी

"केला की उपास, लावला हुता दिवा रातीच. चांगला दोन घटका जळत हुता. तेवा म्हणलं देवी नाय रागावली" कमळाच्या चेहेऱ्यावर समाधान बघून मला बरे वाटले. दिवस परत होता तसा झाला. कमळाचा लाडोबावर किती जीव होता तो दिसून आला. उजळाई वरची अपरंपार भक्ती दिसली.

पाऊस आता संपत आला होता. शेतांत भाताच्या पिकांना केसरं फुटून एक मंद सुगंध सगळीकडे पसरला होता. सराईवरच्या कामांची लगबग चालू होती. पुऱ्या पिकलेल्या शेतांत रानटी जनावरं धुमाकूळ घालीत होती. पिकाची वाट लावत होती. एके दिवशी लाडोबा व कमळाने लावणी केलेल्या शेतांत रात्री रानडुक्करानी नासधूस केली व लाडोबाला मी पहिल्यांदाच एवढा चिडलेला पाहिला. पहिल्यांदाच त्याच्या तोंडून शीवी ऐकली. "ईच्चीभनं! माजं दाणं झोपवलं गुदमाळ्यानी, नाय सोडणार आजच्या राती. दावतोच माजा ईंगा त्यास्नी."

मग भल्लीला धार करत बसला. वडिलानी त्याला खळे चोपायला जा म्हणून सांगीतले तरी उठला नाही. मग वडिलानी त्याच्याकडे लक्ष दिले नाही. रानचे स्वैर पाखरू म्हणजे लाडोबा. त्याच्या मनचेच करणार. आज तो डुकरांवर सूड घ्यायला तयार होत होता. मग रात्री भल्ली व लाकडी सोटा घेवून स्वारी बाहेर पडली. मागे कमळा धांवली. "धनी, सांबाळा" व नंतर डोळयाला पदर कमळाने लावला. व निरोपाचे नेहमीचे दृष्य पूर्ण झाले. लाडोबा अंधारात गायब झाला.

सकाळी सकाळी कमळेने आरडा ओरड करायला सुरवात केली. "धनी, नाय आले. बगाया जाया हवं." ती इतर नोकराना सांगत होती. तिला जबरदस्त हुरहुर लागली होती. ती आपल्या खोलीत जाऊन उजळाईच्या चित्रा समोर दिवा लावून आली. सारखी आंत बाहेर करीत होती. मग वडिलांना म्हणाली "रातच्याला गेलेत. न्हाई आले अजून. मला जीवाला कससंच होतया. बरोबर गडी माणूस पायजे मी बगून येते."

"तू थांब इथेच. जातील दोघेजण." म्हणत वडिलांनी दोघा गड्यांना पिटाळले. अर्ध्या तासांत एक धांवत परत आला. सांगू लागला "शेताच्या पलीकडे रानांत लाडोबा जखमी होवून कण्हत पडलाय. त्याला आणायला आणखी तिघे चौघेजण तरी पाहिजेत."

हे ऐकताच कमळा बोंब ठोकत वाऱ्या सारखी पळत सुटली. तोंडातून चालू होते "धनी धनी काय केलंसा हे? सांग हुते जाऊ नये एकट्याने. कां न्हाई आईकलं माजं. उजळाईमाई वाचीव माज्या राजाला." तिचा पदर वाऱ्यावर फडकत होता. पाय विजेच्या वेगाने दौडत होते. मी मागे धांवत होतो पण अंतर वाढत होते. रानांत पोंचलो तेव्हा कमळा लाडोबाला सांवरीत होती. तरी देखील पदर चेहेऱ्यावर ओढला होता. तोंडाने "धनी काय जालं हे" चालूच होतं. लाडोबा ओरडला "चीप व्हा! काय नाय झालंय. उबा करा. चालन मी." मग एकाबाजूने गडी व दुसऱ्या बाजूने कमळाने काखेत हात घालून लाडोबाला उचलले. तो जागोजागी सोलपटून, खरचटून निघाला होता. गड्याने विचारले "काय झाले? एवढा खरचटलास कसा?" मग लाडोबाने जे सांगीतलं ते ऐकून हंसूच यायला लागले.

लाडोबा दबा धरून डुकरांची वाट पहात बसला होता. पहाटे पहाटे तीन चार डुकरे शेतांत घुसली. याने पारध्याच्या निपुणतेने भल्ली त्याच्या मानेत खुपसली व फिरवली भल्ली बरोबर अडकली. डुक्कर ओरडत पळू लागले. याने भल्लीचा दांडा सोडला नाही. डुक्कर लाडोबाला फरफटत, खेचत जंगलाकडे नेत होते. लाडोबा शेतांच्या मेरेवर, रानांतल्या दगडांवर, करवंदांच्या कांटेरी जाळीतून सोलपट जात होता पण दांडा सोडत नव्हता. शेवटी भल्ली दांड्यातून निसटली व लाडोबा फरपटायचा थांबला. आंग सगळे सोलपटले होते. उठायला गेला तर मुका मार लागल्याने उठता येईना. मग पडून राहिला.

म्हणजे त्याला जास्त काही लागले नव्हते. हंसावे तर कमळाला वाईट वाटेल म्हणून हंसू दाबले. लाडोबाला आधार देत आमची ही वरात घराच्या दिशेने जात होती. तेवढ्यांत समोरून काही गडी आले. आम्हाला बघून थांबले. लाडोबाला आता जोर चढला. तो त्यांना म्हणाला "तुमी आलासा? त एक काम करा. डुक्कर रानांतच हाय. पडलं आसंल झाळीत. भल्ली मानेत घुशीवलीय. भल्ली बी मिळंल, डुक्कर बी मिळंल." अजूनही त्याला भल्लीचा मोह सुटत नव्हता.

घरी पोंचलो. लाडोबाला कमळाने खोलीत झोपवले. सगळे निघून गेले. वडील म्हणाले "त्याला हळद तुरटीचा लेप लावा."

"मी करतोसा लेप." कमळाने सांगीतले. मी पहात होतो कमळा काय करते ते. तिने जुन्या चिंध्या घेवून गरम पाण्याने त्याला पुसून काढले. दरवेळी एकाद्या मोठ्या सोलपटल्या जागी ती बडबडायची "ब! ब! ब! कासं सोललं हाय सगळं आंग. सगळंच कातडं गेलंय की." काही ठिकाणी मुका मार बसून काळेनिळे झाले होते, सूज देखील होती. कमळाला खूप लोक कुठले कुठले उपाय सांगत होते. ती मात्र काहीच लक्ष देत नव्हती. त्याला पुसून

झाले मग म्हणाली “मी पाला घेवून येतंसा. उटू नका. नायतर जाशीला कोणी हाळी दिलीतर.”

“हूं ” लाडोबा. लाडोबा कमळाशी फक्त हूंकरानेच बोलायचा असे वाटले.

कमळा लगबगीने गेली. थोड्या वेळाने आली तर अर्धी टोपली पाला व एक गोल गुळगुळीत चपटा दगड घेवून आली. मी कुतुहलाने सगळे बघत होतो.

“कसला ग पाला हा?” मी विचारले

“गांधारीचा हाय त्यो. जखम लवकर भरतेय त्याने. परू न्हाई होत.” उपयोगा सकट सगळी माहिती कमळाने दिली. मग पाला चांगला धुवून वाटला. दगड जळलेल्या लाकडांच्या निखाऱ्यांत तापत ठेवला. आता लाडोबाचा डोळा लागला होता. त्यांतच तो कण्हत होता. जरा वेळ वाट बघत कमळा थांबली. पण तिचा जीव वरखाली होत असल्याचे जाणवत होते. केंव्हा एकदा लेप करेन असे वाटत होते. शेवटी त्याच्या उठण्याची वाट न पहाता तिने लेप लावायला सुरवात केली. लाडोबाच्या तोंडाकडे पाठ करून बसली. पदर डोक्यावरून चेहेऱ्यावर ओढला.

केवढा अट्टाहास तोंड नवऱ्याला न दाखवण्याचा. मला नवल वाटत होते. तिने लेप लावायला सुरवात केली व लाडोबा जागा झाला. “सुक्काळीची! आताच लावाया पायजे व्हता काय? नीजाया नाय द्याचं?” असं बडबडत लाडोबाने कमळाला एक धपाटा घातला. कमळा जवळ जवळ पुढे पुरी कोलमडली पण तो धपाटा सहन करीत बोलली “निजा न्हवं. मी लावतेया की लेप. बरं नको व्हाया लकूर? थोडं शेकनार बी हाय. झेजरल्यालं सुटंल कसं शेकल्या शिवा?”

मग लेप लावणे व त्याला दुखले की धपाटा खाणे हे सुरू झाले. प्रत्येक धपाट्या नंतर ती बोले “दुकलं? हळू लावते बगा नाय दुकनार आता. थोडं सन करा. बरं व्हाया नगं?” मी बघतच बसलो. लहान मुलाला समजवावे तसे कमळा लाडोबाला समजावत होती. आणि तो नवरेपणाचा अधिकार गाजवत होता. तिने शेकायला घेतले. कपड्यांत दगड गुंडाळला. मुका मार बसलेल्या ठिकाणी शेक देवू लागली तसे धपाटे, बुक्के वाढले. कमळा दोन तास हे सगळे करत बसली होती. आता लाडोबा शांत झोपला होता.

दिवसातून कमळाचे दोनदा लेप लावणे, शेकणे व धपाटे खाणे चालू होते. चार दिवसांत लाडोबा एकदम बरा झाला. कोणत्याही जखमेत जराही पू वगैरे झाले नाही. सर्वांना खपल्या धरल्या होत्या. सुजलेले भाग एकदम बरे झाले होते. माझ्या डोळ्या समोर जंगलातील सावित्री उभी राहिली. मार खात देखील केवढी सेवा मनोभावे केली होती तिने.

चार पाच दिवसांनी गांवातील एकजण वडलांकडे आला. म्हणाला “भाकरांत(रानांत) कुजकी घाण सुटली म्हणून बघीतलं तर डुक्कर मेलेला. त्याच्या मानेत हे हत्यार फसले होते. आपल्यांत असले हत्यार नसते. ते बघा तुम्ही. बाहेरचे लोक येवून आपल्या गांवांत शिकार करतात की काय? बघा काय ते.”

मी एकदम ओरडलो “ही तर लाडोबाची भल्ली.” तेवढ्यांत लाडोबा आला. भल्ली बघतांच खूष झाला. त्याने ती हातांत घेतली व अगदी प्रेमळ नजरेने निरखू लागला. वडिल त्याला म्हणाले “लाडोबा भाला ठेव पण आता रात्री शिकारीला जायचे नाही. एकट्याने तर मुळीच नाही.”

“जी धनी, न्हाई जानार धनी.” लाडोबा.

मला मात्र वाईट वाटले. लाडोबा एक एक भयंकर पण मजेदार प्रसंग उभे करतो. ते बंद होणार. काय मजा? बकऱ्यांकडे कमळा दिसली. धांवत तिच्याकडे गेलो. तिला वडिलानी लाडोबाला दिलेली तंबी सांगीतली. तर एकदम म्हणाली “अगो बया! बरंच की, नाय गेलं तर माज्या जीवाचा घोर तरी वांचल. पण नाय ऐकनार ते. दोन दिसांत जातीलच. शिकारीची भारी हौस हाय. आन् माज्या जीवाला घोर लावनं लई पसंद हाय. जातीलच बगा ते.”

मी मग पुढे घोडे दामटले “तू ही सांग ना नाय जायचे म्हणून. आणि काय ग तो एवढे धपाटे घालतो मारतो तरी तू केवढी सेवा करत बसतेस त्याची?”

“अगो बया! आसं नये बोलू धाकलं धनी, बाई दाल्ल्याचा मार खाते तेवढं जास्त जगते. दाल्ला मार देतं ते बाईल जास्त जगावी हून. पेरमाने मारतो. राग नसतो धरायचा. आन दाल्ल्याच्या कामांत बोलायचं बी नाय. बाईल हूनच ऱ्हायचं बघा.” कमळा सगळी परंपरा फाड करून सांगत होती. केवढा विश्वास होता तिचा आपल्या परंपरेवर.

दहा पंधरा दिवस गेले कापणी सुरू झाली. कामाची लगबग वाढली. झोडणी, मळणी करून भाताची भरणी चालू झाली. लाडोबा कामाला वाघ होता म्हणून कामे झपाट्याने होत होती. कमळा पण तट्टयांत भात भरायला, मळणीच्या भाताला वारा लावायला मदत करीत होती. या कामाची पूर्वी कधीच संवय नसल्या मुळे त्या दोघानाही अंगाला संध्याकाळी खाज सुटू लागली. पहिल्या दिवशी तर कमळा ओरडू लागली. “देवीचा कोप झाला. दोगानाही कां खाजणं सुरू?” तिने देवीच्या चित्रा समोर दिवा लावला. मग लाडोबा बाहेर येवून सांगू लागला. तसे सगळे त्याला समजावू लागले. खोबऱ्याचे तेल लाव व आंघोळ कर खाज जाईल. पण तो व कमळा काही ऐकेनात. त्यांना वाटे देवीचा कोप वाढेल. मग वडलानी दम मारून सांगीतले तसे पहिले लाडोबाने तेल लावले. खाज थांबली. मग कमळाला समजावता समजावता त्याला नाकी दम आला. शेवटी तिनेही लावले. आम्हाला सगळ्याना हंसायला एक विषय मिळाला.

पण तिचे बरोबर होते. तेलाचा वापर ते कधीच करीत नव्हते. नवे काही केले तर देवीचा कोप होतो ही भावना मनांत पक्की बांधलेली.

दुसऱ्या दिवशी झोडणी, मळणीच्या कामाला त्यांनी बुट्टीच मारली. वडिल हंसले, म्हणाले “राहू दे नको त्यांना खाजेची कामे देवूत. त्यांची परंपरा आपण नको बिघडवायला.”

मला बरोबर नाही वाटले. “ते अशिक्षीत त्यांना समजावून सुधरवायला नकोत. कां अंधश्रद्धेत ठेवायचे त्यांना?”

“नको ते आहेत तसेच चांगले आहेत. आपला वारा सुद्धा घेवू नये त्यानी. आज नाही समजणार. मोठे व्हा, शिका, जग बघा, त्यांतली असूया, द्वेष, मत्सर, लांडी लबाडी बघा व मग ठरवा त्यांना सुधरवायचे की बिघडवायचे. हे तर जंगलातले निर्मळ मन. यांच्याकडून आपण शिकावे असे.” वडील हे विचार मांडताना पहिल्यांदाच पहात होतो. गांवातल्या मुलाना पकडून पकडून शिकवणारे वडील, शाळा काढणारे वडील हे उलटे कसे काय बोलतात? गप्प बसलो पण प्रसंग लक्षांत राहिला

जग बघत फिरलो, सुसंकृत सभ्य म्हणवणाऱ्या दिखाव्याच्या समाजांत फिरलो, का जनलज्जेमुळे मी देखील त्यांतलाच एक झालो. लाडोबा व कमळा डोक्यांत फिरत राहिली. दरवेळी आठवले ते लाडोबा व कमळा. रानटी, जंगली रूढी पाळत अतीव प्रेमाने एक झालेले जोडपे. त्यांची मारकुट्या शृंगाराची रूढी, बायकोने नवऱ्यापासून तोंड दडवायची रूढी. त्यांत खरे निर्भेळ प्रेम धगधगत होते. सती सावीत्रीचे गुण कमळांत होते. सेवाभाव कांठोकांठ भरला होता. लाडोबा तर शिकार वाटत होता. ‘माझे मलाच हवे’ हे त्याच्या मनालाही शिवत नव्हते. त्यांची स्वतःची अशी झाडपाल्याची औषधे होती. त्याने ते बरेही होत होते. देवीला प्रसंगा नुसार पाया पडायचे. इतर कुठल्या सणांचा गाजावाजा नव्हता. बकरीचे दूध व नुसत्या शिजवलेल्या फक्त मीठ घातलेल्या अन्नावर दृष्ट लागण्या सारखी शरीर यष्टी भलभल्याना लाजवी. स्वतःची शस्त्रे स्वतःच बनवण्याची कला होती. ते गरजेने सर्वसंपन्न होते. धर्म खरोखर ते पाळत होते. संग्रह करू नये. गरजे पुरते ठेवून बाकी साधू संतांसाठी सोडायला सांगणारा धर्म जन्मतःच त्यानी आपलासा केला होता. स्वार्थ त्यांना शिवलाच नव्हता. हे मला लहानपणी समजले नव्हते. वडील किती खरे होते.

हातांत हात घालून अतीव प्रेमाचे प्रदर्शन करीत फिरणारी व घरी गेल्यावर लहानशा कारणाने भांडणारी जोडपी पाहिली. पैसा, प्रतिष्ठा मिळवायसाठी एकत्र आलेल्या जीवांची स्वार्थी कुतरओढ बघितली. उत्तानपणाचा अतिरेक करून देखील सुधारलेल्या समाजांत संबंधांचे प्रश्न वाढतच होते. माझे तुझे करण्यांत जग दंग होते. स्वतःच्या पोळीवर ओढता येईल तेवढे तूप प्रत्येक जण ओढू पहात होता. तरीही संतोष मिळत नव्हता. आणखी कसे मिळेल यांत सौख्य, जीवनाचा आनंद गमावून बसलेल्या माणसांत वावरलो व लाडोबा आणि कमळा डोळयासमोर आले. वडिलांचे बोलणेही आठवले. “नको ते आहेत तसेच चांगले आहेत. आपला वारा सुद्धा घेवू नये त्यानी.” किती सत्य होते हे.

शिकलेल्यांचे संसार भांडणाने, कुरबुरीने भरलेले होते. पदरांत तोंड लपवणाऱ्या कमळाचे मात्र लाडोबावरचे प्रेम चंद्रकले सारखे वाढतच होते. कुठले चित्र खरे? असे हे रानांतले जीव. त्यांना रानटी, जंगली म्हणायला मी तरी धजत नव्हतो. बाकीचे त्यांना हंसत. त्यांचे रिवाज वेगळे होते पण त्यांत सुद्धा प्रेमाचे एक हृद्य बंधन होते, अपरंपार माया होती. कसे म्हणायचे त्यांना रानटी? रानटी हा गौरव वाटू लागला व एक नवीन शिवी मनांत आली.

स्वार्थी शहरी कुठचा!!!!!!

# विठाबाई

ही कोंकणाच्याच पार्श्वभूमीवरची गोष्ट. स्वार्थी जगाचे कडवट अनुभव घेणाऱ्या अगदीच मामुली शिकलेल्या बाईने सोपे करून सांगीतलेले स्त्री जन्माचे तत्वज्ञान. तिच्याच शब्दांत.

सगळ्याच मराठी भाषीकाना पूर्णपणे समजावी म्हणून काही शब्दार्थ खाली दिले आहेत. ते वाचताना उपयोगी पडतील.

**सोरले किंवा सोरकुल**- मातीचे पसरट गोल भांडे. जेवण बनवण्या करतां वापरतात.

**मिरग**- मृग नक्षत्र. **मिरगाचा पावस**- मृग नक्षत्रांत पडणारा पाऊस.

**कायमाय** - काहीतरी

**घोव**-नवरा **चेडू**- मुलगी **हाड**- आण, घेऊन ये. **पाट**- दुसरे लग्न

**पची खेळणे**- सागरगोटे खेळणे (छोटे गोल दगड सागरगोट्यांसारखे वापरून)

**भंडली**- पिसाळली, वेडेपणाने वागणारी. **आवंदा**- यंदा, या वर्षी

**द्याज**- दहेज , हुंडा, कर्जा वरील व्याज **लुगडे**-साडी **बांव**- विहीर **होऊर**-पूर

**चाकरमानी**- बाहेरगांवी नोकरी करणारा, खास करून मुंबईतला.

**बोंदरा** – जुने कपडे- चादरी, साड्या, गोधड्या वगेरे. **धुमशान**- रागावून घातलेला गोंधळ. किंवा दंगा, ऊत्सव वगैरे.

**मेर**- भात शेतीत दरेक कोपऱ्याचे घातलेले बांध.

**खोप**- जुनाट घर, काकूड फाटा, गुरांची वैरण ठेवण्यासाठी बनवलेले घर. **करवादणे**-रागावणे.

**फाटपट**- पहाट **ईख (किंवा ईक)-** विष

"माई, मी ईश्वर, वामनांचा मुलगा, ओळखलंस?" मी विचारले.

"ईस्वर! ये! ये! बस रे बाबा. जवळ बस जरा. नातू रे तू माजा!" म्हणत माईनी माझ्या चेहेऱ्या वरून हात फिरवायला सुरवात केली. त्या खरखरीत, राबट हातांतून येणाऱ्या मायेने माझे अंग शहारले. केवढी माया भरलेली होती हातांत! ती माया तिच्या स्पर्शातून मला अगदी प्रकर्षाने जाणवली. मी असा स्पर्श कधीच अनुभवला नव्हता. मायेचा झोत त्या हातांतून माझ्यांत उतरत होता व एक अनामिक सुख मी अनुभवत होतो.

"माई! बाबाने पाठवलेय मला. तुला न्यायला आलोय. आणि तू इकडे कुठे येवून राहतेस. आपले घर सोडून? बाबा फार अस्वस्थ असतो. तुझी काळजी वाटते त्याला." मी सांगत होतो.

माई थोडा वेळ विचारांत बसली. मग बोलली "शाम्ली, तुजी आये, कशी हाय? बरी नां? सुखांत ऱ्हा रे सगळे. मग मालाय सुक रे." परत ती विचारांत पडली.

"माई, पण तू माझ्या प्रश्नाचे उत्तर नाय दिलेस? केंव्हा निघूया आपण?"मी विचारले.

"बाबारे, वामनला लय माया माजी. पण मला बोलवता ती माझी कणव करीत. कणव बरी नाय रे." माई.

"माई, बाबा एवढं प्रेम करतो, तुला मानतो. तरी तुला असं कां वाटतं? आणि कणव म्हणजे काय काळजी पोटचे प्रेमच नां?" मी.

"तुमी शिकलंले, मी काय अर्त सांगणार की फरक सांगणार. पण मनाला सुक देतं नी कायपण व्यवार मागत नाय ती खरी माया. नी काळजी करतं, मनांत ठेवतं कायतरी केलं पायजे परत फेड म्हणून ते प्रेम नाय, कणव रे ती. मी काय सांगणार? मी शिकलेच नायरे तेवडी." माई.

माईचे तत्वज्ञान फार भारी होते. समजण्या पलीकडचे होते. मी म्हटले "ते काही नाही माई! बाबाने सांगीतलेय तुला घेवून यायला. केंव्हा निघायचे बोल? केंव्हा तयारी करतेस."

माई काहीच बोलली नाही. गप बसली. गाढ विचारांत गेली. तिच्या चेहेऱ्यावर कधी हंसू तर कधी चिंता, कधी समाधान तर कधी राग असे भाव दिसू लागले. मला समजले ती बहुतेक भूत काळांत गेलीय. पण तिचा हा रंग पहाणं मला लोभसवाणं वाटायला लागलं. मी तसांच तिच्या पुढ्यांत बसून राहिलो. तिला पहात. समजायचा प्रयत्न करीत. ही माझी की बाबांची कोणीच नाही. पण बाबांचं दैवत असल्यागत ते हिच्याबद्दल बोलतात. आणि गांवचे आमचे घर सोडून ती माहेरी गेल्याचे समजले, त्याचे दुःख त्यांना त्यांच्या वडिलांच्या आजारापेक्षांही जास्त झाले. हे काय आहे? आजोबा वेड्यासारखे कां करतात आणि ही सर्वांवर माया असून दूर कां गेली? मग मी म्हटले "माई चल ना गं माझ्या बरोबर. बाबाला, आम्हाला बरे वाटेल."

“असं बोलतोस! मी काय आयुश भर गप गप ऱ्हायले. पण आता सगळं बोलते. ऐक, मग पयले ठरव मी काय करू ते. मग ठरव मी कशी येवू ते.” असे सांगून माई बोलू लागली नी मी गाढ स्वप्नांत असल्यासारखा ऐकू लागलो.

..................

..................

लहानपणीच बाबा गेला. आयेने काकाच्या मदतीने शेती सांबाळली तेंवा मी चार वर्साची होती. दोन भाऊ न मी, मोठा धा वर्साचा आणि मधला सात वर्साचा. काकाला कोनीच नाय. त्यानं लगन केलंच नाय. विड्या फार ओडायचा. आयेशी भांडायचा. आये पण मोठ मोठ्यानं शीवीगाळ करायची. शेतीची कामं झाली कीं सांच्याला भांडण सुरू. डोकं पिकायचं मग मी शेजारच्या शेवतेच्या घरी जायची. पची खेळत बसायची. रात पडायला आली की आयेची बोंब ऐकू यायची.

“रांडग्या खंय मेलसस गो इटे! हंय जेवणात काय तुजो बापूस मदत करता काय गो?”

मी जीव घेवून शेवतेच्या घरून पळत घरी पोचायची. दोन धपाटे घालून आयस पेज करायला सांगायची. सोरल्यांत पाणी घालून चुलीवर चढवी. लाकडं चाळवून जाळ वाढवी. उकड्या कण्या काडून निवडी. मग धुवून सोरल्यांत पाणी उकळले कीं कण्या घाली. थोड्याच वेळांत रटमट रटमट करीत पेज बोलू लागे. आयेचे नी काकाचे भांडण थंड झालेले असायचे. भाऊ भायर काय तरी करीत असायचे. काका त्यांना सांगे ती कामे ते करीत. आये स्वतः बरोबर मोठ्याने बोले. पेजेच्या रटमटा बरोबर ते ऐकताना मला वाटे आयेला भूताने नासवलेय. बाबा भूत होऊन तिच्या मानगुटीवर बसलाय. आणि ती त्याच्याशीच भांडतेय.

ती बडबडे “माज्यार तीन पोरा टाकून गेलो. भावाकय पाठी ठेवल्यान माज्या उरार. सगळयांचा बगतलंय कसा ह्याय नाय समाजला? पोरांका शिकवूक नको? सरायवर येता तां चार सा म्हयन्यांत संपता. मग खातलंव काय?”

माज्या मनांत येय हिला बाबाच्या भूताची बाधा झालीय. ती त्याच्याशीच वैराने बोलतेय. बाबा होता तेवा आयेला केवा केवा मारी. आये मार खाताना गाळी घाले, रडे. केवा केवा तर बाबावर धावून जाई आणि सांगे “मारून टाक माका एकदाचो. दिवसभर काम करायचा नी रातच्याक मार खायचो. मारून टाक मग सुटन तरी”

मला भीती वाटे आय मेली तर माजे केसाची फणी कोण करेल? आठवड्याला केस धुवून आंघोळ कोण घालेल?

पेजेची रटमट कमी झाली नी मी समजले पेज शिजली. हळूच लाकडे भायर काडून पाण्याचा हात मारून विजवली नी भायर आले. “पेज झाली गे आये.” मी हळूच ओरडून आयेला बोलले.

“घाल काकाच्या मढ्यावर पयल्यांदा” आये ओरडली. ती गोधडीला ठिगळ शिवत बसली होती. मिरगाच्या आदी पांगरूणं तयार ठेवायची होती.

काकाने कुड्याच्या पानाची मोठी विडी बनवली होती आणि झुरके मारत होता, ठसकत होता. मी वाडग्यांत पेज काडली नी काकाला दिली. तो पयल्या घासालाच म्हणाला “मीट नाय घातलं गो? मीट हाड वांयच” मी आयेच्या कचकचाटांत मीठ विसरले होते. त्याचे एवढे बोलणे पण आयेला पुरे झाले. तिने वाचाळी सुरू केली,

“राजोच लागून गेलंस न्हय. चार वर्साच्या पोरान पेज करून दिल्यान तां बघ. वर मीट मागता उटून घेवक कंबर मोडलीसा? एवढी सेवा करून होई होती तर लगीन कित्या नाय करूक? रांड तरी ठेवची. ताय नाय. आमच्या उरार बसलोसा.”

मला आयेची कचकच बरी वाटत नवती. काका मला व भावाना चारोळी, करंदं नी तोरणं आणायचा. मायेने जवळ घ्यायचा. भावाची आठवण काडून केवा केवा डोळे भरून यायचे. त्याचा माज्या बाबावर फार जीव. एकदा म्हणाला “चेडवा तुजा लगीन करून दिलंय, मग मरूक मोकळो. तुका पदरांत टाकून गेलोसा तुजो बापूस. तुजी आवस काय लगीन करून देतली? पावणे ईले तर तेंच्याशीय भांडांत हडळ.”

भाऊ शाळेत जायचे. शेतीत काम असले की शाळेला रामराम. मिरगाच्या आदी कवळाचे काम. कवळे तोडायला जायचे तेवा व नंतर ती जाळायची तेवा ऊनाळयाची सुटी असायची. मला शाळेत घालणार म्हणून काका म्हणायचा पण अजून दोन वरस हायत तेवा पेज, भाकरी शिकून घे म्हणायचा. पेजेला काय नाय पण भाकरी जमायचीच नाय. आयेच्या सुंदर गोल व्हायच्या. माज्या मात्र हातावरच मोडायच्या तुटायच्या. आये मग पाठीत धपाटा घालून ओरडायची. मी रडत रडत शेवतेच्या घरी पळायची. शेवताची आई मला म्हणायची “तुझी आय भंडलीसा. घोवाक खाल्लान आता मारून मारून तुकाय खातली काय?”

दोन वरसा गेली. आता मला भाकरी येत होती. नी काका रात्री झोपला तो उठलाच नाय. सकाळी चायची फूटी द्यायला गेली तर निपचीत झोपलेला वाटत होता. उटवायला गेले तर लोळल्या सारखा एकाबाजूला गेला. घाबरून आयेला हांक मारली. तिने बगीतले नी म्हणाली “सुटलव गो पोरा! गेलो तुज्या बापाशी कडे.” मग तिने जोरांत गळा काडला नी बोंब मारून रडायला लागली. “गेलो वो आमचो आदारSSS. काय करतलंव आताSSS. कशी रवतलंव आमी”

तिची बोंब ऐकून शेवताची आये, परबीण, मांडवकरीण सगळया आजूबाजूच्या आया बाया धांवत आल्या. तिच्या बरोबर त्यांनीही गळा काढला. मला मग रडू रडू होवू लागले. भाऊ देखील धसमसून रडू लागले. एकएक करत वाडीतले लोक जमले नी आये नी बाकीच्या बाया गप झाल्या. मला वाटले आयेने लोकांना गोळा करायलाच बोंब मारली होती. काका गेल्याचे दुक तिला कसले? आमी तीनी भावंडं मात्र अजून मुसमुसत होतो.

बांबू आले, मडके आले, शेणी पेटवल्या नी जल्मातले पयले मरतीक मला दिसायला लागले. बाबा मेला तेवा मला शेवताच्या घरी ठेवले होते. मला कायपण माहीत नवते. चार तासानी घरी आलेतर बाबा नवता. त्याच्या झोपायच्या जागेवर पणती लावली होती.

बाजूला डाळीवर आयेने गोधडी पांगरून झोपून दिले होते. मग मधूनच हुंदकत होती. एवढेच माहीत. आज पयल्यांदा मरतीकाची पूजा बगत होते. जीव कायतरीच करत होता. सगळंच वेगळं, भयंकर वाटत होतं. नी कानांवर आले "चला खांदो द्यारे. उचला लवकर. काशाक सांगा मडक्या पकडूक" काशा म्हणजे काशीराम माजा मोठा भाव. मग कोणीतरी राम राम सुरू केले नी काकाचे मरतीक निघाले. परड्याच्या भायर पडले नी टाळ मृदंग ढोलाच्या तालावर भजनाचा सूर येवू लागला.

एक एक बाई उठली नी जाऊ लागली. नायतरी काय आयेचे दुक किती ते त्यांना म्हायतच होते. दोन घटकानी दादा आला नी सगळे परत होते तसे झाले. आयेने त्याला भाकरी दिली नी वर सुकट भाजून, तेल तिखट लावून दिले. मी बगत होते आयेला काका मेला ते काय नाय असेच वाटत होते. मी मात्र काकाची आटवन काडत बसले होते. मधला भाव दिन्या ढोराना घेवून नदीवर पाण्याला गेलेला. तो आला म्हणला आये भूक लागलीय. आयेने भाकर नी मीरचीची फकी दिली. "याला सुकट नाय" माज्या मनांत आले. मला बोलवून म्हणाली "इटे! जेवन घे." काका गेला आता आये कोणाशी भांडणार? मला भय वाटले नी गप खायला गेले. आयेन रात्रीच्या पेजेचं सोरकूलं पुढ्यांत सरकवलं. मी गप मान खाली करून खालं.

दिवस जात होते नी हे असेच चालले होते. काशीरामाला आये चांगले चुंगले करायची. दिन्याला जरा डावे. मला मात्र शिळे पाके. काय नसलेच तर सांगायची पेज नायतर भाकरी थापून खा. मला वाटले आता काशीराम मोठा झाला. बाबाची नी काकाची जागा त्याची झाली म्हणून आय त्याला चांगले ठेवायची.

काशीरामला आमी दादा म्हणायला लागलो. तो शेतीत काम करू लागला. घरचे सगळे बगत होता. दिनाला भाऊ म्हणायला लागलो. तो चांगला शिकायचा म्हणून त्याची शाळा सुरूच होती. मी शाळेत जायचे म्हटले तर आये एकदम चिडली म्हणाली "आणि कामा कोण करीत तुजो बापूस की काका? येतलेत वरसून काय गो? नी शिकललो घोव गावतलो? द्याज किती देवचा लागात? शिकाक चलला! मडम होवक"

काका गेल्या नंतर आय माज्यावरच उकळायची, मलाच नाय नाय ते बोलायची. आयेला भांडल्या शिवाय चालत नवते काय असे वाटे. मी मात्र घरांत दिवसे दिवस बोलतच नसे. गप सांगीतलेले काम करी. ते पण तिला चालत नवते. शेवतेची आये मधून आमच्या कडे यायची. आये मग आपलेच रडणे चालू करी "दादा ल्हान आसा गो अजून. सगळा तेच्यार पडला काय करीत तो तरी. ह्या इटेचो घोर हा गो माज्या जीवाक. काय बोलत नाय. मुक्या हा की काय म्हणतले लोक. मग लगीन कसा होयत?"

शेवतेची आये बोली "काय सांगतस गे. चांगला गुनाचा हा चेडू तुजा. शेवतेकडे येता तेवा चांगला बोलता आमच्याशी. गो! पोरांका माया देवची गो! मग उभारतत. नायतर तू भांडशीत म्हणून भियत असात." हे आयेला काळजाला लागलं. बोंबलत म्हणाली "होयतर

मीच भांडणारा. मारता गांव सगळो बोंब मी भांडखोर म्हणून. तुज्याकडे बरा बोलता. आयस वैरीण हेंची. काय काय माज्या कपाळार लिवलासा तां वरच्याकच ठावक." आयेचा हा चेरा मला नी शेवतेच्या आयेला नवा नवता. ती शांतपणे उठली नी बोलली "मी जातंय. पण एक सांगूचा रवला. शेवतेची सोयरीक इलीसा. जमला तर सरायवर लगीन घेतलंव."

मी ऐकतच ऱ्हायले. शेवतातर माज्यावर एकच वर्सानी मोटी. फार तर आठ वरसाची. लगीन होवन ती पण गेली तर माजी मैतरी संपली. बोलायला कोण पण ऱ्हाणार नाय. आता आयेच्या नशिबा पेक्षा माजे नशीब फुटके वाटले. घरांत मुकी होते. शेवता गेली तर पुरी मुकी होवन जाणार होते.

पण शेवताची सोयरीक जमली नाय. द्याज खूप मागीतले. पांचशे रूपये, दोन तोळे सोन्याचे डाग नी पन्नास नारळ. शेवतेच्या आयेन खूप सांगीतले. पन्नास नारळ मानले, एक तोळयाचा डाग आत्ता करू नी अर्दा तोळा पयल्या दिवाळीला. मानाचे १०१ रुपये देव. पण त्यानी काय पण मानले नाय. त्यांची पांच एकर भात शेती होती. नारळाची धा झाडं नी आंबे फणसांची पण दोन चार दोन चार झाडे होती. खात्या पित्या घरांत पोर जावी म्हणून शेवतेची आये न झेपणारी जबाबदारी घेत होती. सोनं ३८०रुपये तोळा, करायचे २०- २५रुपये सोनाराला, वर १०१ रुपयाची दक्षिणा नी पंचवीस नारळाचे साडे बारा रुपये, वर जेवण खर्च सगळं मिळून सात आटशे तरी लागणार. कुठून आणणार होती. तेल मीठाचे पैसे जवळ करताना तिच्या दम निगायचा. मग एवढे पैसे कुठून आणणार होती.

शेवतेचा बाबा तर हबकून गेला होता. पावणे गेले तसा ओरडला "काय सांगं होतंस तेंका? मान्य ठेवलानी असता तर माका इकणार होतं काय? खंयसून हाडतलंस गो ईतक्या?"

शेवतेची आये कायपण बोलली नाय. शेवतेची सोयरीक झाली नाय पण माज्या आयेचे बोल वाढले. सकाळ संध्याकाळ मी दिसले की बोलायची "रांडेची चेडवा कशाक जल्माक येतत ती? द्याज देताना आवशी बापाशीक खावन टाकतत. आमच्याचा करताना किती गिळतलो माका तां काय म्हायत. शेवतेच्या घरांत चाकरमानी नाय. आमच्याय नाय. खंयसून पैशे हांडतलंव." मी गप कामांत लक्ष घाली आयेचे ऐकाचेय नाय नी उत्तरय द्यायचे नाय. मग भांडणच नाय.

दिवस जात होते. दोन वर्सानी शेवतेचे लगीन झाले. धा कोसांवर गेली. फार लांब गेली म्हणून शेवतेची आई दुक करायची. तिच्या घरी शेती होती, नारळ होते नी दोन गाई, तीन म्हशी नी बैल गाडी होती. तिचा बाबा आनंदात होता. सोयरीक स्वस्तात जाली होती. ११नारळ नी ५१ रुपये दिले. अर्द्या तोळयाचं मंगळसूत घालून त्याने शेवतेला उजवली.

माजी आये सगळं अगदी डोळयांत नी मनांत सांटवत होती. मला समजत होतं पुढले थोडे दिवस मला ऐकायला लागणार होते. पण आता सवय झाली होती. आये बोलणारच. तिच्या तोंडाला कोण बंद करेल.

चार म्हयन्यानी शेवता म्हायेरपणाला आली. सुकली होती. मला म्हणाली “आयेकडे बरां होता. थंय म्हशींचा नी गायेंचा फाटपटी नी संध्याकाळी दूद काडूचा लागता. गोव्याच्या रस्त्यांक लागून हेंच्या मामांचा च्या चा दुकान आसा. थंय दुद घालूक जावचा लागता. दोन मैल लांब आसा दररोज दोनदा मीच जायचा. शिवाय बैल म्हशीचो वाडो साफ करूचो लागता दोन येळ. तेंका करड गवत घालूचा लागता. दुबत्या जनावरांका पेंड नायतर आंबोण घालायचा. जीव दमता गो इटे. चूल मातर सासवेन आपल्या कडेच ठेवलान. मोजून खावक देता.”

मी विचारलंय “अगो घोव बरो आसा ना? तेका सांगायचा काय होया नको तां.”

शेवता सापावर पाय पडल्या सारकी माज्या कडे बगून म्हणाली “अगो तेंका बोललंय तर कायमचा हंय येयन. सासू सांगात तसांच सगळे करतत. सासरे पण नी माजो घोव नी दीर पण. काय सांगतलं त्येंका?”

लग्न म्हणजे असं असतं काय? आजूबाजूला सगळ्याच घरांत बायकोचं म्हणणं ऐकणारे. मग लक्षांत घेतले. पयले सासूचे राज्य! ती गेली की सुनेचे. तोपर्यंत सगळी कळ सोसायची. जगराटी दुसरं काय. शेवतेच्या आयेने तिला आट पंदरा दिवस चांगले चुंगले आवडीचे करून घातले. नी आराम दिला. जरा तुकतुकीत होयपर्यंत तिच्या घरून तिला न्यायला दीर आला. शेवतेच्या आयेने कोंबडी कापून त्याला उजवला. शेवता गेली नी मी परत एकटी झाली.

फुडच्या वर्साला भाऊ सातवी पास झाला नी आयेला बोलला. “मी मुंबयला जातो नी काम बगतो. मांडवकराचा पोरगा भिवा सांगून गेलाय मुंबयला ये. जाऊ? पंदरा रूपये लागतील खर्चाचे. कमवून पाटवीन. नोकरी धंदा चांगला मिळाला तर तुला नी दादाला मदतच होईल.”

आयेने जरा विचार केल्यागत केले नी म्हणाली “जा बापडो. पण चांगलो रवशीत रे थंय? एकटोच रवतलं म्हणून म्हटलंय. नी १५ रुपये खंयसून काडू? तूच सांगून बग कोणाक तरी.”

मनांत आले, नायतरी आयेला मी नी भाऊ नावडतेच. दादाचं काय तो प्यारा. भाऊ मुंबयला गेला तर चाकरमानी होणार नी पैशे पाटवणार. मग मला जरा चांगल्या घरी लगीन करून देतील. माज्याच मनचे दुसरे काय. माजी आये शेवताच्या आये सारकी माजे लाड नाय करत. ती काय खर्च करणार माज्या लग्नावर. पण जावदे भाऊला मुंबयला. चार चांगले दिवस तरी येतील. पण १५ रुपये भाऊ कुटून आणणार.

दोन दिवसानी भाऊ आयेला बोलला “पैशे गावले माका. वाणयान दिलान २० रुपये द्याजावर दिलान. म्हणालो दर म्हयन्याक दोन रुपये वाढतले. वरीस काढलंस तर २०रुपये मुद्दल नी २४ रुपये द्याजाचे देवचे लागतीत. मी घेवन ईलय. दोन दीसांत जातय मुंबयक.”

कदी नाय तो दादा बोलला "अरे तू जमीन नायतर घर लिवान नाय ना दिलं वाणयाक? नायतर आमका घोर लावन जाशीत."

भाऊ बोलला "काय लिवन नाय घेवक. पण एक सब्द घेतलान, बांधावरच्या आंब्याचे अरदे आंबे तेका द्यायचे दर वर्साक. तोच काडतलो नी वाटाप करतलो. नायतरी आपणाक काडताना कोण गांवत नाय, नी पडले की गांव खावन जाता." मग सगळे गप झाले.

नी भाऊ मुंबयला गेला. बोटीन गेला. घरांत तीनच ऱ्हायलो. घर शांत ऱ्हाणार वाटलं. पण नाय, दररोज रात्री जेवताना आये भाऊची आटवण काडून मुसमुसायची. नी म्हणायची "कसो रवत असात तो? पेज तरी खावक गावता काय नाय? काय चिट्टी पण नाय लिवलान." मग दादा म्हणे "गप रव गे! सुकात जेवक दी. मांडवकराबरोबर हा ना तो? नी जावन तीन चार दिसच झालेत ना गे? इतक्यांत चिट्टी काय धाडतलो?"

मग आये जरा गप व्हायची. दादाला ती नाय बोलायची. भाऊ होता तेवा हिने कायपण माया नाय दाकवलीन. आता रडतेय. मी मनांत बोलायची. पंधरा दिवस झाले नी भाऊन चिठ्ठी पाठवली. पोस्टवाल्याने वाचली. त्याला काम लागले होते. मिल मधे लागला होता. मांडवकर बरोबर होता. त्याच्या बरोबर खोलीत ऱ्हात होता. मांडवकरची माणसे नी तो धरून ६ लोक होते. खोली एकच. तो बाहेर गच्चीत झोपे. दोन पगार पैसे पाटवता नाई यायचे लिहीले होते. मग पाटवीन म्हणाला.

मग त्याची चिट्टी दर पंधरा दिवसानी यायला लागली. आये केवा केवा आटवण काडून रडे. मला मात्र नवल वाटे. आता कुठून माया आली हिला वाटे. चार म्हयने गेले नी पोस्टवाला पैसे घेवून आला. दादाच्या नांवाने पैसे आले होते. दादाला बोलवायला आयेने मला पिटाळले. दादाने नांव लिहून पैशे घेतले. पोस्टवाला कागद वाचू लागला.

"आयेला लिवता येत नाय. म्हणून सई साठी तुज्या नांवान् पैशे धाडलेत. आयेला दे ती तेल पाण्याला खर्चेल. सवड होईल तशे धाडेन. मी बरा आहे."

आयेला मायेचा होऊर आला. "माजो शाणो पोर, माजी किती आठव राकता" असे बडबडत तिचा दिवस गेला. नी दादा बरोबर भाऊ पण आयेच्या मायेचा झाला. मी अजून सुकीच होते. गप कामे करत होते. चुकले तर गाळी खात होते.

भाऊ दीड वर्सानी घरी आला. धा दिवसाची रजा घेऊन आला. तो आला नी मी ओळकलाच नाय. पांढरा लेंगा नी वर नीळा आकाशी शरट. सायब वाटला. शेजारचे सगळे मग दुपारी बगायला भेटायला आले. त्यांने मिठाइचा मोठा पुडा आणला होता. आयेचा जीव होत नवता तरी तो सगळ्यांना मिठाई द्यायला लावत होता. सगळे चाकरमानी चाकरमानी करून त्याला बोलवीत होते. सांच्याला वाण्याकडे गेला नी पैशे पुरे देऊन आला नी दादाला म्हणाला "या वर्साक दे रे आंबे वाणयाक. पुढे आपलेच. नी काडून विकत जा बाजारांत." दादान मान डोलावली. आयेन जेवणांत चवळीच्या पानाची भाजी केली. सुकट भाजून तेल तिखट लावून भाऊला जेवायला वाडले. आमाला पण वाडले. दादाच्या नी माज्या पानांत

भाजी नी सुकट थोडे कमीच होते. मनांत आले आता आयेला भाऊ पयला मायेचा झाला. दादाचा नंबर गेला.

आणखी दिवस गेले. भाऊ वर्सा दोन वर्सानी गांवी येई. सगळ्याना कपडे आणी. आयेला साडी, मला परकल पोलका, दादाला धोतर पान, नायतर मोठे पंचे. सगळे सण असल्यागत होई. आयेचा मान वाडीत वाढला. नी ती सगळी कडे फिरू लागली. सगळे काम माज्यावर सोडले. सकाळी सारवण, केरकचरा मग न्हाणीची चूल पेटवणे, भाकऱ्या थापणे, आंगोळी करून झाल्या की कपडे बुचकणे. सगळे मीच करायचे. ती चाकरमान्याची आयस झाली होती.

मी आता चौदा वर्सांची झाली नी भाऊ मुंबयवरून आला तर आयेने बोलायला सुरवात केली. "ईटा लग्नाचा झाला सोयरीक बगुया. तेका उजवलंव मग तुमी लग्नाक मोकळे रे म्हणून म्हणतय. पैशाचा कसा करुया?"

"सोयरीक तर बग. करुया काय तरी. मी जास्त तर हजार देयन. माका थंय खूप खर्च असता गे. मुंबय खूप खर्चीक. तुमकाय बगुचा लागता. खंयसून असतले पैशे माज्याकडे?" पयल्यांदा भाऊला कळवळून बोलताना बगत होते. सगळयांचा विचार करत होता तो. आये मात्र सगळंच त्याच्या डोक्यावर टाकायला बगत होती. मग आईने सांगीतले "करतय रे हजारांतच भागीत असा. रांडग्या दिसूक उजव्या हा. बगतय कोणतरी गावांतच ना?"

पयल्यांदा मी आयेच्या तोंडून माज्या बद्दल चांगला शब्द ऐकला. नायतर नेमाने भांडणच. म्हटलं, लगीन झालं की सुटले हिच्या तावडीतून.

भाऊ गेला नी आये शेवतेच्या आयेला सांगू लागली "इटेचा लगीन करूचा म्हणतय. बग गे कोण बरोसो पोरगो. आमच्या कडे द्याज देवक काय नाय. पण पोर कामसू हा. घरांतला सगळा आता तांच करतां"

"होय तर! माका काय ठावक नाय. पण तुज्या भानगडीत कोण पडात. मनासारको नाय गावलो तर जल्मभर माजो उद्धार करशीत गे." शेवतेची आये बोलली. मी खोपीत शेणी आणायला म्हणून गेले तर हे ऐकले.

जवळ जवळ दोन घटकानी आये आली नी वाडीत कोणाला भेटायला गेली. मी पटकन शेवतेच्या आयेकडे गेली नी म्हटले "माज्यासाठी घोव बघूक सांगा होती काय गे? बघ ईतक्यांत माका नको लगीन. भाऊचा जरा बस्तान बसला काय करीन म्हणतंय. मग भाऊ पण जास्त खर्च करीत. तर चांगला घर मिळात नां?"

शेवतेची आये पयल्यांदाच माझ्यार भडकली. "काय गो न बोलणारा तू. आज मोठी वाचा फुटली तुका. आजून किती रवतलं. दादाचा नी भाऊचा लगीन मग केवा करतली तुझी आये. घरांत लग्नाची पोर ठेवन भावांचा लगीन नाय येयत करूक. समाजलां? मिळात त्या घरांत समाधान मानुचा नी थंयच जीव लावचो. समाजलां?"

मी गप घरी आले. चला आता जे आयस करील ते. नायतरी मलाय लवकर तिच्या तावडीतून सुटायचे नां. आवाठांतून आये येई पर्यंत दिवे लागण झाली होती. मी जेवण तयार ठेवले होते. कंदील घेवून परसांत भांडी धुवायला नेली तर घरी कोणतरी आल्याचे समजले. परत आले तर कोणी नवते. आयेला विचारायची सोय नाय. गप बसले. दादा आला नी जेवताना भायेर आले. वाडीतला घन्या आला होता. त्याने त्याच्या मेवण्याची सोयरीक माझ्यासाठी आणली होती. आये दादाला सांगत होती. दादा फक्त ऐकत होता. शेवटी म्हणाला "तुका नी भाऊक वाटता तसा करा. मी काय सांगू माज्याकडे पैशे खंय? शेती करतंय पण सगळा तुज्याकडेच असताना? तू आपली भाऊकच इचार."

आये मग दररोज पोस्टवाल्याची वाट बगू लागली. भाऊची चीठ्ठी आली नी पोस्टवाला आला. मग आयेने त्यालाच चीठ्ठी लिहायला सांगीतली. माझी सोयरीक आलीय नी पैशे लागतील ते पाठव, लगीन तारीख ठरली की कळवते, रजा केवा मिळेल ते कळव मग तसे लगीन धरते असे सगळे लिहले.

चारच दिवसांत मला बगायला लोक आले. आयेन तीची साडी मला गुंडाळली. धा ठिकाणी बोंगे आले होते. मला अवगड वाटत होते. दादा नी शेवताचा बाबा ओटीवर पावण्यांबरोबर बसले. आये दाराच्या आड शेवताच्या आये बरोबर बसली होती. सगळयांना गूळ पाणी द्यायला मला सांगीतले. मी नेले. मग बोलणी सुरू झाली. दादा बोलतच नवता. आयेच बोलत होती. ते म्हणाले "मुलाच्या नांवार शेत नाय पण गांवकरांची शेती कुळाव्यान करतां. घरी म्हातारी आये हा. घर हा. चार झाडा हत नारळाची."

आये म्हणाली "तुमी बगतासांत आमची शेती कसली. पिकता तां चार म्हयन्यांत संपता. रवत काय नाय. बापूस असतो तर केलान असतां काय तरी. मी पडलंय बाई माणूस काय करतलंय. द्याज काय देवक नाय वो आमच्याकडे. लगीन करून देव नारळ नी पोरगी."

ते लोक कुजबुजले नी बोलले "आमका समाजतां वो. काय नको आमका. लगीन हंयच करूचा. मुलीच्या घरांत. तर लगनाचा जेवण द्या तुमी. बाकी काय नको. नी ह्यो नवरो मुलगो. बगा तुमी. मुलगी आमी बगीतलांव बरी हा. नी कामसू हा, ह्या सांगीतल्यान घन्यान. तेवा ठरवा काय तां"

मी हळूच बगीतलंय तर नवरा अगदीच काटकुळा होता. सारखी विडी ओढत होता नी खोकत होता. वयानेय मोठा दिसत होता. मी बगतच बसले. आयेला लगीन ठरवायची घाय कां? मग तिने होकार सांगीतला. नी वैशाखांत लगीन घ्यायचं ठरलं.

रातच्याला जेवताना दादा बोलला. "आये मुलगो तब्येतीन बरो नाय वाटलो. घन्याक तरी विचारायचा काय शीकपण नाय नां तेकां." पयल्यांदाच दादा आये समोर बोलतानां बगीतलं. पण आये उखडली "अरे मीच बगतय रे सगळयांचा. ह्या लगीन होवन जायत. हजार रूपये भाऊन देतय सांगीतल्यान. ते रवतले माज्याकडे. लगीन झाला की दोन म्हशी

येतीत त्या पैशांत. मग तुजा लगीन घेवक येयत. द्याज पण मागूक बरां नां? शेती हा म्हशी हत म्हटल्यार? चाकरमान्याचे पैशे काय दुसऱ्याच्या डोंबलार फोडू?"

आयेला मी दुसऱ्या घरांत काय पण न्यायला नको होते. मी कोणच नवते तिची. मी काय बोलणार, गप बसून ऱ्हायले.

वैशाखांत लगीन घेतले. भाऊन हजार रूपये पाठवले नी सांगीतले सगळ्यांचे कपडे घेवून येईन. मधी शेवताची आये बोलवायची नी सांगायची "पोरा तुझी आये स्वारती गो! पण तू एक ध्यानांत घे थंय तुझा राज कर. गप गप रव नको हयच्या सारख्या. नायतर तेय ईकून खातीत तुका. पोरीक असा ईकता काय कोण? वशाड मेली. आयस हा की हडळ. मीय मेला थय बसललंय ठरावाक. काय बोलतलंय मी? खावन टाकला असतान तुज्या आयेन." मला तिचा संताप समजत होता. बरे वाटले हिला तरी माजी माया वाटली. बोलले काय नाय नी निघाले. तर उसळून बडबडायला लागली "काय बोलू नको, असाच मर तू. मी दगड धोंड्यांशी बोलं होतय मगासून. गो पोरा बोल तरी मनांतला. नायतर मरशीत तू असाच. जग सगळा भंडलासा. गप रवलंस तर गीळतीत तुका. सांग आयेक हय देव नको माका लगीन करून. माका नाय घोव पसंत."

माज्या पोटांत गोळा फिरला नी म्हणाली "तिका काय बोलू? तिणा आदीच ठरवलान. भाऊ लग्नाचे हजार रुपये देतलो तेणी दोन म्हशी घेतली. मग दादाच्या सोयरीकेत द्याज बरां मागूक गावांत. मी नको लगीन म्हटलंय तर बावीत ढकलांत माका ती."

शेवतेची आये मला बगतच बसली म्हणाली "गो पोरा! खोट्या गो नशीबाचा तूं! असली कसली आवस आली तुज्या नशीबांत! ईकलान गो तुका. खंय फेडतली ह्या पाप?" मी घरी निघून आले. मी काय करणार होती? गप बसली.

सराय संपली आयेन लग्नाचे तांदूळ आधीच बाजूला काडले नी मुडी बांधून घेतली. मग भाऊच्या नी तिच्या चिठ्या वाढल्या. पण मला काही समजायला देत नसे. मधे ती शेवताच्या आयेकडे गेली होती. मग जायची बंद झाली. तीही आमच्याकडे येईना झाली. बाचाबाची झाली असं मनांत आलं. मग सोडून दिलं.

लगीन आठ दिवसावर आले नी आये दादाला बोलली भाऊ दोनच दिवस अगोदर येतोय. त्याला रजा नाय जास्त. दादा गप्पच. आयेनेच लोकाना बोलावले. आता घन्या सगळ्यांत पुढे होता. वाडीतल्या लोकांना पकडून आणून त्यांनेच मांडव घालून तयार केला. आयेने त्यांना चा वरच भागवले. कनवटीचा एक रुपया पण दिला नाय. मी आयेचा बेरकीपणा पुरा समजत होती. तिचा रागय यायचा नी घाणय वाटायची. अशी कशी माजी आये? मी तिच्याच पोटची नां? लगीन दोन दिसांवर नी भाऊ आला. आयेने लगबग वाढवली. त्याला हवे नको ते बगायला लागली. पण एक ती बगत होती. भाऊ नी मी एकटे भेटत नाई याची काळजी घेत होती. मला भाऊशी भाषण करायचं होतं. पण आये हजरच असायची. सगळे कपडे त्याने आणले होते. माझी लग्नाची पिवळी साडी नी हिरवी दोनी

छान होत्या. लग्ना दिवशी तो लगबगीत होता. आयेने घन्याला सांगीतले होते वराडी त्याच्याच घरी न्यायचे. लग्नाच्या वेळीच मुलगा भाऊला दिसला पायजे पयल्यांदा नाय.

लगीन संध्याकाळी झाले नी जेवण बसले भाऊ उसळला होता. तो आये कडे बगत पण नवता. मी पाया पडले तर त्याचे डोळे भरून आले. बोलला "मी चुकलो इटे. तुजा घात केला मी" मला समजले नाय त्याने काय घात केला ते.

चार दिवसानी पांच परतावनाला आले तर समजले भाऊ रागाने लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी निघून गेला. आयेला ठपका लावलान. शेवतेची आये सांगत होती " भडाकललो गो तो. म्हणालो आयस हा की जाकीण. पैशेच पाठवलंय थय चुकलंय. आता एक पैसो नाय पाठवूचय तिका. घे म्हणूचा म्हशी नी खा तेंचा शेण. पण तुज्या आयेर काय एक परीणाम नाय. म्हणता कशी नको पाटवू पैसो. पण मग गांवच्या जमनीत भाग मागूक येव नको. जबरी आये तुझी." मी गप ऱ्हायले. काय बोलणार? माझं कोण ऐकणार?

सांच्याला गांवी परतलो नी कामे सुरू झाली. सास्वेला कायच होत नवते. हांतरूण धरून होती ती. आमच्याना विड्या ओडत बसणं नी खोकणं माहीत. जमीन सारवून पोपडे धरलेली. पायाला टोचायची. कोयती घेतली नी जमीनीची पोपडी उकरायला सुरवात केली. तासाभरांत सगळं घर उकरून झालं. मला पोपडे उकरताना बगून आमचे भायेर पडले. काय पण न बोलता. सगळी पोपडी टोपली टोपलीने उकीरड्यावर टाकली नी घर सारवायला घेतलं. एक खोली सारवून झाली नी सास्वेला तिकडे पथारी हातरून झोपवली. नी दुसरी खोली सारवली. हात पाय धुवून श्वास घेते तोपर्यंत सास्वेने साद घातली. बगते तर काय, तिला हवाळी लागली होती. स्वास फुलला होता. मला बोलली. "थंड जमीनीर हांतरून लावलंस बाधला गे. गरम निवळ दी गे पेजेचो."

तिला पेज देताना विचारले "जेवक काय करू?"

"हा काय घरांत तां करतलंस? कणयो असतल्यो पेजच कर. आता सराय पर्यंत पेजच गो."

मी गप पेज शिजत टाकली. तेवा बगीतले तर कण्या दोन दिवसच पुरतील एवढ्या होत्या. पुढे काय?

दुपारच्याला आमचे आले ते पिवून ल्हास होवून. पेज पिवून आडवे झाले. मी घाबरले. आता या घरांत उपाशी मरायला लागणार. काय करू. सांच्याला सास्वेला हाताला धरून पडवीत नेले. तिला मोकळी हवा मिळाली की बरे वाटे म्हणून सांच्याला ती पडवीत बसे. तेवा विचारले "आये, कण्या तर दोन, चार वेळा होतीत मग खंयसून आणतलांव नी पैशे कोण देतलो."

"गो तुका अजून समाजला नाय? तुजो घोव ह्यो असो. दारवेन ल्हास होवन येतलो दोनय वक्ताक. भट्टी लावता, दारू ईकता, नी सोताय पिता. गुळाचे पैशे वाणयाक दिले की काय रवत नाय म्हणता. काम करूची ताकद नाय तेच्यांत. तुकाच काय तरी करूक होया.

आता परयांत मीच केलंय पण आता हवाळी वाडली नी हांतरूण धरलंय मी. म्हणूनच तर तेचा लगीन केलव. उद्या तुका गुरव गांवकरांकडे नेतय. सांगतय हेंका काम देवा. सांच्याक शेर दोन शेर कणयो देवा. भागात मग गो.''

मी समजले. मलाच य़ानां पोसायचे. गांवकर खूप शेतीवाला. माझ्याकडे टक लावून बगत होता. त्याने मला लगेच कामावर ठेवले. उनाळयांत कामं नसतात तरी ठेवले. म्हणाला ''नदीवर भाजीचा परडा केलंव थंय पाणी घालूक कोणतरी होया.''

मग दररोज सकाळच्याला मी परड्यावर जायची. नदी वरून पाणी आणून भाजीच्या वाफ्यांवर शिंपडायची. नी मग गांवकराच्या घरी जायची. त्याची बाईल मग घरचे पाणी भरायला लावायची. रोज घरी परताना कण्या द्यायची. दुपारच्या जेवणांतले उरलेले द्यायची. नी परड्यांतली भाजी पण द्यायची. आता घरी कदी कण्याचा भात तर कदीमदी भाजी पण होवू लागली. सास्वेला बरे वाटले. आमचे पण घरी दोन घास खायला बसू लागले. मग एकदा सास्वेने म्हटले ''देव तुजा भला करो गो चेडवा. दोन चांगले घांस खावक मिळाक लागले गो आमका. आता मेलय तरी चलात. झीलाक संबाळशीत गो पोरा.'' हा वर की श्राप? माझ्या मनांत चुकचुकले. हिच्या पोराला मी काय सांबाळणार. विडी आणि दारूनी खोका झालेला. बायको घरांत आणली दुबती गाय म्हणून. काम करून पोटं भरायला. मला केवाच म्हायती पडलं मला कदीच पोर होणार नाय. ह्या खोक्यात ती ताकद नाय नी उमेदय नाय.

मिरगाच्या अगोदरच पावसाने झड मारली. नी पेरणी करायला सुरवात झाली. आमच्यानी कुदळ काडला नी म्हणाले चल शेतांत.

शेत कसलं चार कोपरे होते. एक कोपरा कुदळीने खणायचा नी त्यांत पेरायचे. ऱ्हायलेल्यांत लावणी करायची. थोडे खणल्यावर आमचे हवाळी काडत बसले. मी न सांगता कुदळ पकडली नी कोपरा खणून काडला.

दुपार टळली नी घरी पोंचलो. पेरणी झाली होती. पेज करून सास्वेला दिली नी मी घेतली. शेतातून येताना मधुनच आमचे कुठतरी गेले ते आता पिवून येणार समजले. थांबेल कोण. मी पेज पिवून सरळ गांवकराच्या घरी पोंचले. गांवकरीण समजली, विचारलन ''काय गो पेरणी करून ईलस काय गो? आमचाच शेत हा तां. तुज्या सास्वेक खंडान दिल्यानी हेणी. जल्मभर काम केल्यान तिणा आमच्याकडे. आता तू करतंस तसा.'' मी काय बोलणार भविष्य मला समजत होतं. पाणी भरले. तांदूळ सडून दिले नी चाळलेल्या सगळ्या कण्या तिने मलाच दिल्या. वर गांवकरानी केलेल्या शिकारीतली थोडी सागुती पण दिली. सगळे घेऊन घरी आले तर सास्वेला जोराची हवाळी लागलेली. आमचे घरीच होते सास्वेकडे. मी जेवण गरम केले भात केला. नी सास्वेला सागुतीचा गरम रस्सा नी भात दिला. गरम रस्सा पोटांत गेला नी हवाळी थोडी कमी झाली. पण रस्सा बगून आमचे घरातून भायेर पडले नी तासाभराने ल्हास होवूनच आले. सागुती म्हटल्यावर दारू पियालीच पायजे.

रात्री सास्वेची हवाळी फार वाढली. रातभर जागरण. शेका, करा करत होते. फाटपटी फार झाले. आमच्याना उठवलं. नी थोडयाच वेळांत सासून राम म्हटला. आमचे भायर पडले. घरांत मी न सासूचे मढे. फार घाबरली होती. काय करू? काका गेला तेवा आयेन बोंब मारली तशी मारायची कां? कोनी गेलं की बोंब मारतात. पण मला तर जरापण दुक नवतं. खोटी बोंब काय मारायची? मी गप ऱ्हायली. सवास नाय, माया नाय तर डोळ्यांत पाणी नी उरांत दूद येत नाय म्हणतात. मला सवासय नाय नी मायाय नाय. पण भिवून गोळा झाला तशी कवाड उगडून पडवीत बसले. दिवस उजवाडला नी आमचे चार पांच जणांना घेवन झेलपाटत येतात ते दिसले नी घरांत गेले.

भायर काय काय बोलत होते. इतक्यांत गांवकराचा आवाज आला.

"चला रे ते वास बांदा नी तिरडी करा. शीव्या तां मडक्या ने नी शेणीचो विस्तव हाड करून." गांवकर सांगत होता.

आमच्यानी मडकं मला दिलं. मी समजले मडक्यांत विस्तव केला नी दाराभायेर मडके सरकवले. सास्वेला चार जणानी उचलून नेले नी घटकेत सगळे "राम राम" म्हणत निघाले. घरांत एकटी झाले. चार घटकानी पण कोण परत आले नाय.

मनांत आले काका मायेचा होता. पण मरण लांबून बगीतलं. सासू मायेची नाय पण मरण अगदी जवळ बसलं. काय पण बरं वाटत नाय असं झालं. गांवकरणीच्या घरी जाऊन कामाला लागू, तेवढं लांब वाटेल. पण चालंल गेलेलं? मनांतलं धुमशान थांबना. तशी उटली नी गांवकरणीचा रस्ता धरला.

मला बगून गांवकरीण बोंबलत सुटली "अगो तू खंय ईलस. खळयांतच रव. कशाक शीव नको. सुतकातला ना गो तू. सासू मेली असा फिराक खंय भायर पडलंस?"

मी तोंडातल्या तोंडात पुटपुटले "एकट्याक घरांत भिती वाटली गे. काय तरी काम दी माका, करतंय."

गांवकरणीला माझी दया वाटली. म्हणाली "बस खळयाच्या पाळेर. पयलो चा पी नी मग बगुया कामाचा."

चा नी बिस्कीटा खावन जरा बरंस वाटलं. तेवड्यांत गांवकर आला. मला बगून बायलेला बोलला. "तेचो घोव दारूडो. आज तो काय घरांक नाय जावचो दारू पिवन पडतलो खंयतरी. पोर ल्हान हा. ठेवा तेका आज हंयच. जुनी बोंदरा द्या हांतरूक पांगरूक. नायतर भियात बिचारा एकटा." खूप हाय वाटलं. राती घरी कशी राणार ते मलाच नाय होतं म्हायत. गांवकरणीन मग खळयातला केर काड, गोठा साफ कर, गाई आल्या की बांद. गवत करड टाक असली भायेरचीच कामं करवली.

रात पडली तशी एक डाळी नी जुनी गोधडी देऊन पडवीत झोपायला दिलं. तिथेच त्यांचा गडी नी त्याची बायल झोपणार होती. मग भीती नाय वाटली. राती पावसान धुमशान सुरू केले. ओततच होता रातभर. सकाळच्याला बगीतलं तर सगळीकडे पाणीच पाणी.

अजून तरवा वर नवता आला, नायतर लावणी होयल असा पावस पडला होता. मी पावस थांबला म्हणून गांवकरणीला बोलले "ताई! घरांक जावन येतंय. आमच्याक पेज पाणी करून येतंय. दोन दिवस रातच्याक हंय रवलय तर चलांत गे? घराकडे भीती वाटता" जल्मांत मी इतकं एकदम बोलली नवती. तिने होकाराची मान हलवली. नी साडी सांवरत मी घरी निगाले.

बांधा बांधाला पाणी तुडुंब झालेले. मेरे वरून चालत जायला मजा येत होती. शेवता नी मी पांवसांत अशेच मेरां वरून चालायची. ती आठव येवून मन सुखावले. घरी कोणपण नवते. आमचे रातच्याला आलेच नवते. पेज केली, थोडा निवळ प्याली नी परत निगाली. मनांत म्हणली येतील नी घेतील पेज. केवा येतील देवास ठावक.

गांवकरणी कडे सबंद दिवस काम झाले. रातच्याला कुळथाची पिठी नी करडीची भाकरी दिली. खूप दिवशी पीठी भाकर खात होते. दुसरे दिवशी घरी पोंचले तर कालची पेज तशीच. आमचे अजून नाय आले. मनांत कायतरी विचार यायला लागले. गेले कुटे? गांवकरीण ताईला जाऊन बोलले. तिला माजी दया वाटली. दोन गड्याना बोलवून म्हणाली "जावा रे हेचो घोव खंय पडलो सा दारू पिवन बगा रे वांयच. नी गांवलो तर हंयच घेवन येवा."

मी कामाला लागले लगीन होऊन चार पांच मास झाले, पण रोज कायतरी कटकट असायची.

चार पांच घटकानी एक गडी आला नी गांवकरणी कडे कानांत बोलला. ती गांवकराच्या कानांत बोलली. लांब मी बगत होती. गांवकर मग उटला नी तो नी ताई माज्या कडे म्हणाली "तुज्या घराक चल गो पोरा."

मला मनांत लागलं, की कायतरी बरं नाय झालंय. हे लोक सांगत नाय पण विचारात हायत. गांवकरीण ताईने दोन बायाना पण सोबत सांगीतले. वाटेत एकजण बोललीच "काय करतला पोर ह्या! पंदरा वर्साचा पण नाय. कसा करतला." ताईन त्यांना  गप बसायला सांगीतले. आमच्या खोपे भायेर आट धा माणूस उबे दिसले. खोपट्या समोर पांडरे फटक पडलेले, पोटाकडे पाय करून पडलेले आमचे होते. ताईने मला पकडले नी म्हणाली "तुजो घोव गेलो गो. कदी गेलो म्हायत नाय. नदीत झुडपांत अडकून पडलला मढा." मी गप घरांत शिरले नी बसले. ताईनी इतर बाया बाजूला बसल्या. मला ताई हात फिरवत समजावत होती. माज्या डोळ्यांतून टिपूस पण येत नवता. का येईल? हा कोण माजा? आयेन विकलं मला. एक गडी दोन कोसावर माज्या आयेला नी दादाला बोलावायला गेले.

गांवकर म्हणाला "ठेवन चलणार नाय. आजचा मढा न्हय या. वास मारता. नेवया लवकर."  मग ताईकडे बोलला "वो तुमी, तुमचा आटपा मग नेवक मोकळे आमी."

ताई उटली नी मला बोलली "न्हावन घे गो पोरा. नी साडी बदलून ये." मी न्हाणयेत साडीचा पडदा लावला नी न्हाली. लग्नातली हिरवी साडी नेसून भायेर आली. ताई

खोपटाच्या भायेर घेवन गेली. आमच्याच्या समोर बसवून तिने माज्या बांगड्या टिचकवल्या, कुंकू पुसले, मंगळसूत तोडले नी मला बोंब मारायला सांगीतली. माज्या तोंडून कायपण आवाज नाय आला. डोळ्यांतून टीपपण नाय. ते बगून एक बाय बोलली “रांडग्याचो घोव मेलो तरी बगा कसा बसला तां. डोळ्यांत टिपूस नाय का चेऱ्यार दुक” ताई तिच्यार ओरडली “गप रव! तो काय हेच्या लायकीचो होतो. तू दिल्लं असतंस तुजा चेडू हेंका. फसवलासान गो हेंका कोनीतरी. मरूकच झाल्लो तो. लगीन झाल्यार मेलो इतक्यांच नां.”

सगळे गप बसले. ताई मला खोपटांत घेवन गेली नी पाठीवर हात फिरवत बसली. थोड्या वेळान आवाज आला. राम! राम! मनांत आले, खोक्याचे मरतीक निगाले. मला रांडपणचा डाग लावण्यासाठीच माजे लगीन झाले दुसरे काय. मी गप बगून ताईला रहावले नाही. म्हणाली “पोरा बोल वांयंच. नायतर रड तरी. दाबू नको सगळा.” तिला काय म्हायत मला खोका गेला ते सुटका झाल्याचे वाटले. मला दुक तर जरापण नाय वाटले. सास्वेच्या वेळी मढ्याला भियाले होते. याला बगून ते पण नाय जाले. कोण होता तो माजा?

ताईची नी माजी नजर जुळली नी ताई समजली. समजली की मला दुक बिक काय नाय. ती बाकी बायाना बोलली “जावा गो कामाक तुमी. मी येतय मागसून.”

सगळ्या गेल्यावर मला बोलली “काय बगून तुजा लगीन लावल्यानी गो हेच्याशी? लांब होता काय ह्या गांव? भावान तरी बगून जायचा नाय सोयरीक करूच्या अगोदर? आता काय करतले?”

माज्या आयेला माजी माया नाय वाटली एवढी माया गांवकरीण ताई मला दाखवताना दिसली. भाऊ नंतर तिचा आधार वाटला. मग पटकन डोळ्यांत पाणी आले. तीची माया मला पोंचली ते तिला कळले. तशी म्हणाली “चल पोरा हंय बसन काय करतलंव. तुजे लोक येयसर रात पडात. चल माज्याकडे रंव.”

आमी तिच्या घरी पोंचलो तर दुपार उलागलेली. सगळेच जेवायचे. गांवकर मरतीका वरून परतला नवता. ताई मला खळ्यांत बसवून लगबगीने कामाला लागली. बायानी जेवण तयार ठेवलेले. ताई न्हाऊन आली. तंवर गांवकर आले. सगळ्याना जेवण घातले.

गांवकर म्हणाले “हीचा घर चार दिवसांत संपला. आता हेका कोण रवला नाय काय करीत?”

ताई बोलली “येतीत तेचे म्हायेरचे. ते ठरवतीत काय तां. नाय नेलानी तर ठेवया हंयच. काय करीत बिचारा.”

मनांत आले ताईन ठेवन घेतलान तर किती बरे होईल. आयेचा जाच तरी नाय. दादान घरी नेले तर मात्र आये काय काय करेल नेम नाय.

पण माजे नशीब कुठले जोर घेणार. सांच्याला आये नी दादा आला ते सरळ गांवकरां कडे. आयेन खळ्यांतच मला मिठी मारून बोंब पाडली. मला तिच्या मिठीची नी बोंबेची

किळस चढली. तिला ढकलून मी बाजूला केली नी गप बसली. दोन चार वेळ हेल काडून झाल्यावर ती गप झाली. तेवा ताई बोलली "काय वो सोयरीक करताना पोरगो कसो हा? जगांत की नाय ह्या पण बगूक नाय तुमी? इतक्या चांगल्या चेडवाचा वाटोळा केलात? आणि काय वो तुमी मोटे भाव ना? तुमका काय चौकशी करूक झाली नाय? आता काय करश्यांत? जल्मभर पोसूचा इला नां?"

आये हे ऐकून दोन मिनिटे गप झाली पण मग बोलली ते ऐकून मी गारटून गेली.

"काय बोलतास हो! आमका काय माया नाय. पण ह्यांच पांढऱ्या पायाचा. आदी बापाशीक गीळल्यान नी मग काकाक. माका भय वाटला वो. म्हटलय दुसऱ्या कोणाचो नंबर लागुच्या आदी हेंचा लगीन करूया, नी केलव. बगीतलास नां हंय पण दोगांकाय खावन टाकलान. ताय चार म्हयन्यांत"

मला अंगावर साप चडल्या सारखे झाले. मी ताईकडे बगीतले. ती माज्याचकडे बगत होती. नजरेत माज्या बद्दल काळजी दिसली. मग बोलली "मग आता नेलांत तर तुमकाय खायत. मग हंयच ठेवतास काय?"

दादा पटकन बोलला "नाय नाय आमी आताच घेवन जातसंव. मदलो भाव येतलो उद्या तो करवादीत नाय नेलव तर." आये गप होती.

मग तिची नी दादाची निघायची घाई सुरू जाली. तसे गांवकर बोलले. "ह्या बायन पेरणी केलान शेतांत. पुढचा आमी बगू. पण सराय वर तेंका घेवन या नी तेचो भाग घेवन जा."

ताईन मला आंत बोलावले. साडी कपडा दिला नी बोलली. "माका समजलां तुजा दुक. जर जास्त तरास केलान आवशेन तर ये माज्याकडे. पोरा सारक्या सांबाळीन. पण तू बोलूक शीक वांयच. नायतर सगळे खातीत तुका" मला ताई बद्दल माया वाटली नी पटकन् नकळत मी तिच्या पाया पडले.

घरी पोंचलो तर मधरात व्होवची आली होती. हात पाय धुवून कोपऱ्यांत मी मुटकुळी करून झोपली तेवा लक्षांत आले. दोन तास चालताना आये नी दादा काय पण बोलले नायत. सकाळी काय होईल या चिंतेत मी नुसती पडली होती. मला आयेन पांढऱ्या पायाची ठरवली तेच मनांत येत होते. बाबा मेला तेवा मी अडीच तीन वर्साची होती. काका गेला तेवा चार वर्सा वर होती. ते काय मी पांढऱ्या पायाची म्हणून गेले? माजे लगीन आयेने लावले ते सोताच्या मतलबा साटी नी माज्या लग्नांत भाऊला पण पैशाला फशीवले. मला वाटले सोताला बोल नको म्हणून ती ताईकडं तसं बोलली. पण आयेला मी आता ओळखत होते. ती आता तिच्यावर आले की मलाच पांढऱ्या पायाची म्हणणार. बगू भाऊ आला की काय ते समजेल. मी काय करू. गप सहन करायचं. एक भाऊ नी दुसरी गांवकर ताई दोगच माजं बरं बगतील. मग केवातरी डोळा लागला नी फाटपटी आयेची हांक आली. "उटा वो बाई, म्हशी उब्यो हत. दूद काडा जरा. फुकट खावक नाय गांवचा आता."

लगबगीने मी उटले नी तोंडार पाणी मारून झोंप उडवली. दुदाचा लोटा आयेन हातांत दिला नी मी घराच्या मागे गेले. केंबळ्याचा छान मोठा गोठा बांधलेला दिसला. पयल्या म्हशी कडे दूद काडायला बसले तर तिने एकदा मागे बगीतले नी मला आंचळाला हात लावू देईना. चुचकारले, थोपटले तरी काय नाय. दुसऱ्या म्हशी कडे गेली नी तिला थापटून पाठीवर हात घासला नी बसले दूद काडायला. ती बरी उबी ऱ्हायली. म्हटले नशीब नायतर दूदय काडता येत नाय म्हणून आयेन उद्दार केला असता. दूद घेवून गेले नी आयेला बोलले "आये एक म्हस नाय कडायला देत."

आये कायपण बोलली नाय. लोटा सोरकुलांत ओतून सोता गेली दूद काडायला. मी पुडच्या पडवीत आले नी शेवतेच्या घराकडे बगत बसले. दिवस खराब वाटत होता. कायपण सुदरत नवते. काय करू? नी आयेन साद घातली. घरांत गेले तर बोलली "भाकऱ्यो कर गो. आमका चार लागतत नी तुजी एकारदी भाज." दादा तेवड्यांत बोलला "न्यारी नास्तो जालो की चल माज्या बरोबर. चार कापून हाड म्हैशींका." मी आता नोकर जमा झाली होती. घोवाकडे काय नी आयेकडे काय भाकरी तुकडा काम केल्यारच मिळणार होता. माजं ल्हानपण केवाच संपलं होतं.

चारा कापून आण, सुकी लाकडं जंगलात गोळा करून आण, गोठा साफ कर, सारव, बावीवरून पाणी आण, म्हशीना धू, भाकऱ्या कर, जेवाण कर. सगळे मला सांगून आये फिरायला मोकळी होती. सांगत होती दादाची सोयरीक करायची, लोकांना भेटूनच होणार.

दोन दिसांत येणारा भाऊ चार दिस उलटले तरी नाय आला. मी वाट बगायची. आज येईल उद्या येईल. मग पांचव्या दिवशी आला. मला पयला भेटला. आयेशी नी दादाशी कायपण बोलला नाय. दोन पुड्या काडून मला देऊन म्हणाला "खावचा हाडलंय दे तिच्या कडे." आयेकडे पण नाय तिच्याकडे म्हणला तो. माज्या लग्ना नंतर पयल्यांदाच आला तो. अजून राग तसाच होता. मला मग पुढ्यांत बसवून बगत ऱ्हायला. डोळ्यांत पाणी भरले. नी एकदम बोलला "काय नाय मुंबयक चल माज्या संगत. मी खोली घेतलंय."

आये आंतून ऐकत होती. ती कडकडत बोलली "हां! ह्या बरां रे तुजा! नी हंय कोन करतलां सगळा माका वांयच मदत होयत तां नको हेंका. वैरी आसय रे मी तुमची."

"इटे! कपडे बांद गो तुजे. हिका कटकट करूची असांत तर उद्याच निगुया. बगतीत ती नी दादा काय तां. तुजा लगीन करून दिलल्यान नां? तूं घोवाकडे होतस तेवा काय करा होती? करीत तसाच. कां तुजा मरतुकड्याशी लगीन लावलान तां तू परत येवचंस म्हणून. सांगतां माकां! मोठी माया दाकवतां! खंय फेडतली पापा देवाक ठावक."

भाऊ चिडलेला मी पयल्यांदाच बगत होती. जोरजोरांत स्वास चालला होता. आंत आये गप झाली. दादा बोलला "रव दे रे भांडाण! तेका नेतस नां ने बापडो. पण थंय पैशे लय लागतत ना खर्चाक? नी मी आवंदा बैल घेवचे म्हणतंय पैशे देवक जमले तर बग. शेत दोगांचाय हां ना?"

भाऊ तडकला बोलला "मी इटेक मुंबयक नेवचा ठरवूनच इलंय. म्हणून खोली घेतलंय पांच हजार पागडी दिलंय. माज्याकडे पैशे नायत. नी कायरे दादा, मी मुंबयसून खावचे दोन पुडयो तरी हाडतंय. तुमी जाताना माकां मूटबर फॉव नायतर कणयो तरी देतास काय रे? म्हशी घेतलास त्योय माज्या पैशान, माका काय ठावक नाय? इटेचो घात केलास नी म्हशी केलास. मी परत इलय मग बगुया कोणाची जमीन तां. नी जमीन दोगांची म्हणू नको तिगांची म्हण. इटा पण हा वाट्यांत. तुमी सगळा खावा पण दोन वर्सांत बाजूक तेच्यासाटी दोन खोलयाची खोप बांधा. शेतीतलो तेचो भाग म्हणून. नी म्हशीय तेच्योच हत म्हणून. पैशे तू नी आयेन उबे करायचे. खोलयो बांदलास तर तुमचो नी माजो संबंद रवात. नायतर तुमच्या उरार बसून शेतीचो आमचो भाग घेयन नी खंडाक लावीन."

आयेन पयले असं काय ऐकलेच नवते. तिच्या वरच्या आवाजांत भाऊ बोलला ते ऐकून ती भेदरली. आता पर्यंत तिच्यावर आवाज चडवणारे कोणीच नवते. ती भेदरली पांढरी फटक पडली. आता सगळे पाप भाऊने उगडे केले होते. तिला बोलायला ठेवलेच नाय. वर भाग पाडायची धमकी दिली, तीने ती पुरी भियाली. गप भाकऱ्या थापायला बसली. मला हांक पण मारली नाय.

तेवा मग शेवतेची आये नी घन्या एकदम आले. भाऊ परत उसळला. "घन्या आमच्या घरची पायरी नाय चडायची. मराक टेकलेलो मेवणो सोयरीक म्हणून हाडलंस? लाज नाय वाटली तुकां? शेजारांक रवन घात करतंस. पयलो चालतो हो हंयसून."

शेवताच्या आयेच्या तोंडावर हंसू भरले. तो गेला तशी म्हणाली "असो भाव असूचो रे पोरांक इकल्यान रे. वाटोळा केल्यान तेचा. माका बोलावलल्यान बैठकीत पण विचारलान पण नाय माका. नी सरळ होय म्हणून सांगल्यान तुज्या आयेन. मी इटेक सांगीत होतय नाय म्हणून सांग तूं. पण पोर भियाला रे आयशेक. नी बग आता काय जाला तां."

"मावशे तूं काय काळजी नको करूं. तेका मुंबयक नेतय दोन तीन वर्सा शाळेत घालतंय, शिकवतंय नी अटरा वर्साचा झाला काय नोकरीक लावतंय. मग जर चांगलो चाकरमानी गांवलो तर पाट लावीन. नायतर काय शिकला तर सोताच्या पायार ता उब्या होयत" भाऊ बोलला

"होय रे बा तूंच तेचो पठीराको." शेवतेची आये बोलली.

आयेची मात्र दातखीळ बसली. गप गप होती. दादाशीच बोले. मला कामं सांगत नवती. भाऊला हंव नको ते जेवताना विचारायची.

दोन दिसानी आमी जायचे ठरले. मला वाटत होतं शेवटला आये फिरेल नी माज्या जाण्यांत मोडता घालेल. पण काय झाले नाय. आमी मुंबयला निगालो ते तिच्या पाया पडायला मी गेली. पण काय बोलली नाय. आयेचे तोंड काळे ठिक्कर दिसले. तिचा पराभव दिसत होता.

तालुक्याच्या गांवा पर्यंत चालत जावं लागलं. पाऊस पाण्याच्या दिवसांत गांवच्या मोटरगाड्या बंद होत्या. तालुक्याला पोंचलो तेवा दुपार टळली होती. भाऊ मला घेवून एका दुकानांत शिरला नी बोलला "इटे काय खाणार? पुरी भाजी की भजी? खाऊन घे आता रातच्याला बस थांबेल तेवा जेवायला मिळणार." मी गप ऱ्हायले. मी काय ठरवणार कदी चाखले पण नवते. भाऊ बोलला "इटे बोलायला शीक. बोललं नाय तर लोक इकून खातीत. बरां चल मी दोनय मागवतंय चाखून बग नी जास्त आवडांत तां तू खा."

पयल्यांदा मला कोणी तरी मान देत होता. मनांत कसेतरी वाटले नी भाऊ बद्दल एकदम छान वाटायला लागले. भजी पण आवडली नी पुरी भाजी पण. मग थोडे थोडे दोनीतले खात दोगानी संपवले तसा चा आला. दुदाचाच दिसत होता. प्याली तर बेस लागला. असला चा कदी पियालीच नवती. मुंबयत असंच असणार? भाऊला विचारावे वाटले. पण गप ऱ्हायले.

मग बस आली तसे सगळे धांवले. "मुंबयवाले पयले या." मलकट कपड्यांतला एक ओरडत होता. लाल लाल लांबलचक मोटर गाडीला बस म्हणतात ते समजले. आमचा नंबर लागला नी भाऊने पैशे काडून त्या माणसाला दिले. टक टक करून त्यांने छोटे कागदाचे कपटे भाऊच्या हातांत कोंबले नी आमी आंत चडलो. मला खिडकीकडे बसवून भाऊ बाजूला बसला. दोगाना बसायचे एकच बांकडे होते. बाजूच्या बांकड्यांवर तीन तीन बसत होते. मी बावरून नवीन नवीन कायतरी बगत होते. भाऊ पिशव्या डोक्यावरच्या पाळीवर ठेवून बसला नी म्हणाला "इटे तुका बोलाक येता की नाय? गांवा पासून इतपर्यंत काय पण शब्द नाय काडलंस. मुक्या म्हणतीत गो सगळे तुका."

मी काय बोलू? दिसणारं नवीन नवीन. म्हायत पडायला बगीतलं तर पायजे? त्या शीवा बोलणार काय? मी खिडकीतून भायेर बगत गप ऱ्हायले. भाऊ बोलला "इटे तुजी सासू नी घोव एकापाठी एक गेले. तुका भिती नाय वाटली? कसा सन केलंस गो?"

"ताई गांवकरणीन नेल्यान माका तिच्या घरांक." मी

"होय गो रातच्याक पण थयंच रवं?" भाऊ.

मी फक्त हो ची मान डोलवली.

तो हंसत बोलला "तूं असाच रवतलं. मुक्या. तुका मुंबयक बोलता करुचा लागतला."

माझ्या तोंडार थोडे हसणे आले ते त्याने बगीतले नी तोय समाधानान हंसला.

गाडी सुटली नी उबदार वारा मला बरा वाटायला लागला. झाडं, घरं, जनावरं सगळं जोरांत मागे मागे पळत चाल्लं नी केवा डुलकायला लागले ते म्हायतच नाय पडलं. गाडी थांबली नी जाग आली तर भाऊ मला त्याच्या खांद्यावरल्या माझ्या डोक्याला पकडून बसला होता. मला माया पयल्यांदाच मिळत होती. नी मला भाऊवर फार माया वाटू लागली. गाडी थांबली तर भाऊला बोलली "उतरायचं?"

तो हंसला नी बोलला "नाय गो बाय! अजून येळ हां. उद्या उजवाडताना पोंचू मुंबयक रातभर चलतली गाडी."

मी परत भायर बगायला लागली. कितीतरी लाल लाल मोटारी उब्या होत्या नी मुंगळ्या डसतात तशी माणसं त्याला डंसत होती. माणसाला दुक देणाऱ्या, डसणाऱ्या मुंग्या लाल. नी आता माणसं डसतात त्या मोटारी लाल. मजा दिसली. परत गाडी सुरू झाली नी वारा लागून पेंगुळले. पण आता मी भाऊला तरास नाय द्यायचा ठरवून जागं ऱ्हात होती. सांज पडली. काळोक पडायला लागला नी वाटले राती मोटार कशी चालेल? रस्ता कसा दिसंल? वस्तीला थांबल का कुठे? भाऊला इचारू? मग गप बसली. विचारायला जीबच नाय चालली.

काळोकांत मोटरगाडी चालली होती भायेरचं काय पण दिसत नवतं. पण गार वाऱ्याचं बरं वाटत होतं. मग गाडी थांबली. गाडीवाला ओरडला "जेवन घ्या गाडी अर्दा तास थांबेल" मला गांवचे बोलतात तसे नाय वाटले. तो दुसरंच कसं बोलला. तेवड्यांत भाऊ बोलला "इटे चल वांयच कायतरी खावन घे नायतर जेव."

जेवायला गेलो तर पळून जावे वाटले. तिथे सगळे बांकड्यावर बसून फुडच्या चकचकीत पाटयावर थाळी लावून जेवत होते. भाऊ एका बांकड्यावर बसला. बांकडी एवडी ल्हान की एकच बसेल. समोरच्या बांकड्यावर हात करून भाऊ बोलला बस त्या खूर्सीवर. मी बांकड्यावर पाय घेवून बसायला गेली तर बांकडे हलू लागले. भाऊ जोरांत बोलला "अगो अगो पाय वर घेवन खंय बसतंस कुर्सीर. मी बग कसो बसलंय. पाय खाली सोडून बस." मी त्याला बगून तशी बसली. मला लाज लाज झाली. भाऊ आता कोणाशी तरी बोलत होता. मला विचारत होता जेवणार की कायतरी खाणार? मी गपच ऱ्हायले. मला काय समजत नाय, मी काय फिरली नाय. भाकरी नायतर पेज इतकच म्हायती. मी काय सांगू? मग भाऊनी त्या बापयाला कायतरी सांगीतले नी तो गेला.

थोड्या वेळान आमच्या समोर दोन दोन पत्र्याच्या बशा ठेवल्या. एकांत तीन मोठ्या नरम नरम पांढऱ्या भाकरी असल्या सारखे होते नी दुसऱ्यांत वाटाणे असलेले कालवपण होते. भाऊ कसा खातो ते बगून मगच मी खायला सुरवात केली. बांकड्यावर बसताना झालं तसं नको परत. तो भाकरीचा तुकडा तोडायचा नी कालवणांत बुडवून खायचा. मी तसंच केलं. नरम भाकर नी कालवणाची चव बेस होती. भराभर पोटांत जात होतं. असलं कदी बगीतलंय नाई नी खाल्लंय नाई. मला खूप बरं वाटलं. गाडीकडं जाताना भाऊन विचारलं "आंबुळी नी रस्सो कसो वाटलो?" मी मान हलवून होकार दिला तर हंसत बोलला "काय केल्यार बोलशीत गो तूं?" मी मान खाली घालून त्याच्या बरोबर चालू लागली. मोटारीत जावून बसलो.

भाऊ मग बोलला "इटे! गांवच्या सारकी पेज नी भाकरी खावची नाय लागूची तुका. हंय खूप काय काय टेसफुल गांवतला खांवक. पण मुंबयक गेलंव काय माका भाकरी चटणी करून घाल गो गरम गरम. खूप दिवसांत असा नाय खांवक गांवला."

मी मान हलवली. पण मनांत म्हटले “गरम गरम भाकरीच काय सगळं करीन मी तुज्या साटी. भाजक्या सुकट तेल फकी घालून. नायतर गरम गरम पिठी. तू केवडा मोठा भाव. माज्यार केवडी माया. बगच काय करीन ते.” पण तोंडातून एक अक्षर भायर नाय पडलं.

गाडी सुरू जाली. नी डुलकी आली पोट तुडुंब भरलेल. म केवा नीजली ते म्हायतच नाय पडलं. बसून चांगली नीज येईना. चुळबुळ करतां करतां भाऊच्या मांडीवर आडवी जाले नी गडद नीजले. केवातरी फाटपटी परत गाडी थांबली नी सगळे चा ला उतरले. डोळ्यांत गडद झोंप मी नाय उतरले. भाऊ जाऊन आला. तंवसर मी बांकड्यावर मुटकुळी मारून नीजली.

भाऊ आला नी उटवले. तो बसला. आता जागरण झाल्यागत वाटले. मुंबय किती लांब वाटली. केवा येईल असे जाले. गाडी सुटली. चांगल्या बऱ्याच घटका गेल्या नी उजवाडलेले दिसले. भायेर बगते तर काय. घराला घर चिकटून. रान जरापण नाय. घरां वर घर. रस्त्यावर माणसांची जुंबड. अगदी मुंग्याच्या वारूळा सारकी, नायतर मधपोळया सारकी सगळी माणसं. ल्हान मोठ्या मोटर गाड्या धांवतायत. समोर येणाऱ्या मोटर गाड्या बगून जीव घाबरला. एक आपल्या गाडीवर हापटली तर. मी बावचळून घाबरून गेले. भाऊवर नजर गेली. तो हलकं हंसत बोलला “इटे मुंबय ईली. आता शींव कडे हंव. थोड्या येळांत उतरायचा.” कायपण समजलं नाय. मुंबय आली इतकच माहित जालं.

आणि थोड्या वेळान मोटार एका जागी थांबली. हिते तर खूपच लाल लाल मोटारीची रांग होती. सगळी कडं आवाज आवाज करीत माणसं पळत होती. अ बा बा बा हा माणसांचं गांव हाय का राक्षसाचं? मनांत आलं.

भाऊ उठला नी सामान काडू लागला तशी उठून उबी झाले. खाली उतरलो तर भाऊ बोलला “इटे हिकडे तिकडे नको बगू. मज्यार नजर ठेवन चल. नायतर हरावशीत गो. नी पंचायत करशीत. नायतर माज्या शरटाचो सोगो पकड नी चल.”

मी गरदीने भियाली होती. आता घर केवा येणार काय म्हायत. भायर आलो तर भाऊ लगबग करीत एका गाडी कडे गेला. मी घाबरून त्याच्या मागं पळत होते. शरटाचा सोगा हातांत गच पकडला होता. ती गाडी पण वेगळीच होती. तिला घोडा बांदला होता नी चाकं पण पुडे मागे खूप. गांवच्या गाडीला आमी बैल जोडायचो नी तिला दोनच चाकं. हितं सगळंच वेगळं. बाय! बाय! कशी ऱ्हायन मी असल्या गांवांत?

भाऊ गाडीवाल्याशी वेगळंच बोलत होता. कायपण समजत नवतं. गांवची बोली नवती ती. मी बगतच बसली. भाऊ मुंबयला येवून काय काय शिकलाय देवाला टाऊक. मला काय पण येईल काय? मग एका गाडीत भाऊन मला चडवलं नी तोय चडला.

“घोडागाडी हा ही इटे. मी चलत गेलं असतंय एकटो असतंय तर. पण तू दमशीत म्हणांन गाडी केलंय. मजा येता ना?” मी मान हलवली. माजा चेहरा आनंदीत असणार. कारण भाऊय हंसरा झाला. गाडी थांबली तेवा एक मोठं घर समोर होतं. गाडीवाल्याला पैशे

देवन भाऊ त्या घरा कडे निगाला. अ ब ब ब एवढं मोठं घर भाऊचं? जवळ गेलो तर घराच्या मधे लाकडाची शीडी होती. भाऊ चडायला लागला नी मी पण. घाबरायला झालं. वर आलो त वळून परत वर चडायला लागला. वर गेलो तर खोल्याच खोल्या. त्यांत माणसांची गरदी. एका खोली समोर उबं ऱ्हाऊन भाऊन कुलुप कोयंडा उगडला. गांवकरीण सामानाच्या खोलीला असाच कुलुप कोयंडा करी. तो उगडताना शेजारून एक म्हातारी भायर आली नी बोलली “इलास गांववाल्यानु? नी ह्या कोण भैण?”

“होय मावशे! तुका काम हाडलंय. कामार गेलंय की तुज्या ताब्यांत देतलंय तेका. स्टो पेटवूक शिकव, जेवाण शिकव. मग माजी तुज्याकडची खानावळ बंद” भाऊ जोरांत हंसला नी म्हातारी पण गप्प.

आमच्या बरोबर खोलीत येत म्हणाली. “दिनुबा तुजी भयण माका चेडवा सारकीच रे. शीक पडलंय तर किती शेवा केलंस माजी. म्हणून आसय अजून. तुजी काय खाणावळ नाय रे माज्या साटी. माज्या पोरांका करतंय थंय तूं. आता हेच्या बरोबर दिवस पळतीत रे माजे. तुमी सगळे कामार गेलास काय वेळ जायत नाय रे. बाकीच्यो बाजूवाल्यो तुका म्हायतच. नांव काय गो तुजा चेडवा?” मी चमकून भाऊकडे बगीतले. तोय माज्याच कडे बगत होता. मी गप उबी. मग म्हणाला “तेंचा नांव इटा! इठाबाई. बोलूचा नाय तां.”

“अरेरे! देव पन कसो खोटो चांगला रूप दिल्यान नी वाचा नाय? कसा रे ह्या?” मावशी बोलली नी माज्या तोंडून भायेर पडले “मुक्या नाय मी.” नी भाऊ जोरां हां हां करीत हंसत सुटला. मावशी त्याला करवादली “कित्या रे नायती मस्ती करतंस. मुंबय बगून बुजलंस गो? माजाय असाच झाल्लां पयल्यांदा घोवा बरोबर इलय तेवा. चार दिवस खाली खंय एक जावक नाय भितीच वाटा. मग होता गो संवय. फिरशीत बग सगळीकडे एकदा समजलां काय.” मावशी बोलत चालली तसा भाऊ बोलला “मावशे आता चा तरी दी. की बोलण्यारच भागवतलं. उद्यापासून तुका एकजण ऐकणारा गांवतलां. बोलूचा काय नाय, पण सगळा ऐकीत हां तुजा.”

खोलीत एक खाट नी एका टेबलावर दोनचार भांडी ताट नी चाचे कप होते. मावशेन एका पितळेच्या कसल्या तरी भांड्याला पुडे घेवून त्याला घासलेट ओतून आग लावली. नी एक दांडी फुडे पाठी करत बसली. मग त्याच्यावर फुर्र आवाज येत चार बाजूला फुला सारखी आग जळू लागली. मी भिवून मागे सरकून भाऊच्या जवळ गेली. मावशेने त्यावर टोप चडवला तर समजलं ती चूल होती. पण आवाज केवडा फार्र फार्र होत होता. जवळ जायची पण भिती. मावशी बोलली “बगीतलंस गो पोरा ईस्टो कसो पेटवूचो तो.” मी नाय करत मान हलवली. भाऊ हंसत म्हणला “गे भियाला तां स्टोक. मी बगतसंय तेकां. तेकां फुरसतीन शिकव. तुका मदत होयत. भाकऱ्यो करतां. पिठी ढवळतां. दुसराय कायतरी शिकला असांत आता. बग घे करून.”

मावशीन चा उतरलान नी आमाला दिला. सोताय गेतला. मग मला बोलली "आंग आंबला असांत गो रातभर बसून. वांयच नीज नी आराम कर. दुपारचा जेवक मी करतंय. रातच्याक बोलवीन तुका" नी ती निगून गेली.

भाऊनी मला कापडाची हातरी दिली नी मी हांतरून आडवी जाली. आंग हुळहुळत होतं. मोटारीची भर भर अजून अंगात चाललीय भासत होतं. केवा गडद नीजली ते कळलं नाय.

मावशेची साद आली नी उटले. दिस कुटे आलाय समजत नवते. पूरव कुटली, पच्चीम कुटली मुंबयत समजेना. दोनपार जाली एवडंच समजत होतं. दादा उटला नी मावशेला बोलला "मावशे सगळा हंयसर कित्या हाडलंस? आलाव असतंव तुज्याकडेच."

"कशाक रे तुमका तसदी. जेवा भयण भाव निवांत हंयसरच. बोलशांत तरी वांयच एकमेकांशी." मावशी बोलली नी निगून गेली.

मी ताटल्या शोधू लागली तर दादा उटून आला नी टेबलाच्या खालच्या फडताळांतून दोन ताटल्या काडल्या नी नळावर धुवायला लागला. मी ताटल्या काडून घेतल्या नी धुवून पूसून घेतल्या. मावशेन भात, कालवण नी भाकरी दिली होती. भात ताटलीत वाडला मधी खोळा केला नी कालवण वाडायला गेले तर भाऊ ओरडला "अगो थांम थांम! भातांत खंय वाडतं कालवण. कप घे चा चे. नी तेतूर वाड कालवण."

मुंबयचं, भाऊचं सगळंच येगळं. असलं गांवांत केलंव नाय कदीपण. मग कपांत कालवण वाडून खायला बसलो. भाऊ भाकरी तोडून कपांत बुडवून खाऊ लागला ते बगून मी पण.

"बेस केलान नाय डाळ मावशेन? तिकाट नाय ना लागूक तुका?" भाऊ बोलला. मी मान हलवून होकार दिला. मनांत म्हणली कालवणाला डाळ म्हणायचं. पण लागत होतं छान. जेवन सगळं संपवलं. मी खूप जेवली. सगळी भांडी गोळा केली. पण धुवायची कुटे? भाऊ बगत होता पण बोलत नवता. मग मी बोलली "भांडी कुटं धुतात भाऊ?"

"हां आता बोललं ना? तसांच बोलत जा गो. चाळीच्या टोकांक गेलंस काय दिसांत तुका. दगड लावलेसत नी पांच सा नळ आसत. नळा खाली धूवन घे." भाऊ बोलला.

"चाळ? नाय समाजलां, बाव हां?" मी बोलली.

भाऊ हंसत सुटला, बोलला "चाळ म्हंजे आपला ह्या घर. गॅलरीतसून चलत गेलंस की खोलयो संपतत थंय दिसांत तुका. न्हाणये सारकी जागा पण लय मोटी. थंयच संडास पण हत."

मी गप उबी. गांवकरीण ताईच्या दुमजली घराला अशीच घडण होती. ती त्याला गच्ची बोलायची. मुंबयत ती गेलरी झाली होती. मुंबय समजायला कठीन वाटत होती. गेलरी काय, चाळ काय, काय पण लक्षांत शिरत नाय आपल्या. काय होयल आपलं मुंबयत वाटलं. माजा चेऱ्हा बगून भाऊ बोलला "चल दाकवतंय तुका"

मी नी भाऊ चालत निगालो. भायेर आलो तर म्हणाला “हेका गॅलरी म्हणतत.” खोल्या संपल्या नी आंबूस वास वास निगाला. बाजूला दगड बसवलेली जागा होती. मागे ल्हान ल्हान आट धा बंद खोल्या दिसत होत्या.  पांच सा नळ भितीत रूतवलेले दिसत होते. दोन बाया त्यातून येणाऱ्या पाण्यांत कपडे चुबकत होत्या. दोगीजणी नळाखाली धो धो पाणी सोडून भांडी इसळत होत्या. मला समजले तिथे आपण कपडे धूवाचे, भांडी धुवाची. मी धुवू लागली. भाऊ गेला नी त्या बाया माज्याकडे नजर करून बोलल्या “नवीन आली चाळीत? आणि यांची कोण तू?”  “भैण” म्हणत मी होकार भरला. मग मी बोलली नाय तर त्यांनी फुडे बोलणे सोडले.

भांडी धूतां धूतां एक कोणतरी आली. हातांत तारेला बांदलेले डबडे होते ते नळावर भरून त्या ल्हान खोलीत शिरली. तिने दार उगडतां मी समजले त्या खोलीत कशाला जायचे ते. सकाळ पासून वाटत होते मुंबयत रान नाय तर जायचे कुटे. आता म्हायत पडले.

भांडी धुवून घरी आली नी पुसून ठेवली. मावशेची भांडी द्यायला भायेर आले तर चप्पल जोडा ठेवायच्या जागे बाजूला तसेच एक डबडे दिसले. न सांगता म्हाईत पडले हे आपले डबडे. मग मावशी कडे गेली नी बोलली. “मावशी मला जड वाटतंय मुंबयत. काय समजत नाय. रान नाय जायचं कुठे? आंगोळ करायला नळा जवळ आडवसा नाय कशी करायची?”

“हो हो अगो समजांत सगळा तुका. नी मी आसय ना दाकवणारा. भितं कशाक? काय लागला की ये माज्याकडे. मी नेवन दाकवीन तुका. माजाय असांच झाल्लां गो बाय. गांवसून नव्या आल्लल्यांक आठ दिवस जड जातां. मग होता तो मुंबयकर. जीव रमवतां या मुंबयच्या घाणीत.” मग ती हंसत सुटली. मी तिच्याकडे बगत बसली. तर म्हणाली कशी “माजो घोव चाकरमानी. हांडल्यान तेणी मांका मुंबयक. मीय बाचकलंय तुज्या सारक्यांच नी मग संवय झाली सगळ्याची. माका दोन झील. एक गांवांक नी एक हंय. गांवच्याचा लगीन केलंय नी थंय मदतीक रंवलंय. हे शीक झाले म्हणान परत इलय. तेवा मोटी साथ ईल्लली गो म्हामारीच म्हणीनस. आमचे गेले. तेंच्या जागेर दुसऱ्या झीलांक घेतल्यानी. मग तेंका कोण? म्हणान रंवलय हंयच. नी हत ना चाळीत चार पांच जण मारुतीचे भाव. तेंची खाणावळ चलवतंय. तेंकाय बरां नी माकाय. मुंबयत एकमेकांक आदार देवन रवाचा लागता चेडवा. समाजलां”

मावशी किती बोलते, पण तेवड्यांत तिने खूप काय सांगीतले पयल्याच दिवशी. मला सगळं मुंबयत ऱ्हायचं कसं ते अगदी शिकवलान. नी आजूबाजूला ओळक करून पण दिलान. दुसऱ्या दिवशी भाऊ फाटपटीच उटला नी लगबगीने तयार होत बोलला “इटे कामार जातसंय तूं मावशेच्या सोबतीत रव. भायेर खंय जाव नुको हां”

मी मान डोलावली नी मावशीच हजर. हातांत डबा घेवून आली. मग ती चूल म्हणजे ईस्टो पेटवायला गेली तशी मी पण मागे गेली. तीने केललं सगळं बगून ठेवलं. भाऊ कामावरून आला की चा मी करायचा ठरवलं. मावशेन चा केला नी तिगय पियालो.

भाऊ लगबगीने निगताना बोलला "माज्या भयणीक सांबाळ गे मावशे. खाली सोडू नको." मावशी जोरांत हंसत म्हणाली "जा तूं नको घोर लाव जीवाक. कनवटेक टेवतय गुंडाळून तेका."

भाऊ गेला नी मावशी बोलली "चल हंय एकटा काय करतलं? न्हा लवकर नी ये माज्याकडे. बोलतां बोलता येळ जायंत. आता सांच्या शिवाय काम नाय काय."

मावशीचे डबे चार पांच जणांकडे जात. फाटपटी उटून ती सगळे करी नी परतेकाच्या घरी डबे पोंचवी. कोणी सकाळी कामार जात, कोणी दुपारी. भाजी गवाची पोळी देई. गवाची पोळी तिने मला शिकवली. भाऊ, ताई गांवकरीण नंतर मावशी मायेची जाली.

दर दिवशी मी मावशेकडे काय ना काय शिकत होते. मावशी बोलायची नी मी ऐकायची. तिचा मुलगा नी भाऊ एकाच मिल मदे कामाला. एकदम जात नी एकदम येत.

मग ती मला माज्या बद्दल विचारायची. मी काय जास्त बोलायची नाय पण मग तिने एक दिवशी घाव घातला. बोलली "तुजी नी आमची जात एक नाय. आमी शिंपी. नायतर तुकाच मागलं असतंय भावाकडे माज्या धाकल्या साटी." मी गडबाडले. ती फुढे बोलत होती "कशी गो आये तुजी! माया नाय तिका? सोन्या सारक्या तूं. काय केलान ह्या?" मला म्हायत नाय पडलं हिला काय म्हाईत आयेन काय केलं. हिला कुणी सांगीतलं? मी बोलली "तुला कुणी सांगीतलं?"

"तुजो भाव पयलो गेलो तेवा तुजां लगीन करूक म्हणून, नी इलो तो लाल होवन. इचारलंय तर चार पांच रोज काय बोललो नाय. नी मग सांगीतल्यान सगळां तुज्या आयेचा करतूत. परत गेलो तेवा सांगूक लागलो येताना भयणीक घेवन येतलंय. माका समजना लगीन झाला तर तुका हाडीत कसो. माकां म्हणालो घोव मेलो तेचो. तां काय करीत आता. आयेकडे ठेवन अर्त नाय. हंय हाडतंय बगुया काय करूच तां. तुजो भाव तुज्यार माया करता गो पोरा. लय काळजी करतां तुजी."

माजे डोळे भरायला लागले नी मी खाली मान गातली. माजी कथा सगळ्या चाळीत झाली की काय म्हणून लाज वाटली. मी बोलली "सगळ्यांका चाळीत म्हायत हां?"

"नाय गो बाय! माकांच म्हायत. माज्या ल्हानग्यांक पण नाय म्हायत. जातना रडं होतो म्हणून मीच पाटी लागलंय काय तां सांग. तेवा सांगीतल्यान गो. तेवडोच जीव हलको झालो ना तेचो. दुक दुसऱ्या आपल्या माणसांक सांगल्यार हलक्या वाटतां. तेणी इशवासान सांगीतल्यान, मी जीव गेलो तरी दुसऱ्याक बोलुचंय नाय. नी दिनो पण माकां धाकल्या सारकोच नां!" मावशी बोलत सुटली. मावशीचा मला अजून आधार वाटला.

चार आट दिवस गेले नी भाऊ बोलला “इटे उद्या पासून दुपारी जाणार कामावर. राती ११- १२ वाजतां येयन. रवशीत एकटा? राती माजो आवाज ऐकूनच दार उगड. सांगीतल असतंय मावशी कडे रव. पण तिका त्रास नुको. फाटपटी उठून करतां ती सगळयांचा.” मी मानेन हो सांगीतलं

भाऊ सकाळी घरी ऱ्हायला लागला नी एकदा मला बोलला “चल बरोबर तुज्या साळेचा बगुया.” मी तयारी करून निगाली. चाळीतून खाली उतरली. आता रस्त्या वरून चालाची भिती कमी झाली होती. मावशे बरोबर भाजी आणायला गेले तेवा संवय पडली. दोन तीन रस्ते नी एक चौक गेल्यावर एक साळा आली. तिथं गेलो. मला बगून तो खुर्सीतला माणूस बोलला “ही मोटी. हिला सकाळी नाय घेता येणार. रात्री ७ ते १० च्या मोठ्यांच्या वर्गांत बगा.”

मग घरी परतलो. रातच्याला पाटवायला भाऊचा जीव होत नवता. घरी आलो नी मी मावशेकडे गेली. तिला सांगीतलं सकाळी नाय रातच्याला सांगतात साळेत. मावशीने मान हलवून नापसंती दाकवली. पण भाऊ शिकवायचा हट करून बसला होता.

मग त्याची कामाची पाळी बदलली तेवा मला दोन दिस रातच्याला धा वाजतां साळे पर्यंत नेला नी परत घेवन आला. बोलला “इटे, जा ये करशीत राती? मी सुटो अशीन तेवा येयन नेवक सुटलस काय. तू बोलत नाय थंय सगळां नडतां. कोणी काय केलान तर बोंब पाडूक तरी येवक होई. ही मुंबय हा. बऱ्यां बरोबर चंडाळय हत हंय .”

मी गपच होते. मावशेला बोलला तर ती बोलली “काय करतला शिकून? तू माका सांगीतलं तांच कर. कोणतरी चांगलो बगुया नी पाट लावन देवया.”

“गे पण दुसरेपणांक चांगलो नाय गांवलो तर? चौती पास केल्यान तर घडी खात्यांत लावीन. थंय बायो घेतत. आता नियम केलो चौती पास होया. मग कोणतरी चांगलोय गावांत नायतर तां सोताचा सोताच बरां जगांत तरी. ल्हानपणी शिकूचा म्हणी होतां. आयेन नाय घातलान.” भाऊ बोलला.

“अरे जो तो नशीब घेवन येतां. मी काय सांगू. बग बापडो. तसा झाला नी मारगांक लागला तर देवाची कीरपा रे.” मावशी एकदम देवांत शिरली.

माजी राती ची साळा सुरू जाली नी पाटी पेणसील घेवन मी साळेत जाऊ लागली. तीन चार मोट्या बाया नी बाकी सगळे बापये. आमच्याच चाळीतले एक नवरा बायको साळेतून येताना भेटत. वर्गांत नसायचे. मग माहीत पडलं. खालच्या मजल्यार ऱ्हायचे. मला सोबत झाली. त्यांच्या मागे मी चालायची. एक दिवस ती बाई मला बोलली “आमच्याच चाळीतल्या ना हो तुम्ही?” तिची बोली एकदम साफ वाटली. गांवची नवती. मी होयची मान हलवली. ती मग काय बोलली नाय. भाऊला सांगताना बरे वाटले. भाऊ दुसऱ्या दिवशी त्यांना भेटला. आला नी बोलला “इटे ते साळेत शिकवतत. शिक्षक ते. पण वरच्या वर्गांत शिकवतत. या म्हणून सांगतलंय आमच्याकडे. ईले तर चा कर.” मी गप ऐकत होते.

थोड्या वेळांने ते आले नी मी चा करायला लागली. एकच खोली, एकच खाट. त्यांना खाटीवर बसवून भाऊ उबाच होता. बोलला "तुमची सोबत मिळते म्हणून बरे. नायतर मला काळजी होती. गांवावरून आत्तांच आली आहे. मुंबईची काही पण माहिती नाही," तो छान साफ बोलीत बोलत होता मी गारच झाली. भाऊला बामणां सारकं बोलताना पायलं नवतं.

"काय काळजी करू नका. आमच्याबरोबर येईल ती. काय ग कधी शाळा सुरू केलीस?" त्या बाई इच्यारत होत्या.

"आताच" मी बोलले.

भाऊ हंसला नी बोलला "तीला गांवचीच भाषा येते. आणि ती फार कमीच बोलते."

"असं कर दिवसा वेळ असेल तेवा ये माज्याकडे. मी शिकवीन तुला. मोठी आहेस. लवकर शिकलीस तर एका वर्षांत दोन यत्ता करशील. हे दिवसा नोकरी करतात शाळेत. मी घरीच असते."

मग भाऊ खुशीत आला "बघा तसं झालं तर बरंच. चौथी झाली तर मिल मधे लावतां येईल."

"अहो असं का म्हणतां. हुषार असली तर शिकू दे कीं. चांगली शिकली तर भले होईल" त्या बाई सांगत होत्या.

चा झाला नी मी सगळ्यांना दिला. ते लोक गेले नी माज्या दोन शिकवणाऱ्या बाया झाल्या. एक मावशी, सकाळी जेवण शिकवायची नी दुसऱ्या अभ्यास. भरभर दिवस गेले. दररोज तसंच चाल्लं होतं. वरीस संपत होते नी मग परीक्षा आली. मी शाळेत चांगले पास केले. बाई वर येवून भाऊला म्हणाल्या "विठाने छान परीक्षा दिली. मी तिचा दुसरी पर्यंतचा अभ्यास घेतला आहे. आठ दिवसांनी तिची दुसरीची पण परीक्षा द्यायला हरकत नाही. पण तसे पत्र तुम्ही लिहून द्या."

भाऊन आनंदाने चटकन कागद काडला नी कायतरी लिवून त्यांना दिले. त्या बोलल्या "उद्याच हा अर्ज देते नी करते मी काय ते. दुसरी पास केलीन तर वर्ष वांचेल." बाई बोलल्या.

गांवांत माजं कसं होतं, नी इते किती बदलत होतं. मला सुदरत नवतं पुडं काय होणार ते. भाऊ म्हणतोय ना चागलं होईल मग होणार. तो सांगतो ते करायचं. शिकायचं तर शिकायचं. मिल मधी काम करायचं तर करायचं. भाऊ आपला पाठीराखाच, त्याला कायपण दुकवायचं नाय.

शिकवणाऱ्या बाईचं नाव होतं सुमतीबाई. त्यांना मूल बाळ नवतं. घरांत दोगंच. आमची गांवची बोली समजायचीच नाय. ते सुद मराठीत बोलायचे. पुस्तकांत लिवलेल्या सारके. मी तिसरीत होते तेवा. मला बालवाचनाचं बुक होतं. त्यांत लिवलेलं तसंच त्या बोलायच्या. मुंबयत खूप लोक तसंच बोलायचे. गांवची बोली आपसांत कदीतरी बोलत.

आता चार पांच म्हयने जाले मुंबयत नी आयेची चीट्टी आली भाऊला. लिवले होते. सांगीतले तशी खोली बांदायला काडली पण पैका कमी. काय सोय झाली तर बग.

काशीरामाची सोयरीक केली. लगीन ठरवलं ते वैशाकांत. दोन एक म्हयने हायेत. रजेचं बग नी तुला होईल तसं कपडा लत्ता बग.

भाऊन चिटी वांचली नी मला बोलला “इटे जायचं तुला दादाच्या लगनाला?”

मी बोलली “तू म्हणशील तसं. पण शाळेचं कसं करायचं?”

भाऊ खुशीत होवून बोलला “वा इटे! आता अब्यासाची काळजी लागली नां? आता तूं शिकशीत. बग रजा मिळाली साळेक तर जावया. नायतरी तुजी खोली कशी बांदली तां पण बगाक येयत.”

पण आमी गेलो नाय. कारण दुसरं झालं. मावशी लयच शीक जाली. तिला हासपीटलांत ठेवली नी मी दिवसभर तिच्या बरोबर ऱ्हायला लागली. जेवण खावण ने. चा पाणी ने यांत दिवस जात होता. तिचा पोरगा नोकरी करायचा. तो ऱ्हायला तर पगार नाय. मग खायचं काय असं सगळं तिरपागडं जालं होतं. तर गांवी कसं जाणार. सगळा दिवस मी बरोबर होती. रातच्याला तिचा पोरगा नायतर भाऊ जाऊन यायचे. सांच्च्याला मी कायमाय करून ठेवायची नी मग साळेत जाऊन यायची. मावशेन हासपिटलांत धा दिवस काडले नी मग तिला घरी आणलं.

त्याच वेळां दादाचं लगीन होतं गांवी. माज्या ध्यानांत पण नाय ऱ्हायलं. भाऊ कामावरून आला तो सरळ तिच्या खोलीत. मी तिथंच बसलेली. बोलला “काय मावशे बरी आसस नां? इटे मावशी पूरी बरी होयत नाय तित परयांत तू बरोबर रवायचा. दवापाणी येळेर कर.”

मावशीची शक्तिच नाय अशी झाली होती. हळू उटत बोलली “मी शीकपाण काडलंय नी तुमचा लगीन रवलां. पोरान भावचा लगीन टाकलान नी माजी सेवा केलान रे. गुणाचा हा”

मला आटवले दादाचं लगीन झालं असणार. विसरूनच गेली.

भाऊ बोलला “मावशे तुका टाकून मिरवाक जातलंव काय गे? भाकरी घालतंस दोन वर्सा माकां. इसरूक येयत?”

माज्या मनांत आले भाऊ केवढा माया धरतो सगळ्यांवर. तो येताना फळं घेवून आला होता. मी एक चिकू कापून मावशेला खायला आणला. नी भाऊला चा करायला भाऊच्या खोलीत गेली. चा करून आली तर मावशी रडत होती नी भाऊपण डोळे पुसत होता.

मी पटकरून बोलली “काय झालां? भाऊ नी तुमी रडतांस कित्यां?”

भाऊ हंसतच ओरडला “मावशे बाय बोलली गे. इचारल्यान बग”

“इचारतलांच रे भावाच्या डोळ्यांत पाणी बगून कळवळला न्हय रे तां. काय नाय गो तुज्या गांवची याद काडली तुज्या आयेचो इशय ईलो. बाकी काय नाय.” मावशी बोलली.

हे खरं की मी बोलली ती भाऊच्या डोळ्यांत पाणी बगून. ऱ्हायलंच नाई. पटकन ओटावर आलं बोलले. मग भाऊ बोलत होता “गेलव असतंव तर गाडी भाडा नी थंयचो

खर्च कंबार मोडतां गे. म्हागाय कसली झालीसा. नी गेल्यार तू शीक पडलं असतंस तर एकटो पको काय करणार होतो? बरां झालां नाय गेलंव ते."

"पण भावाचा लगीन ना रे. चुकला तर गांवकरी, पावणे सगळे बोल लावतंत. तुजे घरचे संतापतले. आयेक काय सांगशीत?" मावशी

"मावशे ह्या चाळीत सगळेच एकटे. एकमेकांका आदार देवन रंवतव. ता खरां. माजा नंतर. उद्या माकां नायतर इटेक काय झाला तर तू नाय धांवचस? पोरां शीक पडल्या सारकी. मग आमका नुको तुज्या साटी धांवक?"

खरं वाटलं चाळीत शेजारीच एकमेकांशी मैतर करून घर तयार करतात. कोणतरी मावशी आये होते. खानावळ करणारा चांगला वाटला तर पोरगा म्हणून होतो. माज्या सारकी पोरगी होते, नी चाळीत माणसं आपलं एक घर तयार करतात. त्यांत आये असते, भाऊ असतो भयीण पण असते. देवाने जल्माने नाय घातले तरी ते सोताच करतात एक दुसऱ्याला. खरं! मला पण नाय माया आली मावशेची शीक होती तर? काय पण सुदरत नवतं ती घरी येयस्तोपर.

आयेची चिटी आली. नांव टाकलेस काय विचारले होते भाऊला. पावण्यानी, लोकानी विचारले तर शरम आली म्हणाली. इटेला तरी पाटवायचे, कपडा पण नाय धाडला. काय काय बोल लावला भाऊला. भाऊ वांचून बोलला "होयत सगळा बरोबर. वेळ जावंदे. गांवांक गेलंव की होयत बरोबर." मग वरीस गेलं.

उनाळ्यांत शाळेला रजा झाली. सुमती बाई म्हणाल्या त्या गांवी जाणार पंदरा दिस. मग रजा. भाऊ मावशेला बोलला. "तीन चार वर्सा जावक नाय गांवाक. आवंदा जावन येव म्हणतंय. दादाचा लगीन झाला. साडी सुडको नेवक होयो वैनीक. इटेक नेयन बरोबर. पांचवीत गेला पण इल्यार तेकाय मिल मधीं बगतलंय लावक गांवला तर. मग परत जावक नाय गांवचा दोन वर्सा. नवी नोकरी न्हय तेची?"

"जावचां रे बाबा! आपलेच हत ते काय झाला तरी. भांडले तरी मग एक होतत." मावशी.

चार दिवसांत तयारी करून आमी गांवची बस पकडली. दुपारी ४ वांजतां. मावशेन डब्यांत भाकरी नी भाजी दिली होती. भाऊने खूप कापडं मिटाईचे पुडे घेतलेले. मुंबयत आमी कदीपण मिटाई घेत नवतो. पण गांवी जाताना न्यायची ही रीत समजली. तो रातभरचा पल्ला गांठून तालुक्याला पोंचलो तर सक्काळ झाली. गांवची पयली गाडी मिळाली नी न्ह्यारीच्या येळेला घरी पोंचलो.

घरी आये नव्हतीच. दादा शेतावर. आमचा आवाज ऐकून एक बाई भायेर आली. नाक डोळ्याने बरी, पण तब्येतीने जरा बारीक वाटली. आमी आलेले बगीतल्यावर लगबग करीत आंत गेली. पाणी पेला दाराभायेर ठेवला नी मागल्या दारानी भायेर पडली. आयेला बगायला, बोलवायला गेली वाटले.

पण मग ती नी शेवताची आये आली. शेवताची आये मला बोलली “वैनीक भेटलंस गो? बोललंस तरी. वैनीय तुज्या सारकी बोलूक कमीच गो.”

मी मग घरांत गेली. वैनीन चुलीवर चा चडवला होता. बाजूला बसली. माज्याकडे बगून वैनी हंसली नी मी पण हंसली. पण जोरांत वाटले वैनीच्या हंसण्यांत दुक होते. भाऊ बाजूला बांदलेलं घर बगायला गेला. नी शेवताची आये आली. बोलली “तुजी आये आली की बोल लावतली तुमका. लग्नाक येवक नायत नां तुमी. पण काय गो कित्या येवक नाय”

“मावशी शीक होती. हासपिटलांत होती तिचाच करी होतव गे. टाकून कसा येणार?” मी बोलली. शेवताच्या आयेकडे बोलायची संवय होती ती जागी झाली.

“आसा गे एक शेजारीण. आयेच्या मायेन जपतां भाऊक. आदी तो तिच्या कडेच जेवी. मी गेल्यार मी करतंय सगळा. पण आमच्यार माया करतां. मग तिच्या कडे रंवक नुको शीकपणांत?” मी बोलत होते.

चा जाला नी वैनी माज्याकडे बगू लागली. समजले भाऊला चा द्यायला तिला लाज आली. मी भाऊचा कप घेवून भायेर दिला नी परत आली. आता दोनच कप होते मला नी शेवतेच्या आयेला. मी तिसरा कप घेतला नी माजा अर्दा त्यांत ओतून तिला बोलली “घे” ती एकदम भियाली. शेवतेची आये हंसायला लागली. मला समजना काय झालं. तर बोलली. “अगो तिच्या सास्वेचा राज आसा अजून. मोजून मापून खावचा लागता. सासवेक समाजलां तर?”

दोन मिनीटांत मला समजले. आये हिला सासुरवास करतीय. राग राग झाला. माजे दिवस आटवले. आयेला काय चांगले वागतांच नाय येत?

भाऊला पण ऐकायला गेलं. त्याचा मोटा हुंकार ऐकला नी समजले. आता आये आल्यार काय होईल? भाऊ बडबडेल आयेला. भांडण, नी मग परत मुंबयचा रस्ता.

पण काय नाय झाले. धांवतच आये आली. उसासे टाकत बोलत होती. चा करते म्हणाली भाऊन सांगीतले झालां. मग तिथंच बसली. मी भायेर आली तर माज्याकडे बगतच बसली. मी चार वर्सांनी आली होती. मुंबयचं सुक नी वय दोनी रुपाला खुलवतात असे आताच शेवताची आये बोलली होती. आय्रेलाय तेच दिसत असणार.

उमाळा आल्यागत बोलली “ये गो बाय माजी. आवशीची याद पण नाय येवक गो तुका?”

मला पयल्यांदाच मायेची बोली आयेकडून दिसली. खरी की मतलबी वरच्यालाच ठावूक. मी नी भाऊ आयेच्या बाजूला बसली. भाऊन बेगा खोलून सगळे भायेर काडायला सुरवात केली. आयेला साडी नी एक मिटाइचा पुडा दिला. मग वैनीला हांक घालायला सांगीतलं. ती भायेर आली पण लांब उबी. मग तिची साडी, दादाला शरट नी धोतराचे पान दिले. एक मिटाइचा पुडा देवून बोलला. “हा पुडा पावण्यांसाटी. तुज्या म्हायेरी पाटवायला.”

वैनी बगत बसली पण फुडे येवून सगळे घेईना. मग भाऊ बोलला. अगे घे बग साडी आवडली की नाय. आये कडे बगत ती हळू पुढे आली नी सगळे खळवटून आंत गेली. आये खाली बगत गप होती. साडी गोंजारत होती. पण तोंडावर नाराजगी दिसत होती.

जरा आराम करून आमी जेवायला उटलो तर दादा आला होता. मग जेवून दादा मी नी भाऊ पडवीत बसलो होतो. दादा पयल्यांदा गप होता. मग भाऊ बोलला "इटेचां घर बरां बांदलंस. पडवी, चुलीची खोली नी भायरची खोली सगळी छान हत."

"होय सगळां काम मी नी बायलेन केलाव. कोण कामाक बोलावचो तर पैशे खंयसून हाडतलांव? केलांव वांयच वांयच होयत तसां. पण चार ऐन नी दोन आंबे तोडूचे लागले लांकडासाटी. ते कापून वाशे नी फळयो काडून दिल्यान सुतारान. पण पैशे देवचे रंवलेत तेचे. कुंभाराचाय तांच झालां." दादा

"बोलव तेंका उद्या, बगुया काय तां" भाऊ म्हणाला.

मग सगळ्यांचे पैशे भाऊन दिले. दादाला पटकरून बोलला. "वैनी सुकात रवांत बग रे. तोडारसून वाटत नाय. नी आयेक पण कामा करूक सांग. ती खंय गांवभर भटाकतां? नायतर इटेची गत करशांत तिची. तू बोलत जा." दादा खाली मान करून बसला होता.

आयेला राग राग झाला तो दिसत होता. पण बोलली नाय उटली नी घरांत गेली. मला वाटत होते भांडाण होणार. पण काय नाय झालं.

आता आये एकटी पडायला लागली होती. भाऊ बोलला ते दादाला पटत होतं. नायतर तो बोलला असता. मी मागे गेले तर वैनी डोळ्यांतून पाणी काडत गोठा झाडत होती. मी तिच्या हातून झाडू घेतली नी झाडायला सुरवात केली. बोलली "म्हायेर कुटच्या गांवी तुजं?" खूप काय विचारू वाटत होतं पण एकच सवाल आला तोंडातून. तेवडा पुरा पडला आमचं मैतर जुळायला.

खांकरून ती सांवरली नी बोलली "हरकूळाक चार मैल हा हंयसून."

माजा गोठा जाडून जाला नी तिला हात पकडून मागे झाडांत नेली. फक्त बोलली "बोल"

नी ती हुंदकून रडायला सुरू. मावशी आटवली. रडूं दे मनांतलं व्हावून जाईल. नी खरंच थोडावेळ गेला नी ती बोलली. "हे बरे आसत. बगतत माकां बरां होयत तां. पण सासूबाय कितीय केलंय तरी चांगला नाय म्हणीत. सगळया कामांत खोडी काडतत. शेता पासून, घर सारवन्या पासून, दूद काडना, कपडे, भांडी सगळाच एकटा कसा करतलंय. काय ना काय तरी काम रवला मग गाळी घालूक सुरू. जीव देवचो सो वाटता"

मी भोगलेलं ना ओ. मला पटकन समाजलं काय होतय ते. गप ऱ्हा म्हटलं नी घरी आलो. आये दारांतच बसली होती. आमच्या तोडाकडे बगत, मी ऐकन अशी पुटपुटू लागली "ह्या पांडच्या पायाचा ईला हा. ता घालतला आगी. लावतला माजी वाट."

दोगी न बोलता घरांत गेलो. वैनी कामाला लागली. नी मी शेवतेच्या आये कडे गेले. तीच्या कडून सगळी म्हायती मिळाली. पयल्यांदा वैनी उबारीन कामे करी. पन रोज रोज कटकट, मग भाऊ नी बाप आले तिचे. भांडले. हिनी सांगले "घेवून जा पोरीक, मी एकट्यान केलंय इतक्या वर्सा. आता सूनेक नको करूक?" पावणे भियाले. जांवयाक हात जोडून बोलले "सांबाळून घेवा. खूप कामसू हा आमचा चेडू." दादान पावण्यांक शब्द दिलो काळजी नुको करू नी गेले.

मग पयल्यांदा दादाचं नी आयेचं भांडाण झालं. दादान धमकी दिली. "घर सोडून जाव रव एकटी" नी आये थंड झाली.

मी घरी आली तर दादा, भाऊ नी आये बसली होती. भाऊच बोलत होता. आयेला बोल लावत होता. "इटेची वाट लावलंस आता दादाची नको लाव." म्हणाला नी आये रडू लागली. मी मग तितून निगून गेली. मनांत आले आयेचं नाटक काय बगायचं.

दोन दिवस झाले नी ताई गांवकरणीची खूप सय आली. गप गप होती. भाऊन ताडले. म्हणाला "इटे काय झालां. आये काय बोलली?"

मी मानेनेच नाय बोलली. पण मग तोंडातून निगाले "ताई गांवकरणीला भेटावं वाटतय. लय सय येतेय. उपकार हायेत तिचे." भाऊन ते मनावर घेतले नी एक दिवस सोडून सकाळी जावया बोलला. सांच्च्याला परत येवू बोलला.

ताई गांवकरणी कडे गेलो तर घरांत घऱपण नाय वाटलं. कायतरी बिगडलेलं. आंत गेली त ताई खाटल्यात होती. खूप शीक होती. गांवकर भायेर झोक्यावर बसून भाऊला बोलत होता.

"इतल्या डॉक्तराना काय बरोबर गांवत नाय. वशेद असर करत नाय. मुंबयक नेतव पुढल्या आटवड्यांक." गांवकर

भाऊचा आवाज आला "इटेचो जीव आसा ताईंवर, मुंबयक ईलास त काय सांगा लागली मदत तर. खंयच्या हास्पिटलांत दाकवतलांस? आमी परळांत रवतव थंय तीन चार मोटी हास्पिटला हत थंय ईलांस तर जवळ."

"काय म्हायत खंय पाटवतीत तां. पण पत्तो देवन ठेवा. जवळ असलां तर येव. माणूस बळ लागतलांच" गांवकर बोलला.

ताईची सय का आली ते म्हायत पडले. मला मायेन केले तिने. चारच म्हयने सवास पण खूप मायेचा. ती फार शीक म्हणून आंतून सय आली. तीच्या कडेच बसून ऱ्हायले. मन थाऱ्यावर येईना. चांगल्याना देव कां असं शीक पाडतो? दुपारी भाकरी भाजी जेवायला आणली गिळून जाईना.

राती घरी पण चैन नाय. ताई शीक पण आजय तिने चेऱ्यावरून मायेन हात फिरवलान. म्हणाली दोन ल्हानगे नी एक पोरगी मुळे जीव घोटाळतो. दुक सहन नाय होत. जीव जाईल तर बरं वाटेल. मला ऱ्हाऊन ऱ्हाऊन हेच बोल ध्यानी येत नी भय येई. रात जागूनच गेली.

दोन दिसानी मुंबयला गेलो. परत पूर्वी सारखं चालू. नी भाऊ मिल मधे मला नोकरीचं बोलू लागला. मी बोलले "तू काय करशील ते. तू माझं बरंच बगणार."

भाऊ हंसला. बोलला "इटे तुजी भाषा ना धड गांवची नी शुद्ध. चाळीतल्यां सारखी बोलतेस." आता गांव सोडून मुंबयत चार वर्स झालेली. माजी भाषा बदलली होती. भाऊ सारकी सुद भाषा मला अजून नाय यायची. आजुबाजूच्या बोलत ते ऐकून मी तशीच बोलू लागलेली. सुमतीबाई वांचायला सांगायची तेवा पुस्तकातली बरोबर यायची पण असंच बोलताना नाय यायची.

मिल मदे मंदी होती. तीन चार म्हयने लागतील बोलले. मग मी परत शाळा सुरू करू कां विचारत होते. तर भाऊ नाय बोलला. मावशे बरोबर ऱ्हाऊन शिवण, भरत शीक बोलला.

मावशी सगळं करी. चाळीतल्या आया बाया झबली टोपड्या पासून ते ल्हानांचे परकर पोलक्यां परतो सगळं मावशे कडेच शिवून घ्यायचे. मी तिथे बसून शिकू लागली. एक दिवशी सुमतीबाई आल्या नी बोलल्या "अग तू पुढे शिकलं पाहिजेस. हुशार आहेस तूं. भावाकडे बोलू कां?" मी कायपण बोलायच्या आदीच मावशी बोलली.

"भाऊच नाय म्हणालो वो. तेचा लगीन कसा होयत मग, ताय दुसरेपणाचा?"

"म्हणजे हिचं लग्न झालंय? मग ही नवऱ्याकडे नाही रहात?" सुमती बाई

"कुकू खंय लावता. तेचो घोव चार म्हयन्यांत गेलो. ल्हान होता ता तेवा. कसला लगीन? पण डाग तर लागलो. आता शिकला तर तेवडो शिकललो कोण गांवतलो. भाऊ बरोबर म्हणता." मावशी म्हणाली नी सुमतीबाई चुकचुकल्या. थोडा वेळ गप गप ऱ्हायल्या नी गेल्या.

मी मनांत म्हणाली खोक्याशी लगीन काय लगीन होतं. मी तेवा चौदा पंदराची होते. आता हिते बगते तेवा समजतं लगीन म्हंणजे काय ते. गप मावशीने दिलेल्या कापडाना टांके घालत बसली. भाऊ सगळं बरोबर करणार हे समजली.

चार सा दिवसानी मावशी परत शीक झाली. पयल्यांदा हास्पिटलांत होती तेवा डाक्टर बोलला होता "परत शीक पडली तर इथे आणायची. अंगावर काडू नका."

दुसऱ्या दिवशी सकाळी मावशेला घेवून पक्या नी भाऊ हास्पिटलांत गेले. मी जेवण खाण बगीतले. दुपारच्याला भाऊ आला नी बोलला. "मावशेला हास्पिटलांत ठेवली. दुपारच्याक तू जा नी पक्याक सोड. तेका नोकरीर जावचा हा." मी मान हलवली.

मावशे साठी कांजी केली, बाजारांत केळी घेतली नी हास्पिटलांत जात होते तो समोर गांवकर चालत येतांना दिसले. गांवकर नी मुंबयत? मला इचार आला. तितक्यांत गांवकर समोर. मला बगून थांबला नी बोलला "तूं इकडे खंय?"

"मावशेला हास्पिटलांत जेवाण द्यायला चाललीय. तुमी?" मी इचारले.

"तुमची ताई लय शीक. तीका हाडलंय टाटा हास्पिटलांत. जातंय लवकर डाक्तर येवचो वेळ झालो हा." नी गांवकर निघून गेला.

मी विचार करीतच हास्पिटलांत पोंचली. ताई गांवकरीण नजरे समोर येत होती. तशी काय ताई माज्या वर फार तर धा वर्सानी मोटी असल तीस एकतीसची. इतकी कशी शीक झाली. मावशेला तिच्या शिकपणाचे बोलले. ती लगेच बोलली "भेटून ये गो पोरा. कोणी आदार दिल्लो विसरू नये."

मावशेला जेवाय खायला घातले नी बसले. तासाभरान डाक्तरनी कसले तरी औषद दिले. मावशी जरा बरी दिसत होती. म्हणाली "इटे, काम नाय काय नाय झोंपतय मी तास दोन तास तू जा होयातर. काळजी नुको करू. बरां आसय मी."

"घरांक जावन काय करतलंय, कोण हा घराकडे? तू नीज मी ताई गांवकरणीक बगून येतय." मला आता हास्पिटलांत कुणाला कसे शोदायचे ते म्हायत पडले होते. टाटा हास्पिटल केम हास्पिटल जवळच होते. गेली चालत. हास्पिटल मोठे होते. खूप गर्दी. ताई गांवकरणीचं नांवय म्हायत नाय. मग काय फिरत बसली. काय काय करीत होते. मग वरच्या मजल्यावर गेली तर गांवकर एकदोन डाक्तरां बरोबर बोलत येताना दिसला. मी उबी. माज्या समोरून गेला पण मला बगून पण बोलला नाय. हातानेच थांब बोलला. मी तितेच उबी. मग आला नी मला ताई भेटली. एका खाटल्यांत हाडपिंजर होवून पडली होती. काळजांत धस्स झाले. या प्रेमळ बाईला काय झाले? मला बगून ताई जरा हंसली बोलली "इटे तूं आलंस, बरां वाटला गो." मी गप बगत ऱ्हायले तशी बोलली "काय खरां नाय गो. खूप सहन करतंय. पण तरास खूप गो. घराकडे पोरा कशी रवतंत देवाक ठाव."

माझ्या समोर तिची तीनी पोरे आली. मोटा संत्या बारा वर्साचा, मगचा वामन्या नव वर्साचा नी मगची नली सा वर्साची. सगळी तिकडे. नी हे दोगे इकडे. कसे करीत असतील काळजी मला पण आली. तेवड्यांत ताई बोलली "धा दिवस रवचा लागात म्हणतत डाक्तर. मग जातलंव गांवाक."

दोन दिवस मग मी मावशेला जेवण देई नी ताईकडे जाई. दोन दिवसानी मावशी घरी आली. मग तिला सांगून दुपारच्याला मी ताईला भेटायला जाई. दोन दिवसांत ताईला सुटी देणार नी परत पंदरा दिवसानी यायला लागणार असे गांवकर तिला सांगताना समजले.

मग सांच्याला गांवकर आमच्या कडे आला. भाऊला भेटायला. बोलला "दोन चार म्हयन्यासाटी खोली मिळांत काय वो या चाळींत? हिका सारको सारको गांवाक काय नेतलंय. चार म्हयने ईंजेक्शना घेवची लागतीत बोलले. नी हय रवलंव तर तुमचीय सोबत होयत."

भाऊ म्हणाला "काय तरी करूया. अशी चार म्हयन्यासाटी नाय देवचे जागा. पण करतंय काय तरी. तुमच्या कारबारणीन लंय केलासान इटे साटी. नी इटेकय माया हा तेंची. उद्या येवा."

ते चा पिवून गेले तसे भाऊ मावशेकडे गेला नी परत येवून बोलला. "इटे तू नी मी मावशे कडे रवया. नी तेंका हय रव दे. तूकाय बरां तुज्या ताईची सेवा करूक. खोली काय तेंका गांवची नाय नी काय करतीत ते?" मी होकार मानेने दिला.

मावशे कडे गेले तर मावशी बोलली "पुन्यवान गो तूं. माजीय सेवा करतंस नी आता ताईची. सेवेन पुन्य गांवता गो. देव भला करीत तुजा नी भावाचा. असो कोण आपली खोली देयत नाय कोणाक."

चार दिवसानी सकाळीच गांवकर ताईला घेवून आला. दोन जिने चडताना तिला कठीन झाले. मी भाऊ नी गांवकरनी पकडून चडवले. खाटेवर निजली नी माजा हात पकडून रडायला लागली. मी काय बोलणार? गांवकर नी भाऊ गॅलरीत बोलत होते. मावशी आली नी मी ताईसी ओळक केली. ताईला रडताना बगून मावशी बोलली "भोग असतत वो. भोगूचेच लागतत. हे दिस रवचे नाय. थोडा सोसूक लागतांच. बरे होशांत वो लवकर."

गांवकरनी मग कुठली कुठली औशदे केवा केवा द्यायची ती मला सांगीतले. भाऊ कामावर जायला निगाला, दुपारची पाळी. गांवकर पण बरोबर भायेर पडला. मी नी ताई मग जवळ बसलो. ताईला जास्त बोलवत नवते. नी मला काय पण बोलता येत नवते. मनांत खूप वाटायचे विचारायचे. पण तोंड उगडतच नवते. तीला कांजी करून खायला दिली तर चार चमचे खावून पोट भरले बोलली. दोन तासानी दुपारच्याला गांवकर फळं घेवून आला, कापू लागला तशी मी जाऊ लागली. जातां जातां ताईला बोलली "भाकरी भाजी आणूं?" ताई समजली मी गांवकरांसाठी विचातेय. तिने त्यांना विचारतांच गांवकर बोलले "अगो तेणी खोली दिली ह्यांच किती केल्यानी. आता जेवचाय खंय तेंचार टाकूया? मी भायर खावन इलय नी भायरच खायन."

मी मावशेला सांगीतलं. ती बोलली नंतर ती बोलेल गांवकरशी. दुसऱ्या दिवशी सकाळी गांवकर, मावशी नी भाऊ सगळेच खोलीत होते मी चा करीत होती  नी मावशी बोलली "गांववाल्यानु मनांत काय ठेव नुकोत. आमच्या कडे जेवलांत तर कमी होवचा नाय. नी पडलांच तर सागू तुमका काय माय हाडूक भाजी, नायतर साकर, चाची फकी. एकमेकांक धरूनच रवचा लागता. मग जगांक बरा वाटता. तुमी नाय इटेक आदार दिलास. किती माया करतां ताईची. मोट्या भयणी सारकी करतां. तेच्या तोंडात ताईन घातललो घांस ईसराक नाय तां. मग तेच्यासाठी तेच्या ताईची सेवा आमकाय बगुची लागतली वो. काय चिंता करू नुको."

मावशेच्या तोंडून हे ऐकतानां किती बरे वाटले. किती समजदार, पुण्यवान वाटली मावशी. गांवकर पटकन बोलला "तुमी एवडां म्हणतास तर माजा कामच झाला. पोरां तिकडे एकटी हत. मी जातय गांवाक. हिच्या साठी इटा हा बगणारा. मी काय करतलंय हंय. औशदा तांच देता. फळा आणूचा तांच बगात. मग माका काय कामच नाय. हास्पिटलांत नेवच्या एक दिवस आदी येयन. चलांत?"

“वो पण काय जास्त कमी झाला तर? शीकपण काय करीत सांगूक येता?” भाऊ बोलला.

“दर येळेक ईंजेक्शान दिला की असो तरास होतलो म्हणाले डाक्तर. पयल्या परीस बरी हा आता नी सुदरांत एक दोन दिवसांत. नी काय वांटलांच तर तार करा. दुसऱ्या दिवशी येयन मी.” गांवकर म्हणाला नी मग सगळ्यानी मानले.

दुसऱ्या दिवशी गांवकर गेला नी मी ताईच्या सेवेला लागली. दोन दिवसांत खरी ताई बोलायला चालायला लागली. नी मावशी बोलली “बग गे ताई, पोरान तुका लवकर उब्या केलान.” ताई हंसली नी माजा हात घेवन मायेन तिचा हात फिरवू लागली. मग ताई हळू हळू छान चालू लागली नी मावशे कडे पण येवू लागली. पांच सा दिवसानी गांवकर आले. ताईला बगून बोलले. “डाक्तरा परीस इटेचो हात बरो दिसतां.” नी मग मावशी नी सगळेच हंसले. मी एकदम लाल झाली नी भायेर पळाली.

दोन दिवस हास्पिटलांत ताईला ठेवनार. ईंजेक्शन देनार तर मी बरोबर गेली. ताईला ईंजेक्शन दिले नी दुपार पर्यंत ताई झोपून गेली. पण उठली तर उबे पण होता येईना. धडपडत होती. पांढरी फटक झाली. दुसऱ्या दिवशी तर अजून गळाठली चालायला पण होईना. डाक्तर बोलले “घरी न्या सुदरेल तब्येत दोन दिवसांत.”

चांगल्या माणसाला बिगडवून घरी जायला सांगणारे डाक्तर पयल्यांदाच पायले. धा वाजतां घरी आणले तर पयल्या सारकेच उचलून न्यायला झाले. गांवकर एक दिवस ऱ्हायले नी परत गेले. मग मी नी ताई. यावेळी ताई लवकर उबी झाली. तिसऱ्या दिवशीच चालू फिरू लागली. नी बरे वाटले. मदुनच पोरांची याद काडून रडे. मलाय डोळ्यांत पाणी येई.

असे तीन म्हयने चालले ताईला आठ वेळेला तरी ईंजेक्शान दिले असेल. ताई अगदीच खंगून गेली होती. मग डाक्तर बोलले “चार म्हयन्यानी आणा दाकवायला. गोळ्या औशदे बरोबर द्या. बरे वाटेल आता.”

घरी आलो तर सामानाची बांदबांद करायला गांवकरनी घेतली. मी घाबरी झाली. दुपारी भाऊ कामावरून आला नी गांवकर बोलला “दिना भाऊ एक इनती होती.”

“काय बोलाना” भाऊ

“इटेक पाटवशांत काय वो? हिका सांबाळूचा माका होयत असा नाय वाटत. इटा खूप मायेन करतां. चार म्हयन्यान येतलंव तेवा घेवन येयन. पगार देयन मिल देता तितको.” गांवकर.

“बगीतलां आमी. पण पोराचा लगीन करूक बगतंव. मावशे कसा करूया गे?” भाऊ मावशेला विचारीत होता.

“अरे शीकपण काडूक बोलवतसत. ह्या पुण्याचा काम रे. जाव दे तेका. येयत चार म्हयन्यान” मावशी म्हणाली नी गांवकरानी खिशातून पैशे काडले. मावशेला दोनशे नी भाऊला हजार रुपये पुढ्यांत ठेवले. नी बोलले खूप मदत झाली तुमची. भाऊ म्हणाला “चार

म्हयने भाडा तुमीच दिलास, फळा तुमीच हाडलांस, आमीय कदी नाय ती खाल्लव. पैशे कसले देतास.”

“तुमचे खूप ऊपकार झालेसत. हे पैशे तर कायच नाय. ठेवा ते माज्या साठी” गांवकर

मग सगळे एकदम गप झाले. भाऊ मग मला बगून बोलला “इटे तू जावक तयार हस?” दोन मिनिटे थांबून मी मानेनेच हां म्हटले.

मग सगळी बांदाबांद झाली नी दुसऱ्या दिवशी गांवकरनी ल्हान गाडी भाड्याने केली. ताईला जमणार नाय बस म्हणाला. मग आमी त्या गाडीन  गांवचा रस्ता धरला.

गांवाला रातच्याला पोंचलों. सगळं आंग धरलं होतं. ताईला बगून सगळी पिलावळ जमली. मोठ्या संत्याच्या डोळ्यां पाणी दिसले. वामन्या घाबरा झाला. नली ताईकडे धांवली. मी तिला पकडली. ताईला झोपवून मग नलीला तिच्या कडे दिली. सगळे गप होते. एकटी नली बोलत होती. तिला कायपण समजत नवते. ताईच्या डोळयात पाणी होते. ते सांवरत ती येका येकाला जवळ बसवून बोलत होती. आमी वाटेतच जेवून आलो होतो. रात झाली नी सगळे निजायला गेले. ताई जवळ खाली झोपायला दिले. पयले पडवीत झोपणारी मी आता सरळ ताईच्या बरोबर.

सकाळी उठले नी तर ताई बोलली “इटे आता तुकाच बगुचा लागतला माजा सगळा काम. शिकवतय तुका बसून बसून.”

मग खूप लोक भेट ध्यायला आले. बाया आल्या. सगळयांना चा पाणी केले. नी नलीला आंगोळ घातली. ती पाठीच लागली तूच घाल आंगोळ. मग जेवणाचे सांगीतले. पैऱ्याला आलेल्या दोन बायाना मदतीला दिले. नी ताईनी सगळे करवून घेतले. मी आट दिवसांत सगळं समजून घेतलं नी काम सुकर सरळ चालायला लागलं. गांवकर मग त्याच्या भायेरच्या कामांत ऱ्हायला लागला.

पैऱ्याच्या बायाना सांच्याला भात, तांदूळ नायतर कण्या मीच देई. उजव्या मापान् देई. तर पैरेकरणी बाया माया करायला लागल्या.

म्हैना  दीड म्हैना झाला असंल. नी ताईला सांच्याला भायेर आणित होती तर ताई एकदम किंचाळून धापकन खाली बसली. खूप ईवळायला लागली. मी भियाले नी ताई ताई करून वरडायला लागले. एक दोन बाया धांवल्या नी ताईला उचलून आमी तिच्या खाटल्या वर झोपवलं. एक गडी गांवकरला शोदायला धाडला.

गांवकर येयस्तोपर ताई ईवळतच होती. गांवकर आला नी बोलला “दुकतां काय? डाक्तर म्हणाललो केवा दुकला तर एक गोळी द्या. तेणी दिलासान माज्याकडे.” त्याने तेच्याकडून गोळी काढून दिली. नी ताई झोंपली. राती जेवायलाय नाय उटली. दुसऱ्या दिवशी दिवस वर यायला लागला तरी निजलेली. मी भियाली नी जवळ जाऊन हांक मारली. गांवकर ते ऐकून बोलला “उटवू नको तिका. गोळी उतारली कीं उटात.” दिवस मद्यानीवर आला नी ताई जागी झाली. पाणी मागीतले. पाणी नी कांजी मी नेली तर म्हणाली

“इटे काय खरां नाय माजा. या दुकण्यातसून उठीन असा नाय वाटत माकां.” मी तिला गप केलं. नी कांजी भरवायला सुरवात केली. माझे डोळे पाण्यान भरले होते ते बगून हंसली नी बोलली “इटे, तू काय माजी भैण न्हय, की कोण न्हय, पण रडतं माज्यासाठी. किती गो माया करशीत. वायट गो इतको जीव लावचो. मग तरास होता.” माज्या डोळयांतून पाणी पटकन भायर आलं.

महिनाभर असंच चाललेलं. कदी दुके. मग गोळी द्यायची मग ताई अर्दा अर्दा दिवस निजायची. आता गांवकरनी गोळया माज्या कडे दिल्या नी एक गोळी दिल्यावर दोन दिवस दुकलं तरी नाय द्यायची बोलला. तीन म्हयने होत आले नी दुकणं वाढलं. ताई पोट धरून ईवळे. गांवातले वैदुबा सुरू झाले. झाडपाला वाटून पोटावर लावू लागलो. पोटांत काढे देवू लागलो. नी ताई सारकी ईवळू लागली. सगळी कागदं घेवून गांवकर शरांतल्या डाक्तरला भेटाय गेला. तो आला तो काळा ठिक्कर पडलेला, चेरा उतरलेला.

एक दिवशी दुकणे वाढले नी ताई कणत ऱ्हायली. रातभर मी तिच्या बरोबर बसून पाठीर हात फिरवत बसली. सकाळी गांवकर आला, सगळी पोरं आली नी आजूबाजूला बसली. गांवकरणीन सगळयांवर नजर फिरवली नी गांवकरला बोलली “मी जातंय, पोरांका सांबाळा, उगड्यार सोडू नुको तेंका.” नी मग सगळी रडारड सुरू झाली. मी तितून भायर पडले. सहनच होयना डोळयांतून सारकं पाणी. थांबतच नवतं. मग एकदम बोंब उटली नी आंत धांवले. ताई गांवकरीणीने मला जवळ बोलावलं. बसवलं नी काय पण न बोलता बगत बसली. काय सांगत होती? मी कान जवळ नेला. पुटपुटली “नलीक सांबाळशीत?” रडतांनांच माजी मान हलली. थोड्या वेळांत ताई गेली. या मरणान मला पदरांत कायतरी टाकलं. कसं करणार नलीचं? काय समजलं नाय. नियती वर सोडून मी गप मान गुडग्यांत घातली.

गांव लोटला. आयाबाया आल्या नी ताईला घेवन गेले. घर भितीचं झालं. कायपण सुदरेना. गांवकरची भैण आली होती. तिने सगळा कारबार दोन दिवस सांबाळला. वेळ गेला नी दुकाचा भर कमी झाला. गांवकरची भैण गेली. मी सगळं बगू लागली. पण मी किती दिवस बगणार. आता भाऊला कळवलं तर? तो येवून नेईल? चिटी लिवू? की गांव जवळ आहे. आयेकडे जाऊ? काय करू काय करू चाललं. मग नली आली फणी घेवून नी वेणी करायला बसली. मला पाटवायचं गांवकर पण बोलेना. वामन्या आला नी बोलला “माई भूक लागली.” उठले नी त्याला फोव नी दूद देताना विचारले “वामन्या, माका माई बोललस. खंयसून नांव काडलंस माई?”

“बाबान सांगल्यान तुका माई म्हणूचा.” वामन बोलला. मग मी घरांत नी भायेर माई झाले. सगळे विदी पुरे जाले नी मी एकदा वामन्या कडे बोलले “भाऊला चिटी लिवायला हवी. मला जायला पायजे.” वामन्या बगतच बसला. मग त्यानेच केवातरी गांवकरला सांगीतले असणार. राती जेवताना गांवकर बोलला “आमी कळवू भावाक. आमची

जबाबदारी ती. जरा घडी बसली की सोडून येव तुका. कशी घडी बसवतलंव तेचोच इचार करतंव."

मी गप झाले. गांवकर सगळे बरोबरच करणार वाटले. नायतरी पोरांना तो काय सांबाळणार होता.

मग मीच कामाला लागले. ताईची जागा मला मिळाली. पोरांची साळा, पैऱ्यांचे देणे, घर परसांतले काम सगळेच माझ्यावर आले. ताई कशी करायची ते पयल्यांदा चार म्हयने बगीतले होते. काय कठीन नाय झाले. पैरी करणाऱ्या बाया माज्यावर माया करायला लागल्या. मी त्यांना उजव्या मापान् तांदूळ कण्या द्यायची. गांवकर कदीपण काय बगायचा नाय. सगळा कारोबार माजाच होवन् बसला. अडीअडचणीला सगळ्या बाया माई कडे धांवू लागल्या. नी एक दिवस एक बाई बोलली "ताईची भैणच गे तू माई. किती सगळा सांबाळलंस. आमचा पोट या घरार. आदार जाता काय वाटललो गे." मी काय बोलली नाय. पण मनांत कायमाय बरं वाटलं. गांवकर भायर पडवीत हे ऐकत बसला होता. तो एकदम उठला नी चप्पल सरकवून भायेर गेला.

आता म्हयना वर दिवस गेले होते. ताई असती तर मुंबयला गेलो असतो. पण आता? मावशी, भाऊ वाट बगत असतील. गांवकरानी चिटी लिवली का नाय? भाऊची चिटी पण नाय. मी गांवकरच्या घरी मालकीणी सारकी सगळं बगत होती. गडी नी बाया सगळेच माई बोलून मान देत होते. बरे वाटत होते. एवडा मान नी चांगले दिवस खूपच कमी मिळाले. पण हे काय आपलं घर नाय. जायला लागणार. पण गांवकर अजून दुसरी सोय करत नाय तितपर्यंत काय ऱ्हायला लागणार काय? नाय नाय ते विचार चाल्ले होते. इतक्यांत नली धांवत आली नी गळ्याला मिठी मारून बोलली "माई चल गे पची खेळूक माज्या बरोबर." सगळयांत आदी नली सांवरली होती. ल्हान नां लवकर विसरली ताईला. माझीय मया पकडली तिने. नी मला पण तिचा सावास गोड लागे. ताई सारकीच दिसणं, मग मला ताई आठवे.

भायेर येवून आमी पची खेळत बसलो. गांवकर दुपारच्याला झोपले होते. खेळतां खेळतां किती येळ गेला म्हायतच नाय पडलं. गांवकर कदी बैठकीवर येवन बसले तेय समजलं नाय. मग नली चुकली नी मला डाव देईना. मी खोटा रूसवा दाकवला तर ओरडली "बाबा माजोच डाव हा ना रे" मी चमकून मागे बगीतलं तर गांवकर बैठकीवर बसलेत. कौतुक करीत आमचा खेळ बगीत बसलेले. चेऱ्यावर हलकं हंसू. मी लगबगीनं उठले नी घरांत शिरले. लाज लाज झाली ल्हान पोरा सारकी खेळत काय बसली? गांवकर आले केवा कोण जाणे. काय म्हणतील मनांत.

वामन्याला पिटाळले चा करू का विचारायला नी गांवकरनी हो म्हणले ते ऐकले नी चा करू लागली. नली कुरकुरत होती खेळायसाठी. मग बोलली "बाबाच्या फुड्यांत कसा

खेळतलंय?" तर नली भायर जाऊन बाबाला सांगत होती "बाबा तू जा. माका नी माईक पची खेळूचे हत."

"मग खेळा ना गो. मी काय करतंय?" गांवकर

"तूं बसलंस त माई नाय खेळूचा." नली

"बरां जातय हां, चा पितय नी जातंय." गांवकर

मी आंत सगळं ऐकत होती. ही बया कायमाय बोलून गेली खरी पण मला भिती झाली. गांवकरला काय वाटेल.

चा वामन्या बरोबर पाटवला नी नलीला आंत बोलवून चा नी बटर खायला दिले. मग एक एक काम काडून बसली. नलीला चुकवायला. नली पण विसरली नी भायेर खेळत बसली. घरकाम काय कमी नाय. रातच्याला जेवणाची तयारी करायला घेतली. परसांतून ताजी भाजी काडली होती. वांयगी होती. भाजी चिरायला बसली. तर गांवकर दोनदा घरांत ये जा करून गेला. काय पायजे ते समजले नाय. मी भाजी चिरत बसली. राती भाकरी, भात, पीठी नी वांयंग्याची भाजी केली.

रात फार होईल तर? लवकर जेवायचे हा गांवकरांचा नेम. मावळून दोन घटक्या झाल्या नी सगळे जेवले. संत्या, वामन्या नी गांवकर वांयंग्याची भाजीवर खूष झाले. बोलले पण. मग मला मूठबर मांस चडले.

असे दिवस जात होते नी दादा आला. गांवकर भायेर गेला होता. मी दादाला बगून आनंदले. पण दादा रागांत दिसला "इटे इतके म्हयने हय आसंस पण आमका नाय कळवूक. भाऊक तुमचो पत्तो नाय म्हायत. तेणी चिटी पाठवल्यान तू हंय आसस. दोन म्हयन्या पूर्वी जाणार होतस मुंबयक. अजून गेलं नाय चिटी पण नाय. माका धाडल्यान बगूक. काय झाला तां."

"मी सांगललंय गांवकरांका चिटी लीवा. तेणी लिवली वाटला." मी बोलली.

"म आता काय कळवू तेकां? कदी जातलं मुंबयक?" भाऊ.

"बगतंय इचारतय गावकरांका. नायतर तू इचार." मी.

मग त्याला चा बिस्किट दिले नी कामाला लागली. दुपारी जेवन जा सांगीतले. गांवकर दुपारी आले नी दादा बोलला. "भाऊ इचारीत होता. इटेक केवा पाटवतास मुंबयक. चिटी इली हा."

"तेच्याच पाठी आसय मी. ही गेल्यार इटेन सगळा सांबाळलान पोरांचा नी कामाचा पण. दुसरा कोण गांवता काय बगतय, पण नाय जमत. जरा कळ काडा म्हणतय. मीच नेवन पोंचवीन. एक शब्द देतय. माका तुमच्या भयणीन जी मदत केल्यान तेची पुरी भरपाय तेकां देवची माजी जबाबदारी हा. नायतर पाप लागात. मी काय तां बरा बगीन. ह्यो शब्द देतंय. गांवकराचो शब्द आसा समजा." गांवकर बोलत होता.

दादाचं समादान झाले वाटलं. तो निगताना बोलला "भाऊक चिटी लिवा. मग झाला. तोच बगता सगळा इटेचा." गांवकरनी मान हलवली नी दादा जायला उटला. तर गांवकर मला बोलले "सगळयांका देतास, भावाक नाय काय देवक? परसांतली भाजी नायतर कुळीत, ऊडीद दे तेका इटे"

मग मी दिले. दोन शेर कुळीथ, शेरभर ऊडीद नी वालीच्या शेंगा. दादा सगळे घेवन गेला नी गांवकर बोलला "इटे तू इतक्या सांबाळंस सगळा नी तुज्या भावानय इतकी मदत केलान. तर तेंका तू आपण होवन काय दिलं तर आमका लागूचा नाय." मी आनंदले पण गप ऱ्हायले. गांवकर मनानं खूप मोठा वाटला. तसाय तो मी कामवाल्याना काय देते त्यांत लक्ष नाय घालायचा.

गांवकर दुपारभर बैठकीतच बसून होता कसला तरी विचार करीत होता. ध्यान नसल्या सारका झाला होता. मला कामाला अवगड पडत होतं. मी कदीपण गांवकरच्या समोर नाय जायची. पण गांवकर आपल्याच तंद्रीत बसला होता सांच्याला जेवताना पण गुंगला होता. काय ते म्हायत नाय पडले.

खूप रातीला झोपेंत होते नी भासले कोणतरी हांक मारतेय. जागली तर समोर गांवकर. मी पटकन उटून बसली खाली मान घालून. गांवकर हळू आवाजांत बोलला "भायेर चल, हय पोरां जागतीत काय म्हणतंय तां ऐक" मी घाबरी होवन तेच्या पाठी गेले. माज्या कडे काय काम? वाटले मनांत.

भायरच्या खोलीत गांवकर सांगायला लागला "ही गेली, तू पोरांका माया लावलं. वामन्या नी नली खूप माया करतत तुज्यार. दुसरं कोणपण नजरेत नाय. तुजे भाव तुका परत पाटवूक मागे लागलेत. माज्यो भयणी सांगतत परत लगीन कर. पण पोरांका माया गावांत का नाय ह्या इचारान पाठी टाकतय लगीन. पण एक खरां सगळा सांबाळूक कोणतरी होया. तू सांबाळतस तां बगून इचार इलो तुकाच इचारूचा, सांबाळशीत सगळां कायमचा? तुजा मन असांत तरच होय म्हण. एक अडचण हा मी गांवकर, नी तू कुणबी. जाती येगळो, लगीन करूक नाय येवचा पण सगळा बगीन जल्मभर. राज करशीत. बग इचार कर नी सांग एक दोन दिसांत."

तो बोलत होता नी मी लाकूड झाली. ध्यानी मनी पण नवते ते समोर. बावचळून गेले. अर्तच समजत नवता कशाचा. सकाळी उटली तर गांवकर समोर पण जायची लाज झाली. चा पिवन गांवकर भायर गेला. नी मी विचारांत पडली.

गांवकर मोठा असला तरी माया करणारा होता. मनान खूप चांगला वाटला. खोक्या सारक्या बरोबर डाग लागलेली मी मला दुसरेपणाला कोण चांगला मिळणार. पण भाऊला इचारायला लागेल. त्या सीवाय कसं चालेल. तो त माजं भलं बगणारा. पण गांवकरय खरा होता. नलीला सोडून ऱ्हायचं मला दुक झालं असतं. पोरांची माया मला पण लागली होती. पण लगीन केल्या शिवाय ऱ्हायचं म्हंजे कसं? लोकं काय बोलतील? गांवांतले लोक काय

म्हणतील? नाय म्हटले तर नलीचं कसं होईल? कदी नाय ते एवडं मोठं मोठं झाल्यागत झालय. तसं दुसरेपणाचं लगीन केलं तर होईल? शेवता पण दुकीच होती पयल्यांदा. लगीन करून सुकीच होईल असं नाय, मग हे काय वाईट? खायला प्यायला तोटा नाय, कपडा लत्ता तर ताई सारखा मिळतो. गांवकर दारुय पीत नाय नी खोकतय नाय. मोठा असंल पण दणकट आहे. खोक्या कुठे नी हा कुठे. मला विचाराय अगोदरच सत्ता दिली होती त्यानं. का म्हणून नाय म्हणू? पण भाऊचं काय? त्याला रूचेल? मावशी आयेच्या जागी तिला नुको विचारू? काय नंतर झालं तर? एक तरी दार उगडं पायजे. नायतर फापट होईल जल्मभर. काय करू? अर्द हां नी अर्द ना मधी मी सबंद दिवस नी रात घालवली.

पण मग हळूच आडून गांवकराकडे बगायची खोट सुरू झाली. गांवकर घरी नसला तर बरं नाय असं झालं. काम करताना गांवकर नजरेपुढे यायला लागला. मनांत आलं हा कसला नवा सोस. मग दुसऱ्या दिवशी फणी करताना नलीला बोलली "नली मी भावाकडे जाव? तो बोलवता" नली किंचाळत बोलली "नाय माई तू नुको जाव, नायतर माकाय घेवन चल." नी मग हुंदकायला लागली पोर. मी कळवळली. इतकी माया माझ्यार, कशी सोडू? पटकन शब्द भायेर आले "नाय गो पोरा नाय जायत मी. पण मोटा झालंस काय काढून लाव नुको घरांत्सून." ती थांबली नी मला मिठी मारून बसली. मग माझ्या मागे फिरत बसली. जेवण खाण करताना, परसांत लाकडं आणताना. निवड-कर करताना माझ्याबरोबर, जणू काय हिला न सांगता मी पळून गेली तर. काय होतं कुणाला म्हायत. पण सारखी मागे मागे. राती सगळे जेवायला बसले नी नली फाटकन बोलली "बाबा माई नाय जावची खंय. तू पण तिका जावक देव नुको."

माझी नजर पटकन गांवकर कडे गेली. खाली बगत होता पण चेरा हंसरा झाला. संत्या माज्याकडे नी गांवकर कडे आळी पाळीनं बगून खाली मान घालून जेवू लागला. मी मात्र गडबडून गेली. वाटलंच नाही नली एकदम बोलून जायल. काय वाटलं असेल गांवकरला. कशी तरी जेवली. उष्टी काडून शेण सारवून झोपायला हांतरूण घातलं. नली माज्या बरोबर झोपायची. मग झोपलो तर झोंप येईना. मावशी नी भाऊची खूप सय आली. मग केवातरी डोळा मिटला.

रातीला भास झाला कोणतरी शीरावरून चेऱ्यावरून हात फिरवतंय. जाग आली तर गांवकर बसलेला नी मी भियाले. बोलला "मानलं गो माजां, खूप सुकांत ठेवीन, बाकी सगळा स्वयंभूवर." मग मला जवळ घेतले. मी थरथरत होती.

सकाळी उटले तर रात आठवली. कालची इटा आज इटाबाई झाली होती. गांवकरान मला बाईपण दिलं होतं. नी खऱ्या सुखान मी पण ते घेतलं होतं. मी पोरांची आये व्हायचं ठरवलं होतं. गांवकरमुळं मलाय पोर होणारच नां? आता कुठे परत जायचं? भाऊ, मावशी सगळी एका रातीने लांब केली. नी गांवकर, नली, वामन्या माझे केले. आता काय होईल ते बगायचं, सोसायचं दुसरं काय.

दुपारच्याला गांवकर उठला नी बंदूक साप करून तयार झाला. सांगावे गेले नी लोक जमले. शिकारीचा बेत झाला होता. पावसाच्या पयल्या सरीवर पेरणी होवन तरवा वीत भर आला होता. रातच्याला तरवा चरायला येणारं भेकर नायतर ससला गांवला तरी बेस असं बोलताना ऐकलं.

रात पडली चारपांच घटका गेल्या नी सगळे आले. एक मोठं भेकर नी तीन चार ससे गांवले होते. ससे सगळे गावकऱ्याना देवून भेकराचे वाटे केले. मग आंत येवून मला बोलला. बगा उद्या करा. पण टिकायला पायजे म्हणून हळद मीठ लावून वाप काडून ठेवा. मी तसे करायला घेतले नी गांवकरला जेवण वाढले. आज जेवायला आंतच आला. जेवताना पटकन विचारलं "पोरां झोपली?" मी मानेनेच हो म्हटले. हंसत म्हणाला "बोलत जा. तुज्या ताईच्या जागी तूं. मनांत काय पण नको लाव. तसोच ठेवीन तुका. चार दिवसांत मुंबयक जायन नी भाऊक भेटान, मावशेक भेटान सगळा सांगून येयन. बोल लागात तो माका. सन करीन. पण तुका ठपको नाय गांवचो तां बगीन. ईश्वास ठेव. नी जगांक नी लोकांक न भिता बायले सारख्या रव. कोण काय बोललो तर माज्याशी गांठ हां."

मी सुखावली. खरा मरद होता. मला खूप सूख वाटलं. आटपून झोपणार तर गांवकर बोलला "आता तुमका जागा दिली बायलेची. पयला आमच्याकडे नी मग जा पोरी कडे." मी नियम ऐकून बावचळले. पण पाय त्याने सांगीतले तसे चालले. मी फक्त ऐकतच आलेली सगळयांचं. संवयच पडली होती. गांवकर सांगत होता तसं ऐकत चालत होते.

मग चार दिवसानी मुंबयला जायची तयारी करायला लागला तर बोलली "मी येतय, भाऊक मावशेक भेटन म्हणतंय"

"या येळाक नुको, जरा माका येवस्थित करूं दे, भाऊक समजावतंय मग नेयन पाठसून या काम जरा नाजूक हा. थंय तूं नुको." गांवकर बोलला नी मी ऐकले.

गांवकर गेला नी चार दिवसानी आला. शांत होता. मी बगीतलं तर समजलां नी बोलला "भाऊ भेटले बोललंय मग खूप राग राग केलान माजो, पण मग मी समजावलय. मावशी म्हणाली. पोरीच्या नशीबांत असाच सुख असात रे. तूं काय करतलं? नशीबाफुडे कोणाचा काय चलूचा नाय. मग माका म्हणाली, तेणी खूप भोगल्यान तेका सुक मिळांत बगा. तेचा काय वायट झाला तर भाऊ सोडूचो नाय तुमका. मीय सांगीतलंय जीव जायत पण सोडूचय नाय. ईश्वास करा. एवडांच नाय पण तुमकाय काय नड लागली तर उबो रवीन तुमच्या साटी. चल सगळा बरोबर झाला. आता एक कर ह्यो गोळयो हत. रोज एक तूं घेयत जा. मग ताई सारक्या नको होवक तुजा."

मनांत म्हटले मला काय धाड भरलीय चांगली तर आहे. पण जाव दे घेवया गोळया. सगळा कारभार चालला होता. कामाला मी मागे नाय. शेतीची, भाजीच्या परड्याची घरचं जेवणखाण पैऱ्याचा हिशोब. सगळंच मी बगत होती. थोड्यां दिवसांत पैरेकरणी माज्या कडे बगून हंस हंस करू लागल्या. विचाले तर काय नाय म्हणायच्या. मी समजली इतके दिवस

झाले मी इथेच. मुंबयला नाय परतली. गांवकर पण खूष खूष. बोललाय असंल कोणातरी गांवकऱ्याकडे. त्यांना समजले असेल माज्या नी गांवकरांबद्दल.

मग मी जरा दमान घेतलं अशाच हंसत होत्या तर बोलली "कामांक येतास की हंसूक गो. टिंगल करू नये कोणाची. परत दिसलां तर पैऱ्याक बोलवूचय नाय."

त्या दिवसा पासून पूरी सत्ता आली. सगळयानी माला मालकीण मानलं. मी कधीतरीच बोली पण बोलली की असर बरोबर होई.

संत्या आता जरा बिथरत होता. मोठा होता. त्याला मनाला तरास होत होता. मी फार मायेने बोलवायची पण तो राग राग करायचा. गांवकरच्या हे लक्षांत आले नी त्याने त्याला शाळेसाठी, चांगलं शिकायसाठी जिल्ह्याच्या गांवाला पाठवलं. तो सुटीत यायचा. मग हळू हळू बदलायला लागला. आलां की माज्या हातचं खायला लागला. काय तरी जिनस करायला सांगायला लागला नी मला बरं वाटलं. गांवकरने त्याला लांब ठेवून जवळ आणला ते बगून गांवकरचया होशारी बद्दल इश्वास आला.

पोटांत एक भय वाटायचं आयेन लावलेला पांडऱ्या पायाचा डाग हिते नाय ना लागणार? आयेची याद यायला नी दुसऱ्या दिवशी आये नी दादा हजर झाले. भाऊची चिटी मिळाली बोलले. नी गांवकरला आयेन सरळ प्रश्न केला "हिका अशीच कशी डांबलीत हंय? आमका इभ्रत आसा. नेवक इलव. चल गो इटे." दादा गप्पच होता. गांवकर हंसत बोलला "मर्जीन येयत असांत त न्या पण जबरदस्ती विसरा. गांवकर म्हणतत आमका."

मी सगळं ऐकलं. आये बरोबर कोण जायल. मी गप आंत ऱ्हायले. तर मला भायर बोलावलेन. नी इचारलेन इचार काय. मी गप.

"गो रांडग्या इभ्रत घालवलंस आमची. खंय तोंड दाकवूक नुको केलंस." आये बोंबलत होती. सन नाय झालं नी बोलली "खोक्याशी लगीन लावन पाटवलस ना गे हंय. आता तुजो काय संबंद मी खंय काय करूचा तेच्यार? नी पांडऱ्या पायाचा ना मी? सोड नाद माजो."

आये गप झाली. पण मग बोलली "भाऊन चिटीत लिवलासान. तूका घेवन ये म्हणून." ददा चपापला पटकन तिच्यावर नजर केली. मी समजले "चिटी आणलंस? वांचीन नी कळवीन भाऊक मी काय तां"

गांवकर हंसत बसला होता. आता गांवकरची मलाय लाज येत नवती. मी त्याच्याकडे बगीतलं नी हलकं हंसली. तसा गांवकर बोलला "बगा तमाशो करू नये माणसान. चेडू तुमचा सुकांत हा हंय. नी आमीय बगतलंव तेचा चांगला. इचारतीत तेंका सांगा तुमका चेडूच नाय म्हणून." मग मला बोलला "जातीत गो इटे ते. दे तेंका कायमाय." न दुकवता गांवकरने त्यांना जायला सांगीतलं. मी चांगली ताजी भाजी काडली होती ती दिली, भेंडी, दोडकी दिली. घ्यायला दादाला आंत बोलावले नी इचारले "वैनी बरी आसा नां? भेटवलंस तर बरां" दादान हां ची मान हलवली नी सगळे खळवटून भायेर गेला.

आयेला दादाच्या हातामधलं बोचकं बगून समजलं कायमाय चांगलं दिलंय. नी तीच्या चेऱ्यावर खुषी दिसली. उटली नी चालू लागली. येते पण म्हणाली नाय. ती तशीच होती काय करणार.

हळू हळू दिवस जात होते नी मी सगळं सांबाळण्यांत पडले होते. माजंच घर वाटत होतं नी गांवकर पण तसं सगळ मी करील ते मानत होता. सा आठ म्हयने गेले नी भाऊ आला. तो गांवी आला होता नी मला बगायला आला. आता माज्या पोटांत गोळा फिर फिर करू लागला. भाऊ मायेचा. तेच्या मनाविरूद मी वागली. तो रागे भरला तर काय बोलणार. पण तो गांवकरशीच गेला नी बसला.

गांवकर मानान बोलला "या पावण्यानु कदी इलांत मुंबयसून?"

भाऊ बोलला "झाले चार दीस, म्हटलां इटेक बगान येवचा."

"होय तर भावान भैणीक बगुकच होया. नायतरी तुमच्या मायेचा तां. पण आता तुमीच इचारा सुकांत ठेवलंव की नाय तां. इटे भाऊ इलेत चा पाणी बग गो. नी जेवणांत बग कोंबडा बिंबडा." गांवकर भाऊशी बोलतां बोलतां मलाय सांगून गेला.

चा नेताना पायांत कापरी भरली होती. पोटांत गोळा. मी गुना केला असं मन बोलत होतं. पण भाऊ काय बोलला नाय. माझ्या अंगावरची कापडं, लुघडं नी गळयांत सोन्याची माळ नी हातांत पाटल्या होत्या. एकदा गांवकरनीच दिलं होतं सगळं. नी रोज घालायचं म्हणून बोलला होता. माज्याकडे नजर गेली नी भाऊ समजला मी सुकांत आहे. चा ठेवून मी पटकन घरांत गेली. मग गांवकर नी भाऊ भायेर बोलत होते. ते आंतल्या खोलीत येवून हळू बोलू लागले. मी चुलीच्या खोलीत होते. काय ऐकू येत नवते नी गांवकरनी भायेर बोलावले. मी खोलीत गेली तर गांवकर भाऊला बोलला "इटेकय सांगुया म्हणजे तांय सुकांत शांतीत रवात." आता काय सांगणार मी गप उबी ऱ्हायले.

"इटे आमी तुज्याशी लगीनय लावला नाय का पाटय लावलो नाय. बाईल केली आसताव तर हक पण इलो असतो. पण जात मधी इली. नी ठरवला. रवायचा ता तुज्या बरोबर. पोरांका माया लावलंस, घर सांबाळलस, पण तुका जेवणखाण नी कपड्यावरच ठेवलव असा समजू नुको. माज्या पाठी काय होयत हेचोय इचार केलंय मी. ही कागदा बग. नदी कडची सा एकर भाताची जमीन तुज्या नांवार केलंय. तेतुरच तुजा घर बांदतलंय. पोरा मोटी झाली नी तुका नाय बगीतल्यानी तर, म्हणून ही व्यवस्ता केलंय. भाऊ हे कागाद ठेवा तुमच्याकडे." गांवकर बोलत होता नी मी समजत नवती मला जमीन कशाला ते. भाऊन कागद घेतले नी माज्या कडे बगून बोलला "इटे पयल्यांन राग ईल्लो तुजो. असा कसा केलंस वाटलला. पण माकाय असा घर नसता गांवला गो. गांवकर मनान मोठे हत. फुडचो इचार पण करतत. तुजा हंयच भला होयत. मी सुकान जायन आता मुंबयक."

जेवणा आटपली नी भाऊ जाणार म्हणून मी भाजी नी कायमाय घालून पिशवी तयार केली. तो निगताना बोलला “गांवकर इटा येयत चार पावला पोंचवूक, वांयच आमचा आमी बोलू.”

“इचारतांस काय, जावा नी बोला काय तां. आमका जराय लागाचा नाय.” गांवकर बोलला.

भाऊ नी मी निगालो तर भाऊ बोलला “इटे तुका बरां आसा ना हंय? गांवकरान सगळा तुज्याच कडे सोपवल्यान काय गो?” मी मान हलवली

“गो अजूनय बोलत नाय? कसा होतला तुजा? चल पण बरां झाला. गांवकरान सा एकर जमीन केल्यान तुज्या नांवार. आमच्या पेक्षा खूप जास्ती हा गो. मुंबयक बोललला तसाच केल्यान तेणी. ईश्वासाचो हां” मी ऐकत होते. भाऊ खूष, मग मला काय. आता भिती गेली नी मी बोलली “मावशी कशी आसा?”

भाऊ बोलला “चांगली हा. आटव काडता तुजी. शीक झाली तर लय लागता बोलूक. इटा असता केल्यान असतां सगळा म्हणतां. आता गेलंय काय सगळा सांगतय तिका. बरां वाटतला तिकाय.”

लांब आलो होतो. भाऊचा निरोप घेवून मी परत फिरली नी घरी पोंचली तर गांवकर बंदूक साफ करत बसला होता. म्हायत पडलं आनंद झाला की तो शिकारीला जातो.

दोन वर्स गेली. सगळं बेस चाललेलं. नली आता आट नव वर्सांची झाली. तिला रीत लावायला गांवकर सांगायचा. मला समजेना. पोर तर गुनाची हा. असं कां बोलतो. मग इचारलेच तर बोलला “तेका जेवाण शिकवा. वो लगीन होयत दोन तीन वर्सांत तर काय तुमी जाशांत बरोबर? नी मग आमका कोण हंय?” नी जोरांत हंसत सुटला.

मी समजली मी फार लाड करायची नलीची. कामच नाय द्यायची तिला. ते ध्यानांत आले होते त्याच्या.

मलाय मनांत एक लागून ऱ्हायले दोन वर्स झाली माजी कूस कां नाय उजवत. आये व्हायला पायजे. बाईला तो खरा आनंद. वाटणारी माया दूदाने उतरली की दिसते. आये व्हायची ओढ खूप लागायची नी मग चेऱ्यावर दिसायची. नली विचारी “माई काय झाला? बरां नाय?”

मी पटकन भानावर येय. नलीला जवळ घेई नी मायेने थोपटी. तीय मग लाडांत येय.

किती पावस गेले ते म्हायत नाय. नलीचं लगीन झालं, संत्याचंय घेतलं. त्या आधीच गांवकरनी घर बांदले माज्यासाठी. इचार केला तिते कोण ऱ्हायल? तिते मी गेली तर हिकडचे कोण बगेल? एकदा विचारलेच गांवकरला तर बोलला “लगीन करतंव संत्याचा. नाय जमला तेच्या बायलेशी तर? तुका तरास झाल्ललो माका नाय चलुचो.” गांवकर नेमी फुडचाच इचार करी.

दोनी लगीनं माझ्यासिवा झाली. गांवकराचा भाऊ नी वैनीन लावली. मी बाजूलाच होती. जात वेगळी पडली. पण गांवकरनी मला दोन छान लुगडी घेतली. बांगड्या केल्या होत्या. बरे वाटले. जाती पाळणारच नां सगळे.

संत्या चाकरमानी झाला होता. बायकोला मुंबयला नेतो बोलला नी गांवकर गरम झाला. हितलं बगायला नुको. सगळं सांबाळायला केवा समजणार? असं बोलला नी संत्या गप झाला. मी मग गांवकरला बोलली "जाव दे त्येंका, मी आसय बगूक सगळां."

"होय तर मुंबयची संवय लागली तर शेणा चिकलांत हात नाय लावचे. कंटाळो येता सांगतत. काय नाय सराय झाली काय दिवाळी नंतर ने म्हण तेकां. नी रवा दोन तीन म्हयने."

मी गप झाली. संत्या गेला नी संत्याची सुशी हातांखाली आली. नली गेली नी सुशी आली इतकाच फरक. सुशी पोरय चांगली होती. सांगली कामे पटपट करी. मग तिला सगळं सांगू लागली. मी फक्त बगायची बरोबर की नाय ते. गांवकर खूप खूष. सून तयार झालेली त्याला पायजेच होती.

वामन्या शिकायला भायेर गांवाला होता. तो रजेत यायचा पण वांचतच बसायचा. बुकें त्याला प्यारी. मी बगतच बसायची. एकदा एक बुक उगडलं तर काय वांचता येयना. अक्षरं येगळी. त्याला इचारले तर बोलला ती विंगरेजीत आहेत. म्हणजे कसे रे? मग हंसत बोलला "हे बग मी वांचतो. तू ऐक." तो वांचत होता नी मला काय पण समजत नवते. तो हंसत सुटला नी बोलला "याला विंगरेजी भाषा म्हणतात. तू नाय शिकलीस. तू तर मराठीच शिकलीस." पण एक समजलं वामन्या हुषार झाला होता नी माज्यार माया तशीच होती. गुनाचा होता.

दोन चार वर्स गेली. संत्याची सुशी सगळा कारबार बगीत होती तरी सगळे मलाच मान देत. सुशी पण म्हायत असून पण कायतरी करताना मला विचारून करी. मला म्हायत, मान देती दुसर काय.

ही सगळी वर्स सुकाचीच चालली होती. दुक जराय जवळ येत नवतं. ल्हानपण काडलं ते दुकांत नी आता सुक. देव सगळयाच्या वांट्याचं देतोच म्हणतात सुकय नी दुकय. एकच मनांत कुरतड करी कूस नाय उजवली. पण मग म्हणी सगळंच सुक नाय मिळत कायतरी ऱ्हातंच.

वर्स जात होती. वामन्या खूप शिकला नी बड्या पगाराच्या नोकरीला गेला. तो दोन वर्साला एकदा यायाचा नी तीन म्हयने ऱ्हायचा. मी इचारले तर बोलला "बोटीवर आहे, ईंजेनेर आहे, जगभर फिरतो. तुला एकदा नेईन बोटीवर. पण तीन म्हयने घर नाय दिसणार. समुद्रांत बोटीवरच ऱ्हायला लागेल. चालेल ?"

बापरे समुद्रांतच काडायचे दिवस? नी खातील काय? सगळं मिळंल बोटीत. नी संपलं तर उपासमार नाय होत? काय नी काय.. मला इचारांत बगून हंसत बोलला "माई इचारांत पडलीस बोट बगीतलस तरी काय ग तूं?"

मी मुंबयत असताना बोट बगीतलेली. मावशेचा पक्या गांवाला जावन आला तो बोटीन आला. त्याला तेडायला भाऊ जाणार होता. भाऊच्या धक्क्यावर. मग मलाय घेवन गेला नी बोट बगीतली. बोट लागली नी लोक मुंग्यांसारके भसाभसा भायर पडले. भाऊच्या धक्क्यावर ही गर्दी होती. म्हणून वांटले एवडी माणसं बोटीत तीन म्हयने ऱ्हायली तर खायला पुरे पडंल? मी काय बोलली नाय पण मानेने होय केलं.

“मला दर दोन वर्षानी घरच्या एकाला न्यायला मिळते. बाबा नाय यायचा तूं येशील?” वामन्या मायेन बोलवता झाला, पण मला गडबडले. बोलली “लगीन कर नी ने बायलेला. मला कुटे कामांत फुरसत.” तो हंसतच बोलला “तुला घर नाय सोडवणार. माहीत आहे मला.”

तो परत गेला नी गांवकर कडे बोलली “वामन्याच्या लग्नाचा बगूक होया.”

गांवकर हुंकार देत बोलला “तो शिकलो हा खूप. कोण गांवतली हंय. बगात तोच काय तां”

मनांत म्हणाली, जाती भायेरची आणली तर? नी तसलंच झालं. फुडल्या वर्साला त्याची चिटी आली गांवकरला. लगीन करतोय, शिकलेली पायजे म्हणून गांवाकडची नुको. लगीन मुंबयत करणार. खर्चाचं तुमच्यार नाय पण तुमी, माईनी नी सगळे आले पायजे. मुलगी आपल्या जातीत मिळणार नाय म्हायती. पण बामण आहे. गांवकर वांचीत होता नी सगळे ऐकत होते. मग गांवकर इचारांत पडलां.

दोन दिस इचार करीत होता. नी बोलला “इटे तू जा. सुशीकय ने व्होयातर. पण मी इलय तर गांवकर आवाठ बोल लावीत. राग नाय सांग वामन्याक. तूंय भाऊकय भेटशीत.”

मग मी, सुशी, नली नी नलीचा घोव सगळे लग्नाला गेलो. संत्या मुंबयत खूप लांब गोरेगांवला. जागाय तेची नवती. मग सुशीला घेवन गेला. आमी भाऊकडेच ऱ्हायलो. भाऊन चाळ बदलली होती. मावशी मरून वरीस झालं होतं. भेटली नाय ते वायट वाटलं. सांच्याला वामन्या आला नी सुशीला, नलीला नी मला साडी दिली. सुशी नाय बगून तिला द्यायला सांगीतले. भाऊला लग्नाचं न्योवतं दिलान. नी बोलला सगळ्याना टेकसीन घेवन या. माई लावणार माजं लगीन. बाबाला त्याने सांगीतलं होतं म्हणाला. बाबा येणार नाय बोलला. त्याला काय नड होती ते म्हायत नाय म्हणाला. वामन्याची विच्छा होती मी नी बाबाने त्याचे लगीन करावं. पण बाबा बोलला. इटेला ने. ती लावल तुझं लगीन. मला नाय होणार यायला. भाऊ नी मी बगतच बसलो. मला म्हायत पण नवतं लगीन मी लावायचं. कसं होईल जात येगळी, नातं काय सांगणार. येडा झालाय कां वामन्या. पण नाय लगीन लावायला मलाच बसवली. मी भीतच सगळं करीत होती.

बामण सांगत होता ते समजत नवतं. मग बाजूला बसलेला वामन्या सांगायचा नी मी करायची. सूनय बाजूला असायची बगत. मधूनच तिला हंसू येयाचं. सून चांगली हसमुक वाटली.

पण लगीन होयपर्यंत जीव धाक धुक करीत होता. बामणाने नांव इचारले, बोलली “इटा” वामन्या पटकरून बोलला “विठाबाई” बामण कायतरी पुटपुटला नी मग इचारले “यजमानांचे नांव?” घे झाला ना घोळ मन बोलले. तेवड्यांत वामन्या बोलला “गंगाधर. ती नाय सांगायची. नवऱ्याचे नांव घ्यायची लाज वाटते गांवच्या बायाना.”

गंगाधर? हे नांव गांवकराचे. वामन्यान आपल्या लग्नांत माजेय लगीन लावन दिले काय? सून हंसत डोळ्यानी मला समजावल्यागत करीत होती. लगीन झाले नी काय काय जेवायला? मी तर बावल्या अळूगत झाली होती. जेवताना टेबलं लावलेली. एका बाजूला विन्या नी सून तर दुसऱ्या बाजूला संत्या नी सुशी. खायला काय काय घालीत गेले. बबब कदी म्हायत पण नाय असलं पानांत पडत होतं. नी मी गांगरून जात होते. वामन्याने सुरवात केली नी त्याचे बगून मी खायला लागले. सगळे छान होते. पण कितीतरी वानग्या वाढलेल्या. भात दिसतच नवता पुरी नी भाज्या ओळकल्या पण बाकीचं काय ते म्हायतच नाय पडलं. मग भात आला. तांबडा लाल कायमाय आंत घातलं होतं. विन्या तसाच खायला लागला. कालवण नाय घातले मग मी पण नाय, तसच जेवले. असं जेवाण मी गांवच्या लग्नांत नाय जेवली कदी.

जेवल्यार फोटू काय नी काय काय चालले होते. धा वेळा मला फोटूला उबे केले. मग सुनेच्या आयेन पाटावर बसीवले नी साडी घालून ओटी भरली. मी सपनांत होती. वामन्या माजे सगळे लाड करीत होता. कुठे बाळगलीन एवडी माया काळजात? माजी एवडी माया? उटतानां डोळे भरून फुडचं काही दिसना. कशी बशी उटली नी वामन्या हात धरून बोलला. “माई! आता तुका पण ओटी भरूची लागतली. सुनेची नी तिच्या आवशीची. चल दाकवतय तुका सगळा सामान.” मग मला तो खोलीत घेवन गेला नी सगळं सामान काडीत होता तर मी बोलले “अरे मी कुठे सवासण? माज्याकडून चालेल ओटी भरली तर?” तो बगत बोलला “लगीन कोणी लावलं? माज्या आयेन ना? नी बाबाय हा माजो. चल गप सांगतय ता कर. ए चला रे! सगळं सामान घेवून” तो माज्या सकट सगळ्याना हुकूम सोडत होता. गप तो सांगेल ते केलं. सुनेची, तिच्या आयेची ओटी भरली. सुनेला ओवाळलं काय नी काय. मला पयल्यांदाच कोनीतरी इतकं मत्व देत होतं. मी माय झाले होते लेकराची. केवडी माया. डोळे सारके भरून येत होते.

सगळं झालं तर जाणार म्हणून सांगायला भाऊ गेला. वामन्या बोलला “माई, संत्या नी वैनी आज माझ्याकडे येतील. उद्या सकाळी पोंचवीन त्यांना.”

भाऊ सगळं बगत होता. त्याला खूप समाधान झालं. तो नी वैनी घरी गेले. मोठ्या गाडीतून संत्या, वैनी नी मला त्याने पयले पाठवले. एका मोट्या इमारतीत आमी एका लिपट का काय तरी त्यांतून वर आलो. संत्यान घर उगडलं. घरी बगते त काय? सगळंच झ्याक होतं. बसायच्या कुर्सी ह्या मोठया. एक लांब बांकडं कापडानी सजवलं होतं. संत्या बोलला “माई बस. ही तयारी करांत ओवाळूची. जोडप्या इला की पयला तूं ओवाळायचा म्हणून

सांगीतलंन वामन्यान." मी खाली कोपऱ्यांत बसायला गेली तर संत्याची बायको सुशी हंसायला लागली. संत्या बोलला "माई थंय खंय बसतस. वर बस सोफ्यार" नी मला हात पकडून त्या लांब बांकड्यावर बसवलं. काय बाय मऊ मऊ होतं. बांकड्याला सोपा म्हणायचं समजले नी दोन्दा मनांत म्हणून घेतले. सोपा!! सोपा!! आपल्याला पण म्हणाय यायला लागेल नां?

मग विन्या त्याची बायल नी खूप लोक आले. मी नी मग सुशीन तिला ओवाळलं नी ती हंसत हंसत घरांत आली. मग सगळे पुरूष बोलत बसले. नी नवी सून मला घेवन आंत गेली. आंत खाट नी काय काय होतं. मला बोलली "माई बसा इथे बेडवर. मला बोलाचंय तुमच्याशी" मला हात पकडून खाटवर बसवलान. मनांत बोलली बेड!! बेड!! काय करणार सगळंच नवीन बगत होते.

सून हात पकडून बोलाय लागली "माई हे घर तुमचंच समजा. मला वामन सांगत असतो तुमच्या बद्दल. फार प्रेम आहे तुमच्यावर. तुमी केव्हा पण इकडे आलांत तरी चालेल. आणि हो, मी तुम्हाला मदत लागली तर हक्काने बोलावणार आहे."

काय रे बाबा बाय ही! माज्या समोर वामनचं पुरं नांव घेते. पण बोलण्यांत खरेपण दिसत होतं. फार माया आली नव्या सुनेची. मग सगळे गेले नी वामन्या आला नी बोलला "काय सासू सुनेची ओळख झाली की नाही? काय ग शामला कशी वाटली माई?" सुनेचं नांव शाम्ला!! शाम्ला!! परत मनांत घोळवणी केली.

"मी बोलली बाबा. पण माई काय बोलतच नाहीत. होय नाय, काय पण नाही. फक्त हंसत ऐकत बसतात." शाम्ला बोलली.

"माई कधी बोलत नाही. पण तिच्या नजरेतून, मायेने फिरणाऱ्या हातांतून व तिने केलेल्या जेवणांतून ती सगळं काय सांगते. खूप कमी लोक ओखळतात तिची माया. बघ तूं पण समजायचा प्रयत्न कर." वामन्या बायकोला सांगत होता. नी वामन्याला माझी केवढी माया ते मला पयल्यांदाच समजत होतं.

दुसऱ्या दिवशी मला वामन्याने दोन खोके दिले नी बोलला "हे तुझ्यासाठी. गांवी जाऊनच खोल नायतर परत नीट बंद करतां नाय यायचे. सांभाळून ने." नी गाडीने मला भाऊकडे पाठवले. दोन दिसात मी गांवाकडे परतले. गाडीत इचार चालूच. अलीबाबाची गुवा भटकून आल्यागत वाटत होतं. वामन्या शिरीमंत झाला होता. मला बरे वाटले. पण वाटले तो आता गांवाला नाय यायाचा.

सगळे सामान आहे म्हणून गांवकर मुंबयच्या बसवर घ्यायला आला. मग दुसऱ्या गाडीने गांवी पोंचले. गांवकर विचारत होता वामन्या कसा हाय, सून कशी हाय? बरंच मनी येत होतं सांगायला पण होतच नवतं. संवयच नाय बोलायची. तोंडातून निगाले "लगीन छान झालं, सून चांगली आहे सोभावान नी वामन्याचं घर पण छान. आला असतांत त बरं."

गांवकरच्या चेऱ्यावर समाधान होतं. बोलला "तुमका मानाचा झाला ना? मी ईलं असतय तर तुमी कुचंबला असतात मान घेवक. नी पोरगो आमच्या पेक्षां तुमच्यार माया करतां. म्हणून बाजूक रवलव."

परत पूर्वी सारखं राटगाडगं चालू झालं. नी ऊनाळ्यांत वामन्या नी शाम्ला आली. माजी गडबड उडाली. खाटलेच नायत. एकच होता तो गांवकरचा. मोठ्या घरची सून, तिला खाटला नी मऊ गादी कुठून देणार? पण झालं मातर येगळंच. सुनेन डाळीवर गोदडी हातरून वामन्याचे नी तिचे हांतरूण लावले. तेय भायर खळ्यांत. मी बगतच बसले. दुसऱ्या दिवशी तर कर केलान. जेवल्यावर शेण काडते म्हणाली. वामन्या हसत चिडवत होता. बोलत होता "हातांत घेवून तर दाखव, धा रुपये देयीन." तीय की नाय बोलते कशी "बास धाच? पण मला नकोच मी माईचं काम करणार आहे. तुझ्या साठी नाय करत."

तिने मी नाय नाय करत होते तरी शेण घेतले. तोंड कायससं करीत एकीकडे करून. सारवायला लागली नी मी कदी नाय ते जोरांत हंसू लागली. वामन्या माज्याकडे बगतच बसला मी अशी हंसताना तो पयल्यांदाच बगत होता. शाम्ला बॉक बॉक करीत शेण काडीत होती. वामन्यापण हंसू लागला. मग शेण हातांत घेवून ती भायर पळाली. शेण टाकून साबणान हात धुवून आमच्या कडे आली नी बोलली "बॉक्! माई कसं करता हो तुम्ही हे रोज?" मी हंसतच बसली नी वामन्या बोलला "आता आहेस तोपर्यंत तूंच काढ उष्टी. येतं तुला." मी मधे पडली नी भांडू नका बोलली. तसे दोघेय हंसत सुटले.

ते होते ते दिवस मनांत बसले. कशी मजेत ऱ्हात. रानांत जायत. हंसत, धांवत येयत. एकमेकांना नावानच हांक मारीत. मला केवा वाटे गांवकर राग करेल. पण तो लक्ष देत नवता. केवा धा दिवस गेले ते म्हायतच नाय. सून माझ्याकडे भाकऱ्या काय शिकत होती, कालवण शिकत होती. मी इचारले "आता शिकतीस ते एवडे दिवस काय जेवाण बनवलेसच नाय?" त म्हणते कशी "ते आमच्या सारखं हो. पण तुमच्या मुलाला, नाय! नाय! झीलाला माईसारखं जेवण लागतं ना. सारखा म्हणतो माई अशी करायची, तशी करायची मग आता तुम्ही भेटलांत तर नको शिकून घ्यायला? आणि खरं सांगू माई तुमच्या हाताला चवच वेगळी आहे. मला जरा तिखट वाटे पण चव जाम सुंदर." मी तिच्याकडे बगतच बसली. काय गोजीरं बोलत होती. सगळ्यांशीच मिसळून वागत होती. पैरेकरणी तांदूळ सडत होत्या तर ही मुसळ घेवन कांडायलाच गेली. सुप घेवन हासडायला लागली. बरोबर नाय आलं तर, पैरेकरणी हंसत सुटल्या. ही पण त्यांच्या बरोबर हंसायची. गोड गोड करून टाकलं घर तिने.

गेले नी सगळं कंटाळा वाटत होतं. बायापण आठव काढून हंसत नी म्हणत "माई काय काय करी गे ती. सगळ्यांत हात घाली. थंय काय मुंबयत जावन कांडतली? श्याण सारवतली? पण सगळां शिकाक फुडे. घोवाक सरळ नांवान बोलवी गे सगळ्यां फुडे. लाजय नाय वाटा. पण हंसमुक होती हां." मी ऐकून हंसे. नी मग आठवणीन गप गप होवन जाय.

जाताना वामन्या बोलला “माई तू नाय बोललस तरी मी तुका पुरो ओळखतय. आता आमच्याकडे येवचा बग. सगळयानी तुका नाडलासानी. आता चार मजेचे, सुखाचे दिवस घालव आमच्या बरोबर. विचार कर नी कळव नेवक येयन.”

“नी हंय कोण रे बगतलां? नी तेंच्या कडे कोण? कारबार काय जमतलो तेंका?” मी बोलले

“तांच म्हणतंय जेणी तेणी आपलां सांबाळूचा. लोकांक फशी पाडून न्हय. म्हेनत सोता करून. तुका नाय समजुचा आता. पण समजांत एकाद दिवस. मग इस्कटून नको जाव. माज्या कडे ये. तू माज्या खऱ्या आये सारकीच गे. मी सगळयांका केवाच ओळखलंय. तुका सुद्दा. तुजा मन पण माका म्हायत हा. बोललंस नाय तरी ओळखतंय तुझा मन.” विन्या बोलत होता. मनांत राग घरल्यागत पण कोणार राग? काय समजलं नाय पण फुडे विचारलं पण नाय.

आता संत्या पण सुशीला मुंबयला जास्त ठेवू लागला. ती पावसाचे चार म्हयने येय नी सरायवर जाय. तिला एक मुलगा झाला. बाळंतपण मुंबयत काडलं नी मग दोन वर्स नाय आली. विन्याची शाम्ला पण गुरवार होती. मला ते बोलवीत होते पण जाव कशी? हितं सांबाळायला कोण नाय. गांवकरने कदी लक्ष नाय घातलं. सगळं माज्यावरच सोंपवलेलं. जाणार कशी?

मी गेली नाय तर संत्यान नी बायकोन राग धरला. ती यायची नायत. चिटी पण पाटवीनात. शाम्ली मातर दर पंदरवड्याला चिटी पाठवायची. माझ्याच नांवची असायची. मला कोडं वाटे. गांवकरला चिटी नाय वामन्या कडून पण शाम्ली मला लिवते. गांवकरला काय वाटंल? चिटीत मजा मजा असायची हिकडे गेली, तिकडे गेली, काय बगीतलं, माज्या सारकं कालवण चारदा केल्यार जमलं. तेवा वामन्या कसा माझी आठव काडत होता. मग हे फोटु असायचे बरोबर. गांवकर फोटू बगायचा नी काय पण न बोलता ठेवून द्यायचा.

आता  अशीच वर्स जात होती. गांवकर साटीत पोंचत होता नी मी चाळीसी उलटत होती. काम धाम करत नवता. पण आता शिकार पण बंद होती. तो थरथरायचा नी बडबडत बसायचा आपल्याशीच. पैरेकरणी हंसायच्या. त्याला काय नाय त्याचे.

त्याचे वाढायला लागले नी मी घाबरले. पोस्टवाला शामलीची चिटी घेवून आला त्याला बोलले वांच तूच. तिने लिहीले होते. संत्या वामन्या कडे येवून कागदावर सई मागत होता. बोलला सई दिलीस तरच गांवी जावन सांबाळीन. बाबाची चिटी आली होती त्याला. गांवचं सांबाळायला बोलावले होते गांवकरने. वामन्यान सांगीतले वचन देतो. सगळी जमीन घर तुजे. पण जर माईला मानान सांबाळशील तरच. सई आता नाय देणार. माईला सुक लाबतंय बरा ठेवतोस म्हायत पडलं की मगच सगळं तुजं होईल. त्यावरून संत्या बिगडला. बोलला माईचा काय सबंद. बापदाद्यांची जमीन आपली नको व्हायला? वामन्या खूप कमवतो, जमीन बगणार नाय. तुकडे केले तर कोणाला पुरं पडणार नाय. म्हणून सगळी

जमीन संत्याला पायजे होती. वामन्या बोलला होता. त्याला त्याच्या वाटचीच जमीन मिळणार.

मी घाबरली गांवकरला चिटी वाचायला दिली तर त्यांने बाजूला ठेवली. पोस्टवाल्याला सांगू तर गांवांत होईल. मग पांचवी शिकलेली कामाला आली. कागद घेतला. पेणसील घेतली नी लिवायला बसले.

“वामनांस आशिर्वाद,

चिटी भेटली. वांचून बरे नाय वाटले. तुमी दोगय शिकलेले हांत. समजून घ्या. मला जमीन काय कामाची? तुमचीच ती. मी कशी घेवू? तुमच्या बाबान माज्यासाटी सा एकर जमीन नी घर बांदून केवाच ठेवलाय. संत्या नी सुशी येवन सगळां सांबाळतील तर चांगले होयल. ज्याची वस्तु त्याच्याकडे ऱ्हायल. मला दिलेली जमीन खायला मागे कोण? ती पण तुमचीच. आपसांत राग करू नये. राम, लक्ष्मण हांत तुमी.

बाबा थरथरतो, कांपतो बडबडत बसतो. त्याला काय झालंय म्हायत नाय. तुमी नेवन तिकडे डाक्तरला दाखिवलं तर? तितपावर मी सांबाळीन हिते. मग संत्याला नी सुशीला पाटव त्यांच्या संगतीन. मी करीन त्यांना मदत. माजी चिंता करू नये. तुमी सुकांत त मी सुकांत. नायतर मातर दुकी कराल मला.

शाम्लीला इचारले सांग. नी तुज्या ल्हानग्या ईस्वरला माजी माया दे.

तुझी माई”

लिहायला फार येळ घेतला पण मनाजोगते वाटले. पाकीटांत टाकून. वामन्याच्या चिटी वरून बगून बगून पत्त्या लिहिला. नी मग पोस्टवाल्याला देवून आले. मन थार करत नवतं. गांवकरच्या चिंतेबरोबर वामन्या नी संत्याच्या भांडणाची चिंता झाली नी मन सगळया वरून उडालं.

धा दिवसांत वामन्याची चिटी आली जाडजूड होती. पोस्टवाल्याला सांगीतलं तू जा उद्या ये. नाय जमलं मला तर उद्या घेयन वांचून.

राती आंग दुकायची सुरवात झाली नी पयल्यांदाच मी शीक पडली. गांवांत औषद द्यायला सरकारी बाई होती. ती आली. ती बोलली “काय नाय मी गोळया देते. दिवसांतून तिनदा घ्या बरे वाटेल.” घेतल्या नी दुसऱ्या दिवशीच बरे वाटले. पण समाजले नाय का आंग गरम झाले. गांवकरने दिलेल्या गोळया मी रोज एकदा गिळायची. ती सरकारी बाई तीन दिवसानी आली तर मी बोलली “अवो ह्या बगा ह्यो गोळयो मी घेतय रोज. आंग गरम कसं? शीकपण येव नये म्हणून घेत होती.” तिने गोळया बगीतल्या नी हंसली “कोणी दिल्या गोळया? आणि कोणी सांगीतले यांने ताप येत नाय? ह्या मूल होवू नये त्याच्या गोळया. आता कशाला घेता? जरूर नाय त्याची.”

मी बोलली नाय. डोस्के चकरायला लागले. गांवकरान परत एकदा डाव साधला. ईभ्रत जाव नये म्हणून मला वांझ ठेवली. डोक्यांत गरगर सुरू झाली. मला सगळे फसवत होते नी मी फसत गेले होते.

इचारांत चार सा दिवस गेले संत्या नी सुशी आली. बाबाला घेवून जायला. दोन दिवसांत घेवून पण गेली. मला कामांत जीव नवता. खात पीत पण नवती. मग वामन्या गांवकरला घेवन आला बोलला "काय बरा नाय होणार बाबा. डॉक्टर म्हणतात. मेंदूत रक्त नाही जात. कसली तरी चिंता खूप दिवस मनांत बाळगली. नी लवकर उपाय केला नाय. आता ते वेडे होतील."

मी गप. माजा चेरा वांचलान विन्यान. नी राती जेवल्यार बसला माज्या बरोबर. तोच सांगायला लागला "माई मला माहीत होतं कधीतरी तुला समजणार. समजलं की तू बाबाचा दुस्वास करणार. बाबाला, आमाला सोडून जाणार. तू आमचं किती मायेन करायचीस. आईने पण नाय केले एवडे लाड केलेस आमचे. पण बाबा तुला बेरकी पणान वागवत होता. तुला जमीन दिली पण तुला मूल नाय होणार बघत होता. म्हणजे जमीन परत येणार. मतलबी. मला राग आला. तो तुला द्यायच्या गोळया केवा केवा मला आणायला सांगायचा. तेवाच म्हायत पडला बाबाचा कावा. तूं अंधारात होतीस. मी लहान. सांगायचं कसं? पण मग ठरवलं तुला कधी अंतर नाय द्यायचं. तुझा मुलगा व्हायचं. चल माझ्याबरोबर."

आता तर वामन्याने पण सांगीतले राग ऊफाळून आला. ईश्वास तरी कोणार ठेवू? राग राग होत होता नी ठरवले गांवकरला सोडचिटी द्यायची. मी काय बोलले नाय. तयारीय केली नाय. वामन्याला वाटले मी बाबा शीक म्हणून थांबले. पण माज्या मनांत दुसरेच होते वामन्या गेला.

भाऊन माज्यासाटी घर बांदलंच आहे. त्याला इचारायला पायजे. पण कसं इचारू चिटीत काय नाय लीवता येणार. मग सरळ उटली नी बोचकं बांदलं. दागीने फागीने काडून ठेवले. द्यायचा तो नाय दिला. हे मिरवायचे कशाला पायजेत. नी गांवी निगाले.

गांवकर बगून येडया सारका किंचाळत होता. मला जरा पण काय नाय वाटले. मला भोगायला सोडलीस. तूं भोग आता. मनांत आले.

गांवच्या माज्यासाटी भाऊन बांदलेल्या घरांत ऱ्हायचे. गांवी पोंचले. वैनी भेटली. उतरलेले चेरा बगून बोलली "काय झाला ईटाबाई? एकदम आलांत ती?" काय बोलले नाय. ती समजली काय तरी मोटं दुक आहे. चा करून घेवन आली. मी बोलली माजं घर उगडशील? आता तितंच ऱ्हायन म्हणते. ती गप बगत बसली. मग लगबगीन उटली नी घर उगडून साफसूप केलं. मी तिकडे गेली. तिला काय वाटलं म्हायत नाय. जरा पडली तर येवन पाय चेपायला लागली. परत माया लावतेय. नको गे बाई माया आता. मग दुक देते तुटलीतर. वैनी बोलली "बाई होवचा ह्याच खोटा, सगळा भोगाचा लांगता. शांत रवा बगुया हे दीस नाय रवचे."

मी जेवली तर जेवली, नाय तर नाय. कायपण सुदरत नवते. बरंच वाटत नवतं. दिवस भगभगायचा नी रात काळीकुट वाटायची.

ईस्वर! आयकलीस माजी कहाणी? मला घ्यायला पाटवले तुला विन्याने, तुज्या बाबाने? अरे आली असती तर तुज्या बाबा बरोबरच नाय आली असती?

मी बोलणारी नाय म्हणून सगळयानी आपलं रांधून घेतलं माज्या जीवावर. आयेने म्हैशी घेतल्या. गांवकरने घर सांबाळायची पुरी सोय म्हणून मला जवळ केली. घर नी जमनीची लालूच दिली भाऊ समोर. पण मला काय पायजे ते बगीतलं नाय. आता समजतं मला. त्याने मला पोर कां होवू नाय दिलं ते. त्याची पोरं बराबर सांबाळली पायजेत ना मी? मग मला पोर कशाला? भाऊ शिवाय सगळे मतलबी. अरे बाई मरते माया द्यायला. बाईचा जल्म धन्य होयल एक पोर झाल्यार. मायेचा पाजर फुटतो रे पोरासाठी. ऊर फुटून धार लागते दूदाची. नी बाई घन्य होते. इतकंच मला पायजे होतं. माज्याकडून सगळं घेतलं पण मला पायजे ते द्यायला फशीवलं. जल्म एकच मिळतो माणसाचा. धन्य नको करायला त्याला? मला खोटं बोलून वांझ केली.

आता माज्या भाऊ शिवाय कोणार पण ईस्वास नाय. मी गांवकर बरोबर ऱ्हायले ते पाप केलं. तुजा बाबा मला बोलावतो. त्याच्याच कडे ऱ्हा म्हणतो. तो मायेन नाय, माज्या वरच्या कणवेने. पण कणवेचं काय पैसा संपतो तशी कणवय संपते हळू हळू. मग माणसाची अडचण वाटायला लागते. अरे शेणा मातीतली मी, तुज्या चकमकीत घरांत कशी ऱ्हाणार? नी उद्या माज्या वरची कणव संपली, माजा तरास सुनेला, तुज्या आयेला झाला तर? आता कशावर ईस्वास नाय. फक्त एका रगताच्या नात्यार ठेवतेय रे. भाऊवर. येल उद्या परवा तो. पायार डोस्क आपटून माफी मागेन त्याची. नी नाय केलीन तर काय. अशीय मी पांडऱ्या पायाची, वांझोटी जगून काय करू?

जल्मभर बोलले नाय आज तुला सगळी क्हाणी सांगीतली. तूच सांग परत तुझ्याकडे येवन घेवू ईकाची परीक्षा?

फिलॉसॉफीचा अभ्यास करणारा मी. दिङ्‌गमूढ होऊन कहाणीवर विचार करत होतो. केवढा मोठा अर्थ, किती सोप्या तऱ्हेने समोर ठेवला या बाईने. ठरवले हिच्या सुखांत की दुःखांत ढवळा ढवळ नाही करायची. ऱ्हाऊ दे हिला इथेच.

****************

# संन्यासी मी

गुरुवर्य श्रद्धानंदजी मला संन्यस्त आश्रमाची दिक्षा देणार होते. मी त्यांचे शिष्यत्व आपण होवून स्विकारले होते.

श्रद्धानंदजी बोलू लागले. “आज मला आनंद होत आहे. आपल्यामधे अजून एक संन्यस्तआश्रम स्वीकारणाऱ्या सहाध्यायाची भर पडत आहे. आपला आश्रम त्यामुळे अजून समृद्ध होईल. मी परत एकदा सर्वांना, संन्यस्ताची, श्री भगवान श्रीकृष्णाने सांगीतलेली लक्षणे दाखवीत आहे. इथे खूप मराठी लोकच आहेत व संस्कृत ही भाषा उपयोगांत नसल्यामुळे मी गीते ऐवजी गीताईतून ही लक्षणे सांगणार आहे.

**आश्रय सोडूनी करी कर्तव्य कर्म जो।**
**तो संन्यासी तसा योगी न जो निर्यज्ञ फळी निष्क्रिय।।**
**कर्मात जो अनासक्त विरक्त विषयी असे ।**
**संकल्प सुटले तेव्हा तो योगारूढ बोलीला।।**
**उद्धरावा स्वये आत्मा खचूं देवू नये कधी।**
**आत्माची आपुला बंधु आत्माची रिपु आपुला।।**
**प्रकाश स्थिरता सौख्य अंतरी लाभली जया ।**
**ब्रम्ह होऊनी तो योगी ब्रम्ह निर्वाण मेळवी।।**
**काम क्रोधास जिंकूनी यत्ने चित्तास बांधीले।**
**देखती ब्रम्ह-निर्वाण आत्मज्ञानी चहूकडे।।**

हे गीतेतील श्लोक संन्यस्त माणसाचे वर्णन, त्याचा मार्ग, त्याची साधना सर्वच वर्णन करतात. आपण प्राणपणाने त्याचे पालन करायचे तरच खऱ्या अर्थाने संन्यस्त होऊ. अष्टांग साधना आहे ही. आत्मा शुद्ध करावायाचे साधन म्हणजे अष्टांग साधना.

आपण संन्यस्त आहोंत हे सर्वांना पहातां क्षणीच समजावे म्हणून साधी भगवी वस्त्रे आजन्म परीधान करायची आहेत. तसेच स्वतःसही हे पदोपदी मनांत ठसावे म्हणून नवीन संन्यस्ताना आश्रमा कडून नवीन नांव दिले जाईल. यज्ञोपवीत, नामकरण विधी व संन्यस्त दीक्षा आता सुरू होतील. ''

श्रद्धानंदजी एवढे बोलून यज्ञवेदी जवळ होमकुंडा कडे येऊन बसले. मला अगोदरच क्षौर करून, स्नान करून तयार केले होते. होमकुंड पेटवले गेले. मग संन्यासी जनांनी मंत्र जागर सुरू केला.

ओम् शंनो मित्रः, शं वरुणः, शं नौ भवर्त्यमा, शं न इन्द्रो बृहस्पती... .........

मंत्र जोरांत उच्चारले जात होते. चारी बाजूला धूर वाढत होता. माझा दीक्षाविधी तीन तास चालला. आता पूर्ण होत आला होता. मला एक अतीव आनंद होत होता. एवढ्यांत

ओम पूर्णमदः पूर्णमिदम् पूर्णात्पूर्णमुदच्चते।

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते।

ओम शान्तिः शान्तिः शान्तिः

मंत्रोच्चार होत सांगता झाली. मला नवीन नांव मिळाले "विद्यानंददासजी."

हे नांव देण्यामधेही एक शास्त्र होते. मला दीक्षा देण्याचे ठरविण्या अगोदर श्रद्धानंद गुरुजीनी माझे वेद, उपनिषदे व गीतेचे ज्ञान तपासले होते. मी फार सुंदर तऱ्हेने त्यांना विवेचन ऐकविले होते. म्हणून ते म्हणत, आपला वेद विद्याभ्यास चांगला आहे. प्रत्येक संन्यासी कायम सत् चित् आनंदातच राहिला पाहिजे हे संन्यास शास्त्र. व नवीनच असल्यामुळे, अभ्यासक असल्यामुळे दास. म्हणून माझे विद्या+आनंद+दास मिळून "विद्यानंददास " नांव बहाल केले.

मी संन्यस्त धर्म पालन करून, शास्त्रार्थांत प्रगती केली की मग दास निघून जाणार होते व मी गुरुजीं प्रमाणेच "विद्यानंदजी " होणार होतो.

दररोजचा कार्यक्रम ठरलेला. अमृतवेळा उठून स्नान आटोपून बाह्य साधना सुरू करायची. यम, नियमांप्रमाणे चित्त वृत्ति निरोध सुरू करायचो. चित्त स्थिर करणे, मोह, क्रोध, इत्यादी वर लवकर विजय मिळवायचा होता. आसने व प्राणायाम करून शरीर स्वस्थ, निरोगी बनवत होतो. हे सर्व बाह्य असे शारिरीक व मानसिक निरोधन होते.

लवकरांत लवकर प्रतिहार, धारणा, ध्यान व समाधीची सुरवात करायची होती. त्यांत सिद्धी जेवढ्या लवकर मिळेल तेवढा मी सिद्ध संन्यस्त होणार होतो. ही परम अवस्था लवकरांत लवकर गांठण्याचा मानस होता.

पहिल्या चारी अंगांचा अभ्यास करायला जवळ जवळ दोन ते तीन तास जात होते. मग फलाहार व दूध घेऊन मी वेद, उपनिषद् त्यावरची भाष्ये यांच्या अभ्यासाला बसत असे. आश्रमाची बाग फारच सुंदर होती. मोठी झाडे होती, फुलांची झाडे, वेली सगळीकडे

पसरल्या होत्या. त्या वातावरणांत प्रफुल्लित मन अभ्यास चांगला घडवीत होतं. मला कोणतीही अडचण येत नव्हती.

इतर संन्यासी, दास आश्रमाची कामे करताना दिसत. श्रद्धानंद स्वामी सायंकाळी भक्तगणांसमोर प्रवचन करीत. त्याची अत्याधुनिक साधने वापरून ध्वनीफीत बनवली जाई. मग काही सन्यासी त्याच्या अनेक आवृत्ती तयार करीत. हे काम खूपच मोठे असे. सायं-प्रवचनाच्या वेळी या ध्वनीफिती विकत. लोक ते विकत घेत.

मी श्रद्धानंदांची प्रवचने ऐकी. काही फार उद्-बोधक वाटत पण बहुतांशी सद्य परिस्थितीवर कोरडे ओढण्याचे काम ते करीत असे वाटे. मनास फारसे पटत नसे. संन्यस्ताचे हे काम नव्हे असे वाटे. क्रोध, मोह, माया, विषय या सर्वांवर विजय मिळवलेल्या संन्यस्ताने जनमानसावर तोच परिणाम करण्याची दक्षता घ्यायची असते. जन प्रक्षोभ वाढविण्यांत काय अर्थ?

दुसऱ्या क्षणी मन मार्गावर आणत असे. अंतरांत सहज स्फुरण होई,

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः ।।

गुरुविषयी अनन्य श्रद्धा हवी. आपली साधना पूर्ण करण्या करीतां आदिशक्ति व आपण या मधला हाच दुवा आहे. मग मन स्थिर होई.

लहानपणी वडील कीर्तन करीत. तेव्हा पासून मनांत एक उत्कंठा तयार झाली होती. ते कीर्तनांत सांगत "हे विश्व त्या आदिशक्तिच्या मायेने, कृपेने चालले आहे. ती अदृश्यांत राहून आपले अस्तित्व, रक्षण व नाश करते. आपण या तिच्या तीनही स्थितीना देवांची उपमा दिली, त्यांना नांवे दिली ब्रम्हा, विष्णू, महेश. परंतु ती आदी शक्तीचीच तीन अंगे होत. आदी शक्तीची भेट फार दुर्मिळ व कठीण आहे. कित्येक संन्यस्त योग्यांना व ऋषी मुनींना हे शक्य झाले होते. म्हणूनच ते विश्वज्ञानरुपी वेदवेदांत लिहू शकले. एका अतिशय ज्ञानी गुरुची कांस धरली. व अष्टांग साधना केली तरच हे शक्य होते. पण अतिशय कठीण व खडतर आहे."

मी तेव्हाच ठरवले होते. संन्यस्त व्हायचे. तपस्या करायची. गुरू शोधून साधना करायची व आदीशक्तीचे दर्शन करायचे. मला श्रद्धानंदांसारखे गुरु मिळाले, वाचन चाले. वेदाभ्यास, उपनिषिदे, गीता विवेचन व त्यांचे मनांत विश्लेषण चालूच असायचे. बाह्य योग स्थिती यम, नियम, आसन, प्राणायाम यांची. बाह्य योगाने मी सुदृढ व मानसिक सिद्धी प्राप्त करीत होतो. आंतरसिद्धी साठी गुरूची गरज होती प्रतिहार, धारणा, ध्यान करून समाधी अवस्थेत पोंहोचायचे होते. तेच लक्ष. दुसरे काहीच नाही.

दोन वर्षे होत आली. मन शांत, शरीर सुदृढ, प्राणायामाने श्वास नियमित झालेला. मी पुढील अवस्थेसाठी तयार झालो असा माझा समज होता. पण हे गुरुनी ठरवायचे होते. मगच पुढील मार्ग चालू होणार होता.

मी श्रद्धानंदांकडे गेलो व म्हणालो "गुरुवर्य बाह्ययोग पुरा झाला कां त्याची चांचणी घ्यावी. आंतरशुद्धी साठी आपले सिद्ध मार्गदर्शन जरुरी वाटते. पुढील मार्ग कसा आखावा त्या करीता मार्ग दर्शन पाहिजे होते."

श्रद्धानंद माझ्याकडे पहातच राहले. मग म्हणाले "आश्रमाचे कार्य खूपच वाढले आहे. सायं प्रवचनांची थोडी जबाबदारी आपण उचलावी विद्यानंद. आमच्या वरील भार कमी झाला की आपण बसू साधनेत. चक्रशुद्धी तशी सोपी नाही. कुंडलीनी जागृत होई पर्यंत तपे निघून जातात."

मी होकारार्थी मान हलवून निघालो. आश्रमांत सकाळी प्रार्थना, मग वेदसूत्रांचे अथवा एकाद्या उपनिषिदाचे पठण होई. त्यावर चर्चा व विश्लेषण होई. मग सायंकाळी बाहेरील प्रजेमधून भक्तगण येत. त्यांच्यासाठी प्रवचन चाले. तास दीडतासाचे असे. मग लोक भेटी चढवीत व सर्वांना प्रसाद देवून सांगता होई.

मी आल्यापासून यांत भाग घेतला नव्हता. सकाळची प्रार्थना झाल्यावर मी बाह्य शुद्धीची योगासने व इतर उपासने करण्यास जात असे. आश्रमाच्या एकंदर व्यवस्थे बद्दल मला काही शंका येत. आपण संन्यस्त लोक. सायंप्रवचनांच्या वेळी ज्या भेटी येत त्या का स्वीकाराव्यात? संन्यस्त धर्माच्या विरोधी वर्तन म्हणता येईल का यांस? आपण नवीन आहोत संन्यस्त जीवनाची पुरी माहिती अजून व्हायची आहे. आपण गुरुवर्यांचे बरोबर काय चूक काय हे ठरवणारे कोण?

सायंप्रवचन मी करू लागलो. सरस्वतीने दिलेली शुद्ध वाणी, वडीलांकडून ऐकलेल्या पौराणिक कथा व स्व-अभ्यासातून मिळवलेले वैदिक ज्ञान याची सांगड घालून. सर्वसामान्यांस पचतील, रुचतील व संसारीजनांस पालन करतां येतील अशा गोष्टी मी प्रवचनातून सांगू लागलो. मी आश्रमाच्या मुख्य धारेत प्रवेशत होतो हे लक्षांत येत होते. परंतु माझे ध्येय संन्यासी होण्याचे, सर्व त्याग करून सच्चिदानंदात विहरण्याचे होते. ते कसे साकार करतां येईल यावर मी विचार करी.

माझ्या प्रवचनाचा परीणाम लोकांवर फार मोठा झाला असावा. गर्दी वाढू लागली. भेटी वाढू लागल्या. पूज्य श्रद्धानंदजींचे व इतर साधकांचे काम वाढले. भेटींचा हिशोब चोख ठेवावा असा श्रद्धानंदांचा नियम होता. मी त्यांत नव्हतो. प्रवचनानंतर मी माझ्या कुटीत जाऊन ध्यान धरून बसे. मनांस बरे वाटे. लोकांपर्यंत चांगले विचार पोहोंचत होते याचे समाधान मिळे. थोड्यांच दिवसांत आश्रमाचे सभागृह अपुरे पडू लागले. लोक सभागृहाच्या दारांत गवाक्षांत उभे राहून प्रवचन ऐकू लागले. स्त्रियांची गर्दी फार असे. माझे चिंतन व ध्यान वाढू लागले.

एका प्रवचना दिवशी श्रद्धानंदानी लोकांना आवाहन केले. "गर्दी फार होत असल्यामुळे लोकांना सोयीचे व्हावे म्हणून आश्रम आता प्रवचनाची वेळ प्रभाती ७ वाजतां व सायंकाळी ५ वाजतां करीत आहे. लोकांनी आपल्या सोयीप्रमाणे त्या वेळा निवडाव्यांत.

प्रभाती येणाऱ्यां साठी व सायं प्रवचनांत येणाऱ्यांसाठी वेगवेगळी ओळखपत्रे देण्यांत येतील. तशी ओळखपत्रे सर्वांनी आश्रमाच्या कचेरीतून घ्यावीत.”

मग सर्व कचेरीकडे ओळखपत्रे मिळविण्यासाठी गर्दी करू लागले. मला आता आश्रमातली एकंदर व्यवस्था व्यावसायिक होतेय की काय अशी शंका येवू लागली. भेटी, पाकीटे, फळे, फुले यांचा ढीग प्रत्येक प्रवचना नंतर होवू लागला. थोड्या दिवसानी आश्रमाशेजारची जमीन श्रद्धानंदनी विकत घेतल्याचे समजले. इतर साधक त्यांत रस घेत. मला जराही रस नसे. मला जास्तीत जास्त वेळ माझ्या साधने साठी पाहिजे होता. पण आश्रम माझ्यावर जबाबदाऱ्या वाढवत होता. गुरुआज्ञा म्हणून मी त्या स्वीकारत होतो. पण कोठेतरी विचित्र वाटे. संन्यस्ताना मोह नसावा. मग आश्रम मोहामागे धांवत असल्यासारखे कां वाटते? खरे काय?

पण काही दिवसानी सकाळचे प्रवचन श्रद्धानंदनी दुसऱ्या साधकास दिले. मी दिलेल्या प्रवचनाची ध्वनीफीत ऐकून तो प्रवचन करू लागला. काय फरक होता दोघांत समजले नाही. पण सकाळी गर्दी कमी होवू लागली. सायंकाळी वाढू लागली व मी असूयेचा केंद्रबिंदू ठरलो आहे, हे मला एका साधकाने सूचित केले. दुःख वाटले. पण क्षणार्धांत मन स्थिर झाले. मी काहीच केले नव्हते. इतराना असूयेने प्रेरित केले हा त्यांचा दोष. दोष कसला, दुबळेपणा. संन्यस्त धर्म पालनाच्या विरुद्ध विचार. मी दोषी नाही. आता मी मौन पाळू लागलो. आसक्तीचे प्रकार दिसले की मग मौन वाढे. चित्त शांत होई. मला श्रद्धानंदावर विश्वास बसू लागला. ते मला परिस्थिती निर्माण करून साधक बनवत होते. आंतरशुद्धी करत होते असे वाटू लागले.

एका प्रवचनांत मी विचार मांडले “संन्यासी सर्व त्यागतो तेंव्हांच बनतो. मोह, माया, क्रोध, विषय एवढेच काय पण कोणत्याही असत्याची ओढ त्याला लागत नाही. जे नाशीवंत ते असत्य. असे गीतेत सांगीतले आहे. शरीर हे नाशीवंत आहे, म्हणूनच सत्य नाही. आत्मा हाच सत्य जो नाशीवंत नाही. जर शरीरच असत्य आहे तर आपण देता त्या भेटी याही नाशीवंत, असत्य आहेत. त्या संन्यस्ताना मोहांत पाडतात व पर्यायाने आपण पापी ठरतां. संन्यासाचेच कां कोणाचेही व्रत बाधित करणे हे पाप नाही कां? आत्मा जेवढा स्वच्छ, निर्मळ ठेवता येईल तेवढे आपण सत्-चित्-आनंदाकडे पोहोचू. संसारी, संन्यासी, साधू तसेच ऋषीनाही हा नियम लागू होतो. या नियमाच्या विरुद्ध कोणीही प्राणीमात्र नाही.”

रात्री मला श्रद्धानंदानी बोलावून घेतले. यावेळी त्यांच्या शेजारी भगव्या वस्त्रांत एक साध्वी बसल्या होत्या. त्यांच्या चेहेऱ्यावर थोड्या नापसंतीच्या आठ्या होत्या. पहिल्यांदाच पहात होतो. अत्यंत मानाने ते मला शेजारी बसवत म्हणाले. “विद्यानंदजी, आपल्या अभ्यासावर, विचारांवर आम्ही खरोखरच प्रसन्न आहोंत. आश्रम फक्त यांच शहरांत आहे. मनुष्य जातीच्या कल्याणासाठी तो पसरला पाहिजे. आपले विचार, आपला अभ्यास व

विद्वत्ता पहाता आपण ही जबाबदारी घ्यावी व भारत भ्रमणास जावे अशी इच्छा आहे. विचार करून सांगा."

"आपली इच्छा शिरसावंद्य गुरूजी. आपण सांगाल ते काम करणे हेच शिष्याचे कर्तव्य असते. कुठून सुरवात करावी याची आज्ञा करा. कोणास भेटावे. कोणत्या विषयावर प्रवचन करावे हे देखील समजले तर बरे." मी बोलत होतो. माझ्या मान्यतेचा परिणाम त्या साध्वींवर होत होता. त्यांच्या चेहेऱ्यावरील आठ्या जाऊन एक हलके आनंदी हास्य हळू हळू पसरत गेले.

"हो मी सर्व काही उद्या पर्यंत आपणांस समजावतो. लिहूनही देतो मग सोयीस्कर दिवशी प्रयाण करा. आणि उद्या आपले नांव सर्व साधक व भक्तां समोर "स्वामी विद्यानंदजी" म्हणून आम्ही घोषित करणार आहोंत. " श्रद्धानंदजीनी मला मोठ्या अभिमानाने ही गोष्ट सांगीतली.

मी माझ्या कुटीरांत परताना संभ्रमांत होतो. अजून आंतरशुद्धी पूर्ण न होताही मी स्वामीजी कसा? आणि हा निर्णय गुरुजीनी घेतला कशामुळे? बाहेरदेशी फिरताना आंतरशुद्धीचे मार्गदर्शन कसे होईल?. मग मनानेच समजावण्यास सुरवात केली. गुरुजींच्या मनांत यांतूनच आपल्याला आंतरमनाची शुद्धी शिकवायची असेल. आपल्याला तरी योग्य मार्ग कुठे माहीत आहे. बाह्य मार्ग यम, नियम, आसन, प्राणायाम हे शारीरिक होते व व्यवस्थित समजले होते. आंतरमार्ग गुरुंच्या मार्गदशर्नानेच मिळणार होते. ते सांगतील ते ऐकणेच बरोबर ठरेल. मन शांत झाले.

काही साधक भेटावयास म्हणून आले. व मला म्हणाले "आपणांस गुरुजीनी स्वामी बनवले. चार पांच वर्षांत आपण स्वामी बनलांत. आम्ही एवढी सेवा करतो त्यांची पण मागेच राहिलो. आता त्या साध्वीबाई आल्यांत त्यांनाही माताजी म्हणण्याची आज्ञा झालीय. आपण विद्वान होता, आशा होती आपण गुरुजींपेक्षा जास्त चांगले मार्गदर्शन केले असते. हे त्यांनाही समजले होते. म्हणूनच त्यांनी आपणांस बाहेरील काम देऊन आश्रमापासून दूर केले."

त्यांच्या प्रत्येक वाक्या बरोबर मला आघात होत होते. हे साधकाचे लक्षण नव्हे. हे शिषत्वही नव्हे. यांत गुरुला समर्पण नाही. सामान्य जनांसारखा विचार, स्वार्थ, असूया, लोभ सगळेच उघड होत आहे. हे संन्यस्त दीक्षा घेतलेले आहेत? की आश्रमाचा उपयोग जगण्याचा आधार म्हणून करीत आहेत? गुरुंच्या वागण्यावर, शीलावर शंका घेतात, अधिकाराची हांव धरतात, विद्वत्ता अभ्यासाने मिळवण्याऐवजी असूया येते मनांत. मी फक्त म्हणालो "आपण गुरु म्हणून एकाद्याला निवडले की त्याच्याच चरणी मार्गदर्शनासाठी रहायचे असते. आदिशक्ती व आपण यांतील तोच एक दुवा असतो. बदलू पहाल तर मुळापासून परत सुरुवात करावी लागते." काहीच न बोलता ते निघून गेले.

मी चार दिवसानी आश्रम सोडला व भ्रमंतीवर निघालो काम फार अवघड नव्हते. खूप पत्रे गुरुजीनी बरोबर दिली होती. त्या त्या शहरांत गेलो की एक दोन प्रवचने व्हायची. लोकांना कसे माहीत पडायचे माहीत नाही, परंतु प्रवचनाला गर्दी व्हायची. प्रभाती नाहीतर सायंकाळी प्रवचन असायचे. मला साधनेसाठी वेळच वेळ मिळू लागला. सकाळ सायंकाळ वेळ मिळेल तसा ध्यानांत बसू लागलो.

यम तर पाळतच होतो. जीवनांत सर्व नियम पाळण्याची संवय केंव्हाच लागली होती योगासने, प्राणायाम प्रभातीच होऊन जायची. साधनेसाठी पद्मासन सिद्ध केले होते. नासिकाग्रावर श्वास अनुभवत मी ध्यान लावी. सुरवातीसच मिटल्या नजरे समोर गुरुजींची मूर्ती येई व मग ध्यानांत बसे. एक लय, एक वलय, एक प्रकाश, प्रकाशाला अर्थ मिळावा म्हणून काळया अंधाराची वर्तुळे एक एक करून फेर धरीत. या स्थितीचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करीत होतो. गुरुंचे मार्गदर्शन नाही. कसा अर्थ लागणार?

फिरणे चालूच होते. गुरुआज्ञा झाल्या खेरीज परतणे योग्य नव्हते. जवळची पत्रे संपणार तेवढ्यांत पुढील पत्रे येत व त्याप्रमाणे पुढील प्रवास सुरु होई. प्रवचनांनंतर खूप पाकीटे येत. प्रवचनांचे प्रायोजक ती गोळा करीत. दानाचा धनादेशच द्यावा, इतर भेट स्वीकारली जाणार नाही असे अगोदरच सांगण्यात आलेले असे. हे सर्व योजन गुरुजीनी सांगीतल्याप्रमाणे होत असे. प्रायोजक सर्व धनादेशांचे हिशोब लिहीत माझे हस्ताक्षर घेत व गुरुजीना पाठवीत. मला थोडे विचित्र वाटे पण गुरु आज्ञे प्रमाणे सर्व चालले होते. ते पाळलेच पाहिजे या निष्ठेने मी करीत असे. कित्येकदा प्रायोजक सांगत दोन लाख एकवीस हजार झाले. मला त्यांत रस नसे.

एकदा एका प्रवचना नंतर एका बाईनी भेटण्याची इच्छा प्रकट केली. नंतर त्या भेटीस आल्या. सांगू लागल्या “स्वामीजी लग्नाला दहा वर्षे होत आली. मूल नाही. कोणतेही व्रत करण्याची तयारी आहे. आपण सुचवा.”

मी वेदोपनिषीदांवर बोलणारा संन्यासी. या बाईना मी तांत्रिक वाटलो की काय? कसे समाजवायचे यांना. मग बोलून गेलो

“बहेनजी, मैं वेद शास्त्रोंका अभ्यासक हूं. मै तंत्रविद्या नही जानता. भगवान श्रीकृष्णजीने कहा है. मनुष्य योनीमे जन्म लेनेसे सभी भोग भुगतनेही पडते है. भगवान भी मनुष्य योनीमें जन्मते है, तो उन्हे भी भुगतने पडेंगे. आप भगवान की प्रार्थना करते रहो.” त्या बाई विचित्र नजरेने पहांत निघून गेल्या.

मी साधना चालूच ठेवली होती. एके दिवशी पाठीच्या खालच्या बाजूने करोड रज्जूतून वर काहीतरी चढते आहे असा भास होऊ लागला. ध्यानांतून बाहेर निघालो. हे सर्व मर्जी शिवाय झाले होते. पण एक प्रकारची शांती मन व्यापून गेली होती. मला नक्की वाटू लागले. कुंडलीनी तून चक्र शुद्धीची सुरवात झाली आहे. मी सिद्धमार्गावर चालत आहे. मूलाधार चक्रशुद्धी सुरु झाली असणार. मग रोजच हा अनुभव येत गेला. मी जास्त शांत होत गेलो. जगाकडे पहाण्याची दृष्टी बदलत गेली.

मी आता उत्तर भारतातल्या मोठ्या शहरांतून प्रवचने करीत फिरत होतो. गुरूआज्ञे प्रमाणे सर्व चालले होते. माझी आंतरशुद्धी होत होती व गुरुजींवरचा विश्वास वाढत होता. आंतरशुद्धीचा मार्ग बहुदा दूर ठेवूनच करता येत असेल असे मला वाटू लागले.

पुढील दिवसांत गुरुजींकडून मला संदेश पत्र मिळाले. “आपण पूर्व कर्णभूमी, कर्नालला आहांत. तेथून अंबालाला जावे. तीन दिवसांची प्रवचन शिबीरे आटोपून हरद्वार, हृशीकेशला प्रयाण करावे. ही दोन्ही तीर्थस्थळे आपणांस ज्ञानार्जनासाठी फार उपयुक्त होतील ही इच्छा. आपण या स्थळी आपल्या इच्छेप्रमाणे रहावे. नंतरचा कार्यक्रम आपणां कडून प्रस्थानाची माहिती मिळाल्यावर कळवू. अंबाला व हरीद्वार येथील वास्तव्या करीतां सोबत ओळखपत्रे जोडली आहेत.”

गुरुआज्ञे प्रमाणे अंबालाची प्रवचन शिबीरे आटोपून हरीद्वारला पोहोंचलो. ओळखपत्रांतील मजकुरा प्रमाणे गोविंदशास्त्रींच्या मठीत पोंहोचलो. सकाळचे नऊ दहा वाजले असतील. गंगा नदीवर स्नान करण्याचा प्रथम योग आला होता. थंडगार पाण्यांत स्नान करताना मन प्रफुल्लित झाले. थंडीचे दिवस असल्यामुळे फारच थोडे लोक पूर्ण स्नानाचा अनुभव घेत होते. दहा मिनीटे मनसोक्त स्नान झाल्यावर बाहेर आलो. स्वतः गोविंदशास्त्री बरोबर आले होते. त्यानी फक्त हस्त व मुख प्रक्षालन करून घेतले होते. स्नान करून बाहेर आल्यावर ते मला म्हणाले “स्वामीजी, आपण उष्ण कटीबंधातील असूनही एवढ्या थंडीत गंगामैयात स्नान केलेत? तेही पूर्ण स्नान? आम्ही इथलेच तरीही या दिवसांत आम्ही नाही करू शकत पूर्ण स्नान.” मी फक्त स्मित करून गप्प राहिलो. बाह्य शुद्धीतील योगामुळे शरीराने सहनशक्ति पराकाष्ठेच्या सीमेवर नेली होती. मला विशेष त्रास जाणवला नव्हता. किंबहुना मी स्नानाने सुखावलो होतो.

भ्रमणयात्रेत मी ताप्ती, नर्मदा, महानदी वगैरे मधे स्नान केले होते. दिल्ली, आग्रा येथे यमुना दर्शन घेतले होते. स्नान करण्याएवढी पवित्रता पाण्यांत आढळली नव्हती. पण हरिद्वारच्या गंगामैयातील कांचे सारख्या स्वच्छ पाण्याने मनाची व शरीराची पवित्रता वाढवल्या सारखे वाटले.

शास्त्रींच्या घरी सांयकाळी प्रवचन होते. भगव्या वस्त्रांतील खूप संतानी गर्दी केली होती. प्रवचन अतिशय शांतपणे झाले त्यावरून समजलो की सर्वांना आवडले असावे. कित्येकानी आश्रम कोणता, गुरुवर्य कोण, वाचस्पतीची पदवी आहे कां असले प्रश्न विचारले. पण एक प्रश्न अतिशय सुंदर विचारला गेला. आदि वेद कोणता? त्यांत कोणाता ज्ञानोपदेश आहे? त्याचे संक्षिप्त विवरण कराल का?

अभ्यासक संन्यस्ताना असलेच प्रश्न फार समाधान देतात. माझ्या मुखांतून निघू लागले “आदि वेद कुणी लिहीला हे वादग्रस्त आहे. अनादी कालापासून ऋषी मुनी समाजाला तत्वज्ञान रूपी अमृत देत होते. हे विश्व कसे बनले, कसे चालते, कोण चालवते याच्या कुतुहलातून कित्येक विश्लेषणे येत गेली. लिहिण्याची साधने फारशी नसल्याने व पाठांतरास

सोपे असावे म्हणून संस्कृत भाषेत कित्येक श्लोक, सूक्ते बनवली गेली. तीच पाठांतराने पुढच्या पिढीला देण्यांत येत असत. त्यांतून पहिला संकलित करून लिहीला गेलेला वेद हा ऋग्वेद आहे. अग्नीला देवाधी देव मानतो तो ऋग्वेद. श्लोक जरी संक्षीप्त असले तरी प्रत्येक श्लोकाचे विवरण खूपच मोठे आहे. पहिला श्लोक असा,

अग्निमीले पुरोहितं यज्ञस्य देवं ऋत्वीजम |  होतारं रत्नधातमम ||"

या श्लोकातून अग्नी देवता ही श्रेष्ठ ठरवली आहे. शक्तीची स्त्रोत, यज्ञवेदीवर प्रथम प्रकटणारी, तेजपुंज. सर्व देवांचे पौरोहित्य करणारा............. "

माझ्या मुखांतून ऋग्वेदाचे विवरण झरझर निघत होते. सर्वत्र निःशब्द शांतता पसरली होती. कित्येक माना डोलत होत्या. माझ्या जीव्हेवर सरस्वती नाचत होती. ज्यावर माझे कोणतेही नियंत्रण राहिले नव्हते. ही अनुभूती फार वेगळी होती. शब्द मनांतून किंवा स्मरणांतून येत नव्हते. जणू काही अंतरातून स्त्रोत सुरु झाला होता व जीव्हेवरून वातावरणांत पसरत होता. एक चेतना पुऱ्या शरीरांतच नव्हे तर आसंमतात पसरलेली वाटत होती. मी स्वतःच स्तंभित होत चाललो होतो. तीन एक घटिका नंतर हा ओघ ओसरत गेला. व माझे विवरण थांबले. हलकी कुजबूज सुरू झाली व मग एकदम जयघोष ऐकू आला "विद्यानंदजी महाराज की जय!"

अभिवादन स्वीकारत मी  उभा राहीलो व मार्गस्थ होण्याचा प्रयत्न करू लागलो. एवढ्या प्रवचना नंतर देखील एक चेतना शरीरांत दौडत असल्याचा भास सुरू होता. गोविंदशास्त्री अंतर्मुख होवून सोबत चालत होते. मला न्याहाळत होते. घरी पोहोचल्यावर त्यांनी सर्व कुटुंबीजनाना बोलावून सांगीतले "स्वामीजींच्या पाया पडा. महान योगी पुरुष आहेत."

"शास्त्रीजी मी कसला योगी? अजून खूप वाटचाल बाकी आहे. मला फार मान देऊ नका. अभिमान मनांत रुजेल व तो अधोगतीचे कारण ठरेल. मनुष्य प्राण्याला सन्मान द्यावा, देवत्व नये देऊ." मी बोलत होतो.

ध्यानात बसलो तर मन शांत होईना. आज काय झाले होते? या अवस्थेचे नांव काय? ही केंव्हा व कशी निर्माण होते. कोणत्या मर्यादेपर्यंत आंतरशुद्धी पोंहोंचली की ही अवस्था प्राप्त होते? मन ध्यानावर केंद्रित करावेच लागेल असा निग्रह करून मी या विचारांना पळवायचा प्रयत्न करीत होतो. फार प्रयत्नांनंतर केव्हा ध्यान सुरू झाले समजले नाही. प्रकाश व काळोखाची वर्तुळे डोळयांसमोर फिरू लागली. व अचानक करोडरज्जूतून उर्जेचा स्त्रोत वर चढत असल्याचा भास झाला. एक अत्यंत मोहक प्रकाश मिटल्या डोळयांसमोर स्थिर झाला. मी त्यांत रंगून गेलो. हा अनुभव पहिल्यांदाच घेत होतो. प्रकाशाला एक आत्यंतिक प्रेमळ ओढ असते हे अनुभवत होतो. तेजस्वी प्रकाश, पण पूर्वी कधीही न पाहिलेला, अतिशय ओढ लावणारा, त्यांतच मिसळून जावे वाटणारा. मी त्यांत रमून गेलो

होतो. एवढ्यांत सर्व डोळयां समोरून निघून गेले. मी ध्यानातून बाहेर आलो. सर्व शरीर एक चेतना अनुभवीत होते.

रात्रीच्या प्रसाद ग्रहणासाठी सर्व एकत्र झालो तर शास्त्रीजींच्या कुटुंबातील सर्वजण मला नीरखीत होते. समजत नव्हते काय चालले ते. एवढ्यांत शास्त्रीजीं बोलले "स्वामीजी! आज विशेष ध्यान लागले कां? आपल्या मुखांवर एक अनोखे समाधान, तेज, आनंद सर्वांचेच मिश्रण दिसत आहे. आपणांकडून दीक्षा घ्यावी असे मनांत येते. स्वामी श्रद्धानंदजी बरोबर आम्ही सत्संग केला आहे. पण आपणांस पाहिल्यावर वाटते आपण जास्त सिद्धी प्राप्त केल्या असाव्यात." मी काहीच बोललो नाही. गुरुची तुलना शिष्याबरोबर करणे अयोग्य असा विचार आला.

दुसरे दिवशी प्रातःकाळीच मी हिमालयाच्या दिशेने निघालो. हृशीकेश मागे पडले. कोणत्याही संन्यस्ताला हिमालयाची ओढ कां हे समजायचे होते. थोड्याच वेळांत लांबून हिमाच्छादित शिखरे सोनेरी बनून समोर आली. पहाताना मन भरून आले. देवदर्शन झाल्या सारखे वाटत होते. एक संन्यासांचा तांडा "जय भोले! भं भं भोले" करत जवळ येवू लागला. कुतुहलाने त्यांच्या कडे पहात असताना ते जवळ पोहोंचले. मला पहातांच थांबले विचारू लागले "कहां से आये हो स्वामी? बाबा के दर्शन को चले हो क्या? कौनसे आखाडेसे हो?"

"मैं महाराष्ट्रसे आया हूं. हिमालय दर्शन करने चल पडा था. ये स्वामी बाबा कौन है, कहां है?" मी विचारत होतो.

"बडे महान बाबा है. थोडे आगे जाओ एक गुंफा लगेगी वहां ध्यान लगाके बैठे है. किसीसे बात नही करते. अपनेही ध्यान मे रहते है. लगता है भोलेनाथही मनुष्य रूप मे बैठे है."

मला उत्कंठा वाटली. पाहू कोण सत्पुरुष आहे ते. हिमालयांत फार सत्पुरुष तपस्या करतात, कित्येक जण तपस्येत चुकतात व तांत्रिक होतात असे ऐकले होते. पाहू कोण आहे ते. त्यांनी दाखवलेल्या दिशेने पाहिले तो सुरुंच्या झाडांचे वन दिसत होते व मागे एक हिमालयाचे शिखर वर आकाशांत गेले होते. वर हिम फार कमी होते. मी त्या दिशेने निघालो. हळू हळू रस्ता अरुंद होत चालला होता. सुरुचे वन दाट होत चालले होते. मधुनच वारा झाडांतून वळणे घेत फिरत होता, सूर्यकिरणे कवडशांचे लांबलचक स्तंभ होऊन खाली उतरत होती. पुढे फक्त वळणारी पाऊलवाट दिसत होती. माणसांच्या अस्तित्वाची तीच एक खूण बाकी सर्व निसर्ग. देवसृष्टीत प्रवेशल्या सारखे वाटत होते.

थोड्या वेळाने चढ संपत आला. सुरुची झाडे हळू हळू खाली गेली होती. पर्वताची कपार दिसत होती. वाट मात्र कपारीच्या दिशेनेच पुढे जात होती. एक मोठे वळण घेवून वाट थांबली. समोर एक दगडांत बनलेली लहान गुहा दिसू लागली. गुहे समोर एक सपाट

झालेला दगड होता. त्यावर पूर्ण पांढऱ्या झालेल्या केसांचे व लांब लचक दाढी असलेले मुनीवर्य बसलेले दिसले.

जवळ पोहोंचलो. ते ध्यानांत बसले होते. बाजूच्या जमीनीवर बसण्याची जागा शोधत होतो. एवढ्यांत आवाज आला. “बैठो पुत्र, मालूम है हमे, दूरसे आये हो. ज्ञान लालसा पुरी भरी है. राह देख रहे थे हम. बहोत दिनसे राह देख रहे थे.” ते मुनी बोलत होते. मी आश्चर्यांत पडलो. पूर्वी कधीही भेट नाही. ओळख नाही. मग माझी वाट कशी काय पहात होते.

“पुत्र! संभ्रम हम पढ लेते है. पहचानकी जरूरी तो सामान्य को होती है. आप विद्वान हो. आपके तीन चक्र पुरी तरहसे उन्मीलित हो गये है. आप पूर्णतः सही रास्तेपर हो. बाकी बात बादमे करेंगे. अभी थोडा आराम करो. ध्यान करना है तो ध्यान करो. फल है, फलाहार करो. दो दिन तक आप सत्संगमे रहोगे हमारे साथ.” ते अधिकारवाणीने बोलत होते. मी चक्रावून जात होतो. तीन चक्रांवर स्वामित्व मी ध्यानाने मिळवले होते? मलाच ते माहीत नव्हते. यांना कसे समजले? असा कोणता अभ्यास या स्थितींची जाणीव देतो?

त्यांचे स्मितहास्य दिसले व एक हुंकार ऐकू आला. मी ध्यानांत बसायचे ठरवले आसन सुखकर होईल अशी सपाट जागा शोधली व ध्यान लावले. किती वेळ बसलो होतो समजले नाही. जेंव्हा डोळे उघडले तेव्हा मुनीवर खांद्यावर वस्त्र घेवून उभे असलेले दिसले.

“स्नानास येणार?” मुनी विचारत होते. मी एक तेजस्वी, गंभीर, शांत, लोभस व्यक्तित्व पहाण्यांत दंग झालो. तपकीरी, किरमिजी पण मोठे डोळे, जटां व दाढीने आलेला गंभीरपणा, ज्ञानोपासनेने फुललेला पूर्ण चंद्रासारखा तो चेहरा, मला जणू देव दर्शन घडवीत होता. भोलेनाथ संन्यासी म्हणत होते ते खरे की काय? हे स्वतः शंकर भगवान तर नव्हेत.

“मनुष्य व देव यांत फार फरक आहे. देव आपल्या एवढा लहान नाही व आपण देवा एवढे प्रचंड होवू शकत नाही. माणसाने देवाला रुपे दिलीत. ती भक्तीची आवड लागावी म्हणून ती संन्यस्तानी खरी मानू नयेत. आपला धर्म ती आदिशक्ती काय आहे जे जाणण्याचा असला पाहिजे. मी देखील आपल्या सारखाच एका नश्वर देहाचा मनुष्य आहे. आत्मा चिरचिंतनात ठेवून परम सिद्धी गांठण्याचा प्रयत्न केला एवढेच” मुनीवर्यांनी परत एकदा माझ्या मनचे विचार ओळखले होते. मी त्यांच्या मागे चालू लागलो. कपारीच्या बाजूने चालणे फार अवघड होते. एकाबाजूला खोल दरी. दुसऱ्या बाजूला उंच गेलेली हिम शिखराची कपार. मुनीवर्य अगदी निर्धास्त होवून एकाद्या राजमार्गावरून चालत असल्या सारखे चालत होते. मी थोडासा डगमगत होतो.

पुढ्यांत एक छोटासा धबधबा आला मुनीवर्य थांबले. एका दगडावर वस्त्र ठेवून ते त्या धबधब्या खाली उभे राहिले. जटा सोडून पूर्ण स्नान करून परत आले मी मागोमाग धबधब्या खाली उभा राहीलो. पाणी अंगावर पडताच समजलो. तो धबधबा नव्हता बर्फाचे पाणी वितळून वहात खाली येत होते. अतिशय थंड होते. स्नान आटोपून मी बाहेर आलो तर थरथरू लागलो.

“उज्जवी प्राणायाम करा, उर्जा तयार होईल शरीरांत. प्राणायाम याचसाठी असतो” मुनीवर्य सांगत होते.

स्नान आटोपून गुहेकडे आलो. बाहेरच दोन दगडावर दोघे बसलो. मुनीवर्यांनी सुरू केले.

“आपण आत्मज्ञानी होण्याची उपासना करतां आहांत. आत्मज्ञान मिळविणे सोपे नाही. पण आपण आपल्या इच्छाशक्तीने फार चांगली प्रगती केली आहेत. मूलाधार, स्वाधिष्ठान, मनीपूर चक्रे स्वच्छ करून त्यावर विजय मिळवला आहेत. आता अनाहत चक्रावर ध्यान करतां आहांत. त्याचे फार चांगले अनुभव तुम्हाला दिसू लागतील. ही स्थिती अगदी मोहात पाडणारी असते. कित्येक योगी या स्थितीचा मोह सोडू शकत नाहीत. तिथेच ध्यान स्थिर करतात. सुशुम्ना नाडी पुढे जायला मग अवरोध होतो.

अनाहत चक्र हृदय स्थित असते. अग्नीचे स्थान म्हणजे हृदय, आत्माही तेथेच स्थित असतो. प्राण व आत्मा यांचे क्षणोक्षणी मिलनाचे स्थान म्हणजे अनाहत चक्र, आपले हृदय. शरीर ऊर्जेचे कुंडस्थान. सोहम् चा साक्षात्कार. म्हणून अती मोहक स्थिती. श्वास घेतो तो सोSSS. सोडतो हम्SSS. सोSSS ने प्राण, विश्वातील सुप्त चेतना शरीरांत प्रवेशते. अनाहताच्या अग्नीकुडांला प्रज्वलित करते, दूषितता शोषते व बाहेर पडताना हम्SSS करीत बाहेर निघते. विश्व दर्शन आहे हे. प्राणिमात्रांच्या जीवनाचे रहस्य, मनोहारी रहस्य. आत्मशक्ति व आदिशक्तीच्या मिलनाचे स्थान. म्हणूनच फार मोहित होतो या चक्रावर. तेथेच हा अनुभव घेत रहाण्याची प्रबळ इच्छा होते.

हा मोह जास्त होतो. मग अनाहताच्या आजूबाजूची इतर सुप्त चक्रे स्वच्छ होऊ लागतात. इथे योग्याचा अधःपात होतो. पुढचा मार्ग पूर्णतः बंद होतो. व काही सिद्धींवरच समाधान मानावे लागते. अशा लोकाना तांत्रीक म्हणतात. पण ते आत्मज्ञानी होत नाहीत. आपण अनाहत चक्राच्या स्थितीत पोंचलांत हे आम्हाला माहीत पडले. येथून पुढे जाण्यासाठी सक्षम गुरूची साथ हवी. जी आपणाकडे नाही. आत्मज्ञानाने तुम्ही सर्व जाणू शकता. प्रत्येक प्राणी मात्र त्याच्यातील शक्तिच्या अंशाने आदिशक्तिशी जोडलेला असतो. त्याचा हा बंध आत्मज्ञानी पाहू शकतो. न सांगताही त्या प्राणीमात्राचा स्वभाव, स्थिती, मानस सर्व काही स्वच्छ दिसू लागते. गुण दोष दिसतात. मनचे विचार दिसतात.”

मी मुग्ध होवून हे ऐकत होतो.

“एक गोष्ट अतिशय महत्वाची घडते. अनाहता नंतर जेंव्हा पुढे जाता तेव्हा विशुद्धी चक्रावर फार काही करावेच लागत नाही. मनचे विचार व वाणी स्वच्छ करणारे हे चक्र. पुढे अजना चक्र साक्ष दृष्टी बरोबरच दिव्य पहाण्याची शक्ति येते ती याच्या पूर्ण शुद्धीने. अजनाचक्र आपल्या स्मरण, विचार, आनंद, दुःख, यातना याबद्दल आपल्या मेंदूला सूचना देत असते. त्याच्या शुद्धीने सर्व क्रिया अति शुद्धच होउ लागतात. ही चक्रे अनाहता नंतर फार लवकर होतात. परंतु सहस्रकमल, जे अतिशय ऊच्च आनंदाची प्रचिती देते ते खूप वर्षे

शुद्ध होत असते. अधून मधून आपणांस त्या आदीशक्तिचा भास होतो व निघून जातो. शुद्धीकरण चालूच असते. तुम्ही जनमासाला सिद्ध पुरुष वाटू लागता. याने योग सांगता झाली की काय असा संभ्रम तयार होतो. पण ही पूर्ण स्थिती नव्हे. मी देखील अजून ती पूर्णपणे आत्मसात केली नाही. केली असती तर मी आज असा आपल्याशी संवाद साधत बसलो नसतो. मी पूर्ण सत् चित् आनंदात रममाण झालो असतो. या अवस्थेत पोहोंचलेला माणूस योग्यांच्या दृष्टीत परमकोटीचा असतो तर सामान्य त्याला वेडा समजतात. तो आपल्या आनंदातच विहरत राहातो. स्व-शरीरराचे दुःख, यातना, माया त्याला समजणे थांबते. तो आदिशक्तीत जवळ जवळ विलीन होत असतो. सर्वच मृत्यु नंतर आदिशक्तित विलीन होतात पण ते आपआपले संस्कार घेवून. कित्येक ज्ञानोपासना करतात, भक्ती करतात, चांगली कर्मे करतात ते मुक्त होतात पण मृत्यु नंतर. संन्यस्त राजयोगी मुक्त होतात ते जीवंतपणी. ते आनंदच अनुभवत रहातात. पूर्ण समाधीसाठी शेवटी आपणास एका शुद्धात्म्याची गरज असते. तुम्ही व तो एकत्र साधनेत बसता, ध्यानांत बसता. त्याचे शुद्धीकरण करता करता तुमचे शुद्धीकरण होते. व तुम्ही परमसिद्ध होता. पूर्ण संन्यस्त होता.

आपण आता फलाहार करून ध्यानांत बसू. एकमेकांच्या उत्थापनाला कारणीभूत ठरणार आहोंत आपण. माझी सहस्रकमलशुद्धी तुमच्या बरोबरच होणार आहे. माझा योग पूर्ण करण्यासाठीच तुमची योजना केली आहे. तुम्ही जेंव्हा माझ्या स्थितीत जाल तेव्हा कुणाही साधकास शुद्धी साठी बसवा तो पुढे जाईलच पण तुम्ही पूर्ण योग गाठू शकाल."

मी निःशब्द होतो. आनंदातही होतो. मुनीवर्य मला मदत, शिष्यत्व देत आहेत असे वाटू लागले. मनचे विचार त्यांच्यापर्यंत पोहोंचले देखील.

"नाही मी गुरु बनत नाही आपला. आपले गुरु आपण श्रद्धानंदजीना मानता. पण ते एकलव्य द्रोणां सारखे आहे. आपण श्रद्धानंदाच्या पुढे केव्हाच गेला आहात. परंतु ही गुरु भावना शेवट पर्यंत जपा. गुरू म्हणून. नाहीतर अधःपतन होईल. आपण दोघेही साधक म्हणून एकत्र आलो आहोत. एकमेकांस पूरक ठरण्यास. गुरु शिष्य बनण्यास नाही." मुनीवर्य थांबले. मनांतले भटकणारे विचारही थांबले.

सायंकाळ पासून ध्यानास सुरुवात झाली. दिनक्रम ठरत गेला. मधेच साधू येत. आम्हांस ध्यानांत पाहून. निघून जात. फळे, फुले, मिठाईचा प्रसाद पुढ्यांत ठेवलेला असे. मुनीवर्य मिठाई वगैरे एका दगडामागे ठेवत. आम्ही फलाहारच करू. दोन दिवसांनी मी वेगळाच अनुभव घेत होतो. तो तेज प्रकाश एकदम स्थिर झाला होता. चित्तवृति ढवळू लागल्या. त्रास व आनंद यांची वलये उठू लागली हळू हळू सगळे आनंदमय वाटू लागले.

त्या दिवशी सायंकाळी मुनीवर्य म्हणाले. आपण उद्या सकाळी प्रयाण करा. आम्ही बहुधा आजच पूर्ण समाधीत जाणार. निर्विकल्प होऊ. आपणांशी संवाद होणे शक्य नाही. अशा स्थितीत असू आम्ही. व खरोखरच दुसऱ्या दिवशी मुनीवर्य समाधीतच होते.

मी भगवे घेवून स्नानास गेलो. स्नान करून आलो. मुनीवर्यांना नमस्कार करून निघालो. किती सुंदर भाव होते त्यांच्या मुखावर, अत्युच्च्य कोटीचा आनंद होत असल्यासारखा चेहरा दिसत होता.

पूर्ण रस्त्यांत तो चेहरा, तो आनंद बरोबर घेउन मी निघालो. सायंकाळी शास्त्रींच्या घरी पोंहोंचलो. तेथे सर्व चिंताक्रांत दिसत होते. मला पहांताच आनंदले. शास्त्रीजीनी माझा चेहरा पाहून सर्वांना गप्प राहाण्यास सांगीतले असावे.

थोड्या विश्रामानंतर मी ध्यानात बसणार तोच शास्त्रीजी म्हणाले "स्वामीजी! आपण परतणार केव्हा ते विचारले आहे श्रद्धानंद स्वामीनी."

"मी उद्याच निघतोय. माझे हिमालय दर्शन फारच सुंदर झाले. ही भेट अत्यंत महत्वाची ठरली." मी सांगत होतो. "तीन चार दिवस एका मुनीवर्यांच्या सत्संगात गेले. गुहेत राहून साधना करीत होते."

शास्त्रीजी विस्मयाने पहात म्हणाले "ते बाबा बोलले आपल्याशी? ते कुणाशीही बोलत नाहीत." मी फक्त होकारार्थी मान हलवून गप्प बसलो.

तीन दिवसांनी आश्रमात परतलो. सर्व साधक विस्मयाने माझ्याकडे पहात होते. श्रद्धानंदना भेटलो. ते देखील पहात राहीले मग विचारू लागले "कसा झाला प्रवास? आपल्या प्रवचनांना फार प्रसिद्धी मिळाली आहे. परत सप्ताह योजण्यास चहूकडून मागणी आहे."

मी विशेष बोललो नाही. गुरुआज्ञे प्रमाणे वागायचे. मग होकार नकाराचा प्रश्नच नव्हता. तेच पुढे बोलत होते.

"शास्त्रीजीनी कळविले की आपण एका साधू बरोबर तीनचार दिवस साधनेत घालवलेत. आजच्या प्रवचनांत त्याबद्दल माहिती दिलीत तर बरें. हिमालयांत असे खूप लोक भेटतात. शिष्य बनविण्यास भुकेलेले असतात. खूप लोक बळी पडतात त्या मोहास." श्रद्धानंदांचे हे वक्तव्य ऐकून विषाद वाटला . मुनीवर्य एवढे लहान नव्हते. गुरु बदलू नये असे ते म्हणत. मग त्यांनी केलेली एकलव्याची तुलना आठवली.

सायंकाळच्या प्रवचनांत संन्यस्त वृत्ती, त्यांतील त्याग, ऐहिक सुखांचा त्याग, संन्यस्ताचे जीवन, अभ्यास, शास्त्रार्थ, यम, नियम, आसन, प्रणायाम, प्रतिहार, धारणा, ध्यान व समाधी या अष्ट अंगावर विवेचन करीत गेलो. योग साधना हेच संन्यस्ताचे खरे उद्दीष्ट असावे, चक्रशुद्धी करून जीवनांतील अत्युच्च आनंद मिळवावा असा उपदेश करून मी बसलो. सर्व मंत्रमुग्ध होऊन ऐकत होते. साधक तर अतिशय प्रभावित झाले होते.

प्रवचना नंतर मी कुटीराकडे गेलो. नवीन कुटीर मला देण्यांत आले होते. चारी बाजूला आरसपान लावलेला, गवाक्षाना सुंदर कांचा, शयनगृहाला शीत वाताचे यंत्र पाहून मी ओशाळलो. हे संन्यस्ताचे कुटीर नव्हते. हे सर्व ऐहिक सुख मिळवणाऱ्या श्रीमंत लोकांचा

थाट होता. बरोबर आलेल्या साधकाना मी म्हणालो “सर्व गवाक्षे उघडी करावीत. शीतवात यंत्र बंद करावे. मला याची खरच गरज नाही. आश्रमाचे हे रूप संन्यस्ताना कसे सुचले?”

एक साधक म्हणाला “हे सर्व तर आपणामुळेच झाले. आपण कित्येक धनादेश पाठविलेत. आश्रमाकडे धनाच्या रुपाने कुबेर अवतरला असे माताजी म्हणत. मग सर्व कुटीरे नव्याने बनविण्यांत आली. स्वामीजी व माताजींचे कुटीर तर सर्वच सुखसोयीनी तयार केले आहे. जे पहातात ते थक्क होतात. शयनगृह, बैठक कक्ष, प्रार्थनागृह, स्नानासाठी छोटा तलाव तर आहेच परंतु माताजींनी सर्व गवाक्षाना सुंदर पडदे लावून सजवले आहे. आपण आपल्या प्रवचनांत संन्यासी जीवन साधे असावे असे सांगीतलेत. मग हे कसे?”

“सर्वच संन्यस्त जीवनाचा मार्ग चोखाळू शकतात असे नाही. परंतु गुरुजींवर परम भक्ती ठेवण्याने संन्यस्त लवकर योग गांठू शकतो, ज्ञान वाढवू शकतो. मी हे अनुभवत आहे. गुरुजीनी हा ऐहिक मार्ग कां धरला त्याचे विश्लेषण आपण नाही करायचे. तो आपला अधिकार नाही.” मी.

“परंतु कित्येक भक्त आपल्यावर भक्ती करतात आपणांस मानतात. श्रद्धानंद व माताजीं बद्दल फार वाईट बोलतात. आपण नव्हता तेव्हा भक्तांची उपस्थिती फारच कमी असायची. आज आपण आलेले समजल्यावर खूप लोक आपणांस ऐकण्यास आले होते. आपल्यावर केवढा विश्वास, भक्ती आहे. कित्येक साधक तर आपली वाट पहात होते. आपणांसच गुरु करण्याचा मानस आहे त्यांचा.” साधक बोलत असतानाच दुसरे कित्येक साधक भेटण्यास आले. सर्वांचा सूर एकच होता. आश्रमाला अधोगतीतून वांचवायचे असेल तर हे बदलले पाहिजे.

माझे संन्यस्त जीवनावरचे भाष्य, साधकांचे माझ्याकडील येणे जाणे याचा परिणाम श्रद्धानंदस्वामी व माताजीवर विपरीत होत असावा. भक्तांचा वाढणारा ओघ हे देखील कारण होते. एके दिवशी प्रवचनांत मी बोलताना म्हणालो होतो. “भक्तजनांकडून येणारा प्रसाद, दान वगैरेंचा विनीयोग गरीब समाजा पर्यंत परत पोहोंचविणे हा संन्यस्तांचा विचार असावा. गरीब मुलाना शिक्षण, आधार वगेरे कित्येक सामाज सुधारणेची कामे आश्रम करू शकेल...... ” माझे बोलणे पुरे होण्या अगोदरच माताजी उठून निघून गेल्या. प्रवचनानंतरच्या प्रार्थने अगोदर स्वामिजीपण निघून गेले. साधकांत व भक्त गणांत एक हलकी कुजबुज व हंसण्याचा आवाज पसरला.

माझे विचार स्पष्टपणे मांडले जात होते. विशुद्धी चक्र शुद्ध झाल्याचे ते लक्षण होतेच. माझे विचार अजनाचक्र जे पहात होते आत्मसात करत होते त्यावर ठरत होते. म्हणजे अजनाचक्र देखील खूप कार्यरत झाले असे वाटत होते. मी गुरुंचा पाणउतारा केला असा समज जरी लोकांचा झाला तरी मला जराही तसे वाटत नव्हते. माझ्यावर आता चक्रांचे अधिपत्य होते. सत्य विचारच मुखांतून बाहेर पडत होते. म्हणून ते सर्व जनांस पटत होते. मी शांत होतो.

सायंकाळी श्रद्धानंद स्वामींनी त्यांच्या कुटीरांत बोलावून घेतले. माताजीही बसल्या होत्या. ते म्हणाले "विद्यानंद आपण हिमालयातून आल्यापासून पाहातो आहोत. आपणास आमचे गुरुत्व मान्य नसावे. आपणांस हिमालयांत योगी मिळाले, त्यांना आपण गुरु बनविलेले दिसते. आपण आश्रमासाठी खूप काही केले आहेत. कदाचित आमच्या पेक्षा जास्त मान भक्तगण आपणांस देतात. पण आता असे वाटते कीं आश्रमाचे पूर्ण स्वामित्व आपण इच्छिता आहांत. तसे असेल तर सांगावे."

"गुरुवर्य आपला काहीतरी गैरसमज होत आहे. आम्ही पूर्ण संन्यस्त असून तसेच राहाणार आहोंत. आम्हाला कोणत्याही इच्छा आकांक्षा नाहीत. ध्यान व पूर्ण शुद्धीतून संन्यस्त होण्यांत आम्ही धन्यता मानतो. साध्या जीवनाची आम्हास ओढ आहे. ऐहिक सुखाने सजवलेले आमचे कुटीर आमच्या साधनेत बाधा आणते. पूर्वी सारखे साधे कुटीर समाधान देईल. आश्रमाने देखिल समाजकल्याण पहावे अशी इच्छा आमची होती. सर्वानी ती अवलंबावी हा अट्टाहास नाही. ते एक आदिशक्तीचे कार्य या धारणेनेच आम्ही सूचित केले होते." मी मला स्पष्ट केले.

माताजी त्यांच्या कानांत कुजबुजल्या व ते म्हणाले "विद्यानंदजी आपण आश्रमाला फार नांवारुपाला आणलेत. आपल्या इच्छा व सूचना आम्हाला पाळल्याच पाहिजेत. आमच्या आश्रमाच्या ट्रस्ट मधे फक्त वैदिक शिक्षणाचे कार्य करण्याचा मानस लिहीला आहे. म्हणून आपण आपल्या नांवे नवीन ट्रस्ट उभा करू. आपल्या इच्छे प्रमाणे व मतां प्रमाणे त्यांत काम केले जाईल. आपणांस ट्रस्ट चालवायची माहिती नाही म्हणून मी व माताजी दुय्यम राहून काम पाहू. आपल्याला पसंत असलेल्या कार्यातून समाधान मिळावे ही इच्छा."

मी म्हणालो "चांगले कार्य व्हावे हीच इच्छा. माझे नांव असावे असा विचारही नाही. आपण गुरुवर्य आहांत. आपली आज्ञा आम्ही नेहमीच पाळली आहे."

"विद्यानंदजी समाजोद्धार केंद्र " या नांवाने एका महिन्यांत ट्रस्ट तयार झाला. भक्तगणांतले कायदेपंडीत, हिशोबनीस वगैरेनी सर्व जबाबदारी स्वीकारली. कित्येकानी अभिनंदन करताना म्हटले "विद्यानंदस्वामी आता आश्रमाला खरे खुरे रूप मिळेल. आपण फारच चांगले कार्य हाती घेतले आहेत."

माताजी व श्रद्धानंदजी फार कष्ट घेऊन काम करीत होते. प्रवचनां नंतर भक्तगणांना आवाहन करीत "विद्यानंदजींचे कार्य फार मोठे असून त्यांच्या इच्छे प्रमाणे विद्यानंदजी समाजोद्धार केंद्राने गरीब मुलां करीता शाळा काढण्याचे व वृद्धांसाठी आश्रम काढण्याचे ठरविले आहे. तरी सर्व भक्तगणानी या कार्यास भरघोस प्रतिसाद द्यावा." मी माझ्या साधनेत होतो. मधूनच आभास व्हायचा. प्राणीमात्रांमधून एक ज्योत प्रकाश निघून तो सृष्टीतील तेजस्वी प्रकाशाला जोडला गेला आहे. अर्थ समजत नसे. पण मन शांत होई. मस्तकी टाळूच्या जागी एक ऊष्म भास तयार होई.

मधूनच कित्येक धनादेश माझ्या स्वाक्षरी करतां पाठवले जात. कित्येक कागदपत्रे देखील स्वाक्षरी करून सरकारी कामां करतां तयार केली जात. मला त्यांत गम्य नसे. सर्वकाही श्रद्धानंदजी व माताजी पहात असत. आश्रमाच्या बाजूच्या जमीनीत शाळेची वास्तु बांधायचे ठरवून भूमी पूजनाचा दिवस ठरला. माझ्या हस्ते भूमी पूजन झाले. खूप भक्तगण जमला होता. साधक तळमळीने कार्य करीत होते. सर्वच कामाना वेग येत होता.

दुसरी भूमी संपादन केल्याचे मला सांगण्यांत आले. तेथेही भूमी पूजन झाले. वृद्धाश्रमाची तयारी चालली होती.

दोन वर्षे होत आली होती शाळेची वास्तु जवळ जवळ तयार झाली होती. वृद्धाश्रम देखील बराचसा तयार होत आला होता.

माझ्या दृष्टी समोर आता प्रत्येकांतून निघणारा प्रकाशझोत अधिकच स्थिर होत होता. व्यक्तीं प्रमाणे या प्रकाश झोतांचे रंग बदलत. मूळच्या त्या सुंदर तेजस्वी प्रकाशाला लाल रंगाची छटा मिसळे. तर दुसऱ्यांत शांत नीळा रंग मिसळलाय असे वाटे. कोणा मधे काळपट तर कोणांत दोन तीन रंगांचे मिश्रण दिसे. मी ते पहाण्यांत गुंगून जाई.

एके दिवशी बरेच लोक आश्रमांत आले व श्रद्धानंदां बरोबर बोलत बसले. काही काळाने ते व माताजींसह श्रद्धानंद माझ्या कुटीराकडे आले. मग समजले की काही लोक पोलीस होते व काही लोक न्यायासनाने पाठविले होते. मला म्हणाले स्वामीजी आपणांस आमच्या बरोबर यावे लागेल. मी काहीच बोललो नाही. प्रत्येकांतून निघणारा प्रकाशझोत पहाण्यांत मी दंग होतो. बाहेर साधक जमा होऊन कुजबूजत होते. अतिशय क्रोधित होते. त्यांच्या प्रकाशझोतांत लाल रंग खूपच उधळलेला दिसत होता. काय होत होते त्याचे मला काहीही वाटत नव्हते. माताजी अगदी तुच्छ नजरेने पहात होत्या. त्यांच्यातून निघणारा प्रकाश काळपट तपकीरी होता कपटाचा द्योतक वाटला.

श्रद्धानंदजींच्यातून निघणारा प्रकाश काळपट शेवाळी दिसत होता. त्यांत ओशाळेपण दिसत होते.

मी त्यांच्या बरोबर निघालो. मला कोठडीत बसवून ते निघून गेले. मला साधनेसाठी कुठेही जागा चालत होती. कोठडीत ध्यान सुंदर लागले. सायंकाळी एक अधिकारी आला व म्हणाला "आपल्यावर ट्रस्टच्या पैशांची अफरातफर केल्याचा व शाळेत नोकरीचे आमीश दाखवून कित्येकाना फसवल्याचा आरोप आहे. आपण खोटी माहिती देऊन काढलेला पासपोर्ट देखील आम्हाला मिळाला आहे. कोणत्या देशांत पैसे ठेवले आहेत? कोठे पळून जायचा विचार होता? स्वामी बनून लोकांना फसवतां?" तो रागाने बोलतोय हे त्याच्यातून निघणारा लाल प्रकाश दाखवत होता. माझ्या चेहेऱ्यावर बहुदा मंद स्मित असावे. तो चिडून ओरडला "स्वामी असून हंसता काय निर्लज्जपणे. केलेल्या गुन्ह्याची जरा देखील शरम नाही?"

त्याच्याकडे पहाताना तोंडातून निघाले "संन्यस्त मी."  परत स्वतःच्याच विश्वांत रममाण झालो. त्याच्यावर काय परिणाम झाला माहीत नाही. पण जातां जातां तो इतराना म्हणाला. "त्रास नका देवू त्यांना. कोणीतरी गोवलेय त्यांना यांत. सरळ वाटतो. तेज बघा त्याचे."

मला अत्यंत चांगली वागणूक मिळत होती. मगच्या दिवसांत कितीतरी लोक येवू लागले. वर्तमान पत्रेवाले होते. मुलाखत मागीत. काहीबाही विचारीत. मी ते समजू शकत नव्हतो. माझ्या समोर कोणीही आले की त्याचे विचार समजू लागले. मुनीवर्य माझे विचार कसे ओळखीत ते समजले. आनंदीत झालो. माझे सहस्रचक्र शुद्ध होत होते. आता एका साधकाची जरूरी होती. ज्याला समोर बसवून त्याच्या व माझ्या शुद्धीचा प्रयोग करून पूर्ण मुक्त व्हायचे होते.

साधनेला वेळ फक्त रात्री मिळू लागला. न्यायालयाच्या फेऱ्या आता सुरू झाल्या. ते लोक फिरवतील तसे मी फिरत होतो. न्यायालयांत कित्येक साधक भेटायला येत. डोळे पाण्याने भरलेले असत. त्यांच्या प्रकाशाला पाण्याची स्फटीकता आलेली असे. मला सांगत "स्वामिजी बोला. सगळयांना उघडे पाडा. आम्हाला तुमची विटंबना नाही पहावत."

मला समजत नसे म्हणजे काय करायचे. मुक्तीचा अनुभव घेत होतो. बाकी कोणत्याही गोष्टीत स्वारस्य राहिले नव्हते. कोण साधक समोर येईल व माझी मुक्ती होईल याचाच विचार येई.

न्यायालयांत श्रद्धानंद आले, माताजी आल्या त्यानी माझ्यावरील आरोपाना दुजोरा दिला.

न्यायाधिशानी मला विचारले "आपण सर्व ऐकलेच आहेत आपणांस काही सांगायचे आहे कां?"

"संन्यस्त मी."  मी उच्चारले. पहिल्यांदाच माझी व न्यायाधिशांची नजर मिळाली. त्यांच्या प्रकाशा कडे पाहिले तर तो निखळ सुंदर दिसला. कोणत्याही प्रकारचा दुसरा रंग त्यांत नव्हता. त्याच क्षणी त्यांच्या मनचे विचार माझ्या समोर स्वच्छ प्रकट झाले

"स्वामिजी माफ करा. मला माहीत आहे आपण निर्दोष आहांत. पण माणसांच्या या कायद्यांत आपण आपली बाजूच मांडली नाहीत. कर्तव्याने मी बांधला गेलोय म्हणून निर्णय देणे भाग आहे. कमीत कमी शिक्षा देत आहे."

मी शिक्षा ऐकताना देखील विचलित नव्हतो. मला साधने साठी धरती कुठेही मिळणारच होती. निःसंगाना ती कुठेही मिळते. हिमालयातील गुहेपासून ती तुरुंगापर्यंत कुठेही चालते. ही आधाराची धरा तुम्ही पाया खालून घालवू शकता कां? कोठे राहायचे याचा चोखंदळपणा तुम्हाला. आम्हा निःसंगी संन्यस्ताना नाही. शिक्षा देऊन कोठडीत पाठवलेत तरी खाली धरती असणारच आहे. सोडलेत तरी कुठेतरी धरतीचाच आधार

असणारच आहे. आम्हाला ध्यानासाठी बैठकीपुरता हवा तो आधार कोणीच नाही काढून घेवू शकत. दुसरी कोणतीच इच्छा नाही म्हणूनच मनी येते "संन्यस्त मी."

साधक सांगत होते. वर्तमानपत्रांतून फार टीका झाली माझ्यावर. आश्रमावर देखील खूप परीणाम झाला. भक्तगणांची सभा झाली. माताजी व स्वामीजीना फार बोलले भक्त. कोण खरे दोषी आहेत ते उघडे करू अशी धमकी दिली. माताजी व स्वामीजी आश्रम सोडून निघून गेलेत. आपण सुटलांत की वाट पहातो आहोत. तुरुंगात आलो त्याला आठ दिवस झाले होते. सगळेच मानाने वागवत होते. एके दिवशी मी ध्यानांत बसलो होतो ध्यान संपले डोळे उघडले तर समोर न्यायाधीश स्वतः बसलेले.

"आपणांस शिक्षा दिली व नोकरी सोडली. आपले शिष्यत्व पाहिजे. साधना थोडी फार जाणतो. आपण योगी हे जाणले. म्हणून आलो आहे." ते बोलत होते

मी त्यांच्याकडे पहाताच ओळखले यांची कुंडलीनी जागृत आहे. एक मूलाधार चक्र शुद्ध आहे. पुढील चक्राची शुद्धी सुरू झाली आहे. यांच्या बरोबर आपली शुद्धी पूर्ण होऊ शकेल. पण पूर्ण वेळ त्यांना आपल्या बरोबर कसे राहाता येईल? विचार त्यांच्या पुढे मांडला. त्यांनी तुरुंगातच सोय केली. दोघेही एकत्र होतो. सर्व दिनक्रम ठरला. मुनीवर्यांकडचाच अनुभव येत होता. व एक दिवशी पूर्ण शक्तीचा स्त्रोत माझ्या सहस्रचक्रांत शिरतोय असा क्षणीक भास झाला व मी पूर्ण समाधीत शिरलो. आजूबाजूचे सर्व समजत होते पण समाधी पूर्ण लागली होती. त्यांतच विहरत राहायचे वाटू लागले.

थोड्या वेळांत आजूबाजूला गोंधळ चाललाय वाटले. न्यायाधीश सर्वांना सांगत होते. ते समाधीत गेलेत परत येणार नाहीत. त्रास देवू नका.

मी पूर्ण आदिशक्तीत विहरत होतो, शरीराचे भान, मोह राहिला नव्हता. निर्विकल्प समाधी लागली होती. जीवन पूर्णत्वास पोहोंचले होते. एके दिवशी शरीर थंड पडून नाश पावणार होते. पण माझे अस्तित्व आदिशक्ती बरोबर राहाणार होते. तोपर्यंत मी असणार होतो संन्यस्त, पूर्ण संन्यासी.

*******************

# जानवली ते मुंबई

जोराच्या सरीवर सरी कोसळत होत्या. सकाळपासूनच पावसाने ठाण मांडले होते. कोकणातला पाऊस म्हणजे भन्नाट. एकदा कोसळायला लागला की थांबतच नाही. बाबाने पडवीला छान झड बांधली होती. बांबूत करड (गवत) असे काय गोवले होते की सपाट विंचरलेले केस वाटावेत. त्यामुळे एवढ्या पावसांत सुद्धा पावळ्या कशा शिस्तीत एका रेषेत पडत होत्या. मला मजा वाटू लागली. एवढ्या पावसांत शाळेला दांडी, बाबा पाठवणारच नाही. मी त्याच्या खूप मायेची. पावसांत भिजून सर्दी ताप झाला तर? पण पावळयांच्या धारा मला खुणवीत होत्या. खेळायला बोलावीत होत्या. बाबा शेतांत गेला होता. आई घरांत होती. तिला मी शाळेला जावे वाटायचे. पण बाबाची भीती वाटे. मला माहीत होते, की ती काही सांगणार नाही शाळेत जा म्हणून. मग कशाला जायचे?

पावसाची एक मोठी सर आली. पाऊस तिरका होऊन पडत होता. खळ्यांत गेले असते तर नुसती भिजलेच नसते तर पावसाने झोडून काढले असते. थेंब चेहेऱ्यावर चमचमले असते. मग बाबा फार रागावला असता. आता पावळ्या जोर पकडून एका धारेने पडू लागल्या. त्यांच्याशी खेळायची अनावर ओढ लागली. मी पडवीतल्या खांबाला एका हाताने पकडले व गोल फेर धरला. आईचा मागोवा घेतला काहीच आवाज येत नव्हता. बहुतेक आई गोठ्यांत शेण काढायला, गाई म्हैशीना गवत घालायला गेली असावी. मग काय माझा गोल फिरण्याचा वेग वाढवला. दुसरा हात लांब केला. पहिल्याच फेरीला त्याने पागोळ्या कापताना माझ्यावर छोट्या थेंबांचा वर्षाव केला. डोक्यावर, चेहेऱ्यावर, पोलक्या खालच्या उघड्या पोटावर बरीक थेंबानी शिरशीरी आणली. आता प्रत्येक फेरीला हात पागोळ्या कापत होता. खूप शिंतोडे अंगावर येत होते. दंव पडल्या सारखे केस पाण्याने डंवरले होते. चेहेऱ्या वरून ओघळ उतरत होते. छान गुदगुल्या करीत होते. कपडे भिजून चिंब झाले होते. बेभान होऊन मी गिरक्या घेण्यात दंग होते. आणि आईची हांक जोरांत

कानावर आली. “शरू! काय चाललंय ग हे? भिजून चिंब झालीस? अग तुझा बाप फाडून खाईल मला. का माझी हाडं पिळतेस?”

तिच्या पहिल्याच हांकेला मी दचकले होते. फिरण्याचा वेग आवरताच आला नाही. हात सुटला नी मी खळ्यांत धडपडत गेले. आता तर पुऱ्या पावसांत भिजत होते. लागले काहीच नव्हते. पण आई अजून ओरडणार म्हणून आधीच घाबरून मी भोकांड पसरले. “आय! आय! पडले गे मी.”

जीवाच्या आकांताने आई धांवत आली. मला कवटाळून पडवीत चढली. पावसाने गारठवलेल्या मला, आईची ऊब व शेणाचा वास दोन्ही सुखावून गेले. दुसऱ्या क्षणी रडणे बंद झाले. पडवीत मला चांगले कोरडे करून आईने नवा परकर पोलका चढवला. सगळे करताना तोंडाचा पट्टा चालूच होता.

“माझी वैरीण आहेस गो तू. का छळतेस अशी. तुझा बाप आला नी बघतलेन तर माझे मारून मारून तुकडे करील गो. आईचा जरा तरी विचार कर. किती मार खायचा तुझ्यापायी?”

मला हसू यायचे. खरंच मला जरा खरचटले तरी बाबा आईला मारायचा. म्हणायचा “लक्षच नाही संसारात. पोरांचे बघ बरोबर, मग म्हशी सांभाळ तुझ्या.”

आई म्हणायची “ऱ्हा एक दिवस घरांत आणि दाखवा सांभाळून लाडक्या लेकीला. एक नंबरची वांड झालीय. मला जरापण ऐकत नाही. तुम्हीच डोक्यावर चढवून ठेवलीत तिला.”

मला मजा वाटायची. आई बाबांच्या भांडणाची मजा बघताना हसू येई. दोघेही कोंकणातले. वरचे सगळे संवाद शिव्यानी भरलेले असायचे. मला नवीन नवीन शिव्या त्याच वेळी माहीत पडायला लागल्या होत्या. साध्या सरळ शब्दांपेक्षा शिव्यांचे भांडार वाढत होते.

दादा नव वर्षांचा नी मी सात वर्षांची. दादाने शाळेत जायलाच पाहिजे हा नियम. मला मात्र लहान सहान गोष्टींमुळेही सुट्टी मिळायची. दादा माझ्यावर चिडायचा म्हणायचा “हिला सगळे माया करतात मला मात्र सगळे रागवतात.” दादाचा राग नाहितर रुसवा मला पटकन जाणवायचा. मग तो नसताना मिळालेल्या खाऊतला मी त्याच्या साठी राखून ठेवे. पण तो काय माझ्यावर खुशी दाखवीत नसे.

आमचे गांव कोंकणांतले, जानवली. गांवी बाबाची चांगली शेती होती. आंबे, रतांबे, नारळ, पोफळी, काजूच्या बागा होत्या. अगदी श्रीमंत नसले तरी खाऊन पिऊन सुखी असलेले आम्ही. माझ्या आईची पहिली दोन तीन मुले दगावली. मग झालेला एक भाऊ व मी. मी बाबाची लाडकी होऊन बसली. प्रसंगाने हळवा झालेला बाबा खूप माया करी. त्याचा जीवच रहात नसे. मुलीवर जास्तच माया. आई जरा तरी वळण लावण्याच्या मागे असायची. पण बाबा मायेने न्हाऊ घालायचा. मला जरा लागले, खूपले तरी तो हळवा व्हायचा. मी मात्र जास्तच आडदांड व दंगा करणारी होत गेले.

पावसांत भिजायची तर मला भारी हौस. पण बाबा समोर नाही. लेकीला सर्दी पडसे होईल, ताप येईल हीच काळजी करायचा. आईला नको नको ते बोलायचा.

एकदाची मजा तर अजून आठवते. घरा समोरच आंब्याचे झाड होते. आंब्याला कैऱ्या लागल्या होत्या. कोवळया आंबट कैऱ्या माझ्या आवडीच्या. मी आंब्यावर चढले. कैऱ्या तोडून मस्त खात बसले. दादाने आईला चुगली केली. आई धांवत बाहेर आली. मला ओरडू लागली. दोन चार शिव्या हांसडून दम मारू लागली. मी हंसत झाडावर बसून तिची मजा बघत होते. तेवढ्यांत बाबा आला. मी गप्प होऊन पानांत दडून बसले. दादा नी आई दोघेही घाबरले. बाबाची पाठ झाली नी मी झाडावरून घसरत सर्रकन उतरले. मागून धांवत जाऊन बाबाला मिठी मारली. बाबाने लाडाने पुढे घेतले. आई पांढरी फटक पडली होती.

"काय गो शरे! तू कुठून उपटलीस? दिसली नायस येताना, आता कुठून आलीस एकदम?" बाबाने विचारले.

मी पटकन सांगीतले "ही काय मी आंब्यावर बसली होती. बघ किती छान आहेत कैऱ्या. मला आवडतात. तू खाणार?"

आई डोळे वटारून बघत होती. मला मजा येत होती. तिला वाटत होते आता बाबा तिला गाळी घालणार. पण माझ्या बोलण्याने विरघळलेला बाबा म्हणाला "मला नको आंबट काय तरी. आणि तूही खाऊ नको. सर्दी होईल."

आईचा जीव भांड्यात पडला. बाबा रागवला नव्हता. बाबाचे काय सांगताच येत नव्हते. केव्हा मायेत येई. केव्हा एकदम भडके. बाबा काय तरी सामान घेवून परत शेतावर गेला नी आई त्राटीका बनून शिव्या घालत माझ्यावर धांवून आली. "काय गो मला मार कसा पडेल बघतेस काय. ये तंगडीच मोडून ठेवते तुझी."

ती काय धांवणार? मी वेडावत, वाकडे तिकडे धांवत पळू लागली. तिला सांपडलेच नाय. खूप मजा आली. आई दमून गेली बडबडत होती "काय रे देवा! कसली पोर घातलीस रे पदरांत? जीव घेणार रे माझा ही. चांगली बुद्धी दे हिला. तुझी पूजा बांधेन रे. गांव बोलवून भजन पण करीन रे. पण हिच्या जाचातून वांचव."

आज हा प्रसंग आठवला की डोळे पाणवतात. किती लांब ऱ्हायली आई. मी कुठे आले. भेटायचे म्हटले तरी एक दिवस लागतो गाडीतून जायला. वर अर्ध्या महिन्याचा पगार खर्चायचा. जमतच नाय जायला. बाबा पण आठवण काढतो. ये म्हणतो दोन चार दिवस पण काय करणार पैसे पुरायला नकोत. दोघंही कमवतो पण महिना पुरा करताना नाकांत दम येतो. लहानपणी आईचे ऐकले असते तर. शिकले असते तर. आज सगळे मनासारखे करता आले असते. बाबाच्या मायेन बिघडवले मला. पण त्याची माया केवढी खरी होती. किती मन राखायचा माझे तो. पावसांत भिजू नको म्हणणारा, मासे पकडायला घेवून जायचा आणि भिजवायचा. किती आठवतात ते दिवस.

पाऊस सुरू झाला की नदीला पाणी यायचे. आमच्या शेतवडीतून जाणाऱ्या वहाळाला पण पाणी वाढायचे. शेतांत पाणी भरायचे. म्हणजे शेतांतले पाणी वहाळांत, वहाळांतले नदीत असे वाहू लागे. मग मासे चढतीला लागत. म्हणजे नदीतले वहाळांत, वहाळातले शेतांत येत. शेतात पाऊलभर पाण्यांत वीत भर तरवा उगलेला असे. मासे त्या तरव्यांत पोहू शकत नसत. फडफड करीत पाणी चुबकत जाई. आम्हाला मासा कुठे आहे ते समजे. हातांत दांडा घेवून आम्ही तिकडे धांवत जाऊ. एक दोन वारातच मासा गारद करू. असे वीत भर लांब आठ दहा मासे मिळाले की मकमखीत कालवणाची सोय होई.

बाबाने मला एक लहानसे ईरले बनवून घेतले होते. ते घेऊन तो मला बरोबर घेऊन असे मासे मारायला न्यायचा. माझ्या डोक्यावर ईरले असायचे पण माशाच्या मागे धांवताना पडून जायचे. मी भिजायची. बाबा दुसऱ्या माशाच्या मागे लागलेला असायचा. शेतांत धांवताना खालून पाणी भिजवायचे व ईरले पडले की वरून पाऊस भिजवायचा. म्हणजे बाबा बरोबर पण मी भिजायची. मासे पकडून झाले की बाबाच्या लक्षांत येई की मी पुरी भिजलेय.

एकदम बोले "शरे! किती भिजलीस गो तू. चल ईरलं दे माझ्याकडे नी कांबळयात ये माझ्या. नायतर थंडी लागेल माझ्या बायला. शरे! तुझी आयस भांडणार गो आता. चल गपचुप कपडे बदल हां. नजरेत येवू नको तिच्या."

मी मान डोलवी. मग तो कांबळयाच्या खोळीवर ईरले ठेवी. मला कांबळयात गुरफटवी. तोंड फक्त बाहेर असे. घरी पोचताना अंदाज घेई. आई कामांत असे. मग मला हळूच तिच्या अपरोक्ष घरांत पिटाळी. सांगे "जा लवकर कपडे बदल. आंग चांगले पूस हां. नायतर सर्दी पकडेल." मला मजा वाटे. बाबा आईला घाबरतो हे माहित पडे. मी घरांत जाई. थंडीने कुडकुडत आईला शोधून काढी नी सांगे "आई, कपडे बदल माझे लवकर खूप थंडी वाजतेय."

"कुठे भिजलीस गो एवढी. बाप फाडून खाईल मला." आई नेहमीचेच बोले. मी त्याचीच वाट पहात असे. लगेच सांगे "बाबा बरोबरच गेलेली शेतांत, मासे धरायला. धांवताना ईरले ऱ्हात नाय डोक्यावर. बाबा नाय ओरडायचा त्याला म्हाईत आहे." गोळी बरोबर लागायची. आई माझे केस खसाखसा पुसून कोरडे करताना बाबाला शिव्या घालायची. मला तीच मजा हवी असायची.

"आमच्या ताब्यांत असली आणि दोन थेंब पाणी लागले तर कासावीस होतो हा. आता पुरे भिजवून आणलेन तर काय नाय. हा करील ते बरोबर. आमच्या कडून झाले तर हाडे काढतो आमची. कुठे बसलाय आता? तोंड दाखवायचा नाय आता." आईची बडबड सुरूच. मी हंसत मजा बघायची. कोरडी होवून कपडे बदलून मी बाहेर यायची नी बाबाच्या पाठीवर उडी मारायची. तो लाडाने एक चापटी मारायचा आणि विचारायचा "काय गो! आईकडेच गेलीस ना? गपचूप कपडे बदलता नाय आले तुला? आता माझ्या नांवान खडे फोडणार दिवसभर. गाळी ऐकायला लागणार."

"मी काय करू? कपडे नाय गावले मला. आणि आंग पुसता येत नाय अजून. आईन बघ छान पुसले. आता थंडी नाय वाजत." मला आईची चांगली बाजू मांडताना बरे वाटायचे. पण आई बाबाचे भांडण ऐकायला पण मजा वाटायची.

अशी कशी होते मी? आई केंव्हातरी म्हणायची "पोराच्या जन्माला आली असतीस तर बरे तरी दिसले असते. पोरीला नाय शोभत हा आडदांडपणा" आज आठवले की डोळे डबडबतात. जवळ होते तर त्रास देत होते. आता लांब आले तर मायेची सय येते नी हैराण होते. मी माझ्या मुलाना धाकांत ठेवणार, शिकवणार. मी शिकले नाय म्हणून ही परीस्थिती आली. शिकले असते तर.

पण शिकणार तरी कशी. शाळेत जायचा कंटाळाच यायचा. सकाळी शाळेची वेळ झाली की मी बोंबाबोंब, रडारड करून सोडायची. मला जरापण त्रास झालेला बाबाला चालत नसे. मग तो माझी बाजू घेवून बोले. "जावदे गो कशाला जबरदस्ती करतेस. नाय तर नको जावदे शाळेत. नायतरी काय पोरगीच आहे ना." मग आई आणि बाबांचे झोंबट सुरू. आई बोंबलायची "जरा शिकू दे तिला. डोक्यावर चढवून ठेवताय. चांगला नवरा पायजे तर शिकायला नको? मग बसाल रडत. तिच्या जन्माचे नुकसान होईल हे पण समजत नाय. काय डोके फोडून उपयोग नाय. बाप आणि लेक दोघेय सारखेच."

"काय गो! जीव कसा ऱ्हातो तुझा. सकाळपासून रडतेय ती. काय शिकणार शाळेत पोर? " बाबा बाजू मांडायचा. आई आणखीच भडकायची "होय तर वैरीण मी तिची. आणि काय हो दिन्या पण जातोय ना? मग हिलाच कां नको? दोघांत फरक करू नये." बाबा गप्प झाला होता. आई पांच यत्ता शिकली होती बाबाला शिकायचा कंटाळा. शेती होती, सुबत्ता होती, शिकायची गरज नव्हती. माझ्यावर त्याची आंधळी माया होती. पण आई म्हणत होती तेय खरे होते. बाबा मला माया करी नी दिन्यादादाला लहान लहान कारणाने बदडून काढी. दिन्यादादाला आईपण केंव्हा केंव्हा करवादे, रागावे. ती दोघानाय सारखेच पाही. पण बाबा मलाच माया करी. हे बघून दिन्यादादा माझ्यावर राग धरू लागला. मी त्याला माझ्यातला खाऊ ठेवे पण तो मला त्याच्यातला कधीच देत नसे. मग केंव्हा केंव्हा मी त्याला सुनवे "बघ मी आता तुला काय एक देणार नाय. तुला वेडावून खात बसणार बघच तू." या सगळ्यांत खास मालवणी शिव्यांचा भडिमार करी. तो गप उठून निघून जाई.

माडांच्या, पोफळीच्या बागा घर परसांतच होत्या. शिवाय रतांबे, आंबे, आंबाडे, जाम अशी खूप झाडे परसांत भरली होती. पोफळीवर बेडे पिकून पडायला लागले किंवा आंबे पिकून पडायला लागले की कोणीतरी वेचायला बागेत घुसे. माझ्या नजरेला पडले की त्याची सुटकाच नसे. शिव्यांची लाखोली वहात, मिळेल तो दगड उचलून मी त्यांच्या मागे धांवे. ते पळत सुटत. मला खूप मजा येई. गाळींची सरमाळ तोंडातून फुटत राही. मग आई येई. "गे माय माझे, गप ऱ्हा जरा, काय तोंड आहे का काय? किती गाळी देतेस. बरा नाय गो हा वाचाळपणा" असे म्हणत बावळा पकडून फरपटत घरी नेई. एवढया सगळ्या गाळी बोलून

मला दम लागलेलाच असे. पण जीव शांत झाल्यासारखे वाटे. त्यांनी चार आंबे की बेडे नेल्याचे काही नसे, पण गाळी घालायची खुमखुमी जिरवण्याची मजा फार यायची.

आता लगीन होऊन मुंबईला आले. आमचे थोडे शिकलेले. त्यामुळे मुंबईच्या वाश्या हवेतले शुद्ध भाषावाले. चाळीत आले ती गांवचे गुण घेवून. नळावर, भांडी घासताना, कपडे धुताना इतर बायकांना गाळी द्यायला सुरवात झाली. पयल्यांदा तर त्या बायका विंचू चावल्यागत दूर झाल्या. कोणाच्याच तोंडात शिव्या गाळी नाहीत. काय मजा? वाटले आपले कसे होणार? मग काही बायकानी आमच्याना सांगीतले "तुमची बायको तोंडाळ आहे, भांडते फार, भयानक शिव्या देते. हे कसे चालेल चाळीत? आवरा तिला."

मग आमच्यानी मला समजवायला सुरवात केली. "हे गांव नाही. आपल्याला सर्वांबरोबर चाळीत रहायचे आहे. एकमेकाला उपयोगी पडायला लागते. संबंध बिघडवू नयेत. शेजार चांगला ठेवावा. आपल्या चाळीत लोक चांगले आहेत. इथे जास्त भांडणे नाही होत. शिव्या गाळी तर नाहीच. ते सगळे झोपडपट्टीत होते."

मी ऐकता ऐकता विचारले "तुम्हाला कोणी सांगीतले त्याचे नांव द्या. कांडातच काढते तिचे. मी गाळी देते काय? दाखवतेच तिला. माझी तक्रार करते काय माझ्या मागे?"

आमचे हंसले म्हणाले "आता दाखवतेसच ना तुझा रंग? मी नांव सांगीतले तर जावून शिवी गाळच करणार ना त्यांना? मग आणखी वैर वाढवणार, मग रोजच भांडणे होणार. तुला चालेल पण मला व चाळकऱ्याना नाही चालणार. गांवी घरं लांब लांब होती. इथे तसं नाही. रोजचा संबंध येतो चाळकऱ्यां बरोबर. संबंध चांगले ठेवावे लागतात."

त्यांची सांगण्याची तऱ्हाच अशी होती की कुठेतरी पटायला लागले. आई धोपटायची. समजवायची पद्धतच नव्हती. मग माझी संवय एवढ्या वर्षांत केंव्हा बदलली ते म्हायतच नाय पडले. आता एकपण शिवी तोंडातून बाहेर पडत नाय. लाज येते शिवी मनांत आली तर. तोंडातून बाहेर पडतच नाय.

चाळीतलं जीणंच वेगळं. गांवची मजा वेगळी नी चाळीतली वेगळी. मी हळू हळू चाळकरी होत गेले. रमले. मैत्रीणी झाल्या. कपडे वाळवताना, भांडी घासताना एकमेकांच्या चौकशा होत. एक जवळीक येत गेली. एका छपराखाली ऱ्हायलं की कुटुंब मोठं होतं असंच वाटायला लागलं. एकमेकांच्या अडचणीत सगळे मदतीला उभे ऱ्हातात. मला पण अनुभव आला माझ्या दुसऱ्या बाळंतपणांत. सगळ्या साळकाया माळकाया भेटायला यायच्या. बाळंतिणीची सुपारी काय नी गरम खीर काय, तुपाची धीरडी सगळे कोणी ना कोणी आणे. त्यावेळी समजले आमच्यानी काय सांगीतले ते, का शिव्या द्यायच्या नाय ते.

पण मुंबयचा पाऊस काय मला आवडला नाय. सगळा चिखल नी घाण करून ठेवतो. गांवच्या सारखा निर्मळ नाय. गांवी पाऊस सुरू झाला की मजा यायची. गांवची जमीन लाल चिऱ्याच्या दगडाची. पहिल्या पावसाला चारीबाजूने ओहोळ धांवायला लागत. सगळाच चढ उतार. सरळ सपाट जमीन फार कमी. पावसाचे ओहोळ धांवायला लागले की भगवे

लाल दिसायचे. चिऱ्याच्या जमिनीचा रंग उतरायचा पण घाण अजिबात नसायची. या ओहोळांतून धांवायची मजा औरच असायची. दोन दिवसांत पहिले पाणी निघून गेले की ओहोळांचा रंग बदलायला लागायचा. हळू हळू पाणी निवळत जायचे. आता स्वच्छ पाण्याचे ओहोळ सुरू व्हायचे. प्रवाहाच्या विरूद्ध पाय मारून पाणी उडवत मी खेळत बसे. खूप मजा येई. आता लवकरच शेतं वर येणार. भाजीच्या परड्यांतील भाजी जोर धरणार. मग गणपती येणार मनांत त्याची गाणी गुणगुणत मी ओहोळातून पाणी उडवत फिरे.

गणपतीत तर मला दंगा करायचा ऊत येई. गाणी म्हणत, फुगड्या घालीत गांवांतल्या सगळया ओळखीच्यांकडे फिरे. बाबाच मला नेई. माझा आवाज चांगला खणखणीत म्हणून सगळे बोलवीत. गणपतीत रात्री रात्री जागवून मी घरी येई तेवा पहाट झालेली असे. मग दिवसभर झोपून देई. आमच्या गणपतीची संध्याकाळची पूजा आरती झाली की मी पळायची. मग बाबा शोधत शोधत यायचा.

मुंबईत आले नी ठराविक दिवशीच मासे घरी येवू लागले. दररोज नाही. बुधवार आणि रविवारी मासे. सासूबाईची व्रते खूप संकष्टी काय, एकादशी काय मला तर लक्षांतय ऱ्हात नसे. सगळे पवित्र दिवस. मग त्यांचा उपास म्हणून मासेच काय पण कांदा लसूण पण नसे. मला पयल्यांदा वैताग यायचा मग संवय पडू लागली. आता खरोखर समजत होते सासुरवाशीण म्हणजे काय ते.

मुंबईत मासे विकत आणायचे. गांवी केंव्हातरी विकत आणू बाकीच्या वेळी बाबाच पकडून आणी. मुंबयची नवलाई हळू हळू कमी होत होती. उलट गांवापासून लांब आले त्याचेच वाईट वाटत होते. गांवची मजा मुंबईत जरा पण येत नव्हती.

लगीन ठरले तेवा खूष झाले होते. चाकरमानी नवरा आहे. मुंबईला जायचे. मुंबईत मजा असते. पण गांवी मजा करायचो ती मुंबईत येईना. आमचे चांगले होते. केवा लवकर आले तर फिरायला नेत. भेळ नायतर आयस्क्रीम खायला देत. तिखट भेळ खायला बरी वाटे. पण गोडूस थंड आयस्क्रीम आवडत नसे. गोड खायची संवयच नव्हती.

मुंबईतला उन्हाळा पण घाणेरडा. घाम सुटत राही. गांवी उन्हाळा असायचा पण वारे पण असायचे. उनांत भटकताना काहीच नाय वाटायचे. मुंबईत तापल्या रस्त्यावरून जाताना घामाच्या धारा लागायच्या. घरी पोचले की आंघोळ करावी वाटायची पण पाणी पण कमी. गांवच्या नदीत केंव्हाही डुंबायला मिळायचे. शीण उतरायचा.

गांवच्या उन्हाळ्यांत एकच मला आवडायचे नाही. उन्हाळा बाधू नये म्हणून बाबा एका वेलिची पाने आणी. कावळीची पाने म्हणत त्याला. रात्रभर ती आंघोळीच्या पाण्यांत शिजवली जात. त्यांचा हिरवट कडवट वास घरभर होई. मला समजे, दुसऱ्या दिवशी कावळीच्या पाण्याची आंघोळ घालणार आई. कडू कडू हिरवट वासाचे पाणी अंगावर पडले की पोटांत ढवळून निघायचे. नको नको वाटायचे. म्हणून मी रात्रीच ठरवायचे, उद्या सकाळीच कुठेतरी दडून बसायचे, नायतर विहीरीवर जाऊन दोनचार घागरी डोक्यावर ओतून

घ्यायच्च्या, नी आंघोळ केली म्हणून सांगायचे. पण आई कसली खट. ती आंघोळ केली तरी परत कावळीची आंघोळ घाली. बाबाने दम मारलेला असे. उन्हाळयांत दिन्यादादाला व मला महिन्यातून एकदातरी कावळीच्या पाण्याची आंघोळ घालायची. उन्हाळा बाधत नाही. दादा गप आंघोळ घालून घेई मग नदीवर डुंबायला पळे. आई माझा बावळा पकडून जबरदस्तीने आंघोळीला बसवी. मी तिला शिव्यांच्या लाखोल्या वहात भोकांड पसरून दिलेले असे. यावेळी मात्र बाबा ऐकत असला तरी पुढे येत नसे. त्यालाही वाटे मी कावळीची आंघोळ केलीच पाहिजे.

त्या आंघोळी नंतर चांगल्या पाण्याची कितीही वेळ आंघोळ केली तरी कडवट वास काही जायचा नाही. तोंडात एकादे बोट घातले तरी कडू कडू लागे. पण एवढे खरे मी व दादा कधी आजारी पडत नसू. दादा नदीवरून डुंबून मजा मारून येई. मला त्याचा खूप राग येई. तो कां गपचुप आंघोळ करतो म्हणून मी चिडे. तेवढ्यांत बाबा बोले "संध्याकाळी कुरल्या (खेकडे) पकडायला कोण येणार?" सगळे विसरून मी धांवत मी मी म्हणत बाबाला मिठी मारी. दादाही ओरडे मी येणार.

मग नदीवरचे कुरल्या पकडणे आठवले, माशांसाठी खून लावणे आठवले. पावसा नंतर नद्या सुकायला लागायच्च्या. काही ठिकाणी पाणी सांठून ऱ्हायचे. त्याला कोंडी म्हणतात. अशा दोन कोंडींच्या मधे प्रवाह काही दिवस चालू असायचा. बाबा मला घेऊन तिथे जायचा. मग बांबू तासून त्याच्या कामट्यातून बनवलेली खून त्या उथळ प्रवाहात अशी बसवी की पाणी त्यातूनच जावे. मासे आता उताराला लागत. ते या खुनीत शिरत. आंत शिरले की अडकून पडत. त्यांना बाहेर येताच येत नसे. संध्याकाळी जाऊन खून बसवायची व सकाळी जाऊन काढायची. सकाळी माझा जीव ऱ्हात नसे. खुनीत सांपडलेले मासे बघायला जीव आतुरलेला असे. या सगळयाची एक वेगळीच मजा होती. मासे खाण्यापेक्षा हा उद्योग करताना मजा येई.

बाबा कुरल्या पकडायची पण मस्त आयडीया करे. गवताचा पिळून १५ ते २० फूट लांब लचक दोर बनवे. चांगला जाडजूड असे. गाईना घालायची पेंड दोन दिवस आंबवून ती त्या दोरड्याला लावी. एक टोक नदी काठांवर दगडाने दाबून ठेवी व बाकीचा दोर नदीच्या उथळ पाण्यांत पाथरे. थोड्या थोड्या अंतरावर दोरड्यावर दगड ठेवी. हे सगळे संध्याकाळी करू. मग रात्री अंधार झाला की परत नदीवर जाऊ. तो दोर एका झटक्यांत कांठावर खेचून उडवे. त्याला कितीतरी कुरल्या चिकटलेल्या असत. त्या सैरभैर पळू लागत. मी, दादा व बाबा धांवून धांवून सगळे पकडू. एका वेळी आम्हाला १० ते १५ खेकडे मिळत. हे करताना अतिशय मजा येई.

अशी मी मोठी होत होते. आता आई मला पकडून एक एक काम शिकवू लागली. कितीतरी गोष्टी मी बघून बघूनच शिकले होते. कामे फटाफट करू लागले. कित्येक वेळा आई आश्चर्यांत पडे. म्हणे "केवा शिकलीस गो हे? इतक्या लवकर कसे केलेस?"

मी सांगे, “तू करताना बघायची, मनांत पकडायची, मग सांगीतलेस तर पटकन आले.” आई कौतुकाने बघत म्हणे “एवढी हुषारी होती तर जरा मन लावून शाळेत बसली असतीस तर? शिकली असतीस सातवी पर्यंत तर? शिकलेला नवरा तरी मिळाला असता. सोनं झालं असतं ग आयुष्याचं” मी सांगायची “नको ग लावूस शाळेची टुरटुर. कुठचंही काम सांग करून दाखवते एका फटक्यांत.”

मग काय एका मागोमाग एक कामे मलाच करायची झाली. गाई म्हैशींचे दूध काढणे, त्यांना करड, आंबोण खायला घालणे. परसांत भाज्याना पाणी घालणे, तयार भाज्या तोडून आणणे. पडलेले बेडे गोळा करणे, गांवातून गड्याना बोलवून नारळ, बेडे उतरवून घेणे. पावसांत हिरवे हिरवे गवत ढोरांसाठी कापून आणणे. सगळीच कामे मी हौसेने करी. दमतच नसे. आई तर दृष्ट काढी म्हणे “गुणाची माझी पोर. सुखी करील ज्या घरांत जाईल त्याला.”

आता आई गोड बोले. बाबाच्या मागे लागे “कोणतरी चांगला बघा हो शरेसाठी. कामाला वाघ आहे. गांवची कामे आवडतात. कोणतरी शेती, बागायतीवालाच बघा.” बाबा ओरडे “कसले भिकेचे डोहाळे तुझे. तिला चाकरमानीच बघायचा. गांवात काय आहे? मुंबयकर कसे टेचांत ऱ्हातात. काय नाय चाकरमानीच बघायचा.”

मी ऐकायची नी गप्प व्हायची. कोणी का असेना. कुठेही बाईला काम करायलाच लागणार. गांव असो की मुंबई. गणपतीत अजूनही मला फुगड्यांची मजा यायची. आवाज चांगला म्हणून सगळ्यांच्या घरी बोलावत. रात्री रात्री जागवून पण दुसऱ्या दिवशी मी कामांचा निकाल लावी. ते बघून आई व बाबा दोघेही आश्चर्य करीत.

मुंबईत आले नी एकदा म्हाईत पडल्यावर सगळे काम धडाधड करू लागले. सासू खूष पण चेहेऱ्यावर दाखवत नसे. आमचे हे अगदी शांत, रागावणे म्हाईतच नाही अशातले. तोंड बंद ठेवून काम करणे मला कधी जमलेच नाही. वाचाळपणा माझ्यांत भरलेला. सगळे गप्प असले तरी मी बडबडतच असायची.

कोणतीही गोष्ट करायला घेतली की सासूला विचारे “तुम्ही कशी करता हो?”

सासू सांगे “तुला येते तशी कर गो. बघुया काय फरक तो.” मला वाटे सासू सगळे दडवते आपल्यापासून.

“चांगलं नाय झालं तर गाळी देऊ नका. मला येतं तसं करते.” मी म्हणायची. बोलणे चालू झाले म्हणून बरे वाटायचे. पण सासू गप्प व्हायची मग परत शांतता. जेवणांत तर माझ्या हाताला खूप चव. आई पण म्हणे “तुझा नवरा असले चवदार मिळाले की चांगलाच आंग धरेल गो. खूष होईल तुझ्या जेवणावर.”

मग जेवताना पण सगळे गप्प जेवायचे. कोणच बोलायचे नाहीत. राग यायचा. अरे कसे वाटले जेवण ते बोला तरी. पहिले दोनचार दिवस आवरले स्वतःला. पण खोड जाईल का वाचाळपणाची? एक दिवशी फाटकरून तोंडातून निघून गेले “काय मुक्याना जेवायला करतेय काय मी? जेवण कसं झालंय ते काय कोण बोलतय नाही. करणाऱ्याने समजायचे

काय?" मलाच धक्का बसला. एवढे नरम कसे बोलले मी? एकपण गाळ नाय. सासुरवाशीणीला आपसुक समज येते हेच खरे.

हे हंसत म्हणाले "आई, सांग सुनेला जेवण कसे झालेय ते." सासूपण खटपणाने म्हणाली "त्यांत काय सांगायचे. जेवणा सारखे जेवण ते. तुला काय वाटले ते सांग." आमचे गप्प. राग आला. वाढायचे टाकून खोलीतून बाहेर गेले. जीन्यांत उभी ऱ्हाऊन मनांत पुटपुटत पांच पन्नास शिव्या घालून घेतल्या तेव्हा जीव शांत झाला. "कदर नाय तर नाय, यापुढे मी पण मीठ घालून ठेवते पसाभर. खा मग जेवणा सारखे जेवण म्हणत." मनांत ल्हाया फुटत होत्या. आईची नी बाबाची खूप आठवण येत होती. सारखे वाटत होते मुंबई पेक्षा जानवली बरी. पळून जाऊया. या माणसां बरोबर आपले काय जमणार नाय. ठरवले आज पासून जेवण करून पुढ्यांत ठेवायचे. घेतील वाढून. विचारायचे पण नाय.

डोळ्यांतले पाणी पुसून घरांत आले. आंतल्या खोलीत आवरा आवर करू लागले. सगळ्यांचे जेवण आटोपले. पण मी काय उचलायला गेले नाय. सासूने बाहेरचे आवरले. मी आतच माझे जेवण वाढून घेतले. सगळेच चांगले झाले होते. आईने खूप वाखाणले असते. बाहेर काहीच आवाज नव्हता. मनांत आले, मुक्यांच्या घरांत दिलीय मला बाबाने. गांवी गेली की भांडायचे त्याच्याशी. दोन दिवस बोलतच नव्हती. पण कोणावर कायच परिणाम दिसला नाय.

मग धाकले दीर आले नी म्हणाले "वैनी बोलत जा बाय! आम्ही सगळे गप ऱ्हाणारे तुय गप ऱ्हायलीस तर कंटाळा येईल."

"मला एकटीला बोलायला काय चाळेगत लागलीय की भूतान पकडलेय? मरून जेवण करायचे नी मुक्यानी जेवायचे. कसे झाले, काय कमी, काय पण बोलत नाय." मी सुनवत गेले.

"पण काय बोलायचे? तुझे जेवण छानच असते. दादाने आईला सांगूनच दिले, तुलाच जेवणाचे बघू दे म्हणून. तू तर आई पेक्षा चांगले करतेस." धाकले दीर बोलले नी माझ्या अंगावर मांस चढले. पण समजेना हे लोक असे कां. मागे मागे कां बोलतात? तोंडावर चांगले बोलले तर कां चालत नाही?

मग परत नेहमी सारखे चालू झाले. मुक्यांचे जेवण झाले की मी जेवायची. बोलायचे कोणच नाहीत. हळू हळू सगळं आंगवळणी पडत होतं. आमचे मला बाहेर घेवून गेले की खूप बोलत. घरी आले की चुप. आईचा धाक म्हणावा तर सासूबाई कधी बोलताना दिसतच नसत. काही वर्षानी सासुबाई गेल्या. महिने लोटले तरी फरक पडला नाही. बाहेर गेलो की बोलणारे, घरी आलो की चुप. आता खात्री व्हायला लागली. आमचे घराच्या भिंतीना घाबरतात. विचारानेच हंसू आले.

गांवी जेवताना बाबा प्रत्येक पदार्थ कसा झालाय त्याचे बोलणे चालू करायचा. मग मी बोलायची. आईला उगीचच उखडवायचे. मग हंसत पुढे जेवायचे. दादा मधेच ओरडायचा,

"आई लक्ष नको देवू, सगळं चांगल झालंय" मग बाबा म्हणायचा, "आईचाच रे तू. तिचीच बाजू घेणार." घरांत जेवताना आमच्या अशा दोन पार्ट्या. बाबा नी मी व दादा नी आई. जेवण गपचुप हा प्रकारच माहीत नाही. मी जेवण करायला लागले नी बाबा तोंडभर स्तुती करू लागला. मग आई बोले "बरंच झालं मला. करेल लाडकी लेक दररोज. मला काय तेवढाच आराम. पण लक्षांत असू दे, लगीन होऊन गेली की माझ्याच हातचे खायला लागणार." दादा मान डोलवे.

मी दादाची कळ काढायसाठी त्याला मीठ वाढे. तो विचारे "हे काय मीठ कशाला?" माझे उत्तर तयार असे "मान डोलवलीस ना मी मीठ हवे विचारल्यावर?" "तू कुठे विचारलेस? " दादा उखडायचा. बाबाला माझी खोडी कळायची तो हंसत सुटायचा. जेवण कसे खोड्या काढत, रेंगाळत व्हायचे. मुंबईत सगळे गप्प. पटापट जेवून उठले की मी एकटीच जेवणार. हंसणे नाय, खोड्या नाय, पचणार काय? गांवच्या जेवणाच्या आठवणी काढीत मी जेवायची. जेवता जेवता कधी कधी त्या आठवणीनी हंसू यायचे.

असेच एकदा आमच्यानी मला हंसताना बघितले. तेव्हा काय बोलले नाहीत पण सासूबाई देवळांत गेल्याचे व दीर मित्राकडे गेल्याचे बघून मला विचारू लागले "मघाशी जेवताना एकटीच हंसत होतीस? काय आठवून हंसू आले? की मनांत आमची खिल्ली उडवायची तयारी चाललीय?"

"नाय बा, मी कशाला हंसणार? तुमाला भास झाला असेल." मी उडवा उडवी केली. मग रीतसर त्यानी केंव्हा कशी हंसत होते ते सांगून मला पकडल्यावर बोलले "ते होय! काय नाय गांवच्या तानू गाईची नी तिच्या वासराची आठवण आली." मग काय तुमच्या गप जेवण्याला हंसत होते म्हणून सांगणार? ते समजले इथे काय बरोबर उत्तर मिळणार नाही. मी मनांत म्हणायची. गांवची आठवण हाच विरंगुळा. तुम्हाला काय समजणार!

यांचेही गाव कोंकणातले. पण यांचे आजोबा मुंबईला आले मग हे लोक जास्त गावी गेलेच नाहीत. बेताबाताची जमीन आजोबांचा भाऊ बघे. मग त्यांच्या मुलानी वहिवट केली. सगळे आपल्या नांवे केले. "काय भाग करायचे एवढ्याशा जमिनीचे" म्हणत सासऱ्यानी गांवचा नाद सोडून दिला. हे लोक पुरे मुंबयकर झाले.

एकदा सगळे मे महिन्यांत आमच्या गांवी गेलो होतो. आई खूप खूष झाली होती. जावई आलेला मग काय. सगळीकडे धांवत होती. मला मजा आली. रानांत करवंद, चारोळ्या होत्या. काजूचा सीझन संपला तरी काजूवर चुकार बोंडू होते. हिरव्या कैऱ्या आंब्याना लटकल्या होत्या. पिकून पडतही होत्या. रतांबे तर लगडले होते. मग काय माझ्या कानांत वारेच शिरले. आमच्याना नी दीराना घेवून बागेत रानांत फिरू लागले. झाडावर चढा म्हणू लागले तर नाही म्हणत बाजूला झाले. करवंदांच्या झाळी जवळपण येईनात कांटे लागतील म्हणायचे. मग मीच करवंदे काढून दिली. रतांबे पाडून दिले. विहीरी कडे तर जाम मजा आली. दोघेही रहाटा पर्यंत येताना दबकत आले. खाली वाकून पहायची हिम्मत पण

केली नाही. मी तर हसत सुटले. मनात म्हटले भित्रे बावळट कुठले. परत एकदा गावची होत होते. वाटत होते दीराची व आमच्यांची चांगली टेर घ्यावी. पण ते दाबून टाकले. मुंबईतच वाढलेले ते, या सगळ्याची सवय नाही. भीती वाटणारच.

परत मुंबईला आलो तेव्हा यानी म्हटलेच "करवंदात जाताना भीती नाय वाटली. कोंकणात साप फार असतात असे ऐकले होते. तुला भिती नाय वाटली?" मी जोरात हसू लागली. म्हटले, "अहो साप आपल्यालाच जास्त घाबरतात. जरा चाहूल लागली माणसाची की पळतात. त्यांना काय घाबरायचे. त्यांच्यावर पाय पडणार नाही एवढेच जपायचे." त्यांच्या चेहऱ्यावरचा "धन्य आहे ग बाई" चा भाव वाचताना मला मजा येत होती. मला गांवच्या आयुष्याचा अभिमानही वाटत होता.

मग मात्र घरांत दीर व हे मला मान देऊ लागले. दीर तर केंव्हा केंव्हा माझी खेचत. कुठली तरी लढाई चालू झाली तर दीर म्हणाले "दादा वहिनीला पाठवूया लढाईवर, सगळ्यांचा खात्मा करून येईल." हे पण मग हंसू लागले. असले विनोद केंव्हातरीच व्हायचे. परत शांतता पसरायची.

वैशाखात आणि कारतीकात चाळीत एकादे तरी लग्न निघायचे. मग काय चार हत्तींचे बळ माझ्यात शिरायचे. ज्या घरचे लग्न असेल तिथे मला आवर्जून बोलवायचे. मला दोन कामे असत. एक लग्नातल्या ओव्या, गाणी म्हणायची नी लग्नाचा फराळ करायला मदत करायची. पहिल्यांदा तोंडाळ म्हणून दूर ठेवणारे चाळकरी माझ्या गळयावर व फराळाच्या चवीवर एकदम फिदा होते. सगळेच बोलवीत नी मी सुद्धा एका पायावर तयार असे. असे काही आमंत्रण आले की आमचे खूष होत. माझे चाळकऱ्यां बरोबरचे संबंध वाढतात हीच त्यांची खुषी. गाणी गावून गावून मी माझी वाचाळतेची खुमखुमी जिरवायची. गावची शेकडो गाणी तोंडपाठ होती. चाळीतल्या इतर बायका आ वासून बघतच ऱ्हायच्या. मग माझी छाती अभिमानाने फुलून जायची. लग्नाचे पंधरा दिवस व नंतर पांच परतावना पर्यंत मी मानाची अधिकारी ठरलेली असे. कोणत्याही गोष्टीत माझाच सल्ला घेतला जायचा. मी चाळकरी झाले त्याचाही एक वेगळा नशा मला चढू लागला.

लोणचे घातले की सरूकाकूना द्यायची आठवण हटकून यायला लागली. परबाची निशा कॉम्पुटरवर रात्री रात्री अभ्यास करी. तिची आई शीकच असे. मग रात्री तिला चहा करून द्यायला मला आवडू लागले. वेड्यासारखी तिच्या पुढ्यातल्या कॉम्पुटरवर चित्रे बघत बसायला लागली. घोरपड्यांचा नवा बाळ रडू लागला की गांवचे अंगाई गीत म्हणत झोपवू लागली. केंव्हा मी चाळीची शरयुताई झाली तेच समजले नाही. कोणत्याही खोलीतून मग अडीअडचणीला "शर्युताई" अशी हांक यायला लागली व मी तिथे हजर व्हायला लागली.

मला माहीत पडले होते, हेच आपले आयुष्य. मुंबईच्या चाळीतले, घुसमटवणाऱ्या उन्हाळयांतले, पावसांतल्या चिखलांतले. शेजाऱ्यांच्या घरोब्याचे, चिक्कार गर्दीच्या सहवासाचे. तरीही समाधान देणारे, सुख वाढवणारे.

जानवलीचे रान, बाग, घर आता फक्त आठवणीत ऱ्हाणार.  चार दोन वर्षांनी गेलोच जानवलीला, तर मजा करायला मिळणार.

आपला प्रवास पुरा झालाय माहेर ते सासर, जानवली ते मुंबई.

************************

# विचारवंत

लहानपणी वडिल नेहमी एक मराठी श्लोक म्हणत. "केल्याने देशाटन, पंडित मैत्री, सभेत संचार मनुजा चातुर्य येतसे फार" हाच श्लोक केंव्हा केंव्हा वेगळाच म्हणीत "केल्याने देशाटन, पंडित मैत्री, सभेत संचार, होतसे मनुज विचारवंत फार" अर्थात हे सर्व आमच्या हातून काहीतरी चूक झाली किंवा अजागळा सारखा एखादा प्रश्न विचारला गेला, की हे ऐकावे लागे. एके दिवशी मी त्यांना त्याचा अर्थ विचारला.

"अरे बाबा, माणसाने खूप फिरावे, देश विदेशी जावे, त्या लोकांचे रीती रिवाज अभ्यासावेत. हुशार लोकांची मैत्री करावी, सभा, वाद, संमेलनात भाग घेवून इतरांचे विचार जाणावेत. आयुष्यात मग काहीच कठीण पडत नाही. प्रसंगी कसे वागावे समजते. कठीण परिस्थितीत मग तुम्हीच तारतम्य वापरून निर्णय घेता. लोक तुम्हाला चतुर समजतात. तुम्ही चांगले विचारवंत होता. आपले विचार सर्वांना बोलून दाखवता. त्यामुळे मान मरातब मिळतो. सर्व काही मग तुम्हाला मिळते, मान, प्रतिष्ठा, धन, अधिकार सर्वच मिळाले की तुम्ही सुखी होता." वडिल सांगत होते.

"पण चतुर व्हायचे की विचारवंत? कोण होणे जास्त चांगले?" मी बाळबोध शंका विचारली.

"अरे गाढवाच्या लेका! विचारवंत झाल्या शिवाय चतुर होता येईल कां? श्लोकांत म्हटल्या प्रमाणे सगळीकडे फिरून निरनिराळे विचार अभ्यासून आपली विचारशक्ती व विवेकबुद्धी वाढवायची. ती वापरता वापरता तुम्ही चतुर होता. मग मला सांग पहिले काय व्हायचे?" वडिल

"विचारवंत!" मी एकदम ओरडलो. पण मला गाढवाच्या लेका संबोधलेले मात्र आवडले नाही. ते स्वतःलाच कमीपणा घेत होते.

"ते वापरायचे कसे?" वडिल

आता झाली कां पंचाईत. विचार कसे वापरतात? ते काय एकादी वस्तू आहेत की हातांत पकडून वापरता यायला?

“विचार कसे वापरता येतील, ते काय पकडता येतात? ते ऐकता येतात, आठवणीत ठेवता येतात.” मी गोंधळून विचारत होतो.

वडिल खो खो हंसू लागले. म्हणाले “वा! विद्वान वा! विचार, ज्ञान कसे वापरायचे काय? अरे विचार विवेकाने, तारतम्याने प्रसंगानुरुप वापरायचे असतात. म्हणजे पहा कोणी वैद्याने तुला दोन औषधे सांगीतली. तू पडलास व मुका मार लागला तर त्या ठिकाणी हळद तुरटीचा लेप कर व शेक. आणि खरचटून जखम झाली असेल तर हळद चुना खलवून लाव. हे विचार त्याने तुला सांगीतले. तुझ्या ज्ञानांत भर पडली. ते आठवणीतही राहिले. पुढे केंव्हातरी तू स्वतः किंवा तुझा मित्र पडला. त्याला लागले तर काय करायचे? पहिले लागल्याची जागा बघायची खरचटले की मुका मार आहे ते ठरवायचे. याला तारतम्य म्हणतात. मग त्या प्रमाणे औषध योजायचे याला. विचाराचा, ज्ञानाचा वापर म्हणायचे.”

बापरे फार भारी आहे. चिकार शंका अजूनही आहेत पण आज पुरे. मी गप्प बसलो.

विचार चालूच होते. मग छंद सुरू झाला. कोणी बोलू लागले की लक्ष देऊन ऐकायचे व ठरवायला बघायचे. हा माणूस विचारवंत आहे कां? विचारवंताना शोधून काढण्याचा चंग बांधला. नऊ दहा वर्षांचा मी असले छंद खूप जोपासायचो. परिणाम मात्र खोल होवू लागला.

माझ्या आत्याकडे गेलो तेव्हा आतेभाऊ आत्याला कोणाबद्दल काही सांगत होता. ऐकता ऐकता वाटू लागले आपला भाऊ खूप विचारवंत आहे. दुसऱ्याच्या चुका त्याला बरोबर समजतात. मग ज्याच्या बद्दल तो सांगत असे तो बुद्दु वाटे. त्याला विचारवंत कसा म्हणायचा? तो बुद्दुच. मग काही दिवसांतच माझ्या भोवती चिक्कार विचारवंत व चिक्कार बुद्दु गोळा झाले.

माझा हा आते भाऊ खूप फिरे. मुंबईला वारंवार जाई. म्हणजे देशाटन करतो. मामलतदार कचेरीत, कलेक्टर कचेरीत जातो. त्यांना गांठून कामे करवतो, एवढया मोठ्या सरकारी हुद्देदारांशी बोलून कामे करवून घेतो. म्हणजे पंडित मैत्री झाली. मग इलेक्शन आले व हा गावांत सभा भरवू लागला, सभातून बोलू लागला. म्हणजे याचा सभेत संचारही आहे. हाच तो विचारवंत, एक नंबरचा विचारवंत. माझी खात्री होत गेली. त्याला पहात बसण्याचा, बोलणे ऐकण्याचा, वागण्याचा सगळ्याचा मला अभ्यास करावासा वाटू लागला. मी आनंदित झालो होतो. एक विचारवंत माझ्या अगदी जवळ नात्यातच आहे याचा अभिमान वाटू लागला.

एके दिवशी मुंबईहून कोणीतरी पाहुणे या भावाकडे आले. दुपार नंतर त्यांचे जोरजोरांत बोलणे सुरू झाले. एकमेकांना दोष देत होते. काहीतरी हिशोब एकमेकांना सांगत होते. मी आ वासून सगळे ऐकत होतो. दोघेही विचारवंत? मला शंका आली. मग जास्त विचारवंत

कोण? जो जिंकेल तो. माझ्या मनाने कौल दिला. एक दीड तास भांडाभांडी झाली मग दोघेही शांत होऊन दूर झाले. जिंकले कोणीच नाही की काय? जास्त विचारवंत कसा ठरवायचा. मन काही स्वस्थ बसेना.

एकदम प्रकाश पडला “विचारवंत चतुरही असतो.” मग चतुर कोण? माझा भाऊ त्या पाहुण्याचे पैसे देणे लागत होता. त्याला भावाने काहीही न देता गप्प केले. म्हणजे भाऊ चतुर कां? हो! भाऊच चतुर. मन शांत झाले. मोठे कोडे सुटले होते.

दोन दिवसांत भ्रम उतरला. पाव्हणा जायला निघाला व भावाने त्याला पैसे दिले. राहिलेले थोड्याच दिवसांत देतो म्हणाला. आली कां पंचाईत! आता पाव्हणा चतुर ठरत होता. म्हणजे जास्त विचारवंत. मनावर ताण वाढला. केवढे कठीण असते विचारवंत ठरवणे. काही ठाम निकष असतीलच. ते लावले की सोपे जाईल. वडिलाना विचारू.

“आपल्या आत्याचा मधु मला विचारवंत वाटला बाबा.” मी वडिलाना म्हणालो.

वडिल हंसू लागले. म्हणाले “काय आदर्श विचारवंत शोधलास रे! अरे विचारवंतांची लक्षणे मधु सारखी असतात काय? एक नंबरचा बाष्कळ बडबड करणारा, शेंडी टोपी लावत फिरणारा, कामचुकार. मधु म्हणे विचारवंत! तुम्ही तुमचा अभ्यास करा विचारवंत शोधण्यापेक्षा विचारवंत व्हायला बघा.”

आदरार्थी संबोधल्यावरून समजलो वडिल नाराजीने बोलतायत. पण तीन निकष तर मिळाले. विचारवंत शेंडी टोपी करीत नाहीत. बाष्कळ बडबड करीत नाहीत. कामचुकार असत नाहीत. मिळेल! मला येईल शोधता विचारवंत. प्रयत्न मुळीच सोडायचा नाही. नाहीतरी मुसळे गुरुजीनी शिकवलेच आहे “प्रय़त्ने वाळूचे कण रगडीता तेलही गळे.” एकादा आदर्श विचारवंत समोर असल्या शिवाय आपल्याला कसे होता येईल? फक्त अभ्यासाने फार तर ज्ञानी होवू. पण वडिलाना बोलेल कोण? ते खूप वेळा चांगले काहीतरी सांगतात मग बुचकळ्यांत टाकणारे बोलतात. काही नाही अभ्यासही करायचा व विचारवंतही शोधायचा, प्रयत्न अजिबात सोडायचा नाही. हेच आपले ध्येय. तिसरीतल्या मला मग एक ध्येय सांपडले होते.

मुसळे मास्तर! हो मुसळे मास्तर विचारवंत असणार. किती शांत बोलतात! किती सुंदर शिकवतात! आपल्या घरचे मोठे लोक फार मान देतात त्यांना. मग त्यांना सगळे निकष लावून पहायला लागलो. बाष्कळ बडबड- नाही, शेंडी टोपी- करीत नाहीत, कामचुकार नाहीतच नाहीत. म्हणजे नव्या निकषांवर ते उतरतात. देशाटन केलेय?- माहीत नाही. पंडीत मैत्री- यांचे मित्र माहीत नाहीत, सभेत संचार?- कधी पाहिलेच नाही. आयला गोचीच झाली. कशी मिळणार ही माहिती? चला मुसळे मास्तरनाच विचारू.

“मास्तर तुम्ही कुठच्या कुठच्या गांवी फिरला आहांत?” देशाटन तपासायला मी प्रश्न विचारला.

“कां रे बाबा, आज माझ्या फिरण्यावर का घसरलायस तूं?” मुसळे मास्तर विचारते झाले.

“तसं नाय मास्तर, खूप फिरलेला मनुष्य हुशार, विचारवंत होतो ना? म्हणून विचारले.” मी

“म्हणजे माझी हुशारी तपासायचीय काय रे तुला? सांगायलाही लाज नाही वाटत? गुरू लोकांना मान द्यावा, विसरलास काय?” मुसळे मास्तरांच्या लाह्या फुटू लागल्या. बापरे विचारवंताचा शोध इतका तापदायक होईल कल्पनाच नव्हती. तेवढ्यांत समोरून हेडमास्तर आले व मुसळे मास्तरांना ओरडू लागले. मी तिथून सटकता सटकता ऐकले. “वेळच्या वेळी कामे करा. कामचुकारपणा मला चालणार नाही.”

माझा प्रश्न फटक्यात सुटला. मुसळे मास्तर कामचुकार म्हणजे विचारवंतात बसत नाहीत. मला या योगायोगाचे आश्चर्य वाटले. मनांत आले आपल्याला कोणीतरी अदृश्य शक्ती मदत करते आहे. प्रयत्न सोडायचे नाहीत. विचारवंत शोधायचाच, निदान एक तरी शोधायचाच.

एवढे लोक होते, नात्यातले, शेजारी पाजारी, गांवांतले, बाजारपेठेतले पण मला एकही विचारवंत कां सांपडत नव्हता?

आता परीक्षा जवळ येत होती. अभ्यासाला लागलो. गणित, कविता, बालवाचनातले धडे, व्याकरण यावरून घरातले सगळे लोक परिक्षेपूर्वीची तपासणी घेवून हैराण करीत होते. त्यांना चागली उत्तरे देता यावीत म्हणून पुस्तके डोळ्या समोर धरावीच लागत. मास्तर उजळणीच्या नांवाखाली तेच तेच उगाळीत. या सर्वांत विचारवंताचा शोध मागे पडला. बालमनाप्रमाणे विसरून गेलो. परीक्षा, रिझल्ट, वरचा वर्ग, नवी पुस्तके, नवी पाटी, नवे कपडे यांचा नवा सुगंध सुखी करू लागला. शाळा सुरू झाली. मित्रांबरोबरचे खेळ वाढले. आणि एकुलते नवसाचे ध्येय पूर्ण विस्मरणांत गेले.

एक दोन वर्षे अशीच गेली. एके दिवशी मी थंडी तापाने आजारी झालो. मग मला बघायला आलेले नात्यातलेच एक वकील व नेहमी तपासून औषध देणारे डॉक्टर व वडील माझ्या बिछान्या भोवती कोंडाळे करून गप्पा मारत बसले होते. डॉक्टरनी सिरींज उकळत ठेवल्या होत्या. त्या चांगल्या दहा पंधरा मिनिटे उकळे पर्यंत त्यांना वेळच वेळ होता. तो शनीवार असल्यामुळे वकिलाना कोर्ट नव्हते. वडील तर गांवची कामे टाकून मी आजारी म्हणून आलेले. त्यांच्या गप्पांना त्यामुळे रंग चढत गेला. कोणीतरी आप्पासाहेब त्यांचे काम या विषयी ते बोलत होते. मला विषेश रस नव्हता. पण मधेच वकील बोलले “आप्पासाहेब साहेब म्हणजे कर्मयोगी माणूस, अतिशय हुशार, अतिशय विचारवंत.”

“विचारवंत” शब्द ऐकला मात्र आणि मागच्या आठवणी जाग्या झाल्या. आपण विचारवंताचा शोध थांबवलाय. नाही चालणार असे. शोध घेतलाच पाहिजे. कोण? हे आप्पासाहेब कोण? मग त्यांचे बोलणे लक्ष देवून ऐकू लागलो. वकील बोलत होते.

“स्वावलंबनानी त्यानी गोपुरी वसवलीय. काय सुंदर गांव वसवलेय. गोबर गॅस घराघरांत आहेच पण गोपुरीच्या रस्त्यावरचे दिवे देखील गॅस वर चालतात. जपानी पद्धतीने भातशेती करतात. पवन चक्कीने शेतीला पाणी लावतात. हे कर्मयोग्याचेच काम, फार विचारवंताचेच काम. संन्यस्तपणे काम करतात. बोलणे सुद्धा फार मृदु.”

मला विचारवंत माहीत पडला होता. गोपुरीतले आप्पासाहेब हेच ते विचारवंत. बरोबरच विचारवंताची अनेक लक्षणे वाढत गेली. पूर्वीच्या लक्षणांत आणखी भर पडत होती. विचारवंत कर्मयोगी असतो, मृदुभाषी असतो, स्वावलंबी असतो व संन्यासी पण असतो. शाळेत व्याकरणात विशेषणे चालू झाली होती. आणि विचारवंताची विशेषणे माझ्या डोक्यांत फेर धरत होती.

पण एक बरे वाटत होते. विचारवंताचे एक लक्षण अगदी ओळखण्या जोगे मिळाले होते. तो संन्यासी असला पाहिजे. म्हणजे संन्यासी बघितला की तो विचारवंत आहे की नाही ठरवायचे. पण कशाला, आप्पासाहेबांनाच भेटू की. शोधत बसायची काय जरूर! मग गोपुरीत जायचा बेत ठरवायला लागलो. चार मैलांवरच्या गोपुरीत एकट्याने जाणे शक्य नव्हते. वाटेत नदी होती. थोडा रस्ता जंगला सारखा होता. तिथे एकट्याने जायला भिती वाटायची. म्हणून अशोकला गळ घालायला सुरवात केली. अशोक माझा वर्ग मित्र.

अशोकने विचारले “कशाला रे बाबा जायचे एवढे लांब तंगडतोड करीत?”

“मला आप्पासाहेबाना बघायचंय. जमलंच तर त्यांना भेटायचंय.” मी

“त्यांना भेटून बोलून काय मिळणार तुला?” अशोक

“अरे बाबा! ते फार विचारवंत आहेत, कर्मयोगी आहेत, संन्यासी पण आहेत. त्यांच्या कडून शिकण्यासारखे खूप आहे” मी

एकाद्या विचित्र किंवा जगावेगळया गोष्टीकडे पहावे अशा नजरेने बराच वेळ अशोक माझ्याकडे पहात राहिला. मग बोलला, “मला कर्मयोगी म्हणजे काय माहीत नाही. मला संन्यासी व्हायचे नाही. विचारवंत होवून काय करायचे ते माहीत नाही. मोठा हो व बाग सांभाळ म्हणून बाबा सांगतो. एस.एस.सी पर्यंत शीक म्हणजे शेतीचा हिशोब लिहीता येईल. असे बाबा सांगतो. शाळेत अभ्यास काय कमी आहे ते हे नवे लचांड तू गळयांत बांधतोयस?” मग जोरांत ओरडून इतर मुलांना म्हणाला, “अरे उद्या पासून गोविंदाला विचारवंत म्हणा रे!” मग माझ्याकडे वळून म्हणाला “बस् खूष? झालास ना तू विचारवंत? आता गोपुरीत जायसाठी डोकं खाऊ नको.”

मी ओशाळून गप्प बसलो. अशोकचा राग आला. पण खरेच कर्मयोगी म्हणजे? स्वावलंबी म्हणजे? आयला विचारवंताचा शोध मला चांगलाच विचारांत टाकत होता. विचार नवरात्रीतल्या गोंधळा सारखे डोक्यांत फेर धरत होते. विचारवंत मात्र हाती लागत नव्हता. माझा शोध दुसऱ्या कोणाकडेही बोलणे कठीण वाटत होते. अशोकने उडवली तशी खिल्ली बाकीच्यानीही उडवली तर?

मी विचारवंताच्या शोधांत एकटा पडलो होतो. परिक्षेत मार्क चांगले मिळत होते, वरच्या वर्गात जात होतो, वांचन वाढत होते, वयाने वाढत होतो, खूप लोक भेटत होते, विचारांची देवाण घेवाण वाढली होती. आणि एके दिवशी साक्षात्कार झाला. विचारवंत वेगवेगळ्या प्रकारचे असतात. काही गणिताचे ज्ञानी, काही व्यापाराचे, काही कायदेबाज तर काही सेवाभावी, काही विनोदवीर तर काही धर्मवाचस्पती. आता एक नक्की झाले होते सर्वगुणसंपन्न असा विचारवंत नसतो, दोन विचारवंत सारखे नसतात व आपल्याला एकाद्या विचारवंताचा आदर्श ठेवून अगदी तसेच होता येत नाही. लहानपणीचा विचारवंतांचा शोध किती पोरकट होता ते मनांत येऊन हंसू आले.

चला मनावरचे एक दडपण व विचारवंताचा शोध दोन्ही थांबले. मूळ कर्तव्य जे त्या अभ्यासांत मन रमू लागले. पण एक नवाच छंद लागल्याचे अचानक माहीत पडले. कोणी आपले विचार मांडू लागला की त्याचा अभ्यास किती खोल आहेत हे पडताळू लागलो. कोणी भांडू लागला की तो मुद्देसूद भांडतोय की नाही? भांडणाचा अभ्यास सखोल आहे की नाही यावर विचार यायचे. एकादा मित्र दुसऱ्याला काही बंडल मारत असेल तर त्याची शिताफी परीपक्व आहे कां? एकादा बुवा तल्लीन होवून भजन म्हणताना प्रसाद आला तर विचलीत होतो कां? लेक्चर देणारा प्रोफेसर अभ्यास करून तयारी करून आलेत कां? कॉलेज, नोकरी, मग सुरू केलेला धंदा या सर्व व्यापांत हा एक छंद कायम जोपसला गेला. प्रत्येकाबद्दल प्रश्न व विचारवंताची पायरी ठरवण्याचा छंद.

कितीतरी प्रश्न नवीन नवीन भेटणाऱ्या लोकांबाबत सुरू व्हायचे व त्यांच्या व्यक्तित्वाची चीरफाड मनांत सुरू व्हायची. कित्येकांचे बोलणे मला प्रथमदर्शनीच पटे. मग काही दिवसानी ते कसे चूक आहे ते समजे. केंव्हा केंव्हा चांगला वाटणारा एकादा अशी काही टोपी लावे की मग त्याच्याशी सबंध बिघडत. कित्येक मित्र गाढे होत त्यांची मते पटत. त्यांचे विचार घ्यावेसे वाटत.

सुधीरला मी म्हणालो "काय एक एक लोक असतात! प्रथम दर्शनी चांगले वाटतात मग शेंड्या लावतात."

"गोविंदा इथेच चुकते तुझे. समोर आलेल्यावर तू एकदम भरोसा करतोस. मी नाही तसे करत. मी त्याला सर्व दुर्गुणसंपन्न समजतो. मग सहवास वाढत गेला की तो कोण कोणत्या बाबतीत चांगला आहे ते ठरवत जातो. मग त्याच्या न पटणाऱ्या वागणुकीत भाग घेत नाही की त्याला साथ देत नाही. त्यामुळे फसण्याचा की बदनाम होण्याचा प्रश्नच येत नाही. मगच मैत्री होते."

सुधीर माझ्या वागणुकीच्या अगदी विरूद्ध सल्ला देत होता. पण तो मला पटत होता. दुसऱ्या क्षणी माझी चमकली. याने मला देखील पहिल्यांदा असाच तपासला कां? मग माझ्यांत कोणते दोष मिळाले याला ? विचारलेच पाहिजेत. म्हणतात ना निंदकाचे घर असावे शेजारी. बघू विचारू केंव्हातरी. तुम्ही म्हणाल सुधीर कोण?

जे विचारवंत अगदी जवळ आले व माझ्याभोवती फेरधरून बसले ते तिघेजण. सुरेश, सुधीर व सुहास. तीन "सु"स्वर. तिनही जणांचे विचार वेगळे. ते माझ्या आयुष्यात कफ, पित्त, वाता सारखे जाम चिकटून बसले. तसेच मोसमा प्रमाणे बळावत. म्हणजे ते एकदा आले की सारखे सारखे भेटत. गायब झाले की महिना महिना भेटत नसत. पण मीच त्यातला लसावी होतो. तीघांचाही मित्र. ते मात्र तसे गाढेमित्र नव्हते. एकमेकांशी त्यांची ओळख बहुदा माझ्याकडेच भेटण्याने झाली असावी. पण एका बरोबर माझे विचार मंथन चालू असले की दुसरा कटे. स्वभाव धर्म वेगळे दुसरे काय.

सुधीर फार तत्वनिष्ठ, पण अतिशय हिशोबी. नव नव्या शोधांवर विश्वास ठेवणारा. तत्व मोठे त्या पायी त्याने कित्येक नोकऱ्या घालवल्या. धंदा करणाऱ्यांचे मार्ग अजिबात पसंत न करणारा हा माणूस. म्हणून सारखा नोकऱ्या घालवणारा. सांपत्तिक अस्थिरतेवाला. अगदी अश्रद्ध. सत्यनारायणाच्या प्रसादाला शीरा म्हणणारा. भाषांवर प्रचंड प्रभुत्व असलेला, कवी (विडंबनात्मक), विनोदातच बोलणारा, पोटतिडकीने समाजीक परिस्थतीवर मते मांडणारा, पण प्रसंगी, कठीण परिस्थितीत किंवा गरजेला उभा रहाणारा सुहृद.

सुरेश स्वभावाने भयंकर खट, घिस्से घालण्याची फार हौस. स्वतःचे मत हेच बरोबर व दुसरे सल्ले देतात ते बे अकली या ठाम समजाचा. कधीही सरळ न बोलणारा. विषयात कधी पकडला जाणार असे वाटले की साळसूद पणे विषय बदलणारा. कधी कोणाच्या कचाट्यांत न सांपडणारा. माशा सारखा सुळसुळीत. लोक संग्रह फार. उपजीविकेसाठी काढलेल्या कारखान्यात मित्रांच्या मैफिली जमवून गप्पा मारणारा. पण माझ्याशी जीवापाड मैत्र जपणारा.

सुहास एक अप टु डेट माणूस, पण पैसेवाला असूनही बेहिशोबी कारभार करणारा. पैसे खोऱ्यानी कमवी पण लोक त्याच्याकडून लीलया पळवीत. कारखानदार, कामसू, हुशार पण लोकांवर अवास्तव विश्वास ठेवून स्वतःचे नुकसान करून घेणारा. त्याबद्दल बोलू गेल्यास ठाम पणे आपणच कसे बरोबर हे अट्टाहासाने समजावायचा प्रयत्न करणारा. रसीक, कदाचित असू नये एवढा रसीक.

असे ह्या तीन "सु"स्वरानी, माझ्यामते विचारवंतानी माझे आयुष्य मात्र आपल्या विचारानी भरून टाकण्यास सुरवात केली. विचारवंताच्या मी ठरवलेल्या सांच्यात ते बसत होते. सप्तसुरां ऐवजी तीन सूरच मला आयुष्यात पुरले होते. या सर्वांचे विचार व वागणूक जर तुमच्या समोर मांडली तर समजेल की ते कसे विचारवंत होते.

पहिली ओळख सुरेशची. माझ्या कारखान्यांत जायचा रस्ता त्याच्या कारखान्यासमोरून जाई. मी शहरांत नवीनच आलेला. पत्ता विचारायच्या निमित्ताने मी त्याच्या कारखान्यांत गेलो तो कायमचाच. मग येताजाता माझे पाय आपसुक त्याच्या कारखान्याकडे वळत. तीन चार जणांचे कोंडाळे गप्पा मारीत बसलेले असे. हळू हळू मैत्री वाढली. घरगुती सबंध तयार झाले. चहा पाण्यावरून जेवणाच्या निमंत्रणा पर्यंत मजल गेली

व मला पहिला साक्षात्कार झाला. सुरेश मैत्री कशी वाढवतो, काय बोलतो याचे प्रात्यक्षिक पाहिले. जेवण झाल्याबरोबर सुरेशराव बोलते झाले "वा! वहिनी वा! काय अमृत आहे हो तुमच्या हातांत! असेच बोलवत जा अधून मधून."

लोकांना खायला घालून तारीफ ऐकायची फार आवड असलेल्या आमच्या अर्धांगाला याने पहिल्या जेवणांत गारद केले. अर्धांगीनीच्या चांगल्या लोकांच्या यादीत हे पहिल्या क्रमांकावर जाऊन बसले. मग काय घरांत काही चांगले रांधले गेले की जेवणाचे आमंत्रण सुरेशला न चुकता मिळू लागले. दुपारी मी घरी जेवण्यास येई. सुरेश कारखान्यांत जेवे. मग दुपारी केव्हा केव्हा नव्या वानगीचा डबा मला त्याच्या साठी न्यावा लागे. माझ्या समोरच तो सर्वांना वाटत खाई व ताबडतोप फोन करे. "वा! वहिनी मझा आला, काय अमृत आहे तुमच्या हातांत पण खरं सांगू जरा कमी पडले हो. पुढच्या वेळी जरा मोठा डबा पाठवालच तुम्ही. पण खरंच मझा आला." तो पुढचे बुकिंग असे करीत असे. केवढ्या मेहेनतीने, सखोल विचाराने हे त्याने आत्मसात केले होते.

एकादी नवीन वस्तु घेण्या आधी फार विचार करणारा. कित्येक वेळी भिजत घोंगडे टाकणारा. काहीही असेना प्रत्येक गोष्ट मनाची तयारी करूनच केली पाहिजे यावर ठाम असणारा व त्यामुळे कित्येक संधी फुकट घालवणारा. सुरेश त्याच्या या संवयीं मुळे फार विचारवंत वाटू लागला. काम झाले काय की नाही झाले काय, विचार हा केलाच पाहिजे या धर्मातला सुरेश.

विनोद सांगणे हा दुसरा गुणधर्म. तुम्ही भेटलांत की पांच दहा मिनीटांच्या औपचारानंतर तो विनोदावर पोहोचे. त्याचे कित्येक विनोद मी परत परत ऐकलेत. दरवेळी तपशील, पात्रांची नांवे, प्रसंगाची ठिकाणे अशी बेमालूम बदली की वाटे नवीनच विनोद सांगतोय. पण विनोद पुढे सरकू लागला की समजे हा जुनाच विनोद नवीन शब्दांत सांगत आहे. तो प्रसंगाला, व्यक्तीला नाहीतर परिस्थितीला साजेसा असायचा. हे सर्व करण्यास त्याला केवढा विचार करावा लागत असेल? विचारवंतच तो दुसरे काय!

फार धडपडया, तसाच उपयोगी पडणारा माणूस. एकवेळ एकाद्या चांगल्या प्रसंगी भेट देणार नाही. पण कोणी गचकले तर हा स्मशानात नक्की भेटे. म्हणे "अशाच वेळी मैत्रीची खरी गरज रे गोविंदा. माणसांना दुःख विसरायला थोडी फार मदत होते." पण त्याचा स्मशानातला सहवास तापदायक होई. हा ओळखीच्यांचे कोंडाळे जमा करी व विनोदाच्या पुड्या सोडू लागे. आमची पंचाईत होई. ज्या ठिकाणी आंबट चेहेरा दाखवत बसायचा, तिथे हसले तर बरे नाही असे वाटे. मग सगळ्या लोकांकडे पाठ करून विनोदाला दाद द्यावी लागे.

यावरून मी त्याला एकदा बोललो देखील. तर म्हणतो कसा "दोन प्रकार असतात रे. एक खरोखरचे दुःखी व दुसरे मनात सुखावलेले. असे नातेवाईक जेंव्हा आपल्याला पहातात तेव्हा पहिल्या प्रकारातले लवकर सावरतात. समजतात हाच सृष्टीचा नियम. दुसऱ्या प्रकारातले मग माझ्याकडे येतात व हळूच विचारतात, काय सांगून हसवीत होतात हो

सगळ्याना? आम्हालाही सांगा ना. म्हणूनच स्मशान ही विनोद सांगण्याची योग्य जागा." हे तत्वज्ञान भारी असले तरी खरे वाटले. केवढ्या अवलोकनाने त्याने हे विचार आत्मसात केले असतील! असा हा भारीतला विचारवंत मला लाभलेला.

सुधीर दोन अंगानी विचारवंत वाटे. विनोद, छळणुक करणाऱ्या कविता, प्रत्येक बैठकीचा ताबा स्वतः कडे घेवून शब्दछल करणारा सुधीर हा वाहाता वाटे. कित्येकाना पांचट वाटे. त्याची दुसरी बाजू गंभीर होती. प्रत्येक नोकरीत वरचे लोक कसे चूक ते त्यांनाच पटवायचा प्रयत्न करी व नोकरी घालवून बसे. ज्ञान असे सुदृढ की थोड्यांच दिवसांत दुसरी नोकरी लागे. त्यामुळे दर वेळी "तू आता कुठे आहेस?" हा प्रश्न आमच्या कडून जायचा. जगाला सुधरवायलाच पाहिजे, नाठाळांना वठणीवर आणलेच पाहिजे अशा जहाल मतांमुळे कित्येक नोकरीत त्याने प्रश्न उभे केले होते. त्यांतून कंपन्याना त्रास होत असला तरी आम्हा मित्रांना कित्येक वेळा हे विनोदीच वाटे. यांची मात्र नोकरी गेलेली असे. स्वतःच्या विचारावर एवढी भक्ती ठेवणारा दुसरा विचारवंत मला अजून तरी भेटलेला नाही.

कंपनीत संप झाला की परसोनेल मॅनेजरला बाजूला ठेवून हे संप तोडण्याचा आटोकाट प्रयत्न करीत. कंपनीत चोरी झाली की चोर शोधून त्याला चांगलाच जेरीला आणीत. वास्तविक हे काम परसोनेल मॅनेजरचे पण हे आपला चंचुप्रवेश करून मोकळे होत. एकदा वर्नियर चोरणाऱ्या कामगाराला यानी बरोबर पकडला. घरून उचलून आणला. चोप देवून कबूल करवले. त्याने दिलेल्या माहिती वरून घरी वर्नियर मिळाला मात्र, यांनी वस्तऱ्याने त्याच्या डोक्यावर दोन पट्टे काढून सोडून दिले. कंपनीत जोरदार वादळ उठले. युनियनने केस केली. हे एकच हेका पकडून बसले. "माझ्या डिपार्टमेंट मधे झालेली चोरी मी शोधणार नाहीतर कोण? दाखवला ना चोर पकडून, मग कां दोष देता. काय ती इनक्वायरी करा, कागदपत्र तयार करा मग करतो की सही. कोण हरीचा लाल येतो मला विचारायला ते बघतोच."  पण विचार सरळ, कोणीही चोरी करू नये. तसेच शोधांवर, टेक्नॉलॉजीवर विश्वास ठेवून आपले आयुष्य संपन्न करावे हा विचार. देवभक्त दिसला की त्याची खिल्ली उडवायची. पण त्यांत एक स्पष्ट विचारांची बैठक होती. शोध, शास्त्र हेच खरे बाकी सर्व थोतांड

आजही मला तो जबरदस्त प्रसंग आठवतो. कोणीतरी एक बाई देवीचा अवतार म्हणून सगळीकडे सभामिरवणूका काढत फिरत होती. तिने डोक्यावर हात ठेवला की म्हणे सर्व अंगात लहरी उठतात. मग सुधीरचे भाष्य सुरू "त्यांत काय बाईनी हात लावला तर शिरशीरी येणार नाहीतर काय होणार?"

"पांचटपणा पुरे सुधीर. अरे काही तरी सिद्धी असेल त्या बाईंकडे." मी बोलता झालो.

"सिद्धी? कुठल्या युगात आहेस तू? अरे सिद्ध करून दाखवतो ती फालतुगिरी करून पैसे उकळतेय. येतोस माझ्याबरोबर? बघ मी तिला कसे उघडे पाडतो ते?" सुधीर

सुधीर विचारवंत असला तरी उपद्व्यापीही होता. मनांत येताच माझ्या पोटांत गोळा आला. मात्र बोलताना पटकरून  सांवरत बोललो. “कामे काय थोडी आहेत! कशाला ह्या लष्कराच्या भाकऱ्या भाजायच्या!”

पण ह्या गृहस्थाने चंगच बांधला. दुपारी आमचे बोलणे झाले तोच संध्याकाळी हे गृहस्थ तिच्या दर्शन सोहळ्याला गेले. रांगेत उभे राहिले. नंबर लागताच यांनी भक्तिभावाचा आव आणून तिच्या पायावर डोके ठेवले. तिने डोक्यावर हात ठेवताच यानी तिच्या तळव्याना जोरांत गुदगुल्या केल्या. बाई खवळल्या “ये पापी है. नास्तिक है. इसे सभासे उठाके फेक दो.” मग काय! दोघे तिघेजण त्यांच्या अंगावर धांवले. हे तसे पहेलवान गडी. त्यांचे हात करकचून पकडीत यांनी समोरच्या माईकवर ओरडून सांगायला सुरवात केली,

“हूं मै नास्तिक. ये बाई ठगा रही है. इसके पास पॉवर है तो मेरा बुरा करके दिखाये. नही तो इधरसे भाग जाये. देखता हूं किसमे जादा पॉवर है. कल भी आऊंगा.”

सभागृहांत एकच गोंधळ झाला. पोलीस सर्व घडी बसवायचा प्रयत्न करू लागले. यांनाही भाविक लोकांच्या चार पांच थपडा खाव्या लागल्या. हे मग तिथून निघत असतानाच आणखी पोलीस हजर झाले. हे सटकले. सभा विस्कळली. बाई निघून गेल्या. हे दुसऱ्या दिवशी वीरवाणीने सांगू लागले “बघ गोविंदा! पाडली की नाही उघडी त्या बाईला? बघ आज ती दर्शन बिर्शन रद्द करते की नाही.” आणि खरेच दुसऱ्या दिवशी दर्शन तर सोडाच पण बाई देखील चंबूगवाळे घेऊन निघून गेल्याची बातमी वर्तमान पत्रात झळकली. जाताना भाविकाना म्हणाल्या म्हणे “ये पापी शहरमे मैं फिर नही आऊंगी.” मग काय वर्तमान पत्रातली ही बातमी फडफडवत हे विजयी वीर परत एकदा माझ्यासमोर आले. “असल्या भुक्कड लोकाना उघडे पाडले पाहिजेत रे गोविंदा. लोकांना लुटतात बुवाबाजीने”

किती खरा होता सुधीर! त्याची स्वतःच्या विचारांवरची श्रद्धा बघून मला आनंदच झाला होता. एक खास विचारवंत माझा मित्र होता याचा अभिमान वाढला.

खूप दिवस गायब झाल्यावर भेटला व विचारले तर सांगे “अरे गोविंदा! रजा होती तर गेलो सक्ख्या बायको बरोबर थंड हवा खायला.”

“बायको सक्खीच असते, आणखी दुसरी कसली असणार?” चूक उमगण्या अगोगर प्रश्न माझ्या तोंडून निसटलेला असे.

“अरे वा! तुला माहीतच नाही जणू! पूर्वी सक्ख्या बायकोबरोबर ठेवलेली म्हणून असायची. पण ती लग्नानंतरच यायची. आज काल ती अगोदर पण येते नांव बदलले इतकेच. लिविंग ईन रिलेशनशिपवाली. तिच्या बरोबर नाही जमले किंवा स्थिर व्हायचा विचार आला की मग लग्न. तेही तिच्याशी नाही. शिवाय इतरही असतात रे अंधारातली नाती. उजेडात आली तर इज्जतचा फालुदा करणारी. तर मग या जगांत रहायचं तर नको कां स्पेसीफिक असायला.” सुधीर विचार सडेतोड उलगडत होता व मला पटत असले तरी अनकंफर्टेबल वाटत होते.

असा सुधीर विचारवंत. याच्या विचारांना लोणावळ्यासारख्या थंड हवेच्या ठिकाणी काव्याचा बहर आलेला देखील मी पाहिला आणि थक्क झालो. तो जबरदस्त विनोदी. विचारांची दिशाच वेगळी.याची बदली लोणावळ्याला झाली. महाशय एकटेच गेले. मग संध्याकाळी वेळच वेळ. याना मनाचे श्लोक सुचू लागले तेही विनोदी. दोन चार उदाहरणा दाखल देतोय पण एक नम्र विनंती आहे. त्यांतला वाह्यातपणा बाजूला ठेवून सुधीरच्या विचारशक्तीचे माप ठरवा.

मना सांगपा शी- क्षणी काय झाले,
अकस्मात होणार होऊन गेले.
जीवाच्या आकांता ' सुलभ ' सापडेना,
फजीती अशी की कुणा सांगवेना,

हे विडंबन ऐकताना सगळे हंसत होते. पण मी विचारांत होतो. कसे सुचले याला? शिक्षण कुठे शी-क्षण कुठे. आचार्य अत्र्यांनी याच्या डोक्यावर हात ठेवला होता की काय? हे विचार चालू असताना कित्येक शी-क्षणांवरचे श्लोक निसटले व नवीनच श्लोक ऐकू आला.

मना शोक कैसा न मिळता हापूस
बांबू च चोखून समजावा ऊस
येथे '**माधुरी** ' फक्त '**नेने** 'स मिळते
आरश्यात पाहता आम्हास ही कळते

वैफल्याची छटा दाखवीत हा श्लोक ते असा काही सांगत होते की सगळ्यांची हंसून हंसून पुरेवाट होत होती. माधुरी त्यावेळी कित्येक दिलांवर राज्य करीत होती. हे त्यांतलेच एक. पण उघडपणे जाहीर करणारे तसेच "ही शक्यताच नाही " हे सत्य मानणारे. बघा विचार कसे स्पष्ट. ह्या विचारवंताचे अवलोकन करता करता मला आनंद मिळत होता. माझ्या विचारवंताच्या शोधातला हुकमी एक्का माझ्या हाती आलाय असे वाटतानाच पुढचे दोन श्लोक अग्नीशमनाच्या गाडी सारखे ढणढणत समोर आले.

मना साठ वर्षे, असा देश कैसा
महाराज वेषे उभा भिक्षु जैसा
जिरेटोप शोभे नुसते कपाळी
वस्त्रांत लपली हाडांची ती जाळी।।

नशीबी नसे शौचकूपांत हगणे
बहुतांश गाती निसर्गांत गाणे
शोकांतिका कां अशी आम्ही पाहू
चंद्रावरी पण निसर्गांत जाऊ।।

वैफल्यातून बाहेर येत त्यांचे श्लोक आता समाजकारणाचे रूप घेत होते. चंद्रावर जायची तयारी करणारा भारत एकीकडे, तर सुधरायला तयार नसलेला भारत दुसरीकडे, किती खरे वर्णन होते. भाषा असेल भडक पण किती विचारांती वापरली होती. हे विचार ऐकणाऱ्याला बंबाचा फवारा भिजवून टाकेल तसे पूर्ण भिजवीत होते. पहिल्या हंसण्या नंतर मूक करीत होते, विचार करायला लावीत होते.

मला विचार आला, विनोद करणे आधीच अवघड पण आमच्या ह्या विचारवंताने रामदासांच्या मनाच्या श्लोकांची अगदी विरुद्ध दिशा थंड हवेच्या ठिकाणी कां व कशी पकडली? या विचारांत कित्येक दिवस मी बुडून होतो. लोणावळयातल्या पावसांतली इंद्रधनुष्ये बघून त्यानी ह्या विचारांच्या छटा उचलल्या कीं खडाळयाच्या धबधब्यानी यांना ऐकणाऱ्यांचा कडेलोट करणारी भाषा दिली. हा विचारवंत होताच होता, पण दुसऱ्यांच्या विचारांची दिशा कायम बदलत असे. त्यामुळे प्रत्येक भेटीत हा कुठल्या मूडचा विचार आणणार हे कोडे असायचे. आज देखील भेटला की हास्याचे फवारे उडतात किंवा देव, धर्म, धर्म बुडवे, शास्त्र, नवीन शोध यावर ज्ञानवर्धक आख्यान होते. नाहीतर आपले सध्याचे मालक कसे चोर आहेत ते पैशाची अफरातफर कशी करतात, पैसे कसे खातात, कामे रेंगाळवून सरकारला कसे लुटतात यावर पोटतिडकीने केलेली टीका असते. पण सर्वांतून मांडलेले विचार मात्र मनावर पक्के परिणाम करतात. एक मला लाभलेला चक्रवादळी, इंद्रधनुष्यासारखे सप्तरंगी विचारांचा विचारवंत सुधीर.

सुस्वरातला तिसरा विचारवंत स्वर म्हणजे सुहास. मोठ्या कंपनीत नोकरी केली व एक दिवशी धंद्यात पडले. पडले म्हणणे चुकीचेच, वाक्प्रचार बरोबर असला तरी सुहास धंद्यात कधी पडला नाही. मोठ्या प्रोजेक्टची भरपूर कामे मिळत. पैसेही भरपूर मिळत. म्हणूनच धंद्यात खरोखर तर वर आला म्हणायला हवे. पण पडलाच म्हणायचा तर तो व्यवहारात फार कच्चा म्हणून, किंवा उत्पन्नाची शिस्त न बाळगल्याने पडला म्हटले तर जास्त बरोबर होईल.

अमाप पैसा येई. बंगला बांधला चौपट खर्चाने. सर्वच एजंसी लुटत होत्या. सांगायला गेले तर म्हणे "मी आर्कीटेक्टचेच ऐकणार. त्याला कशाला नेमलाय? तो सांगेल ते बरोबर. तुम्ही काय आर्कीटेक्ट आहांत?" विचार एकदम सुदृढ. वादातीत. मग आम्ही फक्त त्याची लुटफाट याची डोळा बघत असू. पण म्हणू "बंगला छान होतोय तुझा. मोठ्ठा बांधतोयस रे." मग स्वारी खूष. आम्हा मित्राना एकच अधिकार, पूर्ण विचाराअंती दिलेला. तो फक्त नावाजण्याचा, टीका करण्याचा नाही.

मोठ्या कंपनीत मोठ्या पोस्टवर काम केल्याने सुहासला काही एक्झीक्युटीव संवयी लागलेल्या. तो बडोदा मुंबई देखील विमानाने जाई. खरेतर कंपनीला लुटणाऱ्या एक्झीक्युटीव लोकांचे हे मानक. "आपण आपल्याच कंपनीला काय खर्चात टाकायचे?" या

कंजूस विचाराचे आम्ही कारखानदार, त्याला समजावू गेल्यास आम्हालाच एक बौध्दिक मिळे.

"कंपनीची इमेज वाढवायची तर विमानानेच जावे लागते. मोठ्या एक्झीक्युटीव्जवर त्याचा रुबाब पडतो. तुम्हाला काय समजणार! धंदा करायचा तर रुबाबात." परत स्पष्ट विचार. आम्हाला एकदम खुजे झाल्या सारखे वाटे. त्याचे विचार पटत. पुढच्या फेरीला आपणही विमानाने जायचा आम्ही चंग बांधायचो. वेळ आली की खिशांत हात जाई व रेल्वे स्टेशनचा रस्ता धरू. काय करणार? आमच्यावर प्रभुत्व "अंथरुण बघून पाय पसरावेत" या वाक्-प्रचाराचा. विमानाचे तिकीट पोटांत गोळा उठवी. एखादी जीवनशैली काहीजणानाच शोभते हेच खरे.

चोखंदळ आयुष्य जगणाऱ्या सुहासचे आयुष्य चोखंदळ विचारांनीच घडले होते. प्रत्येक गोष्टीत ते प्रतीत होत असे. त्याने बांधलेले घर व आजूबाजूची बाग फार सुंदर होती. बागेत टेबल लावून संध्याकाळी होणारे सोमरसपान चोखंदळपणाने भरलेले असे. त्याची ग्लासेस, डिशेश, ॲरेंज केलेले खाद्य, मंद लाईट, हळू लावलेले संगीत हे सगळे कसे त्याचा चोखंदळ स्वभाव प्रतीत करी. त्याचा कारखानाही तसाच. दर्शनीच सुंदर बाग, बागेत बसवलेली गणपतीची मुर्ती, फुलझाडे, मग कारखाना अगदी सुंदर योजून बांधलेला. याचे योजन सुंदर पण काही कॉंट्रॅक्टरनी थोड्या बहुत त्रृटी स्वतःच्या मर्जीनुसार घुसवलेल्या. म्हणजे पहा. छप्पर अर्धगोलाकार सिमेंटच्या पत्र्यांचे. ते एका आर सी सी च्या पन्हळीत उतरत. या पन्हळीला जर व्यवस्थित उतार दिला असता तर पावसाचे पाणी झटकन निघून गेले असते. पण घरच्याच कॉंट्रॅक्टरने एवढी काळजी घेतली नाही. त्यामुळे पावसाचे पाणी पन्हळीतून पाईपने खाली जाण्या ऐवजी उभरून कारखान्यातच पडे. बहुतेक उतार एका बाजूला व पाईप दुसऱ्या बाजूला अशी स्थिती झाली असावी. पण त्यावरही सुहासचे सुविचार "होते रे असे. आपलेच लोक आहेत. आपण कमवलं की त्यांनाही वर आणायचं असतं"

असा विचारवंत माझ्या मित्रांत होता. तसा रसिक देखील. हाडाचा रसिक फक्त शृंगारीच नसतो तर खानपानांतील त्याची स्टाईल, पदार्थांना हाताळण्याची पद्धत, स्वाद घेतानाचे पसंतीचे हावभाव हे सगळेच वेगळे असते. त्यात हावरटपणा की बुभुक्षितपणा जराही जाणवत नसे. "ये तो बडी नजाकत से खा रहा है " असेच माझ्या मनी येई. किती विचारपूर्वक त्याने हे साध्य केले असेल असे वाटे.

तसा चांगलाच कृष्ण मुरारीचा अवतार होता, पण तो त्याच्यावर फिदा होणाऱ्यांमुळे की याच्याच प्रयत्नांमुळे ते मात्र समजले नाही. पण मैत्रिणी चिक्कार. सगळे दोष देत, ते त्यांच्या जळकू स्वभावामुळे. हा मस्तरामच असे. जर चुकून विचारले तर म्हणे "जळू दे रे त्यांना मला काय फरक पडतो?" इथे देखील हा बेदरकार पण बोलण्याची फेक चोखंदळ. मागचा विचारही सखोल "कशाला लक्ष द्या, भांडून काय होणार? मित्रच गमवायचा ना?" मग

त्याच्या विचारवंत असण्याचा माझा अभिमान अजून वाढे. नवल वाटे, एवढे पटकन याला उत्तर सुचते कसे?

एक दिवशी मी त्याला बोलून दाखवले "खरोखरच केवढा विचार करतोस तू, कशा बद्दलही उत्तर तयार असते तुझ्याकडे. खरा विचारवंत भेटलायस."

"गोविंदा! गोंद्या! साल्या फिरकी घेतोस काय? आम्ही सगळे तुझा हेवा करतो. केवढा विचारी, शिस्तीचा, नियोजन करणारा आहे गोविंदा पुरचुरे असं सगळेच म्हणतो. आणि तू काय मलाच शेंडी लावतोस काय? काय पेग मारायचा असेल तर तसे सांग. बसू हवे तर संध्याकाळी. पण साल्या विचारवंत वगैरे उपाधी लावू नकोस बाबा."

मी बुचकळ्यांत पडलो. मी आणि विचारवंत? काय म्हणतोय हा? पण तसा विचार कधी आलाच नव्हता. जास्त विचार चालू झाले. घरी पोहोंचता पोहोंचता एक लक्षात आले. विचारवंत दुसरेच ठरवतात. आपणच आपल्याला ठरवायचे नसते. पण दुसऱ्याने ठरवले तर खरे मानायचे असते.

याच गुंगीत घरी येवून बसलो. चहा आणायच्या ऐवजी अर्धांगिनीची ऑर्डर सुटली. "अहो! दिवाळी येतेय. घराला रंग केला पाहिजे. रंगारी शोधा. आणि हे पहा तुमच्या नावाची पाटी अगदीच विटली आहे काही वाचताच येत नाही. ती देखील नवी बनवा."

एक हुंकार भरला आणि विचारात गेलो.

विचारवंताचा शोध घेणारी मुले आजही असतील कां ? कां नाही असणार? कोणाचे तरी बाबा ऐकवतीलच की "केल्याने देशाटन.... " मग तोही लागेल शोधायला विचारवंत. मला ५५ वर्षे लागली शोधायला.

मग पटकन विचार आला. अशा शोधक मुलाला एवढा त्रास कशाला. त्याला पटकन विचारवंत मिळावा म्हणून नांवाची पाटीच तशी बनवू.

"**गोविंद सीताराम पुरचुरे**
**एक विचारवंत**."

**********

महत्वाची टीप-

या काल्पनीक गोष्टीत कोणीही सदृष्यता शोधू नये. सांपडल्यास तो निव्वळ योगायोग समजावा. कोणताही नुकसानीचा दावा चालणार नाही याची विचारवंत असल्यामुळे अगोदरच विचारकरून खबरदारी घेतली आहे.

# उस्तादांची सितार मी

मिरजेच्या उस्मानजींच्या हाती मी जन्मले. कितीतरी दिवस श्रमून ते मला बनवीत होते. मनासारखे सामान चोखंदळपणे निवडत होते. दोन वर्षे असे काम केल्यावर मनासारखी मी तयार झाली की नाही हे पहाण्याकरतां त्यानी तारा जोडल्या. ताण ठीक केला व अलगद बोटे फिरवत नादाची परीक्षा सुरू केली. पहिल्याच सुरांनी अशी काही दाद दिली की विस्मयाने ते मला पाहू लागले. मायेचा हात फिरवत त्यांनी मला एका मऊ गादीवर अलगद ठेवली. जणू काही नवीन बाळालाच ते सांभाळत होते.

संध्याकाळी मखमली बुरखा आला व तो मला सजवला. मी आंत बंद झाले. पण मला माहित पडले होते, उस्मानजीनी प्राण ओतले होते माझ्यांत. सर्व कौशल्य पणाला लावून मला बनवले होते. इतरही सितार, तंबोरे वगैरे तारवाद्ये त्यांनी बनवली होती. पण माझ्यावर जीवापाड मेहेनत घेऊन बनवीत होते. मला बनवत तेव्हा शेजारचे इतर लोक येऊन पहात, विचारीत "क्युं उस्मानभाई बडे दिलसे बना रहे हो. क्या खयाल है? कीमत कितनी बढेगी? बेच भी सकोगे?"

उस्मानजी एक कौशल्य राखणारा कारागीर, त्याला किमतीचे देणे घेणेच नव्हते. तो सांगे "अरे भाई कीमत तो बादकी बात होना. इसको समजनेको होना, इसका सही ईस्तेमाल करनेको होना. ऐसा कोई मिले वही नसीब की बात. ऊर्स आ रहा है. आयेगा कोई फरीश्ता इसके नसीबमें. बना रहा हूं लेकीन बोल निकालनेवाला मिलनेको होना. तो ही चीज बन गई समझूंगा."

मी हे सगळे ऐके व मनांत ठरवी आपणही सुंदर बोल काढायचे. आपल्या जन्मदात्याचे ऋण फेडायचे. पण बोल काढणारा कसा मिळेल? तोही संगीताची चांगली समजवाला असला पाहिजे ना? ऊर्स चालू व्हायला दोन दिवस होते व एक कोणी सितारी पहायला आले. उस्मानभाईनी इतर सितारी दाखवल्या. पण माझ्या जवळ देखील आले नाही. गिऱ्हाईक निघून गेले. मला नवल वाटले तसेच इतरानाही.

एका जुन्या कारागिराने विचारले देखील "बडेमियां! आपने असली चीज नही दिखाई उनको? बेचनी नही है क्या?"

"भाई वो तो अव्वल घरमेंच जायेगी. लडकी ब्याहते वैसी ब्याहनेको होना. देखते है ये ऊर्स मे कोई मिले तो." उस्मानजीनी मला मुलगी बनवले. किती खरे होते. माझे जन्मदाते तेच होते. पहिल्या कोतरण्या पासून ते शेवटच्या पॉलीश पर्यत त्यानी कुणालाच मला हात लावू दिला नव्हता. मलाही बरे वाटले.

ऊर्स सुरू झाला. उस्मानजी रोज रात्री ऊर्सांत जाऊन संगीत सभा ऐकू लागले. भाग घेणारे एक एक मातब्बर होते. गाणारे तर होतेच, पण जोडीला सरोद, शहनाई, सितार वगेरे वाद्यांचे प्रयोगही होत. ऊर्स पहाटे चार चार वाजे पर्यंत चाले. तीसऱ्या दिवशी कितीतरी जुगलबंदी झाल्या. लखनौ कानपूर पासून कलाकार आले होते. पुढच्या दिवशी सितार, शहनाई व तबला यांची जुगलबंदी ठरली. सितार वाजवणारे नामवंत तर होतेच पण नवीन काही कलाकार आले होते. उस्मानजींची तळमळ वाढली होती. कोणी चांगला सितारवादक येतो कां त्याची वाट पहात होते.

नामवंत कलाकारांच्या नंतर नवीन कलाकार अदा पेश करू लागले. मग उस्ताद गुलबक्ष आले. सितार छेडली व प्रेक्षकांचा पूर्ण ताबा घेतला. पुढचा एक तास प्रेक्षक डोलत होते, दाद देत होते. उस्मानजी डोळे विस्फारून उस्तादना न्याहाळत होते. लखनवी वेश त्यांना शोभून दिसत होता. पण त्यांचा प्रोग्रॅम संपत येता येता एकदम उस्ताद उठले सितार उचलून निघून गेले. कुजबूज वाढली. "काय झाले? काय झाले?" ची चौकशी चारी बाजूने होऊ लागली.

उस्मानजी उठून धांवले. त्यानी उस्तादना गांठलेच. कुणाच्याही लक्षांत न आलेली गोष्ट उस्मानजीना समजली होती. उस्ताद भेटताच काही न बोलता त्यानी त्यांची सितार हाती घेतली.

"आप क्या कर रहे हो?" या उस्तादांच्या प्रश्नाला ऊत्तर न देता त्यानी सितारीची तुटलेली तार पाहिली. आपल्या खिश्यातून तारांची दोन तीन भेंडोळी काढली. व तुटलेली तार बदलली. एक टणकार काढून सितार उस्तादजींच्या हाती देत ते बोलले "तार तुटनेको कलाकार छोटा नक्को होना. कल इससे भी बढीया बजानेको होना उस्ताद."

मग उस्तादनी उस्मानजींची रीतसर ओळख करून घेतली. सितार ठीक चढवून, वाजवून पाहिली. संतोषाचे एक हंसू त्यांच्या चेहेऱ्यावर पसरले. मग म्हणाले "मीरजमे बढीया सितार बनती है सुना है. हम कल देखना चाहते है."

"जरूर जरूर आठ दस दुकाने है. आप जरूर घुमके देखना. मिरजमेंच अच्छी चीज मिलनेको होना उस्तादजी." उस्मानजीनी माहीती दिली व निघून गेले.

उस्मानजीना राहून राहून वाटत होते. आपण चूक केली. उस्तादना आपल्याकडे बोलावले पाहिजे होते. आपली बढीया कारागीरी दाखवली तरी असती. पण मग वाटे, नाही

सितारीला तार चढवली त्यामुळे त्यांना गळ घालतोय असे वाटले असते. आपल्याला तर खरा पारखी पाहिजे. गळे पडून मुळीच सौदा नको. ते शांत झाले.

दुसऱ्या दिवशी उस्मानजी दुकानांत उशीराच आले. का कोण जाणे त्यानी माझा मखमली बुरखा उतरला व एकटक माझ्याकडे पाहू लागले. वर घडलेली गोष्ट त्यांनी सर्व कारागीराना सांगितली व विचारले "कोई लखनवी या मोगली हिंदी बोलने वाला सितार पुछनेको आया?" कारागीरांचा नकार ऐकून त्यांनी मला बुरखा चढवला व परत जागी नेवून ठेवले. तासभर झाला असेल मग सगळ्या दुकानात एकच धांवपळ सुरू झाली. ऊर्सांत आलेले कलाकार सितार, सरोद, तानपुऱ्यांची चौकशी करत फिरत आहेत ही बातमी सगळी कडे पसरली. प्रत्येकजण आपआपले दुकान स्वच्छ करू लागला. बैठकीच्या मळलेल्या चादरी बदलू लागला. मालावर बसलेली धूळ झटकू लागला. वर्षांतला खरा धंदा याच वेळी होई. फार तर दोन तीन दिवस मग क्वचितच गिऱ्हाईक असे. दुरुस्ती, जोड कामावर दुकानाचा खर्च काढावा लागे. सिनेमाचे दिवस चांगले येत चालल्या मुळे थोडे फार गिऱ्हाईक मधल्या दिवसांत येई. पण त्यांना जाणकारी कमीच. जाणकारा बरोबरच्या धंद्याची रंगत फक्त ऊर्साच्या वेळी येई.

जीव ओतून केलेल्या कारागीरीचे मोल हे कलाकार समजत. सिनेमेवाले किमतीवर लक्ष देत. घासाघीस फार करीत. तो धंदा घेणाऱ्याचे व देणाऱ्याचे संबंध घट्ट करीत नसे.

हे कलाकार मात्र जाणीव पुर्वक पुढच्या वर्षीही भेट देत. वाद्यात आलेल्या तकलीफी बोलत. कारागीर सुधारणा करून देत. त्यांत एक घरोबा पैदा होई.

संध्याकाळ होत आली होती. एक दोन कलाकार सरोद व तानपुऱ्यासाठी येवून गेले. पण उस्मानजी आपल्याच विचारांत होते. त्यांचे मिरजेच्या बाजारांत एक नंबर म्हणून तानपुरा, सरोद सहज विकले गेले होते. कारागीरानीच सौदा घडवून आणला होता. एवढ्यांत लखनवी पहेरावांत तीघे जण दुकानांत आले. त्यांत उस्ताद पण होते. उस्मानजीना पाहून ते एकदम बोलले "भाईसाब आपने बताया नही. आप यहांके सबसे बढीया कारागीर है. बजारमे बहुत सितारे देखी लेकीन बढीयासे बढीया ढूंढ रहे है."

"बैठीये. बताता हूं जी." एवढे बोलून उस्मानजी उठले त्यांनी मला ऊचलून उस्तादां समोर ठेवले.

"भाईसाब कवर निकालो तो सही" उस्तादजी

"हम कारागीर, साब. बुरखा उतारना आपको करना साब. सितार कैसी है के साथ उसका पहेराव भी देखनेको होना साब. सभी दिलसे बनाया है. बोल निकालके देखना. कानमे बोलेगी सितार आपके. ये दिलसे बोले तोही सौदा करनेको होना साब" उस्मानजी तळमळून बोलत होते. जणू लाडक्या लेकीचे स्वयंवर चालू झाले होते.

उस्तादनी माझा बुरखा उतरला. मला उचलून मांडी पुढ्यांत बसवीले. मी हळू त्यांच्या खांद्यावर विसावले. त्यांनी एकदोन तारा छेडल्या. मग ते सरसावून बसले. हळू हळू माझ्या

तारांतून आवाज काढू लागले. मला समजून गेले उस्तादना भैरव वाजवायचा आहे. पुढचे बोल मला अगोदरच समजत होते. त्यानी तार छेडायची खोटी मी त्यांच्या मनांतील बोल उमटवू लागले. वाद्य व कलाकार आम्ही दोघे एकमेकांत केंव्हा मिसळू लागलो ते समजलेच नाही. अर्धा तास उस्ताद भैरव वाजवीत होते. दुसऱ्या कोणत्याही वाद्याची साथ नव्हती. निःशब्द बनून सर्वच ऐकत होते. उस्मानजींच्या डोळयांतून पाण्याच्या धारा लागल्या होत्या. त्यांच्या मुलीचा संगीत प्रवेश ते पहात होते. श्रमांचे, कामाचे चीज होत होते. एका समर्थ कलाकाराच्या हातांत त्यांची मुलगी त्यानी दिली होती. मी त्यांचे श्रम सार्थ करीत होते.

उस्तादनी मला खाली ठेवले. माझ्याकडे एकटक पहात ते निःशब्द बसले होते. खूप शांततेत वेळ गेला व मग एकदम बोलू लागले "मियां ,क्या चीज बनाई है आपने." परत शांतता मग परत बोलू लागले "ये अनमोल है. तार छेडनेसे पहिले बोल निकलते है मियां. मेरे मनके बोल पहिलेही जानती है. क्या बनाई है चीज आपने."

स्तुती ऐकून मी शरमत होते. कुणीतरी बुरखा चढवावा असे वाटत होते. उस्मानजी तर आनंदाने भिजत होते. माझा निकाह उस्तादजींशी होणार हे मला स्पष्ट दिसू लागले. एवढयांत उस्ताद बोलले "इसका दाम तो कोई बोल नही सकता. फिर भी पूछ लेते है भैय्या क्या लोगे इसका "

उस्मानजी बोलले "जिंदगीकी सबसे बढीया कारागिरी है साब. अच्छे उस्तादकोही देना ऐसाच मनमे था. आपके हाथों बहोत खूब रहेगी. दो साल लगाये इसने जनम लेने. कैसे दाम करू? आप बताइये."

एक पट्टीचा कारागीर तर दुसरा जबरा कलाकार. दोघेही एकमेकाना मान देत होते. पित्याची इच्छा माझा निकाह उस्तादशी व्हावा तर उस्तादही माज्यावर फिदा. पण बिदागी ठरत नव्हती नी निकाह लांबत होता.

उस्मानजी शेवटी बोलले "साहब हमारा पेट है. आठ हजार चाहते है. फिर भी आप बता सकते है."

"मियां ये तो सौदा नही है. हम इतने पैसे भी लाये नही है. उर्सकी बिदागी मिलायेंगे तो भी इतने जमा नही होंगे. क्या करे? चीज तो पसंद है लेकीन रुपये नही है. अगले साल आयेंगे बचेगी तो ले जायेंगे." असे म्हणत उस्ताद उठले. दुसऱ्याक्षणी उस्मानजी उठले मला बुरखा चढवला. उस्तादना थांबवून म्हणाले "उस्तादजी जिसकी चीज उसके पास होना. एक साल मेरे दुकान में क्या करेगी?. आपके हाथों बनाई उसका वापर होगा. लोगा खूष होंगे. ले जाव. अगले साल जी मे आये वो पैसा देना."

उस्तादनी खिशातून बटवा काढला पैसे मोजले. तीन हजार वेगळे केले फार थोडे उरले होते त्यांच्याकडे. तरीही तीन हजार उस्मानजींच्या हातांत ठेवत म्हणाले "हमारे पे कर्ज रहा आपका शायद ऊर्सके बाद और भी थोडे दे जायेंगे. अगले साल जरूर आयेंगे. आपको जींदगीभर याद रखेंगे मियां. हम इसके साथ प्रोग्राम करेंगे कल. जरूर आना ऊर्समें."

मिरजेच्या वाद्य बाजारांत पहिल्यांदाच असा दिलांचा सौदा झाला. माझा निकाह दोघानाही जवळ घेऊन आला, कायमचे मित्र बनवून टाकायला.

दुसऱ्या दिवशी सकाळीच उस्ताद मला घेवून बसले. मांडीला टेकून बसवले, मी अगदी अलगद खांद्याचा आधार घेतला. हळूच त्यांचा हात माझ्या तारां वरून फिरू लागला. बोल उमटू लागले. मी मोहरत होते आणि उस्ताद रंगत होते. ताल हळू हळू वाढत होता. गती देखील जलद होत होती. समोर बसलेल्या मित्रां समक्ष त्यांचे प्रियाराधन चालू होते व मी त्यांना पूर्ण साथ देत होते. रंगत येत चालली होती. माना डोलत होत्या. "वाह, बढीया," मित्रांकडून मिळत होते. उस्ताद अजून रंगात येत होते.

हे असेच चालू रहावे वाटत होते. हा हनिमून संपूच नये वाटत असतानाच उस्ताद थांबले. एकदम उद्गारले "दोस्तो क्या चीज बनाई है. ये सितार है या सरस्वती देवी की देन है. कैसी कला है उस्माजींके हाथोमे. आज तो हम यही बजायेंगे."

मला खूप खूष खूष व्हायला झाले. बोल, ताल सगळे हेच असणार मग काय मीही तयार आहे. पण आश्चर्य वाटले. उस्ताद मला सरस्वतीची देन म्हणाले हे कसे.

ऊर्स चालू झाला व मध्यरात्री नंतर उस्ताद बसले. समोर लोकांचा लोट आला होता. एक एक नामवंत गायक, वादक कलाकारांचा मेळाच भरला होता. गायकी संपल्यावर पहिलाच प्रोग्रॅम उस्तादांचा. ते बसले, मला पुढ्यांत घेतले, मी अलगद त्यांच्या खांद्यावर विसावली. हा क्षण माझ्यासाठी फारच प्रसन्न असायचा. उस्तादांचा सर्वांत जवळून सहवास, स्पर्श सर्व हवे हवेसे वाटणारे याचवेळी मिळायचे. ते तारा छेडू लागले की आमचे संभाषण सुरू व्हायचे. सर्वच उघडपणे. मला पडदा नव्हता.

त्यांनी पहिली तार छेडली व मी समजले सकाळचीच धून वाजवणार. बोल निघाला. त्यांच्या मनांतला. अगदी मनासारखा. उस्तादानी एक हंसरा मोहक कटाक्ष माझ्यावर टाकला. ती नजर जणू काही सांगत होती "समजलो हां मी! आज तू अप्रतीम साथ देणार ते." मी सुखावले, हलकी फुलकी झाले. मग काय उस्तादांचे बोट तारेवर येई व मी लगेच बोले. त्यांच्या मनांतला अगोदरच ओळखलेला सूर, त्यांना पाहिजे असलेला बोल. त्यांना पूर्ण खात्री होती की मी एकही नकोसा सूर काढणार नाही. आजची मैफील आम्ही दोघे नक्कीच जिंकणार. या साथीने उस्ताद बेभान होऊन तारा छेडत होते. बोल निघत होते. वाहवा, बहोत खूब चे उद्गार चारी बाजूने येवू लागले. समेवरचे "आSSहा!" वाढत गेले.

आता द्रुतगती तीनतालांत लय चालू झाली. मग मी माझ्या बोलां सकट उस्तादांमधे विरघळले, उस्तादही माझ्यांत. त्यांचे मनचे बोल मी त्यांना हव्या त्या वेगाने काढत होते. फक्त त्यांच्या बोटाचा स्पर्श माझ्या बोलाचा वर्ण ठरवत होता. लोक, पुढ्यांत बसलेले कलाकार नागासारखे डोलत होते. उस्तादांचे केस, मान उडताना, हलताना पहाणे मला अनावर होत होते. दोघेही अति तल्लीन होवून प्रत्येक क्षण सजीव करीत होतो.

जवळ जवळ तासभर हा सोहळा झाला. वाजवणे थांबले. टाळयांचा कडकडाट होत होता. कलाकारातले एकदोघे मंचावर धांवत आले. एक तर वयोवृद्ध होते. उस्ताद मला कवटाळून बसून होते. डोळयांतून पाण्याच्या धारा सुरू होत्या. "क्या बजाया उस्तादजी! ये शाम बडी सुहानी, यादगार कर दी मियां." ते वयोवृद्ध कलाकार बोलत होते.

उस्तादनी हळूच मला खांद्यावरून उचलले. आपले ओठ माझ्या तारांवर ठेवले. व एक अवर्णनीय लहर माझ्यांत पसरली. थरथरली. एवढ्यांत उस्ताद बोलू लागले "साथ अच्छी हो तो संगीत स्वर्गसंगीत बन जाता है. आज एहसास हुवा मियां. बहोत कुछ सिखा आज हमने. साथ बगैर कलाकार भी अधुरा रहता है." माझ्या साथीचे हे गुणगान ऐकताना मी हरखून जात होते. त्यांचा कृतज्ञ भाव मला गहिवरून टाकत होता. वाटत होते उस्मानजीनी एक चूक केली. मला अश्रुंची वाट करायला हवी होती. मनसोक्त आनंदाश्रु वहाता आले असते आज.

खूप लोक येत होते. उस्तादना शाबास करीत होते. पण उस्तादांचा एक हात मला घट्ट पकडून होता. माझा भार ते सहज पेलत लोकांना आलींगीत होते. हळूच एकादे बोट माझ्या तारेला लागे व मी बोल देई "संईSS". मग माझ्याकडे नजर टाकून हंसत. न बोलताही त्यांचे मनांतले बोल मला समजत. खट्याळपणे म्हणत "ऐकले हो आम्ही तुमचे ईश्श!"

आज आमचा निकाह अल्लासाक्ष झाला. हा कधीच तुटणार नव्हता.

समोरून उस्मानजी येताना दिसले. गर्दीतून वाट काढत येताना त्यांना त्रास पडत होता. उस्ताद पुढे झाले. उस्मानजीना कडकडून भेटले. दोघांच्याही डोळयांतून पाण्याच्या धारा सुरू होत्या. मग उस्मानजी मला उस्तादां कडून घेत बोलले "आज हमे जन्नतकी सैर करायी आपने. इसे सुनकर हमारी ख्वाईश पुरी की. अब फिक्र नही! मरने को होना तो भी फिक्र नही!"

उस्मानजी माझ्यावरून प्रेमाने हात फिरवत होते. त्यांच्या मुलीची जणू पाठवण चालली होती. हळू हळू मंचावरून लोक उतरू लागले. उस्ताद मला घेवून खाली उतरले तसे कित्येकानी सलाम करीत आम्हाला पहिल्याच रांगेत बसविले. उस्तादनी मला बुरखा चढविला. व कवटाळून बसले. आज ते मला जराही दूर करीत नव्हते. पुढचे तीन चार कलाकार आपली कला पेश करून गेले. पण जल्लोष मात्र कमी होता. आम्हाला मिळाली तशी दाद कुणालाच नाही मिळाली.

ऊर्स दुसऱ्या दिवशी संपणार होता. पण उस्ताद काहीही पेश करणार नव्हते. आम्ही निघणार एवढेच माहिती पडले. दुसऱ्या दिवशी दुपारी आम्ही निघालो. उस्ताद पहिले उस्मानजीना भेटायला त्यांच्या दुकानावर गेले. उस्मानजी नव्हतेच. एकजण त्यांना बोलवायला धांवला. दुसऱ्याने लगबगीने चहा मागवला. बनारसी पान देखील आणले. उस्मानजी आले. उस्तादनी बटवा काढला पैसे मोजले उस्मानभाईंच्या हाती ठेवले "दोस्त हम आपके कर्जेमे हमेशा रहेंगे. ये बिदागीसे कुछ मिले वो दे रहे है. अगले साल पुरे देंगे."

"भाईसाब रास्ता लंबा. खर्चापानी बहुत होना रास्तेमे. रखा है ना पैसा साथमे? सब हमको नक्को. थोडा रख्खो." उस्मानजी आता दोस्ताच्या वाटखर्चाची काळजी करीत होते.

"रखा है. रखा है. चिंता मत करो. घर टांगेसे जायेंगे इतनातक इंतजाम है. शायद थोडा जादाही है." उस्ताद बोलले.

आम्ही निघालो तर उस्मानजी बरोबर निघाले. मिरज स्टेशनांत गाडी सुटे पर्यंत होते. मला व्यवस्थित वर ठेवून दोघेच बोलत होते. फार जुने गाढ मित्र असल्या सारखे बोलत होते. चार दिवसांपूर्वी एकमेकाला ओळखत देखील नव्हते. आज एकदम दिलजमाई झालेली. एक लखनवी स्वच्छ हिंदी भाषी. दुसरा हैदराबादी हिंदी बोलणारा. भाषेचा प्रांतांचा कुठलाच फरक त्यांना दूर ठेवत नव्हता. दोघां मधला दुवा एकच कलाकार.

गाडी सुटायची वेळ झाली. उस्मानजी उतरले बाहेर येवून बोलले. "उस्ताद दो दिन का रास्ता, संभलके जाना." गाडी सुटली. ससुराल कसे असेल हा विचार आला. उस्ताद तसे वयाने तीशीतले पस्तीशीतलेच दिसतात. त्यांची बिबी कशी असेल? लखनौ संगीताचे शहर आहे. उस्ताद दररोज पेशकश करणार कां? गाडीच्या प्रत्येक हेलकाव्या बरोबर मी वेगळ्या विचारांवर आरूढ होत होते.

गाडी थांबे, सुटे असे चालले होते. संध्याकाळ होत होती. उस्तादनी मला उचलले खाली सीटवर बसून बुरखा काढला. तारा छेडू लागले. मी बोल देत होते. ते वाजवत होते त्यात करुणा रस भरभरून येवू लागला. मला रडवेले होऊ लागले. बोल अजून करुण येवू लागले. गाडीत समोर बसलेले एक गृहस्थ काहीतरी वांचत होते. ते थांबून डोळे मिटून ऐकू लागले. पुढील मागील बाजूनी एक दोघेजण आले. बैठकच जमू लागली. हळू हळू ताल वाढत गेला. मग उस्ताद थांबले. लोकानी मग बोलायला सुरुवात केली. मिरजचा ऊरूस, भाग घेणारे लोक, कोण केवढा मोठा कलाकार वगैरे गोष्टी अनभिज्ञ लोक अधिकाराने करत होते. मग समोरचे गृहस्थ बोलले "सितारवर फारच सुंदर हात आहे. कुठे चाललात?" संध्याकाळ आणखी गडद झाली.

"लखनऊ" उस्तादनी ऊत्तर दिले.

"हे माझे कार्ड. मी दिल्लीला आकाशवाणीत आहे. लखनौला पोहोंचलेत की एक दोन दिवसांत मला फोन करा. मला आपला प्रोग्रॅम आकाशवाणीवर करायला आवडेल. फारच सुंदर वाजवता सितार. पूर्वी कधी लखनौ की कानपूर आकाशवाणीवर केला आहे का प्रोग्रॅम?"

"नही जनाब. आम्ही लखनऊ मधेच प्रोग्रॅम करतो. खूप संगीत सभा होतात. वाजवतो तिथे जाणकारांच्या कोंडाळ्यात. मुंबई पुण्याला केला होता एक प्रोग्रॅम." उस्ताद

"मग दुसरे काय करतां? पैसे कमवावे लागतातच ना?"

"आती है बिदागी चला लेते है उसमें. पण आता दिवस बदलताहेत रफ्तार वाढली आहे. संगीत रसीक कमी होत आहेत. सिनेमाची गाणी व संगीत फार पसरत आहे. क्या करे?" उस्ताद विषण्ण मनाने बोलत होते.

"मी कानपूर नाही तर लखनौ आकाशवाणीला बोलून पहातो. तुमचा पत्ता देवून ठेवा."

मग त्यांची थोडी कागदांची देवाण घेवाण झाली. गप्पा थांबल्या. रात्री कोणत्या तरी स्टेशनवर ते गृहस्थ उतरून गेले. आमचा प्रवास चालूच होता. दोन दिवस लागतील लखनौला पोचायला, हे उस्तादनी उस्मानजीना सांगताना ऐकले होते. मधे मधे उस्ताद मला घेत व न्याहाळत बसत. चेहऱ्यावर एक आनंद पसरे. मग केंव्हा केंव्हा बोल काढीत बसत. कोणताही राग आळवणे नसे. बोल काढीत व विचारांत खूप गुंगून जात. मला मात्र बरे वाटे. त्यांचा सहवास, स्पर्श मला सुखावून टाके. मला त्यांनी कधीच वर ठेवू नये, दूर करू नये असे वाटे. त्यांना कुठले बोल काढायचेत तेही समजणे अवघड होई. पण तार व बोट यावरून मी पटकरून बोल काढी व त्यांना न्याहाळी मनांत येई "आलाय कां बरोबर बोल?" त्यांच्या चेहेऱ्यावर समाधानच दिसे.

कुणा एका ठिकाणी उतरून गाडी बदलली व पुढचा प्रवास सुरू झाला. एक रात्र गेली आणि सकाळी सकाळी लखनऊ आले. उस्तादांच्या घरच्या लोकांची आता ओळख होणार म्हणून मी उत्सुक होते.

उस्तादांचे घर म्हणजे एक फार जुनी कोठी होती. लाकडी कोरीव दरवाजे, तसेच खांब, वर कोरीव तुळया. मात्र घराला फार वर्षात डागडुजी केलेली दिसत नव्हती. वाटले पूर्वी फार रईस असावेत. मला घेवून उस्ताद बाहेरच्या मोठ्या व्हरांड्यात आले. एक आठ दहा वर्षाचा मुलगा व मागोमाग चार वर्षाची मुलगी त्यांना येवून बिलगली. आंत गडबड उडालेली दिसू लागली. मला घेवून मुलांशी बोलत उस्ताद आपल्या खोलीत शिरले. तिथे तानपुरा, एक सितार, तबले अशी वाद्ये एका मंचावर गादीवर व्यवस्थित ठेवली होती. मला त्यानी अलगद त्याच मंचावर ठेवले. स्वतः मुलांशी बोलू लागले. मिरजेहून मुलांसाठी घेतलेला खाऊ दिला. तर मुले अम्मी अम्मी करत पळून गेली.

माझे लक्ष खोलीत फिरू लागले. सगळीकडे गाद्यांची बैठक होती. मक्का, मदिनांचे फोटो भिंतीवर टांगले होते. पण वाद्याच्या मंचा समोरच वीणा घेतलेल्या सरस्वतीचा मोहक पुतळा होता. त्यावर फुले देखील वाहिली होती. उस्ताद दोन्हीतही मानत होते?

थोड्याच वेळांत एक बाई आल्या. डोक्यावरून पदर, कानांत लोंबते कानातले, नाकांतही असेच काही घातलेले. पण चेहरा काळजीने भरलेला, फिकट वाटला. "कैसा हुवा ऊर्स? बिदागी अच्छी मिली की नही? घरमें चार दिन अच्छे जायें, इसलिये पूछ रही हूं." ती बाई बोलत होती एवढ्यात तिचे लक्ष माझ्याकडे गेले. क्षणात चेहरा लाल झाला. "ये क्या जी? आपने आपकी पुरी बिदागी सितारपे खरच की? मेरे लिये कुछ पैसे रखे भी या खाली हाथ आये हो?"

मला राग येत होता. उस्तादांची बिबी अशी कशी. लांबून आलेत. जरा आराम करू दे, चहापाणी होवू दे. मग बोलावे. ही अगोदरच विचारत सुटली होती. उस्तादही काही कमी नव्हते. हंसत हंसत म्हणाले "अजी बिदागी तो खर्ची, आणि वर कर्जपण करून आलो. पण सितार फारच सुंदर मिळाली. बघा ही नशीब घेवून आली असेल. बदलेल दिवस आपले."

मला उस्ताद खुषमिजाज आहेत हे पहिल्यांदाच दिसले. पण बिबीजी गुश्यांतच निघून गेल्या. मग मात्र शांतता होती.

संध्याकाळी बरेच लोक आले. उस्तादांचे मित्रमंडळ होते. मिरजेच्या गप्पां वरून ते माझ्या खरेदीबद्दल बोलू लागले. मग एक जण उठला. तबला उचलत म्हणाला "गुलबक्ष हो जाने दो मैफील. जरा देख लेते है नई सितारका नखरा." दुसरा उठला तानपुरा लावू लागला. मग उस्तादनी मला उचलले. बैठकीवर बसले. मला परत एकदा उस्तादांची जवळीक मिळाली. मैफिल सुरू झाली. एक राग उस्ताद वाजवू लागले बोल काढताना मी देखील मागे पडत नव्हते. सगळे माना डोलवत होते. तबलजी पण रंगात आले होते. मग काय जुगलबंदीच चालू झाली. उस्ताद जबरदस्त वेगांत बोटे फरवत होते, तारा छेडीत होते, मी बोल देत होते, तबलजी तबल्यातून तेच बोल काढत होते. अर्धा तास हा सोहळा चालला. चहा घेवून बिबीजी आल्या.

चहा प्रत्येकाला देता देता बोलू लागल्या "भाईसाब आपके दोस्त से कहो. घर चलानेके लिये रुपये पैसोंकी जरूरत होती है. पुरी बिदागी सितारमे खर्चके आये है. घर कैसे चलाऊ मै? बनीया कितने दिन उधार देगा? अभी दुकानपे जानेकी शर्म आने लगी है."

कोणीच काही बोलले नाही. एकमेकांकडे पहात राहिले. बिबीजी गेल्या आणि सगळेच हंसू लागले तबलजी बोलले "क्युं मिया गुलबक्ष कैसे घर चलाओगे? सितारसे आपका पेट भरता है. घरवालोंका क्या?" मग हसत सुटला.

उस्ताद हंसत म्हणाले "क्या तबलेकी बिदाई बहोत कमाई क्या आपने? घर भरून टाकलेत काय सगळ्या वस्तूनी."

सगळे हंसत होते. दुसरा एक म्हणाला "भाई सभी घर यही हाल है. अल्लामियांने जन्म दिलाय त्यालाच काळजी. आपण चिंता करून काय होणार?"

"मनहरजी आप चुप क्यूं? कैसे चल रही है संगीत और संसार साधना?" तबलजी विचारत होते. मनहरजी स्वप्नातून बाहेर येत बोलले.

"आपने हमे याद दिलाई. घरून सामान घ्यायला निघालो होतो. उस्ताद आल्याचे समजले म्हणून इकडेच आलो. विसरलो. आता काय खैर नाही. घरी ऐकायलाच लागणार."

"और नवाबसाब आपका क्या हाल है. आप तो ठहरे नवाब. आपके घरमे तो ऐसे किस्से नही होते होंगे."

“अजी काहे के नवाब! सब नवाबीके ढंग चलाते तंग हो रहे है. आमदनी नाही आणि खर्च नवाबीचे. कालच व्हिक्टोरीयाचे शिक्के सराफाला विकून आलो. तेव्हा कुठे बिबीजीला पैसे दिले.  आज खूष होईल एवढेच नशीब.” नवाबसाब बोलले.

मला आश्चर्य वाटत होते. हे सगळे संगीताचे वेडे पीर, याना कसलीच काळजी नाही. कसे होत असेल यांचे.

एवढ्यांत बिबीजी आल्या विचारू लागल्या “रात के खाने पे है ना सब?”

“जी हां! हमे मिलने आये है, तो साथ खाना भी खायेंगे.” उस्ताद बोलून गेले.

“तो जरा कोई मुझे सामान लाके देगा? खाना बनाने के लिये सामान लगता है.” बिबीजी

“जोहरभाभी, रहने दिजीये हम तो घर जायेंगे. कहे बिगर आये है.”

बिबीजींचे नांव जोहर होते तर. मी नांवाची खूणगांठ मारली. मग एक एक जण कारण सांगत निघू लागला. सगळ्यांचेच खिसे खाली. सामान कोण आणणार? त्या पेक्षा घरी जाणेच रास्त वाटले प्रत्येकाला.

जोहरबिबी पण हुशार होती. छान युक्ती काढली तिने सर्वांना कटवायची. सगळे गेले मग जोहरबिबी उस्तादांजवळ बसून बोलू लागली.

“हे बघा आपल्याला सितार सर्वस्व आहे. पण घरसंसार नको का चालायला बरोबर? मुले मोठी होताहेत. त्यांचे शिक्षण नको का व्हायला? आपण सर्व खर्च आपल्याच शौकावर करीत राहीला तर घर कसे चालेल?”

“देखिये! ये चीज! ही अशी सितार लाखांत एक बनते. हात लावला आणि प्रेमांत पडलो. सर्व विसरलो. ऊर्स पण गाजवला या सितारी वर प्रोग्रॅम करून. जरा सबर करा. काहीतरी चांगले दिवस दाखवेल ही. फार चांगली साथ देते. आपल्या सारखीच. आपली घर गृहस्थीत. हिची संगीतात.” उस्ताद बोलत होते. अजाणतेपणी मला व जोहरबिबीला एकाच मखरांत बसवत होते. मी सुखावत होते. जोहरबिबी उठली चौरंग उचलून बैठकीच्या मधे ठेवला. मुलांना बोलावले. घरांत जाऊन जेवण घेवून आली. चौरंगावर मोठी थाळी ठेवून त्यांत बनवलेला बिर्याणी सारखा भात वाढला. सर्व भोवती गोल बसले व जेवण सुरू झाले. एकाच थाळीत सर्व जेवत होते.

गुणी मुले गपचुप जेवत होती. साधा बिर्याणी भात. मला फार वाईट वाटत होते. एवढा चांगला कलाकार, एवढी समजूतदार बिबी, मुले पण केवढी सोशीक. कोणतेही मागणे नाही हट्ट नाहीत. खरोखरच मी समाधानी समजूतदार लोकांत आले. किती भाग्य माझे.

दिवस जात होते. मला लखनऊ मधे जवळ जवळ महिना होत आला होता. शहरातल्या छोट्या मोठ्या संगीत सभामधून कार्यक्रम झाले होते. त्यातून मिळणाऱ्या तुटपुंज्या बिदागीवर उस्तादांची बिबी घरचा गाडा ओढीत होती. तिची ओढाताण मला फार दुःखी करायची.

एवढ्यांत एक दिवशी एक लिफाफा आला. आकाशवाणी कानपूर कडून उस्तादना बोलावले होते. बहुतेक गाडीत भेटलेल्या त्या गृहस्थानी आपला शब्द पाळला होता. चार दिवसानी आम्ही, म्हणजे मी व उस्ताद कानपूरला पोंहोचलो. पत्र दाखवतांच लगबग सुरू झाली. आम्हाला मानाने एका अधिकाऱ्याकडे नेण्यांत आले. उस्तादना मानाने बसवून तो अधिकारी विचारू लागला

"केसकर साहेबांची व आपली ओळख कशी?"

"केसकर? हां हां  ते आम्हाला ट्रेन मधे भेटले. लंबा प्रवास होता. गाडीमधे चीज वाजवली त्यांना पसंद आली. ओळख झाली. म्हणाले आकाशवाणीवर प्रोग्राम ठेवू." उस्ताद सांगत होते.

"अहो तुम्ही केवढ्या मोठ्या माणसाला भेटलात माहीत आहे कां? अहो आकाशवाणीचे सर्वे सर्वा आहेत ते. भारतीय संगीताचे अतिशय भोक्ते व जाणकार. त्यांची नजर आपल्यावर पडली म्हणजे पहायलाच नको." तो अधिकारी बोलतच सुटला. मला खूप बरे वाटत होते. यामुळे तरी उस्तादना चांगली आमदनी सुरू होईल असे वाटले.

मग परत एकदा मी आणि उस्ताद एकत्र आलो. सभागृहांत फारशी गर्दी नव्हती. एका मंचावर आमची बैठक होती. उस्तादनी सुरू केले. मी देखील विरघळून गेले. बोल असे काही निघत होते की उस्ताद तल्लीन व्हायला जरा देखील वेळ लागला नाही. अर्धा तास दिला होता. उस्तादनी त्या वेळांत सुंदर वाजवून दाखवले. पुरा झाला तेव्हा सभागृह पूर्ण भरले होते. म्हणजे लोकाना खेचून आणण्यापर्यंत आमची जोडी तयार झाली होती तर.

ते अधिकारी तर भलतेच खूष दिसले. चहापाणी झाल्यावर अदबीने उस्तादाना म्हणाले "फारच छान, अहो कोठे होता इतके दिवस? आकाशवाणीवर देऊच प्रोग्रॅम पण दुसरे देखील मिळतील. मी सांगेन, काही ऑर्गनायझेशन आहेत ओळखीच्या. फिरावे लागेल. आहे तयारी?"

"आम्हाला आनंदच होईल. संगीत अल्लाची देण आहे, सरस्वतीची देण आहे. जेवढ्या दिलांपर्यंत पहोंचेल तेवढा जन्नतचा मार्ग मिळेल." उस्तादनी कबुली दिली.

बिदागी व खर्चाचे पैसे मिळाले. ते घेवून लखनऊला पोहोंचलो तर रात्र झाली होती. घरी येताच उस्तादनी जोहरबिबीच्या हाती सर्व पैसे ठेवून सांगीतले "सर्व मिळून अडीचशे रूपये आहेत. एक पैसापण खर्च नाही केला. शौक मौज बंद. आता मिळेल ते सर्व आपले."

जोहरबिबी खूष झाली. एवढे पैसे उस्तादनी एकदम कधीही दिले नव्हते. माझ्या जवळ येवून तिने माझ्यावर मायेने हात फिरवला. बोलली "उगाच बोल लावला. शगुनाची आहे ही."

मला फार बरे वाटले. पण उस्मानजींची याद जोरांत आली. त्यांच्या कसबामुळेच माझे कौतुक होत होते. तो काळ ६३-६४ चा २५० रुपयांत महिना सहज चाले.

दुसऱ्या दिवशी सगळे मित्र जमले. कानपूरचा प्रसंग उस्तादनी सर्वांना रंगवून सांगीतला. मग काय एकच जल्लोष करीत सगळे ओरडू लागले "गुलबक्ष कुछ हो जाय. कुछ हो जाय."

उस्ताद काही बोलण्या अगोदर जोहरबिबी हातांत पंचारती घेवून आल्या. व सर्वाना म्हणाल्या "आज आप बोलनाही नही. न बोलवता आज दावत आहे आमची. सर्व जेवूनच जा. पण अगोदर सरस्वतीजीची आरती उतरा. सितारीला ओवाळा. त्यांना विसरून कसे चालेल."

उस्तादनी आरती केली. मला ओवाळले. मी लाजून गेली. जोहरबिबींवर फिदा झाली. उस्तादाना जोहरबिबींची साथही पुरी होती तर. त्यांचे मन सांभाळणारी होती ती पण.

मग संगीताचा एकच दंगा चालू झाला. उस्ताद मला छेडीत होते, मनहरजी तानपुऱ्याची साथ करीत होते. मधुनच करीममियां रागदारीचा आलाप काढीत. ईशाकभाई तबला दमदार पणे वाजवत होते. सगळे संगीतमय होत होते. मी देखील उस्तादाना हवी तशी साथ देत या दंग्यात सामील झाले होते. सगळे वातावरण संगीतमय होऊन गेले. आज कुणीही घरचे कारण सांगून जाणार नव्हते.

जोहरबिबीनी बेतही सुंदर केला होता. सर्व शाकाहारीच होता कारण मनोहरजी. मग सगळे मनोहरवर तुटून पडले. "मनोहरमुळे एक मियांके घर ऐसा खाना पड रहा है." वगैरे शेरे गेले पण सगळे आनंदात चालले होते. जेवण अर्धवट झाले असेल एवढ्यांत उस्तादजींचा मुलगा सलीम धांवत आला ओरडून सांगू लागला "अब्बू रेडिओवर तुमचे नांव सांगताहेत."

हे कानावर पडताच सगळे जेवण सोडून पळत बाहेर आले. उस्ताद देखील आले. जोहरबिबी एकदाच म्हणाली "अरे जेवण तर होऊ दे." मग तीही पळत बाहेर आली. तोपर्यंत रेडिओवर उस्तादांचा प्रोग्रॅम सुरू झाला होता. अर्धा तास कोणी उभे तर कुणी जमीनीवर बसून माना डोलवत ऐकत होते. उष्ट्या हातांचे भानही नव्हते. समेवर "बहोताखूब बहोताखूब" चा जल्लोश व्हायचा. करीममियानी केंव्हा लेंग्याला हात पुसले, मनोहरनी उष्ट्या हातानी ईशाकभाईला टाळी दिली हे त्यांनाच समजले नाही. अर्धातास सगळे वेडे पीर संगीतात नहात होते. भान हरपून मित्राचा पहिलाच प्रयोग अनुभवत होते कृतकृत्य होत होते.

प्रोग्रॅम संपला मग सगळे स्तब्ध झाले. थोड्यावेळाने ईशाकभाई बोलू लागले "मियां गुलबक्ष नाम करोगे. क्या बोल निकाले है दोस्त. बहोत खूब." सगळे माना डोलवत होते.

"अरे भाई ये सितारका भी कमाल है. चीज खूप पसंत पडली. रुपये नव्हते पण देणाऱ्यानेही अर्ध्या किमतीत दिली अर्धे ऊधार ठेवले. म्हणून आज नांव मिळाले. चांगल्या कलाकाराला चांगली वस्तु देखील लागते. उस्मानजीना विसरून नाही चालणार दोस्त" उस्ताद भावूक होऊन बोलत होते. मला खूप आनंद होत होता. उस्तादाना यश व उस्मानजीना कारागीरीची शाबासी एकदमच मिळत होती.

जोहरबिबी मग बोलल्या "काय जेवण करण्याचा विचार आहे की पोटं भरली तुमची." मग सगळयाना जेवण्याची आठवण झाली. आपण केलेले प्रतापपण दिसू लागले.

करीममियांचा लेंगा जेवणाचे डाग दिमाखाने दाखवत होता. ईशाकभाई व मनोहर हात सुकले असं सांगत धुवून आले. मग जेवण सुरू झाले. पण जेवणात कुणाचेही लक्ष नव्हते. सगळे उस्ताद व त्यांची सितार यावरच बोलत होते. जोहरबिबी हंसतही होती व रागावतही होती. तिच्या जेवणाची तारीफ कोणीच करीत नव्हते म्हणून राग. आणि उस्तादांची तारीफ होत होती म्हणून हंसू.

जेवण झाले तरीही गप्पा संपत नव्हत्या. त्या सर्व वेड्यापीरांची दिवाळी व ईद एकत्र झाली होती. मध्य रात्रीच्या आजूबाजूला सगळयाना घरची आठवण झाली. तीही जोहरबिबी बोलल्या तेव्हा "भाईसाब घरी बिबीयां वाट पहातात माहीत आहे ना? नाहीतर उद्या पासून आमच्याच घरी पाठतील तुम्हाला."

सगळेच मग हंसत उठले पण जातां जातां बोललेच "भाभीजी जाते है. अभी नही बनेंगे कबाबमे हड्डी." उस्तादां सकट सगळे जोरांत हंसत बाहेर निघाले. जोहरबिबी मनोमन शरमली.

आठ दिवस झाले असतील. काही लोक पत्ता शोधत उस्तादना भेटायला आले. उस्ताद मला घेवून नवीन काहीतरी रियाज करीत होते. ते लोक बाहेर आल्याचे समजले तसे उस्ताद मला बैठकीवरच ठेवून निघाले. मला राग आला. मग बाहेरचे बोलणे कानी पडू लागले.

"उस्ताद आप लखनऊके और कानपूर स्टेशनपे आपका प्रोग्रॅम कैसे हुवा? आप हमे कभी मिलेही नही. कानपूरसे लखनऊ बडा स्टेशन है." एकजण बोलत होता.

शांतपणे उस्ताद बोलले "मी कुठेही गेलो नाही. त्यानी बोलावले मला."

दुसरा बोलला "चलो रहने दो. आता आम्हाला केंव्हा देताय प्रोग्रॅम? बघा आमच्या स्पेशल प्रोग्रॅम मधे तुम्हाला घेऊ. २०० रुपये बिदागी मिळेल."

उस्तादनी केंव्हाही तयारी दाखवली. मग दोनच दिवसांत प्रोग्रॅम रेकॉर्ड झाला. २०० रुपये जोहरबिबीच्या हाती आले. परत एकदा मित्रांचा दंगा झाला. उस्तादांचे दिवस बदलणार हे सर्वांना समजून चुकले.

आणि झालेही तसेच. उस्तादांची मैफील आता मोठी होत चालली होती. लखनऊ मधले चांगले गायक, वादक भेटीला येत व कायमचे मित्र बनत. जोहरबिबीना आता पांचजणा ऐवजी दहा पंधरा जणांची मेहमानगिरी करावी लागे. त्या ती फार आनंदाने करीत. या दहा पंधरा जणांत सगळेच होते. हिंदूपण मुसलमानपण. मैत्री मात्र निखळ होती. धर्माचा फरक मैत्रीत कुठेच बाधा आणत नव्हता. दिवाळी व ईद दोन्ही एकाच जोशाने, संगीताच्या मैफीलीने सजत होत्या.

आता मुंबईहून कुणी एकजण उस्तादना भेटायला आले. म्हणाले "दोन वर्षाचे कॉंट्रॅक्ट करायचे आहे. परदेशी प्रोग्रॅम करू. तुम्हाला बिदागी अगोदरच मिळेल. सर्व खर्च आमचा. पण दोन वर्षे तुम्ही इतर कोणालाही प्रोग्रॅम द्यायचा नाही. आकाशवाणीवर तुम्ही प्रोगॅम देता. तोच फक्त देऊ शकता. पहा बिदागी म्हणून पहिले दहा हजार देऊ. मग निघते वेळी दुसरे पांच

हजार मिळतील. प्रोग्रॅम झाला की दहा हजार देवू. म्हणजे एकूण पंचवीस हजार मिळतील. वर परदेशीची सफर फुकट होईल. साथीचे वादक आम्ही ठरवू. पहा विचार करून. आम्ही दोन दिवस आहोत लखनौ मधे."

उस्ताद आ वासून बघत बसले १९७०चा काळ हे पैसे कल्पने बाहेरचे होते. पण काही गोष्टी खटकत होत्या. साथीला आपले नेहमीचे लोक कां नाहीत? नवीन लोक केवढे तरबेज आहेत? आपण स्वार्थाने एकट्याचेच पहातो असे नाही का होणार. तानपुऱ्यावर मनोहरजी व तबल्यावर ईशाकभाई असले की जी रंगत येते ती येईल नव्या साथीने? परदेशी कधीच गेलो नाही. तिथे पोंचल्यावर हे लोक फसवणूक तर करणार नाहीत ना?

संध्याकाळी सर्वांबरोबर बोलू मग ठरवू. संध्याकाळी सगळे जमले. आज उस्तादनी मला हात लावला नाही. सगळे मैफीलीला आतुर झाले होते. उस्ताद विचारात होते. शेवटी मनोहरजी बोलले "उस्ताद क्या बात है? गप्प गप्प कां? आज मैफील नाही?" एकदा सगळ्यांवरून नजर फिरवत उस्तादनी सकाळचे संभाषण सर्वांना सांगीतले. एकच हलकल्लोळ उडाला. जोहरबिबीना कुछ हो जायची फर्माईश गेली. पण सर्वांना शांत करीत उस्ताद बोलले.

"दोस्तो बात पैसे की नही है. त्यानी एक शर्त ठेवली आहे. साथीला त्यांचे कलाकार असणार. म्हणजे आम्ही एकटेच जाणार. मनोहरजी व ईशाकमियां शिवाय काय मजा. आपलाच विचार कसा करायचा?"

"उस्ताद पागल मत बनो. जिंदगीत पहिल्यांदाच लक्ष्मी येते आहे. तिला परत कुठे पाठवता. आणि आपण आमचे दोस्त तुमच्या नांवाचा गर्व आम्हाला पण असणार. जा! जा! आमच्या साठी मागे नका राहू."

"गुलबक्ष, सही फर्मा रहे है मनोहरजी. आणि रईसी आली तर आम्ही काय तुम्हाला एकटयाला भोगू देणार नाही. आम्ही वसूलात करणार इथे येवून." ईशाकभाई हंसत बोलून गेले.

दोस्ताचा उदय सगळ्यानाच हवा होता. संगीताच्या झऱ्यांत नेहमीच वहाणारी ती निर्मळ मने. कोणत्याच स्वार्थाने, द्वेषाने, असूयेने भरूच शकत नव्हती. मित्राचा उदय तो त्यांचा विजय होता.

दुसऱ्या दिवशी ते लोक आले. आता बाकीचेही बैठकीला आले होते. त्यांना स्वतःसाठी काही नको होते. पण उस्तादनी संधी घालवू नये या साठी ते काळजी घ्यायला जमले होते. उस्ताद त्यांना बोललेच "जनाब! आमची इथे बैठक चालते. आमचे साथीदार आहेत. त्यांची साथ मिळाली की वाजवायची रंगत वाढते. नवीन लोकांची साथ कशी असेल ते माहीत नाही. साथ बरोबर नाही म्हणून कार्यक्रमाची रंगत जायला नको. आमच्या बरोबर यांना घेता येईल तर बरे."

“हे पहा! आम्ही जो गृप नेणार तो सगळा नामवंत आहे. गायक तर आहेतच परंतु सरोद, बांसरी, शहनाई, तबला साऱ्यांचे उस्ताद बरोबर आहेत काही तर यापूर्वी आमच्या बरोबर जाऊन आले आहेत. त्यांचे नांव परदेशांत आहे. त्याचा फायदा आपल्यालाही मिळणार आहे. परदेशांत सर्व गाजलेल्या नांवावरच चालते. एकदा तुमचे नांव, तुमचा प्रोग्रॅम लोकाना आवडला की पाहू तुमच्या साथीच्या लोकानाही नेऊ. एवढेच कां, लोक आपल्यालाच आणायचा आग्रह धरू लागले तर आपला गृप बनवून तोच घेऊन जाऊ. पहिले आपण नांव बनवावे असे आम्हाला वाटते.”

सगळेच मग उस्तादना जा जा सांगू लागले. उस्तादनी मग होकार भरला. दोन दिवस मग काय काय कागदपत्रांचे कामकाज झाले. संध्याकाळी बैठकी होतच. प्रत्येक जण आनंदात होता. त्या लोकानी सर्व काही काम केले व मी व उस्ताद एके दिवशी निघालो. मुंबईला जायचे होते.

मुंबईत पहिला कार्यक्रम व्हायच्या आधी इतर वादकां बरोबर ओळख, बैठकी झाल्या. तालीम झाली. साथीला बसणारे चांगलेच होते. उस्तादांची सितार त्यांना आवडली. मग प्रोग्रॅमचा दिवस उजाडला. गायकांचे गाणे पेश झाले. सरोद झाली व आमचा नंबर आला. सुंदर सजवलेल्या मंचावर उस्ताद मला घेवून गेले. बैठकीवर बसले. मला पुढयांत घेवून वाजवण्याचा पवित्रा घेतला. एक तार छेडून मला जणू ईशारा केला. “आज कमाल करायची आहे, साथ देशील?” मी असा काही हुंकार दिला की त्यांचा चेहरा उजळून निघाला. मग जो काही बहर आला तो विचारूच नका. अर्धा पाऊण तास नादांत अतिशय गुंगून आम्ही दोघेही एक होत होतो. समोर लोक तल्लीन होऊन ऐकत होते. वाजवणे संपले तसे टाळ्या व वाहवाची बरसात झाली. एक बुजुर्ग हळू हळू मंचावर येताना दिसले. लांब केस, लांब दाढी लखनवी कुडता पैजमा घातलेली ती व्यक्ती उस्तादाना कडकडून भेटली. “बढीया! बहुत बढीया! क्या रंग लाये! बहुत दिनों के बाद सुनी ऐसी चीज. कहांसे हो भाई?”

“लखनऊसे” उस्तादनी सांगीतले. आता तर खूप लोक मंचावर आले होते. त्यातील एकजण म्हणू लागला “उस्ताद आप आपका और स्वरसंगमका नाम करोगे. हे जे येवून भेटले ते सितारीचे बादशहा आहेत. जगभर नांव आहे. त्यांनी शाबाशी दिली आपल्याला. भाग्यशाली आहांत.”

हे सर्व ऐकताना उस्ताद मला एका हाताने पकडून होते. दुसरा हात प्रेमाने माझ्यावरून फिरत होता.

त्या दिवसा नंतर मी व उस्ताद सारखे फिरत होतो. सगळी कडे विमानाने जात होतो. उस्ताद गुलबक्ष हे नांव सर्वांच्या तोंडी होत होते. लखनऊला मधेच येवू तेव्हा परत बैठक होई. दंगा होई. उस्ताद सर्वांसाठी भेटी आणत. सगळे खूष होत. जोहरबिबी तर आनंदाने लगबगीने सगळयांची मेहेमानगीरी करी.

ऊर्सचे दिवस जवळ आले. उस्तादनी रजा मागीतली. ऊर्सच्या कार्यक्रमांत भाग घ्यायची परवानगी घ्यावी लागली. पण उस्तादांचे नांव झाले होते. म्हणून परवानगी मिळाली. मिरजेला पोंचलो तर उस्मानजीना भरून आले. मला हाती घेवून ते मायेने गोंजारीत होते. उस्ताद म्हणाले "उस्मानजी आपल्या सितारने आम्हाला खूप नांव मिळवून दिले. आणि हे तुमचे पैसे. हे आमच्या बिबीजीनी पाठवलेत. माहीत नाही किती आहेत. कमी असतील तर सांगा. पुढल्या वर्षी येण्याचे कारण मिळेल."

उस्मानजीनी पैसे मोजले "ये तो जादा है जी. तीन हजार बाकी थे देने. ये तो पांच है."

"जो भी है वो आपके है. हमारे बिबीजीने भेजे है. ठेवा मियां. आपल्यामुळे आम्हाला नांव, बरकत मिळते आहे." उस्ताद बोलून उठले. मला घेतले. रात्री कार्यक्रम झाला व लगेच आम्ही मुंबईला आलो. मुंबईला कार्यक्रम अगोदरच ठरला होता. भटकंती सारखी सुरू होती.

दोन वर्षे केंव्हा गेली ते समजलेच नाही. मुंबईला शेवटचा कार्यक्रम झाला व स्वरसंगमचे लोक उस्तादना भेटायला आले. ठरलेले पैसे त्यानी अगोदरच दिले होते. वर एक जाडजूड पाकीट देत म्हणाले "आपका काँट्रॅक्ट पुरा हुवा. अभी आपके साथ आगे भी काम करना चाहते है हम. बिदागी दुगुनी करेंगे. और अच्छी कमाई होगी तो और भी पैसे देंगे. आपका हिसाब तो हमने पुरा दिया. अब ये लीजीये आपका बोनस, कमाई आपकी वजहसे हुई ये आपका भाग." उस्ताद ते पाकीट घ्यायला नाही नाही करत होते तरी त्यांनी त्यांच्या खिशांत कोंबले.

आम्ही लखनऊला पोंहोचलो. पाकीट न उघडताच उस्तादनी जोहरबिबीच्या हाती ठेवले. जोहरबिबीने उघडून पाहिले तर आंत वीस हजार रुपये होते. ती अक्षरशः थरथरत बोलू लागली "अजी ये देखीये! वीस हजार आहेत. त्यांनी सर्व पैसे दिले होते. मग हे कसले?"

"उन्हे हमारी कला पसंद आई. बोनस दिलाय नको का आपल्याला?" उस्ताद रंगात येवून जोहरबिबीची उडवत होते. जोहरबिबी एकदम माझ्याकडे आली. माझ्यावर मायेने हात फिरवत म्हणाली. "क्या देन है सरस्वतीजीं की. बरकतही बरकत लाई है."

उस्ताद समाधानाने हे पहात होते एवढयांत काही लोक आले. ओळख देत म्हणाले "हम ईमाम सजीदऊल्ला. आपका नाम बहुत सुना. कोम को बहुत आगे बढा रहे हो. लेकीन कई बातें हमें अच्छी नही लगती. एक तो आप मस्जीद नही आते. दुसरा घरमें हिंदुओकी मुर्ती रखते हो. पूजते हो उसे हररोज. देखिये ये घर्मके खिलाफ है. आप कोमका अपमान कर रहे हो. जरा सोचीये आप जैसे नामवाले लोग ऐसा करेंगे तो बाकी लोग क्या करेंगे?"

"अजी ईमाम साहब बचपनसे एकही सीखा हमने, संगीत. वही धर्म बन गया. कभी कोई भी धर्म पढा नही. कोईने सिखाया भी नही. पिताजीने सिखाई वो सितार, संगीत, बोले ये विद्या सरस्वतीजीं की देन है. क्या करे पिताजीका सुने या आपका? किसी दुसरे धर्मको मान देनेसे अपना धर्म छोटा नही होता. आप धर्म संभालो, हम संगीत संभालते है." उस्ताद

शांतपणे बोलत होते. समर्पक उत्तराची संवय नसलेल्या ईमामना खटकले. राग आला. ते उठून निघून गेले.

संध्याकाळी सगळे जमले तेव्हा विषय निघाला. ईमाम काय बोलले ते सगळ्याना त्यानी सांगीतले. ईशाकभाई म्हणाले “उस्ताद नाम बनाओगे तो ऐसी कठीनाईयां आयेगी. इन्हे बडोंका साथ चाहिये. हम कुछ भी करे कोई पुछता भी नही.”

“भाई सभी का हाल यही है. आम्हाला पण लोक टोचतात मियांच्या घरी जेवता खाता धर्म सोडला का विचारतात. अरे दोस्ती केली, प्रेमाने वागले, भाईचारा वाढवला तर धर्माच्या विरूद्ध आहे काय?” मनोहरजी पोटतिडकीने बोलत होते.

“चलो जाने दो. आपण कां आपली संध्याकाळ बिघडवायची. चला थोडी संगीत मैफील जमवू.” असे बोलत उस्तादनी मला उचलले, ईशाक भाईनी तबला घेतला, मनोहरजी तानपुरा सजवू लागले व हे संगीता बाहेरचे वादळ विरून गेले. परत एकदा मैफीलीला रंग चढला.

थोड्याच दिवसांत नवीन कार्यक्रम ठरवायला स्वरसंगमचे लोक आले. त्यानी ईशाकभाई व मनोहरजीना पण सामील केले. आता तिघेही एकत्र आले याचा आनंद जोहरबिबीना झाला. उस्ताद बाहेरगांवी गेले की काळजी वाटे. आता तिघे बरोबर असणार त्यामुळे बरीच काळजी कमी झाली. त्याचा आनंद त्यानी एक बडी दावत देवून साजरा केला.

पुढच्या सफरी, कार्यक्रम जोरांत सुरू झाले. ईशाकभाई तबल्यात बरेच मागे पडत. उस्ताद त्यांना बरेच मदतीचा हात देत. मला ह्या मैत्रीचा खूप अभिमान वाटे. माझे उस्ताद सर्वांवरच प्रेम करणारे, सच्चे कलावंत होते.

तीन चार महिने फिरून, संगीताच्या मैफिली गाजवून परत आलो. संध्याकाळची मैफील जमली. आज ईशाकभाई वेळानेच आले. चेहेऱ्यावर मायुसी पसरली होती. सर्वांच्या तोंडून एकदम विचारणा झाली.

“क्युं मियां क्या बात है? देरसे आये?”

“क्या बताऊ? साला किसीने दो शादी करनीही नही चाहिये. आणि केलेच तर आमदनी वाढवू नये?” ईशाकभाई वैतागून बोलत होते.

“कोण सांगतं तुम्हाला चार चार शादी करायला? मग भांडणारच ना सगळया. अरे एक सांभाळायला आम्हाला नाकी दम येतो. पण ईशाकभाई काय बात काय?” मनोहरजी विचारू लागले.

“भाई बिदागीके पैसे मैने बडी बिबीको दिये. काय गुन्हा केला काय. छोटी गुस्सा होऊन बसली आहे. पूर्वी कसे घर चालवायलाच सगळा खर्च होई. आता जरा जास्त पैसा आला तर आनंदी व्हायचे सोडून भांडणे सुरू. कुछ नही मियां ये पैसा बडी बुरी चीज है.” ईशाकभाईंचा मूड अजून ठीक होत नव्हता.

एवढ्यांत उस्ताद बोलले "क्या बात कर रहे हो ईशाकभाई! आमची पण दोन लग्ने झालीत आम्हाला कुठे काय तकलीफ आहे. उलट दोन्ही बिबीयां गळयांत गळे घालून रहातात."

"जोहरभाभी! देखो ये क्या बोल रहे है. यांची दोन लग्ने झालीत म्हणतात. आम्ही तर तुम्हालाच ओळखतो. दुसऱ्या भाभीजान कुठे आहेत?" दहा बारजण एकदम विचारत होते. उस्ताद मिस्कीलपणे हंसत होते.

"होगी कोई! आजकल बाहर घुमते है. मनोहरजी कोणी मड्डमशी निकाह करून आलेत कां?" बायकांची नेहमीची धास्ती दाखवत जोहरबिबीनी विचारणा केली.

"देखो! है की नही सच्चा प्यार. प्रेम सच्चे असेल तरच असा संशय पटकन येतो बायकांच्या मनांत. आणि काय हो आम्ही कोठे म्हटलेय तुम्हाला दडवून आम्ही दुसरी शादी केली म्हणून? उस्मानजींची मुलगी शादी करून आणली ती पहिली तुम्हालाच दाखवली. नाही तुम्ही रोज बुरखा चढवत तिला? अहो बाहेरगांवी तुम्ही नसता तेव्हा तीच आमच्या बरोबर बोलते ना?" उस्ताद रंगात येवून बोलले. एकच हलकल्लोळ झाला. जोहरबिबी मनापासून हंसत होत्या त्यांची नजर माझ्याकडे फिरली. मी लाजून चूर झाली.

उस्ताद आले मग नेहमी प्रमाणे इतरांसाठी मैफील व आमच्यासाठी मिलनपर्व सुरू झाले. आनंद, मस्ती, विनोद व बरोबर संगीत यांना बहर आला.

रात्रीचे बारा वाजले तरी दंगा चालू होता. शेवटी जोहरबिबीनी "अजून उशीर केलात तर जेवण मिळणार नाही"ची धमकी दिली. व सर्व जेवायला निघाले.

कार्यक्रम चालले होते, नांव होत होते पण काळ बदलत होता. उस्तादांच्या मुलीचे लग्न झाले होते. मुलगा संगीता पासून दूर होता. तो उस्तादांचे ऐकत नसे. बैठकीत आता मनोहर नव्हते त्यांचा देहांत झाला होता. ईशाकभाईंचे दांत राहिले नव्हते. उस्ताद चालताना थरथरत. जोहरबिबी देखील थकत चालल्या होत्या. मीच काय ती जशीच्या तशी होते, चीरतरूण. मला भीती वाटू लागली होती. उस्तादां नंतर कुणाशी संबंध येईल आपला? जमेल कां आपले त्याच्याशी? मी देखील थरथरू लागे.

उस्तादांची बोटे मात्र अजूनही व्यवस्थित चालत. संध्याकाळच्या मैफीलीत आज त्यांनी कुठला राग घेतला होता देव जाणे. अतिशय करूण स्वर काढायला लावत होते. मी आधीच भ्यालेली त्या स्वरांत माझ्या भीतीची थरथर घालून अजून करूणपणा वाढवीत होते. निःशब्द होऊन सगळे ऐकत होते. उस्तादानी मला खाली ठेवले. तरीही कोणी बोलले नाहीत. मग एकदम मागून कोणीतरी बोलले "क्या उस्ताद है. क्या उस्तादकी सितार है. सलामत रहे ये जोडी."

उस्ताद म्हणाले "सही फर्माया दोस्त. ये सितार है इसलिये हम उस्ताद है."

मला आनंदाची थरथर भरली. उस्तादांबद्दल मन भरून आले. उस्मानजींची कारागीरी सार्थ केल्याचे समाधान वाटले.

मग अभिमानाने मनांत म्हटले “उस्तादांची सितार मी.”

दुसरा दिवस मात्र फार वाईट उजाडला. उस्ताद आजारी झाले होते. जोहरबिबी लगबगीने त्यांना हवे नको ते पहात होती. डॉक्टर येवून गेले होते. मग सगळीकडे काळजीचे वातावरण पसरले. करीममियां व ईशाकभाई धांवत आले. सर्वजण होईल तेवढी सेवा करीत होते.

मला माझाच राग येत होता. मला दुःखांत देखील अश्रु येत नव्हते. आता तर सेवेसाठी धांवताही येत नव्हते. अशी कशी मी फक्त सुखाची साथी? असे कसे बनवले मला तुम्ही उस्मानजी? जोहरबिबीपेक्षा मीच जास्त काळ जवळ होती उस्तादांच्या. आता मात्र ढीम बसली आहे बैठकीच्या गादीवर. दुःख देखील दाखवू शकत नाही. आनंद, करुणा, दुःख, तांडव सगळया रसांचे बोल माझ्यांत भरलेत पण उस्तादांची बोटे तार छेडतील तेव्हाच बोल येतील. आजपर्यंत दुःखाचे बोल काढले. आज दुःख काय ते अनुभवतेय. प्रिय माणसाची सेवा करायची तर आरामात गाद्या गिरद्यांवर लोळतेय. अपंग, स्वार्थी, कृतघ्न कशी आहे मी? किती परावलंबी केलेत मला उस्मानजी. हे चिरतारुण्य देखील दुःखी करतेय

उस्मानजीनी सगळी कारागीरी पणाला लावली होती. पण एक विसरले होते. मला फारच दीर्घायुष्य देवून बसले होते. त्याचा मला त्रास होणार होता. उस्तादांची साथ संपल्यावर काय करणार होते मी.

जोहरबिबी किती नशीबवान, सेवा करताहेत, काय हवे ते विचारताहेत, काळजीने डोळयांत अश्रु येताहेत. किती लगबगीने धांवताहेत. ही साथ खरी की मी केली ती संगीत साथ खरी. एवढ्यांत जोहरबिबीनी टाहो फोडला. जोरांत दुपट्टा मागे फेकला. तो माझ्या तारांवर आपटला आणि माझ्यातून बोल निघाले “अलविदा! अलविदा!”

********************

# सिद्धू

आपल्याला अत्यंत हुशार मुलगा व्हावा अशी प्रत्येक आई बापांची इच्छा असते. अशाच एका मुलाची गोष्ट मी आता सांगणार आहे. अगदी त्यावेळी माझी आजी सांगायची तशीच.

एक आटपाट नगर होतं. नगरात राजा नव्हता. पण खूपशा नगरांचं मिळून एक राष्ट्र तयार झालं होतं. त्या राष्ट्रातलं हे एक छोटस नगर. नगर कसलं, खेडच होतं ते.

या खेड्यांत एक शेतकरी कुटुंब रहायचं. थोडीफार शेती होती. थोडी हातात कला होती, गळ्यात सरस्वती नाचे. कर्ता म्हणून तो शेतकरी सगळे काम आस्थेने करी. तसा जन्माने तेली, बारा बलुतेदारातला एक. त्याची वाडवडिलार्जित तेलाची घाणी पण होती. गावात तीळाचे एक पीक येई तेव्हा घाणी चाले.

तो व त्याची बायको कष्टाळू होती. ती दोघे पहाटेच उठत व कामाला लागत. ती दळण करी मग न्याहरीच्या भाकऱ्या करी. तिचे आटपे पर्यंत तो गाईंचे दूध काढे. गोठा साफ करी. मग तो गुरांना घेवून निघे. बरोबर ती न्याहरीची टोपली घेवून निघे. रानात गुराना सोडून तो शेतांत येई. ती तोपर्यंत शेतांत कामाला लागलेली असे. दोघेही फार कष्ट करीत. त्याच्या तोंडी कायम संतांचे अभंग असत. सकाळी सुरू झालेले अभंग दुपारी काम थांबे पर्यंत चालूच असत. थांबत ते फक्त न्याहरी करताना. ती लवकरच घरी निघे. दुपारचे जेवण करायचे असे.

तासाभराने तोही निघे. गुरे त्याचा गाण्याचा सूर पकडून घरी वळत. त्याच्या मागोमाग घरी पोहोंचत. त्यांना पाणी वैरण घालून हा स्नान करी. तोपर्यंत तिने जेवण वाढलेलेच असे. गरीबी असून देखील हा कुणाकडे काहीच मागत नसे. आपण भले, आपले घर भले, आपले अभंग भले. असा सात्विकपणे जगणारा तो. तर बायको देखील त्याच्या पावलांवरच चालणारी.

वर वर पहाता याना काही दुःख असेल असे वाटतच नसे. पण दोघांच्याही मनांत एक सल होता. लग्नाला चार वर्षे झाली अजून पाळणा काही हलत नव्हता. भजन म्हणताना त्याच्या मनी देवाकडे एकच मागणे येई.

“देवा वंशाचा दिवा दे बाबा. निःपुत्रीक ठेवू नको. कसाही दे, काळा सांवळा, बावळट, येडपट पण वंशाला कोणतरी पाहिजे. नाहीतर दिवस कार्याला कोण? मुक्ती कशी मिळेल?”

एके दिवशी देवाने त्याची हांक ऐकली. देवाला त्याचे भजन एवढे आवडले की त्याने ठरवले याला अतिशय हुषार, एकपाठी तर मुलगा द्यायचाच पण त्या मुलाला पुढे काय होणार हे अंधुक जाणण्याची शक्ती देखील द्यायची. सद्गुणी मुलगा द्यायचा.

पुढच्याच महिन्यांत त्याच्या बायकोला समजले, आपण आई होणार. तो हे ऐकून हरखून गेला. तिला काळजीने सांभाळू लागला. त्याला दुप्पट जोम चढला. बायकोची व स्वतःची जड कामे तोच करू लागला.

पाणवठयावर याला बघून बाया हंसू लागल्या. बायकोच्या तब्येतीची चौकशी करू लागल्या. हा म्हणाला “वारस येणार काळजी नको घ्यायला तिची?”

काही बाया फिदी फिदी हंसल्या. तर काही त्याला आदराने पाहू लागल्या.

दिवस लगबग उलटले आणि त्याला मुलगा झाला. ती बाळंत होई पर्यंत हा अभंग गात बसला होता. बाळाचे रडणे ऐकू आले व अभंग पुरा करीत त्याने देवाला साष्टांग नमस्कार घातला.

डोळयातल्या पाण्याने जमीन भिजून गेली होती. देवानेच मुक्ती दिल्याचा आनंद पूर्ण छातीत भरला होता. वंशाला दिवा मिळाला होता.

जेंव्हा त्याने बाळाला बघितले तेव्हा त्याचा आनंद गगनांत मावेना. गुटगुटीत गव्हाळ रंगाचा बाळ आपल्या नाजूक इवल्या डोळयानी त्याच्याकडे एकटक पहात होतं. हरखून जाऊन त्याने अभंग सुरू केला.

फिराविली दोन्ही कन्या आणि चक्रपाणी।
जाला आनंदे आनंद अवतरले गोविंद ॥
तुटली बंधने वसुदेव देवकीची दरशने।
जाला आनंदे आनंद अवतरले गोविंद ॥
गोकुळासी आले ब्रम्ह अव्यक्त चांगले।
जाला आनंदे आनंद अवतरले गोविंद ॥
नंद दसवंती धन्य देखिले श्रीपती।
जाला आनंदे आनंद अवतरले गोविंद ॥
निशी जन्मकाळ आले अष्टमी गोपाळ।

जाला आनंदे आनंद अवतरले गोविंद ॥
आनंदली मही भार गेला सकळ ही ।
जाला आनंदे आनंद अवतरले गोविंद ॥
तुका म्हणे कंसा आट भोविला वळसा ।
जाला आनंदे आनंद अवतरले गोविंद ॥

(संत तुकयाचे अभंग मधून.)

अभंग ऐकताना बाळ हात पाय जोर जोरांत हलवू लागलं. श्वास घ्यायला तुका थांबला की तेही थांबे. सगळे हे नवल बघून थक्क झाले.

"देवान् अजोड प्रसाद दिलाय" असे म्हणत सुईण बाई घरी निघाल्या.

दिस मास जात होते. बाळ बाळसं घरून पौर्णिमेच्या चंद्रागत होत चालला होता. त्याचे अभंग अजून वाढले होते. अभंग बाळालाही आवडत म्हणून तो घरी असला की गातच बसे.

एक दिवशी गांवचा पोलीस पाटील कोणालातरी घेवून आला. म्हणाला "हे ग्रामसेवक इथे मुल जन्माला आलंय समजलं. नोंदणी करायला आलोय. मुलाची जन्माची नोंदणी करायची असते."

"ती कशाला " तो विचारू लागला.

"अहो असं कय करताय! उद्या मोठा होईल. शाळेत घालताना जन्माचा दाखला लागेल तेव्हा काय कराल? आता नोंदणी केलीत तर त्यावेळी ग्राम सेवक देईल की दाखला. जन्मभर लागतो तो सरकार दरबारी." पाटील सांगत होता.

"किती पैसे लागतात? माझ्याकडे पैसेच नाहीत" शेतकरी.

"कोण मागतोय पैसा तुमच्याकडे. अहो हे सरकारी काम. फुकटांत होतं." पाटील

"अस होय मग करा की काय ते." शेतकरी.

"जन्म कोणत्या दिवशी झाला? मुलाचे नांव, आईचे नांव, बापाचे नांव वगैरे सांगा. मी भरतो फॉर्म" ग्रामसेवक सांगत होता.

"बघा, दोन महिने झाले. गुरुवार होता, म्हणजे तारीख बघा तुम्ही काय येईल ती. बाळाचं नांव ठेवलय सिद्धेश्वर. आईचं नांव सगुणा, माझं नांव तुका म्हणजे तुकाराम. झालं?" शेतकरी तुकाराम एका दमांत सगळे सांगत गेला. ग्राम सेवकाने मग कॅलेंडर वरून दोन महिन्या पूर्वीच्या गुरुवारची तारीख बघितली. फॉर्म भरू लागला. मधेच विचारू लागला "आडनांव काय?"

"आडनांव? ते काय? कधी कोणी विचालंच नाही. बापानी कधी सांगीतलंच नाही." तुकाराम

"तेली तांबोळी आहेत ते. लावा तेली नाहीतर तांबोळी. काय फरक पडतो." पाटील बोलला.

फॉर्म भरून झाला. तुकारामाच्या डाव्या हाताचा आंगठा उमटवून झाला व ग्रामसेवक म्हणाला “दहा दिवसानी चावडीवरून दाखला घेवून जा.”

“तो कशाला?” तुकाराम

“अहो कायम जरूर पडणार त्याची. रेशन कार्डावर नांव वाढवायला, शाळेत नांव घालायला. आणि हे बघा मुलाला शाळेत घाला. आपलं सरकार आहे आता. कायदा आहे सर्वांना शाळेत घालायचा” ग्रामसेवक.

“हो! हो! घालणारच शाळेत. शिकवणार त्याला” तुकाराम. तेवढ्यांत सिद्धू रडू लागला. कधी न रडणारा रडताना ऐकून तुकाराम कळवळला. लगबगीने घरांत शिरला. पाटील व ग्राम सेवकानी  आपले दफ्तर उचलून मार्ग पकडला. त्यानी घराचे फाटक ओलांडले व सिद्धू रडायचा थांबला. परत नेहमी सारखा इकडे तिकडे टक लावून पाहू लागला. तुकारामाचा जीव भांड्यात पडला. सगुणाने पदराने डोळे पुसले. व परत घर थाऱ्यावर आले.

सिद्धू कां रडला कुणालाच समजले नाही.

दिवसा मागून दिवस जात होते. तुकाराम भजनांत रंगला होता. आणि अहो आश्चर्य सिद्धू तो त्याच तालांत गाऊ लागला. नुकताच बोलू चालू लागलेला सिद्धू बापाच्या तोंडून फक्त एकदाच ऐकलेला अभंग जशाच्या तसा गात होता. तुकाराम आ वासून बघत होता. तल्लीन झालेल्या सिद्धूने शेवटची ओळ म्हटली,

“सगुणे! सगुणे! पोराची नजर उतरव. काय करू? अग देवानं, पांडुरंगानं कसला प्रसाद दिला बघ. अग पुरा अभंग म्हणतो सिद्धू.” तुकाराम उतावळेपणाने  आपला आनंद दाखवत नाचत होता. सगुणेने सिद्धूला सांगताच त्याने परत सबंध अभंग म्हटला. सगुणेच्या डोळ्यातून पाण्याच्या धारा लागल्या. सिद्धूला कुठे ठेवू कुठे नको असं होवून गेले. तुकारामाने पांडुरंगापुढे लोटांगण घातले.

आनंदाची वर्षे भरभर चालली होती. सिद्धू सगळं काही पाहून ऐकूनच शिकत होता. आई बापाना काहीच करावे लागत नव्हते. तो एकपाठी होता. आतापर्यंत ऐकलेले सारे अभंग पाठ होते. गळा तर अतिशय गोड. गाताना वाटे कोणी गंधर्वच गातोय.

सहावे वर्ष लागले व ग्राम सेवक हजर झाला मुलाला शाळेत घालायची आठवण करायला आला होता. सिद्धू एकपाठी आहे हे त्याला समजले होते. शाळेत गेला तर नांव काढेल म्हणाला.

तुकाराम त्याला घेवून शाळेत गेला.

नांव घालताना हेडमास्तरनी विचारले “मुलाचे नांव?”

“सिद्धू.”  तुकाराम.

“पूर्ण नांव सांगा. जन्म दाखला आणला आहे?” हेडमास्तर

“याचं नांव सिद्धेश्वर आणि माझं तुकाराम आणि याच्या आईचं सगुणा.”  तुकाराम

"अहो आईचं नांव काय करायचंय. आडनांव सांगा." हेडमास्तर

"हा दाखला बघा. त्यांत आहे." तुकाराम

"अहो यांत तर तेली व तांबोळी दोन्ही लिहीलंय. काय लिहू तेली की तांबोळी?" हेडमास्तर

तुकाराम आता अडचणीत सांपडला. आयुष्यभर कधी आडनांवाची गरजच न पडलेला माणूस तो. खरोखर आपल्याला आडनांव असतं हे माहितही नसलेला. नाहीतरी हे नांव त्याला पोलीस पाटलानीच दिलं होतं. बोलून गेला "तुम्हाला बरं वाटेल ते लावा."

मास्तरनी लिहीले "सिद्धेश्वर तुकाराम तेली."

सिद्धूला एकदम वाटले काहीतरी चुकतेय तो बोलून गेला "दोन्ही लिहीली तर तेली तांबोळी जशी दाखल्यात आहेत तशीच?"

"अरे वा! शाळेत यायच्या अगोदरच मास्तरला शिकवायला लागलास कां?" हेडमास्तर

"जाऊ द्या मास्तर, पोर आहे अजून. त्याला काय माहीत." तुकाराम बोलत होता.

सिद्धूला मात्र राहून राहून वाटत होतं काय तरी घोळ होणार. दोन्ही नांवे लिहीली पाहिजे होती.

.........

सिद्धूची शाळा सुरू झाली आणि त्याच्या मास्तराना एकावर एक धक्के बसू लागले. श्री पासून सुरू केलेली बाराखडी सिद्धू दोन दिवसातच एकही चूक न करता लिहू लागला. बाकीची मुले श्री व क वरच अडकून होती. मास्तरनी कविता म्हटली की लगेच सिद्धू म्हणू लागला. मास्तरनी हेरले हे पाणी वेगळेच आहे. हा फार हुशार आहे. मग त्यानी त्याला पुढचे धडे भराभर शिकवायचा सपाटा लावला.

कविता, गणित, बालवाचन हे त्याने दोन महिन्यांत पुरे केले. मास्तर त्याला घेवून हेडमास्तरकडे गेले. म्हणाले "या मुलाने पहिलीचा अभ्यास दोन महिन्यांत पुरा केला. सगळे कसे पाठ केल्यासारखे बोलतो. गणिते तर पटपट सोडवतो. याला पुढचे शिकवावे असे वाटते."

"अहो घरी करून घेतले असेल आई बापानी. एकदम पुढे नेऊ नका. मग मागे पडेल" हेडमास्तर .

पण मास्तरनी वेगळेच ठरवले. सिद्धूला घरी बोलावून शिकवू लागले. हे हाडाचे मास्तर होते. त्यांच्या हाती एक अप्रतीम शिष्य मिळाला होता. सिद्धू वर्गात पहिलाच येई. मोत्या सारखे अक्षर, नीट सरळ रेषेतले लिखाण पाहून त्याचे लिहीणे कोणीही पूर्ण वांचायच्या मोहात पडायचा. परीक्षेत नेहमी पहिला यायला लागला. भरभर परीक्षा देत गेला. चौदाव्या वर्षीच एस्. एस्. सी पास केली. ती देखील वरच्या मार्कानी. खूप वाहवा झाली. तरी देखील सिद्धू आपल्याच विश्वात असे. भजनांत खूप रस.

कॉलेजला गेला. प्रवेश मिळवताना नांव लिहीले सिद्धेश्वर तुकाराम तेली- तांबोळी. तिथल्या माणसाने ओरडून विचारले "एकच नांव नाही लिहीता येत? तुमच्या स्कूल लीवींग मधे फक्त तेलीच आहे तेवढेच लिहा." असे म्हणत त्याने फॉर्म परत दिला.

"हा पहा माझा जन्म दाखला. त्यांत तेली- तांबोळी असेच आहे. केंव्हातरी चूक दुरुस्त नको कां व्हायला?" सिद्धू

"अहो आम्ही इथे चुका दुरुस्त करीत नाही, ऍडमिशन देतो. स्कूल लीवींग मधे जे नांव असेल तेच चालणार." तो माणूस

सिद्धूने नाव बरोबर केले व ऍडमिशन घेतली मनांत मात्र हुरहुर लागली. काहीतरी चुकतेय. पण काय ते समजत नव्हते.

कॉलेज सुरू झाले. मित्र मिळाले. त्यांच्या आग्रहाने सिनेमा पहायला गेला. आणि फार विषण्ण झाला. ती गाणी, ती पळापळ, तो उघडा नागडा नाच ,ती मारामारी सिद्धूला दुःखी करून गेली. हे सगळं पहाता नये. फार विचित्र आहे. "हे असले सिनेमे कां काढतात हे लोक?" हा विचार सतवत राहिला. त्याने सिनेमाला जायचे थांबवले. मित्रानी टवाळी केली, चिडवले तर सिद्धूवर परिणाम उलटाच झाला. मित्रानाच तो समजावू लागला.

"पहा आपण विद्यार्थी आहोत. हे असले सिनेमे आपले मन कलुषित, विचलित करतात. आपण मारामारी वगैरे करण्यास उद्युक्त होतो. हे बरे नाही."

मित्रानी हंसून टवाळी केली.

सिद्धू एकपाठी त्यामुळे प्रत्येक परीक्षेत पहिला येत गेला. प्रोफेसरांचा लाडका झाला. हुशारीमुळे अभ्यास करणारे मित्रही मिळाले. सिद्धूला नवी क्षितिजे दिसू लागली. त्याने शिक्षण पुरे झाले की आय. ए. एस् ला जायचे ठरवले. व तो झालाही.

सिलेक्शनचा फॉर्म भरताना तिथल्या अधिकाऱ्याना सिद्धू म्हणाला "सर! माझ्या नांवात एक चूक पहिल्यापासून झालेली आहे. माझे सरनेम फक्त तेली लागले आहे. पण जन्म दाखल्यात ते तेली-तांबोळी असे आहे. आत्ता ते कसे सुधारता येईल?"

"आता जे चालते आहे तेच लिहा. तेवढेच लिहिलेत तर जात वगैरे बदलते कां?" साहेब

"जात नाही बदलत, पण सर नंतर प्रॉब्लेम नाही ना व्हायचा?" सिद्धू.

"अहो तुम्ही आय् ए एस् झालात. एक छोटासा मार्ग आहे. या फॉर्म बरोबर इतर सर्टीफिकेट बरोबर जन्म दाखला पण लावा. म्हणजे तुम्ही काही दडवलेत किंवा बदललेत असे होणार नाही." साहेब

सिद्धूने तसेच केले. यावेळी मनाला बरे वाटले. पण एक शिकायला मिळाले. काम छोट्याश्या गोष्टीनेही सुलभ कसे करता येते.

तो गांवी वडिलाना भेटायला आला. पाटील व ग्रामसेवक धांवत भेटायला आले.

“आपण आता कलेक्टर व्हाल. आमच्यावर लोभ ठेवा सिद्धेश्वर.” पाटील मान देत बोलले.

“नमस्कार करतो साहेब.” असे म्हणत ग्रामसेवकाने साष्टांग नमस्कार घातला.

हे सगळे पहाणाऱ्या तुकराम व सगुणेला वाटले, आपला मुलगा एकदम केवढा मोठा झाला. तो काय बनला हे तुकारामाला समजले देखील नाही. एवढेच समजले की सिद्धूला विठ्ठलाने फार मोठा माणूस बनवला. त्याला खूप अधिकार मिळणार. तो लोकांचे भले करणार. म्हणजेच त्यांचे दुवे त्याला मिळणार. तो फार पुण्यवान होणार. देवाची केवढी कृपा की त्याने असा पुण्यवान मुलगा आपल्या पोटी जन्माला घातला.

...........

सिद्धू आता फार लांब गेला होता. वेगळ्याच प्रदेशांत, वेगळ्याच भाषेच्या प्रांतात. पण सिद्धू मनापासून काम करी. लोकाना भेटे. त्यांच्या अडचणी समजून घेई. कामांचा निकाल लवकर करे. लोक खूष होऊ लागले. सिद्धूचे रेकॉर्ड चमकदार बनू लागले. पण सिद्धूला परत हुरहुर लागू लागली. या कामांमुळे, लोकांच्या प्रेमामुळे काहीतरी होईल. अरे आपण तर चांगले काम करतोय मग ही हुरहुर कां? त्याला समजेना.

त्या आटपाट नगरांत (नव्हे राष्ट्रांत) इलेक्शन जाहीर झाले. सिद्धूकडे त्याच्या जिल्ह्याचा पूर्ण भार आला. चोख व्यवस्था चालली होती. इलेक्शन चार दिवसांवर आले. त्या दिवशी संध्याकाळी चारपांच लोक त्याच्या घरी आले. एक तर उभे राहीलेले उमेदवारच होते.

“काय व्यवस्था बरोबर झालीय ना? आम्हीच परत निवडून येणार. आमचे लोक आम्हाला मत देणाऱ्याना गाड्यानी घेऊन येतील. अपोझीशन जोर करत आहेत. पण ते काही जिंकणार नाहीत. आम्हीच त्यांना जिंकू देणार नाही. बुथ आमच्या ताब्यांत असतील. तुम्ही फक्त काणाडोळा करा. आम्ही तुमचे आउट ऑफ टर्न प्रमोशन करू.” ते उमेदवार बोलत होते.

सिद्धूला काय होणार याची पूर्ण कल्पना आली. त्याने पोलीस प्रमुखाना बोलावून घेतले. पोलीस बंदोबस्त व्यवस्थित करायची ऑर्डर दिली.

“अहो पण हे रुलींग पार्टीचे उमेदवार फार ताकदवान आहेत. ते दरवेळी असेच निवडून येतात. त्यांना विरोध केलात तर तुम्हाला त्रास होईल.” पोलीस प्रमुख बोलले.

“हे सरकारी काम आहे. स्वच्छ काम करण्याचा माझा निर्धार आहे. एकही बूथवर गोंधळ गडबड होता नये. परिणाम मी भोगायला तयार आहे. प्रसंगी गोंधळ करणाऱ्यास अटक करायला मागेपुढे पाहू नका. असल्या गुंडानी आपल्यावर राज्य केलेले कसे चालेल?” सिद्धू

पोलीस प्रमुख निघून गेले. सिद्धू विचारात पडला. आपली लोकशाही अशी आहे? गुंड राज्य करतात? लोक सहन करतात? अशी कशी सिस्टम तयार झाली? एवढ्यात एक

मनात शंका आली. आपल्याला काय करू शकतील हे लोक? मग सिद्धूने ठरवले. जे सरळ कायदेशीर आहे, तेच होईल हे पहायचे.

पुढचे दोन दिवस सिद्धू सर्वांना निवडणुकीच्या बाबतीत कोणताही गोंधळ चालणार नाही ही सूचना देत होता. त्याचा एकंदर आविर्भाव पाहून सगळे अधिकारी समजून गेले की या वेळी निवडणूक खरोखरची निवडणूक असणार.

निवडणुकीच्या दिवशी दंगा करणाऱ्याना चांगलाच दणका बसला. चोख व्यवस्थेमुळे सर्व निवडणूक व्यवस्थित पार पडली. पहिले गुंड आमदार सपशेल पडले. लोकानी सिद्धूचा उदो उदो करायला सुरवात केली. थोड्याच दिवसात सिद्धूला बदली झाल्याची ऑर्डर हातात पडली. हरलेले उमेदवार मुद्दाम भेटायला आले म्हणाले,

"नवे अहात, म्हणून बदलीवर सोडले. समजा काम कसं करायचं ते. जिथे जाल तिथे समजून काम करा. राजकारण्यांशी पंगा नाय घ्यायचा. एकमेकाना मदत करायची. मग लवकर बढती मिळत जाईल. नायतर कचऱ्यात फेकले जाल."

सिद्धू विचारात पडला. सरळ, कायदेशीर काम केले तर हे परिणाम, राजकारण्यांशी हातमिळवणी केली तर ती लोकांशी प्रतारणा. मनाला न पटणारे काम करून समाधान नाही मिळायचे. मग त्याला एकदम भास झाला. आपण खूप ठिकाणी फिरणार आहोत. लोकांची कामे करणार आहोत. लोकांचे प्रेम मिळवणार आहोत. त्याला शांत वाटले. त्याने नव्या जागी जायची तयारी सुरू केली.

नवी जागा तर एकदम जंगलातला जिल्हा. सरकारी कामे, वाटप, रस्ते सगळाच कारभार कागदावर होई. प्रत्यक्षात काहीच नाही. सरकारी पैसे राजकारण्यांचे पित्ते लुबाडत. अशिक्षित लोकाना आपल्या अधिकाराची जाणीव पण नव्हती. त्यांना एकत्र करून भडकवणारे पण होते. जंगलात शस्त्रे लपवून सरकारी लोकांवर हल्ले होत. नाडलेले लोक त्यांना साथ देत. परिस्थिती फारच कठीण होती.

सिद्धू कामाला लागला. रेशन, केरोसीन वितरण पहिले हाती घेतले. गरीबापर्यंत पोहोचेल याची काळजी घेतली. रस्ते बांधकामे व्यवस्थित होऊ लागली. पैसे लुबाडणाऱ्याना कंत्राटे देणे बंद केले. त्यामुळे नाराज झालेल्यानी सिद्धू बद्दल तक्रार करीत मंत्र्यांचे पाय धरले. कधीच न येणारे मंत्री जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले. मोठ्या मोठ्या शहरात फिरले. खेड्यांकडे फिरकले देखील नाहीत. सिद्धूला तंबी वजा उपदेश करीत म्हणाले, "फार तक्रारी आहेत तुमच्या बद्दल. लोकाना दुखवू नका. ही लोकशाही आहे. त्यांच्यासाठी काम व्हायला पाहिजे. नाहीतर आपली बदली करावी लागेल."

सिद्धूचे विचारचक्र चालू झाले. ही यांची लोकशाही. फक्त यांच्याच लोकांसाठी राबवलेली. नाव गरीबांचे पण त्यांचे रेशन, पैसे लुटणार यांचे लोक. काही नाही आपण आपले काम चालूच ठेवायचे. मनाला पटणार नाही ते कधीच करायचे नाही.

कशी कोण जाणे पण मंत्र्यांची धमकी लोकाना समजली. मंत्री परत जाणार, कसे जाणार याची माहिती त्यानी मिळवली व मंत्र्यांच्या गाडीवर गोळीबार झाला. गाड्या परत फिरल्या. कलेक्टरला, पोलीस प्रमुखाना बोलाण्यांत आले. हा हल्ला का झाला त्याची चौकशी करण्याचा आदेश दिला गेला. बंदोबस्त वाढवून देखील मंत्री गाडीने जाण्यास तयार नव्हते. त्यांची घाबरून दयनीय अवस्था झाली होती. हेलीकॉप्टर मागवण्याचा हट्ट धरून बसले. सिद्धू कधी ऑफिसमधे मंत्र्यांकडे तर कधी लोकाना समजावण्यासाठी जंगलात असे फिरत होता. हेलिकॉप्टर दोन दिवस तरी मिळणार नाही याची खात्री पटल्यावर सिद्धू सोबत मंत्र्यांची वरात निघाली. रस्ता बदलला. जंगल सुरू झाले व दोन्ही बाजूला गरीब आदीवासी उभे दिसले. सिद्धूला ते अभिवादन करीत होते. कधी नव्हे ते या कलेक्टरच्या राज्यांत त्यांना रेशन मिळू लागले होते. मंत्री घाबरून गेले होते. त्यांच्या गाडीच्या दोन्ही बाजूला पोलीसांच्या गाड्या होत्या तरीही त्यांना भीतीच वाटत होती.

सिद्धू मात्र शांत दिसत होता. अभिवादन स्वीकारीत होता.

मंत्री गेले. सिद्धू घरी आला. बॅग भरू लागला. केंव्हाही बदलीची ऑर्डर येणार हे निश्चित असेच मन सांगत होते. झालेही तसेच. मंत्र्यानी रिपोर्ट दिला, "लोकाना सरकार विरुद्द भडकवणाऱ्यांशी कलेक्टर सामील दिसतात. बदली करणे योग्य वाटते."

मंत्र्यांची इच्छा ताबडतोप अंमलात आली. लोकेच्छा काय हे लोकशाहीत बघितले तर राज्य चालेल कसे? या विचाराची राज्य व्यवस्था, त्यांत लोकेच्छेला स्थान नव्हते. सिद्धू तयार असलेले चंबू गवाळे उचलून निघाले.

नवे गांव, नवे लोक, नव्या समस्या फक्त बदलत नव्हती ती एकच गोष्ट. राजकारणी. या राजकारणी मंत्र्याना सिद्धूने लोकांसाठी काम करणे पसंत नव्हते. प्रत्येक जिल्ह्याला एक पालक मंत्री असे व तो आपल्या खास लोकांसाठीच काम करायला सांगे. तेही सरकारी पैसे लाटण्याचे काम. ही लूटमार उघड्या डोळ्यानी पहाणे सिद्धूला शक्य नसे. तो काम कायदेशीरपणे करी. पण मंत्री नाराज होत. सिद्धूची बदली मग ठरलेली. काही वर्षांत चौदा जिल्हे फिरून झाल्यावर सिद्धूचे काय करायचे हा मोठा प्रश्न सरकार समोर उभा राहीला. सिद्धूची बदली आपल्या जिल्ह्यांत होणार नाही यासाठी सर्व पालकमंत्री दक्ष असत.

सर्वांना एक गहन कोडे पडे. गांवातून आलेला, अतिशय गरीब घरचा सिद्धू पैशाच्या मोहांत का नव्हता पडत. इतर सरकारी अधिकारी कोणत्याही मंत्र्याच्या एका कटाक्षाला आसुसलेले असत. हा मंत्री चालून समोर आले तरी भीक घालीत नसे. एका सहाध्यायी अधिकाऱ्यांनी जेव्हा विचारले तेव्हा म्हणाला "आपण शपथ घेतली ती विसरला काय? पैसे अयोग्य मार्गाने कमवणे व दरोडेखोरां बरोबर सामील होणे यांत फरक काय? माझ्याच लोकांना लुटायचे? गरीबी मी देखील पाहिली आहे. ती कां आहे हे या लोकांना पाहिल्यावर समजते. फक्त पांच वर्षे पैसे खाणं बंद करा. इमानदारीने राज्य चालवा. पहा देश पांच वर्षांत कुठे पोहोचेल."

सिद्धू जरी बदल्या मिळवत होता, तरी त्याचे रेकॉर्ड स्वच्छ होते. कोणताही दोष त्याला मिळत नसे. मग कठोर काय पण हळवी शिक्षा देखील द्यायला कुणी धजत नसत. मग एकच शिक्षा उरे. बदली करीत रहा. पण आता मंत्र्यांच्या विरोधामुळे तेही शक्य नव्हते. शेवटी सिद्धूला राजधानीतच एका नगण्य खात्यांत ठेवायचे ठरले. तशी त्याची बदली झाली.

काम करायचे तर कुठेही संधी आहेच. स्टॅटीस्टीकल डिपार्टमेंट मधे सिद्धू रुजू झाला. या ठिकाणी सर्वच आराम करीत. काम नसेच. काळया पाण्याच्या शिक्षेसारखी शिक्षा म्हणजे हे ऑफिस. पण सिद्धू गप्प थोडाच बसणार. ह्या डिपार्टमेंट मधे काय होते समजण्या पेक्षा काय केले पाहिजे हे समजायला त्याने सुरवात केली. त्याला धक्काच बसला. इथल्या लोकानी सरकारी कामकाजाचे नियोजन काय होते व खरोखर प्रगती काय झाली. याचे देखील रिपोर्ट सरकारला द्यायचे होते. कोणत्याही मंत्र्याला नको असलेले हे रिपोर्ट. मग ते बनतच नसत. याने फाईली उसकटून गेल्या अनेक वर्षातल्या नियोजनाची माहिती विषयवार वेगळी करायला सुरवात केली. फाईली बनत चालल्या. खाद्य वितरण योजना, मध्यान्न भोजन योजना, सिंचन योजना, दळणवळण योजना अशा कित्येक सुंदर योजना त्याने वाचल्या. मग विचार करू लागला एवढ्या सुंदर योजना पुऱ्या झाल्या असतील? व्यवस्थित चालत असतील. त्यांने त्याच्या वरच्या अधिकाऱ्याना विचारले “या एवढ्या योजना कशा चालल्यात त्याची माहिती कोणत्या जागी आहे? मला मिळालीच नाही.”

“अहो कशाला नको त्यात पडता, आरामाचे काम आहे, आराम करा. आपल्या वाट्याला कोणीही जात नाही. कशाला करता हे?” साहेब

“सर मला हे माझ्याच माहितीसाठी पाहिजे. नियोजन काय, ते कसे पुरे झाले, त्याचा सामाजिक फायदा काय झाला हे नको का तोलून पहायला? मला हे करायला आवडेल. मी सर्व ठिकाणी जाऊन माहिती गोळा करायला तयार आहे. तुम्ही तशी ऑर्डर काढा.” सिद्धू

साहेबाने विचार केला. निरनीराळ्या ठिकाणी जाऊन माहिती गोळा करण्यासाठी खूप पैसे अंदाजपत्रकातून प्रवासभत्त्या साठी मिळतात. पण दर वर्षी अंदाजे ५० टक्के पैसे परत जातात. कारण कोणी जाण्यास तयारच नसतो. हा वेडा करणार असेल तर करू दे. तेवढेच बजेट वापरले जाईल.

आणि सिद्धू कामाला लागला. दौरे सुरू झाले. माहिती अगदी सरकारी कागदांसकट तयार होऊ लागली. एका ठिकाणी भेट दिली की सगळ्याच योजनांची माहिती गोळा करायचा. दोन वर्षांत त्याने सर्व माहिती गोळा केली. त्याला धक्का बसला. प्रत्येक योजनेत त्या त्या वेळच्या मंत्र्याने आपली पोतडी भरून घेतली होती. राहिलेल्या पैशातून अधिकारी आपली पोतडी भरत होते. स्टॅटीस्टीकल टक्केवारी सिद्धूने काढली. मंत्री ४० टक्के, अधिकारी २०टक्के, खालील कारकून प्यून वगैरे ५ टक्के कंत्राटदार १५ टक्के मग कामासाठी खर्च फक्त २० टक्के. सर्वांत जास्त गडबड सिंचन योजना व मध्यान्न भोजन योजनेत होती. या बरोबरच सिद्धू प्रमाण म्हणून त्या त्या ठिकाणी जमवलेले पुरावेही जोडत

होता. काम अत्यंत चोख होत होते. दुसऱ्या कोणालाही रस नव्हता म्हणून याच्या फाईली कोणी वाचीतही नव्हते.

परत सिद्धूला भास झाला. त्याच्या हातून एक बाँब तयार झालाय, टिकटिकतो आहे. ज्या दिवशी फुटेल त्या दिवशी सगळे सरकार हादरेल.

त्याला भास होत होता गांवी चाललोत. सरकारी नोकरी गेलीय. कोर्ट कचेऱ्यांत बोलवून जबान्या होत आहेत. जीवे मारण्याच्या धमक्या मिळत आहेत. उपाय म्हणून सिद्धू आता ऑफिसमधे अभंग म्हणू लागला.

रिटायर व्हायला दोन वर्षेच आहेत. देशाशी इमान राखण्याची घेतलेली शपथ आठवली की सिद्धूला प्रश्न पडतोय. आपण केले ते बरोबर की चूक? ते जर बरोबर तर एवढे सगळे लोक करतात ते चूक कसे? भजन करून देखील मन उत्तर देत नाही. आत्ता पर्यंत असे कधीच झाले नव्हते. मनाने काय चूक काय बरोबर ते क्षणात सांगीतले होते. म्हणूनच सिद्धू काम न करता आराम करू लागला होता, अभंग म्हणू लागला होता.

थोड्याच दिवसांत एक सारंग नावाचा नवा अधिकारी डिपार्टमेंट मधे आला. साहेब म्हणाले "काय कोणत्या मंत्र्याशी टक्कर खेळलात?"

"सगळयाच." सारंग रुबाबात बोलून गेला.

"हो! मग ते बघा सिद्धेश्वर, तुमचे सिनीयर." साहेबानी सांगताच तो सिद्धूकडे आला, बोलला. पुढच्या काही दिवसांत तो काम शोधू लागला.

........

........

रात्र नुकतीच होत होती. सिद्धूने टीव्हीवर बातम्या लावल्या. आणि उडालाच कोटी कोटी रुपयांची कौभांड बातम्यात उलगडत होती. त्याच्या फाईल मधले पुरावे दाखवले जात होते. बाँब स्फोट झाला होता. सरकारी पक्षाचे लोक समर्थन करण्याचा प्रयत्न करीत होते. विरोधी पक्षाचे जोरांत हल्ला चढवत होते. दोघेही सारखेच चोर आहेत हे सिद्धूला माहीत होते.

.......

या अशा फाईल कोणी तयार केल्या याची चौकशी सुरू झाली. कोणत्याही मंत्रालयाने ही माहिती मागतली नव्हती तरी फाईल कशा व कुठून आल्या?

सिद्धूचे अभंग म्हणणे अविरत झाले. तो उठला व साहेबाकडे जाऊन बोलला साहेब ही सगळी माहिती माझ्या फाईल मधे होती. पण ती बाहेर कशी गेली खरोखरच मला माहीत नाही. सर्व फाईल्स तर इथेच आहेत.

साहेब हादरला म्हणाला "सिद्धेश्वर वाट लावलीत तुम्ही. दोन महिन्यांत रिटायर होणार होतो. आता सगळे उलटेच होणार. तुमचे पण व आमचे पण."

सिद्धूला संशय आला हे सारंगचेच काम असणार. तो त्याला म्हणाला "साहेब म्हणतात ते व मी गोत्यात येणार. हे तुम्हीच केलेत ना?"

"एवढा वेळ लागला तुम्हाला समजायला? अहो एवढे सुंदर काम करून काय फाईल मधे ठेवायचे. शपथ आठवा. लोकांसाठी काम करायचेय आपण. या भुक्कड मंत्र्यांसाठी नाही. काही काळजी करू नका. तुम्हाला काही होणार नाही. काही झालेच तर सगळी आय ए एस् ची लॉबी उभी करणार मी तुमच्या पाठीशी. कसला गुन्हा केलाय तुम्ही? अहो एवढ्या सुंदर कामासाठी गौरव व्हायला पाहिजे तुमचा. दुसऱ्या देशात झाला असता. या देशात नाही झाला तरी लोक बघा तुम्हाला डोक्यावर घेतात की नाही. काही घाबरू नका. काय होतेय ते मला सांगत चला. मी यांना पुरून उरणार आहे." सारंग

सिद्धू शांत झाला. साहेबाने स्वतःची कातडी वाचवायसाठी चुगली केली. या फाईल्स सिद्धेश्वर ने तयार केल्यात. चार तासांत सगळ्या मंत्र्याना माहिती मिळाली. पण करणार काय? सगळी माहिती पुराव्या सकट बाहेर आली होती.

मुख्यमंत्र्यानी सिद्धूला बोलावले. म्हणाले "तुम्हाला असले काम आवडत होते तर सांगायचे ना आम्हाला हे न मागीतलेले काम कुठे करत बसलात तुम्ही. तुम्हाला याची परवानगी कोणी दिली?"

"मी साहेबांच्या परवानगीनेच हे काम केलेय. तसे त्यांचे पत्र आहे माझ्याकडे." सिद्धू

"अहो यामुळे राज्यांत गोंधळ उडेल, अराजक माजेल त्याचे काय?" मुख्यमंत्री

"हे नियोजनाचे पैसे खाणे हे अराजक म्हणतात की सुराज्य हे मला समजत नाही आहे." सिद्धू

"तुम्ही इनक्वायरीला तयार रहा. पाहून घेईन तुम्हाला. चालते व्हा." मुख्यमंत्री.

सिद्धू आपल्या जागी पोचला. सारंग धांवतच आला. सर्व ऐकून म्हणाला "आजच्या बातम्या ऐक व उद्या दांडी मार"

"कां रे बाबा." सिद्धू

"मी सांगतोना तसे कर. मी तुला वाचवतो की नाही ते बघ."

सिद्धू बातम्या ऐकत होता. बातमी देणारा आता सनसनाटी बातमी सांगणार होता. त्याने सुरवात केली.

"आपल्या मुख्यमंत्र्यानी आपल्याच अधिकाऱ्याला धमकावले. ही माहिती गोळाच कां केली हे विचारून चौकशी बसवण्याची धमकी दिली. वर एखाद्या नोकरा सारखे चालते व्हा म्हणून सांगीतले. आपले राजकारणी सत्तेसाठी कोणत्या थराला जातात ते पहा."

दारावर बेल वाजली. सिद्धूने दार ऊघडले, तो सहा सात लोक आंत घुसलेच. माईक, कॅमेरे व इतर सामान घेवून त्यानी बाहेरच्या खोलीचा कब्जा घेतला. प्लग मधे वायरी बसवत गेले.

टीव्हीवर बातम्या चालूच होत्या. त्या माणसांत एक माईक पकडून असलेल्या मुलीनी फोन लावला. म्हणाली “वुई आर रेडी ”

दुसऱ्या क्षणी टीव्हीवर बातमी देणारा सांगू लागला “आज आम्ही आपल्याला ही माहिती गोळा करणाऱ्या माणसाची मुलाखत तीही लाईव दाखवणार आहोत.”

“रेखा माझा आवाज येतोय? मुलाखत चालू कर”

“हो. हे आहेत सिद्धेश्वर. एक अपराईट अधिकारी. सिद्धेश्वर आपण ही सरकारी योजनांची व त्यांची वाताहात करणाऱ्यांची माहिती गोळा केलीत?” रेखा नामक मुलगी

“हे पहा ही सरकारी माहिती आहे. वरीष्ठांच्या परवानगी शिवाय मी काहीच बोलू शकत नाही. आपण मला आगोदर सूचना देऊन आले नाहीत.” सिद्धू.

“हा पब्लीक इंटरेस्टचा, लोकांच्या विश्वासघाताचा प्रश्न आहे असे नाही कां वाटत आपल्याला?” रेखा

“हे जरी तुम्हाला वाटत असले तरी सरकारी माहिती मी बाहेर बोलू शकत नाही. मी कोणताही दुजोरा या बातमीला देत नाही हे लक्षात घ्या.” सिद्धू

“आज आपली मुख्यमंत्र्यांबरोबर भेट झाली?” रेखा

“आमच्या व मंत्र्याच्या भेटी कामानुसार वारंवार होतच असतात त्यात नवीन काय?” सिद्धू.

“पण आजची मिटींग ही माहिती तुम्ही गोळा केलीत या बाबत होती अशी आमची माहिती आहे. त्यांनी आपल्याला अपशब्द वापरल्याचेही समजले. चालते व्हा म्हणाले. खरे आहे ना?” रेखा

“वा! आमच्या दोघांच्या मिटींगची इतकी माहिती तुम्ही सांगताय मग माझ्या मुलाखतीची काय जरुरी? माझ्यापेक्षा काय घडले हे तुम्हालाच जास्त माहिती दिसते.” सिद्धू

“निशांत ही ईज टफ गाय. कनफर्म्स नथिंग.” रेखा.

मुलाखत संपली. सिद्धूला नवल वाटले आपल्यांत पूर्ण आय ए एस् केंव्हा घुसला हेच समजले नाही. काही नाकारले नाही कशाला होकारही नाही. पण हा सारंग फार पुढे चाललाय. त्याला थोडे आवरले पाहिजे. मिडियात जायची काय जरूर? हा नामानिराळा राहातोय. सिद्धू मात्र चक्रव्युहात सापडतोय.

दुसऱ्या दिवशी ऑफिसमधे पोचताच सारंग धांवतच आला. “काय मस्त उत्तरे दिलीस. हेच पाहिजे होते मला. कशातच ट्रान्सपरन्सी आणायला देत नाहीत हे मंत्री लोक. मलीदा जाईल ना यांचा.” सारंग पोट तिडकीने बोलत होता.

.........

सेक्रेटरी साहेब अचानक आले. बरोबर अंडरसेक्रेटरी पण लगबगीने येत होते. ते केबीन मधे शिरतानाच जोरांत ओरडले “सिद्धेश्वरना बोलावले सांग रे.” प्यून सिद्धूकडे पाहू लागला.

सिद्धू नीमूटपणे केबीनकडे निघाला.

"या सिद्धेश्वर! या! आम्हाला काय कमी कामे आहेत ते हे तुम्ही अजून वाढवून ठेवताय? काय दुःख काय आहे तुमचं? कोणतं रिवॉर्डिंग पोस्टींग पाहिजे का? करतो तशी शिफारीश पण हे धंदे सोडा. खरतर आज तुमचा शेवटचा दिवस ठरला असता. पण काल टीव्हीवर काही बोलला नाहीत म्हणून वाचलात." सेक्रेटरी ताडताड बोलत होते.

"एवढी सरकार विरोधात डॉक्युमेंटस् का तयार केलीत? कोणी ऑर्डर केली?" सेक्रेटरी

"साहेब, त्यांना काम जास्त नव्हते. कधीही विधानसभेत प्रश्न विचारला तर माहिती असावी म्हणून मी संमत झालो त्यांच्या बरोबर. मीच ऑर्डर काढली पण कल्पना सिद्धेश्वरचीच." अंडरसेक्रेटरी बोलले.

"सिद्धेश्वर, दीडवर्ष आहे रिटायरमेंटला तुम्हाला. मंत्री साहेबांची इच्छा आहे तुम्ही तब्येतीचे कारण दाखवून अर्ली रिटायरमेंट घ्यावी. मग तुम्हाला कोणत्या तरी कार्पोरेशनवर अपॉईंट करू. मला वाटतं वाद वाढवण्यापेक्षा मंत्रीसाहेबांचे मानावे. सर्वांसाठी चांगले." सेक्रेटरी

"साहेब पण आपण मंत्र्यांसाठी काम करायचे की देशासाठी?" सिद्धेश्वर

"थांबवा! हे थांबवा. हा देश असाच चालणार आहे. तुमच्या एकट्याने काय होणार आहे. तुमचा विचार दिसत नाही. घ्या टक्कर साहेबांशी. अहो केंव्हा नाहीसे व्हाल या जगातून माहीत पण पडणार नाही. त्यांचे पित्ते तुम्हाला सोडणार नाहीत. माझे माना रिटायरमेंट घ्या." सेक्रेटरी

"साहेब समजावतो मी त्यांना." अंडरसेक्रेटरी.

"समजवा. उद्यापर्यंत मला कळवा. मग पुढचे काय करायचे ते ठरवू." सेक्रेटरी

मिटींग संपली. सारंग धांवत आला. "काय सिद्धेश्वर काय तंबी मिळाली?"

"बाबारे तुझ्याशी बोलताना विचार करायला लागेल. नाहीतर संध्याकाळी सनसनाटी बातमी देशील. आणि काय रे आपले सेक्रेटरी आय. ए. एस् चेच ना? मग त्यानी कॅडरला सपोर्ट करायचे  की मंत्र्याना?" सिद्धू.

"अरे हे लोक अगोदर मंत्र्यानाच सपोर्ट करतात. पुढे केस मोठी झाली तर कॅडरला. का तुझ्यावर काय ऍक्शन ठरवली? सस्पेंशन की फोर्सड् रिटायरमेंट की डिपार्टमेंटल ईनक्वायरी?" सारंग

"जाऊ दे रे. अजून काहीच नाही समजले. जे करतील ते पाहू मग. आपल्या साहेबांवर सोडलंय" सिद्धू.

"तुला सस्पेंड करणार. चौकशी होणार. मग हळवा आरोप सिद्ध करणार आणि रिटायर व्हायला लावणार. आपले साहेब सुवर्णमध्य शोधण्यांत पटाईत आहेत." सारंग.

आणि झालेही तसेच. चौकशीची नोटीस निघाली. सहा महिने चौकशी चालली. गृहमंत्रालयांत पांच महिने अडकली व सिद्धूने चार महिने अगोदरच नोकरीतून रिटायरमेंट

घेतली. सारंग मात्र कायम सिद्धूच्या संपर्कात राहू लागला. म्हणायचा "तुला माझी गरज लागणार. हे मंत्री म्हणजे सापाची जात. ते तुला सतवणार."

झालेही तसेच.

सिद्धूवर आरोप झाला. सिद्धूने खरे नांव सरकार पासून दडवले. तेली-तांबोळी ऐवजी फक्त तेली लावून सरकारची घोर फसवणूक केली. म्हणून सरकारने त्याची पेंशन, प्रॉव्हीडंड फंड द्यायचे नाकारले.

सारंगने सिद्धूच्या सह्या घेवून केस केली. हायकोर्टात निकाल सिद्धूच्या बाजूने लागला. सरकार सुप्रीम कोर्टात गेले आहे. सारंगला खात्री आहे निकाल सिद्धूच्याच बाजूने लागणार. त्याने सरकार विरोधात रान उठवले आहे. मिडियामधे दररोज नव्या नव्या फाईल उघडत आहेत.

सिद्धू गांवी पोचला आहे. भजने चालू आहेत. त्याला एक अतीव समाधान मिळाले आहे. हायकोर्टने निकालात म्हटले आहे. "त्याचे नांव, तेली काय किंवा तेली तांबोळी काय, याने सरकारची फसवणूक सिद्ध होत नाही. दोन्हीतील कोणतेही नांव वापरण्याचा अधिकार सिद्धेश्वर यांना होता व त्यानी तो शाळेपासून तो नोकरी पर्यंत वापरला. यांत कोणतीही फसवणूक नाही. की फसवणुकीचा मानसही नाही. त्यांनी नोकरी स्वीकारताना जन्मदाखला जोडला होता. त्यांचा कुठेच दोष आढळत नाही. सरकारचे काम फारच आंधळेपणाने चालते असेच दिसते."

नावावर शिक्कामोर्तब झाल्याने सिद्धू अतिशय आनंदला आहे.

प्रजा पुढे केंव्हातरी सुखी होईल अशी आशा करीत भजन करतो आहे. राष्ट्राच्या कल्याणासाठी. ...............

साठा उत्तराची ही कहाणी सुफळ(?) संपूर्ण.

*************